# ॥ श्रीज्ञानेश्वर ॥ आणि संत मंडळ

डॉ. हे. वि. इनामदार

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३३०३




REFBK-0026196

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
ा वर्गणी भरावी लागले.

1 NOV 1990

20 MAR 1

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

संदर्भ निबंध
३३९३
२६१९९
२८।५।९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
निबंध ३३९३
का. क्र. २६१९९
२८।५।९०

# श्रीज्ञानेश्वर आणि संतमंडळ

लेखक

**डॉ. हेमंत विष्णू इनामदार**

मराठीचे सुप्रतिष्ठ प्राध्यापक

श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

प्रस्तावना

**डॉ. यूसुफखान महंमदखान पठाण**

अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

त्रेसष्टावे अधिवेशन, पुणे.

RFFBK-0026196

उत्कर्ष प्रकाशन, पुणे

□ प्रकाशक
सौ. सविता सुधाकर जोशी
उत्कर्ष प्रकाशन
श्री रेणुका अपार्टमेंट्स
भांडारकर मार्ग
पुणे-४११ ००४

□ मुद्रक :
विजय कापरे
'अक्षरमुद्रा'
१३६० शुक्रवार पेठ
पुणे-४११ ००२

□ © डॉ सौ. अलका हेमंत इनामदार
भारतीनिवास कॉलनी,
६०/१५ एरंडवणे
पुणे-४११ ००४

□ मुखपृष्ठ :
डॉ. भय्यासाहेब ओंकार, पुणे
व
जाधव आर्टिस्ट, पुणे

□ प्रथमावृत्ती : एप्रिल १९९०

□ मूल्य : रुपये चाळीस फक्त

लक्षावधी अभ्यासकांच्या

आणि

उपासकांच्या अंत:करणांना

आत्मसुखाची

शीतल छाया देणाऱ्या

ग्रंथराज ज्ञानेश्वरीस

सादर समर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध 3323
दा. क. २९१९६
२८।५।८०

# अनुक्रमणिका

पृष्ठ

०० लेखक-परिचय ७

०० लेखकाची साहित्यसेवा ८

०० लेखकाचे मनोगत १०

०० प्रस्तावना-(डॉ. यू. म. पठाण) ११

**०१ संत नामदेवकृत ज्ञानेश्वर-चरित्र** १७

(नामदेव-गाथा । तीर्थावळीची रचना । श्रीज्ञानेश्वर – समाधि – महिमा । नामदेवांची 'आळ' । ज्ञानेश्वर महाराजांची 'आदि' । ज्ञानेश्वर महाराजांची 'समाधि' । अमोल ठेवा.)

**०२ श्रीज्ञानेश्वरांची ग्रंथसंपत्ती** २६

(ज्ञानेश्वरीचे उद्दिष्ट । रोचक विषयान्तरे । स्वतंत्र प्रज्ञा – प्रतिभा । नामदेवांचा निर्वाळा । शांकरमताचेच प्रतिपादन । कोऱ्या कागदाची आख्यायिका । सगुणाकडून निर्गुणाकडे । भक्तीचा रसाळ आविष्कार । ज्ञानदेवांची क्रीडासक्ती । त्रिवेणी संगम.)

**०३ श्रीज्ञानेश्वरांचे काव्यसौंदर्य** ३६

(काव्य आणि तत्त्वज्ञान । वाग्चातुर्यातून गीतादर्शन । अमृतानुभव । चांगदेव-पासष्टी । अभंगवाणी । 'ब्रह्मरस–सुस्वादें अक्षरें'.)

**०४ 'ज्ञानदेवें रचिला पाया'** ४१

(विषयाची व्याप्ती । तत्त्वज्ञानाची संकल्पना । धर्म व तत्त्वज्ञान । अध्यात्म-ज्ञानाचे अधिष्ठान । तीन मतांचे भक्तीत सामरस्य । चिद्विलासवादाची मांडणी । ज्ञानेश्वरांचा नीतिविचार । प्रेमभक्तीचे अपूर्वत्व । ज्ञानेश्वरांचे गीताप्रेम । गुरुभक्तीचे वस्तुपाठ । ज्ञानेश्वरीतील श्रोतृवंदन । समारोप.)

०५ संत नामदेव : व्यक्तित्व आणि कवित्व ५०

(जीवितरेखा । तीर्थयात्रा । काव्य-रचनेची ओळख । अभंगवाणीचे अमृत-माधुर्य । व्यक्तित्वाचे गवाक्ष । कार्यकर्तृत्व । समारोप.)

०६ ज्ञानदेव आणि नामदेव ६६

(व्यक्तित्वांचा वेध । काव्यसंपदांचे विशेष । विचारधनांतील एकरूपता । दोन संतांचे जीवित-कार्य । दोन आक्षेपांचा परामर्श । समारोप.)

०७ संत नामदेवांचे कुटुंबीय ८२

(पंधराजणांचे एकत्र कुटुंब । कुटुंबीय व्यक्तींची अभंग-संपदा । घरातील मुलेबाळे । दामाशेटी व नामदेव । गोणाई व नामदेव । नामदेव व राजाई । नामदेव व नारा । नामदेव व विठा । नामदेव व गोंदा । नामदेव व महादा । नामदेव व लाडाई । नामदेव व लिंबाई । नामदेव व आऊबाई । नामदेव व जनाबाई । अन्य कुटुंबीय । श्रीविठ्ठल व नामदेव । समारोप.)

०८ श्रीज्ञानेश्वरांची प्रभावळ ९७

( ' संतकृपा झाली –' । द्विविध काव्यरचना । व्यापक सहानुभव । प्रभावळीचा ' भूगोल ' । ज्ञानेश्वरांचा वारसा । समारोप.)

०९ एकनाथ — पंचक १०६

(संत एकनाथ । दासोपंत । रामा जनार्दन । विठा रेणुकानंदन । जनी जनार्दन । समारोप.)

१० प्राचीन मराठीचा वाङ्मयेतिहास १२०

(वाङ्मयेतिहाचे शास्त्र । वाङ्मयेतिहासाचा विषयानुक्रम । संकलित ग्रंथाची रूपरेषा [भूमिका, पूर्वपीठिका, प्रारंभीचे वाङ्मय, विविध धर्मपंथ, चक्रधर, महानुभावीय चरित्र – वाङ्मय, महानुभावीय काव्य, ज्ञानदेव, नामदेव, ज्ञानदेव – नामदेवांची प्रभावळ, मुकुंदराज, संकीर्ण काव्य, संकीर्ण गद्य; यादवकालीन साहित्य विचार] उपसंहार आणि पाच सूची.)

# लेखक–परिचय

सातारा जिल्ह्यातील 'खटाव' या गावी दि. ३ नोव्हेंबर, १९२५ रोजी डॉ. हेमंत विष्णु इनामदार यांचा जन्म झाला. एम्. ए., एल्‌एल्. बी., आणि पीएच्. डी. या पुणे विद्यापीठाच्या पदव्या त्यांनी मिळविल्या. माध्यमिक शाळांतून चार वर्षे आणि महाविद्यालयांतून छत्तीस वर्षे अशी एकंदर चाळीस वर्षे त्यांनी अध्यापनाच्या क्षेत्रात काम केले. पुण्यातील एस्. एन्. डी. टी. कॉलेजचे प्राचार्य म्हणून डॉ. इनामदार डिसेंबर १९८५ मध्ये सेवानिवृत्त झाले.

डॉ. इनामदारांचे मार्गदर्शन घेऊन अकरा विद्यार्थिनींनी मराठीतील पीएच्. डी. ही पदवी मिळवली. एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठात त्यांनी अनेक जबाबदारीची कामे केली. मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, आर्ट्स फॅकल्टीचे डीन, कार्यकारिणीचे सभासद, सिनेटचे सभासद इत्यादी नात्यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीला त्यांनी हातभार लावला.

१९७६ ते १९७९ अशी तीन वर्षे डॉ. इनामदारांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादन केले. मराठीतील महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकांची कामगिरी विशद करणारे अभ्यासपूर्ण लेख त्या काळात त्यांनी प्रसिद्ध केले.

डॉ. इनामदारांना आजवर लाभलेले काही सन्मान नमूद करण्याजोगे आहेत. 'विद्यापीठ पातळीवरील उत्कृष्ट शिक्षक' म्हणून सप्टेंबर १९७९ मध्ये त्यांना राज्य पुरस्कार मिळाला. 'मराठीचे राष्ट्रीय व्याख्याते' म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने १९८४–८५ या वर्षासाठी त्यांची निवड केली. 'मराठीचे सुप्रतिष्ठ प्राध्यापक', ('इमिरिटस प्रोफेसर ऑफ मराठी') म्हणून महिला विद्यापीठाने त्यांची नियुक्ती केली आहे.

मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद, नागपूर विद्यापीठ, रामकृष्ण मठ इत्यादी संस्थांमधून डॉ. इनामदारांनी संत साहित्यविषयक व्याख्यानमाला गुंफल्या आहेत. तसेच विविध विद्यापीठे, वसंत व्याख्यानमाला, साहित्य संमेलने आणि महाविद्यालयीन कृतिसत्रे व अभ्यासमंडळे येथील परिसंवादांतून ते वेळोवेळी सहभागी झाले आहेत.

निवास : 'संतोष', भारतीनिवास कॉलनी,
६०/१५, एरंडवणे, पुणे-४११ ००४.

# लेखकाची साहित्यसेवा

## स्वतंत्र पुस्तके

१. 'संत नामदेव' : समीक्षा व संशोधन, केसरी प्रकाशन, पुणे, १९७०.

२. 'श्रीनामदेव : चरित्र, काव्य व कार्य' : (सहकार्याने), महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, १९७०.

३. 'भागवत धर्माची मंगल प्रभात' : समीक्षा, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९७५.

४. 'भक्तिपंथ नवचिंतन' : समीक्षा, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९७७.

५. 'संत सावता दर्शन' : चरित्रचित्रण व काव्यविवेचन, महात्मा फुले मंडळ, पुणे, १९८३.

६. 'श्रीज्ञानेश्वर आणि संतमंडळ' : उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९९०.

## संपादित साहित्य

१. 'हरि नारायण आपटे : व्यक्ती आणि वाङ्मय', आर्यभूषण मुद्रणालय प्रकाशन, पुणे, १९६४.

२. 'श्रीनामदेव दर्शन' (सहकार्याने) : अ. भा. नामदेव समाजोन्नति परिषद, कोल्हापूर, १९७०.

३. 'राष्ट्रवाणी' : श्री नामदेव विशेषांक (हिंदी), महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, १९७०.

४. 'वाङ्मय–विकास' (सहकार्याने), श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ प्रकाशन, मुंबई, १९७१.

५. 'साहित्य–वैभव' (सहकार्याने), श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ प्रकाशन, मुंबई, १९७२.

६. 'शरच्चंद चटोपाध्याय दर्शन', महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे, १९७६.

७. 'पुण्याई : पुणे शहर सांस्कृतिक दर्शन' (सहकार्याने), नगर वाचन मंदिर, पुणे, १९७७.

८. ' विस्तारलेलं क्षितिज : मराठी लेखिकांच्या निवडक कथा ' (सहकार्याने), संजय प्रकाशन, पुणे, १९७९.

९. ' नामदेवांची अभंगवाणी ' (सहकार्याने), मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९७९.

१०. ' प्रा. गं. बा. सरदार साहित्य समालोचन ' (सहकार्याने), मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९८०.

११. ' भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक ' (सहकार्याने), संजय प्रकाशन, पुणे, १९८२.

१२. ' संत एकनाथ दर्शन ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८३.

१३. ' संत नामदेव : काव्यसंभार आणि संत परिवार ', संजय प्रकाशन, पुणे, १९८७

१४. ' महाराष्ट्राचे लोकनाथ : संत एकनाथ ' (सहकार्याने), शिवपार्वती प्रकाशन, नाशिक, १९८८.

१५. ' भक्तिगंगेच्या वाटेवर ' (सहकार्याने), संजय प्रकाशन, पुणे, १९८८.

१६. ' ज्ञानेश्वरी दशरूपदर्शन ', चंद्रमा प्रकाशन, पुणे, १९९०.

१७. ' अबोली ' : साहित्य संमेलन विशेषांक, (सहकार्याने), पुणे मराठी ग्रंथालय, पुणे, १९९०.

# लेखकाचे मनोगत

शके १९१२ हे ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीच्या सप्तम शताब्दीचे संवत्सर आहे. या वर्षी संत ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व यांचे संस्मरण, वाणी आणि लेखणी या दोन्ही माध्यमांतून सर्वदूर होत राहणार आहे.

या निमित्ताने आपणही या विषयावर वेळोवेळी केलेल्या स्फुट लेखनाचा धांडोळा घ्यावा, जरूर तेथे त्या लेखनाचे संस्करण करावे आणि लेख-संग्रहाच्या रूपाने ते प्रसिद्ध करावे असे मला वाटले. त्या दिशेने शोधल्यावर आजवरचे वीस-बावीस लेख माझ्या हाती आले. हे सर्वच लेख कुठे ना कुठे प्रसंगोपात्त छापून आलेले होते. त्यातील दहा निवडक लेखांचा हा गुच्छ या पुस्तकाच्या रूपाने येथे सादर केला आहे. या लेखांना पूर्व-प्रसिद्धी देणाऱ्या संपादकांचा मी आभारी आहे.

माझे स्नेही डॉ. यू. म. पठाण यांची रसोद्ग्राही प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. डॉ. पठाण हे स्वतः संत साहित्याचे साक्षेपी अभ्यासक आहेत. ते साहित्य संमेलनाध्यक्षही आहेत. या दोन्ही दृष्टींनी त्यांची प्रस्तावना ही औचित्यपूर्ण ठरावी.

'उत्कर्ष प्रकाशन'चे श्री. सुधाकर जोशी यांनी स्नेहाचा जुना ऋणानुबंध लक्षात ठेवून, पुस्तक प्रकाशित करण्यास आस्थेने संमती दिली. माझे मित्र डॉ. भय्यासाहेब ओंकार यांनी एका सुखद प्रसंगी ज्ञानेश्वरांचे जलरंग-चित्र आवर्जून तयार केले व मला दिले. त्यांचे हे उपायन या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर विराजमान झाले आहे, याचे समाधान वाटते. श्री. विजय कापरे यांनी पुस्तकाची छपाई आस्थेने केली आहे.

वरील सर्व स्नेहीजनांचा मी मनोमन आभारी आहे.

दा. क्र. निबंध ३३८३ २६९६६ २८१४६०

# प्रस्तावना

'समुद्रातल्या शिंपल्यांनी नेहमी उन्मीलित अवस्थेत असावं, कारण स्वातीच्या जलधारा कधी कोसळतील; आणि त्या शिंपल्यांचे मोती केव्हा होतील, हे कुणी नि कसं सांगावं ?' —प्रा. ना. सी. फडके यांनी 'मित्र' या आपल्या लघुनिबंधात ही कल्पना मांडली आहे. आयुष्यात सन्मित्र लाभण्याचा योग किती दुर्मिळ असतो, हे सांगताना त्यांनी हा दाखला दिला आहे.

— अशाच एका उमललेल्या मन:स्थितीत डॉ. हेमंतराव इनामदारांशी माझी ओळख झाली. कुठल्या तरी विद्यापीठीय कामाच्या निमित्तानं आम्ही भेटलो. आमच्या मैत्रीची कुंडली जुळून गेली. हा स्नेह दिसामासांनी वाढत गेला. आज मागं वळून या स्नेहबंधाचा ताळेबंद पाहिला, तर मोठं समाधान वाटतं; आणि याचं बरंच श्रेय हेमंतरावांच्या व्यक्तित्वाला आहे.

'हे. वि. इनामदार' या प्रेमानं नि कर्तृत्वानं मंतरलेल्या नाममुद्रेनं महाराष्ट्राच्या शैक्षणिक विश्वात मानाचं स्थान मिळवलेलं आहे. व्यासंगी अभ्यासक, विद्यार्थी-प्रिय प्राध्यापक, कर्तबगार प्राचार्य, मातबर लेखक, कुशल ग्रंथसंपादक नि रससिद्ध वक्ते अशा अनेक नात्यांनी ते सर्वदूर सुपरिचित आहेत. संत साहित्याचं लेखन, संशोधन, महिला विद्यापीठाच्या शिक्षणसाधनेतील लक्षणीय सहभाग नि व्याख्यानांच्या माध्यमातून सर्वत्र फिरून केलेलं वैचारिक जागरण ही हेमंतरावांची कामगिरी वैशिष्टचपूर्ण आहे. ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी पाऊल ठेवलं, त्या त्या क्षेत्रात आपल्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांनी उमटविला. कुठलीही लहानमोठी कामगिरी पवित्र कर्तव्यभावनेनं तडीस न्यावी, आत्माभिव्यक्तीची ती संधी मानावी, अशी त्यांची वृत्ती आहे. आपला अभ्यास सकस नि सुसूत्र असावा आणि अभिव्यक्तीस सौजन्याचं नि रसात्मकतेचं कोंदण असावं, याचं सतत भान ठेवून डॉ. हेमंतराव इनामदारांनी आजवरची साहित्यसाधना केली आहे.

— याच विनम्र वृत्तीनं 'श्रीज्ञानेश्वर आणि संतमंडळ' हा लेखसंग्रह हेमंतरावांनी सादर केला आहे. ज्ञानेश्वर आणि त्यांच्या परंपरेतील भागवतधर्मीय संत यांच्या कामगिरीविषयीचं आपलं चिंतन त्यांनी इथं शब्दांकित केलं आहे. मराठी भाषेच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडण्याची ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा होती. विश्वात्मक देवाजवळ पसायदान मागताना त्यांनी जी प्रार्थना केली, तिच्यावरून त्यांच्या साहित्यनिर्मितीमागं प्रामुख्यानं धर्मरक्षणाचीच प्रेरणा होती, हे सिद्ध होते. ज्ञानेश्वर हे स्वत: नाथसंप्रदायातील योगी असले तरी चिद्विलासवादाच्या तत्त्वज्ञानाचे ते उद्गाते होते. लोकसंग्रह हा त्यांच्या

जीवितकार्याचा केंद्रबिंदू होता. ज्ञानेश्वरादी भक्तिमार्गीय संतानी बुद्धीच्या स्थैर्यासाठी भक्तिमार्गाचा अवलंब केला; आणि अंतःकरणाच्या शुद्धतेसाठी नीतिमूल्यांचा आग्रह धरला. अध्यात्म व कर्मसाधना यांना भक्तीच्या कोंदणात बसविण्याची दक्षता या संतांनी घेतली आहे. संसार सांभाळून परमार्थ–प्राप्ती करून घेता येईल, असा आत्मविश्वास या संतांनी समाजात निर्माण केला; आणि तळागाळातल्या सर्व जाती–जमातींच्या बांधवांना त्यांनी भागवतधर्माची दीक्षा दिली.

— याच भूमिकेतून डॉ. इनामदारांनी ज्ञानेश्वरांच्या आणि संतमंडळातील त्यांच्या अनुयायांच्या कार्याचं मर्म या पुस्तकातील विविध लेखांतून विशद केलं आहे. संत ज्ञानेश्वरांचं चरित्र, त्यांच ग्रंथधन, त्यातील काव्यसौंदर्य आणि त्यांनी केलेलं प्रबोधनकार्य यांचा उलगडा पहिल्या चार लेखांतून केलेला आहे. नामदेवांचं कवित्व, ज्ञानदेव-नामदेवांचा अनुबंध, नामदेवांच्या कुटुंबियांचे भावबंध आणि ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील संतसज्जनांचा परिचय हे विषय त्यापुढील लेखांतून विवेचिले आहेत. एकनाथ पंचकातील कवींचं वाङ्मयीन कर्तृत्व त्यानंतर विशद केलं आहे. मध्ययुगीन मराठीचा वाङ्मयेतिहास कोणत्या दिशेनं लिहिला जावा, हे शेवटच्या लेखात सुसूत्रपणे मांडून दाखविलं आहे. अशा रीतीनं प्रस्तुत पुस्तकातील दहा लेखांचं विहंगदर्शन घेतल्यानंतर प्रत्येक लेखाचं प्रमुख प्रतिपाद्य सूत्ररूपानं सांगणं उपयुक्त ठरेल.

ज्ञानेश्वरांचे जीवनचरित्र हाच मुळी एका अर्थानं एक ‘चमत्कार’ आहे. ‘वयसेचिया गावां न जाता, बालपणीच सर्वज्ञता वरी जयातें,’ असं ज्ञानेश्वरांचं अलौकिक व्यक्तित्व आहे. नामदेव हे ज्ञानेश्वरांचे आद्य चरित्रकार आहेत. त्यानंतरची सर्व ज्ञानेश्वर–चरित्रं संत नामदेवकृत त्रि–प्रकरणात्मक ज्ञानेश्वर-चरित्राची उमटलेली प्रतिबिंबं आहेत. आदि, तीर्थावळी व समाधी अशा तीन प्रकरणांतून नामदेव गाथेत ज्ञानेश्वरांचं जे चरित्र उपलब्ध होतं, त्याचा विवेचक परामर्श पहिल्या लेखात घेतलेला आहे.

‘ज्ञानेश्वरांची ग्रंथसंपत्ती’ हा दुसऱ्या लेखाचा विषय आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी हे तीन प्रबंध आणि अभंग–गाथा ही स्फुट रचना असे चार ग्रंथ ज्ञानेश्वरांच्या नावावर नमूद आहेत. हे सर्व साहित्य म्हणजे एकाच व्यक्तित्वाचं स्पंदन आहे. त्यातील काव्यसौंदर्य व तत्त्वदर्शन केवळ अपूर्व आहे. ‘ज्ञानेश्वर प्रबंधांमध्ये प्राधान्यानं तात्त्विक भूमिका घेतात, व अभंगांमध्ये ते साक्षात्काराच्या भूमिकेवरून अधिक बोलतात. नाथमत, शांकरमत व भक्ती ही तिन्ही ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी एकवटलेली आहेत,’ हे लेखकांचं विवेचन विचारप्रवर्तक आहे.

ज्ञानेश्वरांच्या काव्यसौंदर्याची मीमांसा तिसऱ्या लेखात केलेली आहे. ज्ञानेश्वरीत वाग्चातुर्यातून गीतार्थदर्शन घडविलेलं आहे. अमृतानुभव व चांगदेवपासष्टी या ग्रंथांतून ज्ञानेश्वरांनी ‘आत्मवस्तू’ची लक्षणं विशद केली आहेत. अभंगवाणी ही त्यांची शुद्ध पारमार्थिक भावकविता आहे. एकूणच काव्यानंदाची अंतिम परिणती ब्रह्मानंदात व्हावी

यासाठी ज्ञानेश्वरांच्या समग्र काव्य-संपदेचा अवतार असल्याचं लेखकाचं म्हणणं पटण्यासारखं आहे.

'ज्ञानदेवें रचिला पाया' हा संत बहिणाबाईंच्या प्रसिद्ध अभंगातील काव्यचरण कसा अर्थपूर्ण आहे, हे चौथ्या लेखात साधार व सविस्तर स्पष्ट केलं आहे. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तत्त्वाधार व प्रेमाधार दिले, हे आपलं मुख्य विचारसूत्र लेखकानं इथं मार्मिकपणे मांडलं आहे.

'संत नामदेवांचं व्यक्तित्व व कवित्व' हा त्यापुढील लेखाचा विषय आहे. नामदेवांची जीवितरेखा, गृहजीवन, परमार्थ-साधना, त्यांच्या व्यक्तित्वाचं गवाक्ष असलेलं त्यांचं अमृतमधुर काव्य आणि सांप्रदायिक कार्यकर्तृत्व यांचा सुरेख आलेख येथे चित्रित केलेला आहे. नामदेवांची अभंगवाणी ही वारकऱ्यांची अमृतसंजीवनी आहे, हे या लेखाचं मथित आहे.

सहाव्या लेखात ज्ञानदेव आणि नामदेव या दोन संतांतील भावानुबंध उलगडून दाखविलेला आहे. त्यांची व्यक्तित्वं, काव्यसंपदा, विचारधन आणि जीवितकार्य कशी परस्परपूरक होती, याविषयीचा ऊहापोह इथं केलेला आहे. ज्ञानदेवांच्या विचाराशी सुसंवाद राखून नामदेवांनी अध्यात्मप्रधान कर्मयोगाची शिकवण दिली. तसंच भक्ती व प्रवृत्ती यांत ज्ञानदेव–नामदेवांनी साधलेला समतोल तत्कालीन समाजाला उपकारक ठरला. कर्म, भक्ती व ज्ञान यांच्या त्रिवेणी संगमानं वारकरी संप्रदाय धन्य झाला. या लेखातील हे सारंच विवेचन प्रत्ययकारी उतरलं आहे.

'नामदेवांचे कुटुंबीय' हा अभिनव विषय सातव्या लेखात मांडलेला आहे. पंधरा व्यक्तींच्या या एकत्र कुटुंबातील वातावरण, त्यांची अभंग–संपदा, जनाबाईंची भूमिका, नामदेवांचा जणू कुटुंबीयच झालेला श्री विठ्ठल आणि या सर्वांचं नामदेवांशी असलेलं लौकिक, तसंच अलौकिकही नातं याविषयीचं भावमधुर चिंतन या लेखात शब्दांकित केलं आहे. जन्मदा गोणाई व मोक्षदा विठाई यांचा नामदेवाविषयीचा कळवळा केवढ्या भिन्न पातळ्यांवरचा होता, याचा हृदयंगम आलेख या लेखात मांडून दाखविलेला आहे.

'संत कृपा झाली...।' हा बहिणाबाईंचा अभंग, तसंच 'विठो माझा लेकुरवाळा।' हा जनाबाईंचा अभंग सर्वश्रुत आहे. 'ज्ञानेश्वरांच्या प्रभावळी'तील संतमेळ्याचं वेगळंपण त्या दोन्ही अभंगांतून विशद झालं आहे. या संतमेळ्यानं पारमार्थिक समतेचं नवं व्यासपीठ निर्माण केलं, हे आठव्या लेखात सविस्तर स्पष्ट केलं आहे.

'एकनाथ—पंचका' ची ओळख नवव्या लेखात करून दिली आहे. दासोपंत, रामा जनार्दन, विठा रेणुकानंदन, जनी जनार्दन व स्वतः संत एकनाथ यांचं नाथपंचक मानलं जातं. त्यापैकी पहिल्या चार कवींची जीवितं, त्यांची ग्रंथरचना व नाथांशी असलेला त्यांचा अनुबंध याविषयीचं समालोचन इथं केलं आहे. त्यातून नाथपरंपरेशी असलेलं या संत चतुष्काचं नातं विशद करून दाखविलं आहे.

'प्राचीन मराठीचा वाङ्मयेतिहास' हा या संग्रहातील शेवटचा लेख आहे. आपल्याकडं वाङ्मयेतिहास-लेखनाचं शास्त्र अजून तरी सिद्ध झालेलं नाही, याचं भान ठेवून ही रूपरेषा सादर केलेली आहे. व्यासंगी संशोधकांच्या तीन-चार बैठकी घेऊन व त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून वाङ्मयेतिहासाच्या प्रथम खंडाचा हा आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रारंभ ते इ. स. १३५० हा कालखंड पहिल्या खंडासाठी योजिलेला आहे. चौदा प्रकरणं व पाच सूची यांत या खंडाची मांडणी केलेली आहे. सव्वासहाशे डेमी मुद्रित पानांत हा ग्रंथप्रकल्प मांडावा, अशी योजना आहे. काही अडचणीमुळं प्रस्तुत प्रकल्प ग्रंथरूपानं सिद्ध होऊ शकला नाही. पण त्यासाठी आखलेली ही रूपरेषा एवढी सुसूत्र, शास्त्रपूत व सर्वंकष आहे, की 'एखाद्या जिद्दीच्या व जाणकार संपादकानं याचा उपयोग करून घेऊन, या प्रकल्पाची पूर्ती करावी', ही अपेक्षा रास्तच आहे.

ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या सप्तम शताब्दीच्या संवत्सरात डॉ. हेमंतराव इनामदारांचा ज्ञानेश्वरमंडळविषयक अभ्यास प्रकाशात येत आहे, याचा मला विशेष आनंद होतो. 'ग्रंथसंबंधे जग निवे' अशी आपली ग्रंथविषयक अपेक्षा ज्ञानेश्वरांनी व्यक्त केली आहे. डॉ. इनामदारांच्या प्रस्तुत पुस्तकातून ही अपेक्षा काही प्रमाणात तरी निश्चितपणे पूर्ण होईल, असा मला विश्वास वाटतो.

३१ मार्च १९९०

२, आनंदनगर, टाऊन हॉल, — डॉ. यू. म. पठाण
औरंगाबाद-४३१ ००१

## वाक्तरंगिणीचे विहंग-दर्शन

"यात माझे असे काहीच नाही. विशेष बुद्धिसामर्थ्याने खोल पाण्यात बुडी मारणारांना आणि स्वतःच पाकनिष्पत्ती करणारांना, त्यांची तहानभूक हरेल, असे येथे काही सापडावयाचे नाही. पूर्वी सात-आठशे वर्षे महाराष्ट्राची लेखणी कशावर चालली, हे येथे थोडेसे सांगू. या आपल्या सरस्वतीचा उगम कोठे झाला; व पुढे ही वाक्तरंगिणी स्वराज्याच्या सीमेपर्यंत कशी कशी वाहत गेली, याचे किंचित्मात्र दिग्दर्शन करण्याचा यात यत्न करू. तुमचेबरोबर येऊन या ज्ञानगंगेच्या काठची देवळे आणि मठ आम्ही दाखवून देऊ. वाटेवरच असतील त्यांचे दर्शन घडवू. जरा पलीकडे असतील त्यांच्या कळसांना व गोपुरांना दुरून नमस्कार करू. पण एखाद्या देवळाच्या आत जाऊन बसून तेथल्या अपूर्व नक्षीकामाची शोभा व कुसरीचा थाट कोणास नीट पाहावयाचा असेल, तर तो ज्याचा त्यानेच सवडीनुसार मागाहून पाहिला पाहिजे. यात्रेत इतका वेळ सापडणार नाही. तेथले देखावे मात्र दुरून दाखवून देऊ.

— विनायक लक्ष्मण भावे

(महाराष्ट्र सारस्वत, दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ३३९३
ग्रा. क्र. २६१८६
२८५८७
संदर्भ शाखा

एक

# संत नामदेवकृत ज्ञानेश्वर-चरित्र

नामदेव-गाथा । तीर्थावळीची रचना । श्री ज्ञानेश्वर-समाधि-महिमा । नामदेवांची आळ । ज्ञानेश्वर महाराजांची 'आदि'। ज्ञानेश्वर महाराजांची 'समाधि'। अमोल ठेवा.

संत ज्ञानेश्वर (इ. स. १२७५ ते १२९६) आणि संत नामदेव (इ. स. १२७० ते १३५०) हे दोघे समकालीन संत होते त्यांचा परस्पर-स्नेहभाव अपार होता. 'सखा विरळा ज्ञानेश्वर। नामयाचा जो जिव्हार' असे वर्णन संत जनाबाईंनी केले आहे. नामदेवांना ज्ञानेश्वरांविषयी असीम आदर वाटत होता, 'परि भानूसी देखणें करिजे अनुतेजें।' तैसें माझें ज्ञान स्वामीप्रती' या शब्दांत आपली आदर-भावना नामदेवांनी व्यक्त केली आहे. ज्ञानदेव-निष्ठेपोटी नामदेवांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहून ठेवले आहे. किंबहुना, नामदेव हे ज्ञानेश्वरांचे आद्य चरित्रकार आहेत. केवळ त्यांच्यामुळेच ज्ञानेश्वरांच्या जीवितयात्रेचा थोडाफार तपशील आपल्या हाती लागतो. अन्यथा ज्ञानेश्वरांसारखे दिव्य व्यक्तिमत्त्व अज्ञाताच्या धुक्यात हरवून गेले असते.

## नामदेव गाथा

आजवर वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या नामदेवांच्या अभंग-गाथा थोडयाफार फरकाने सांप्रदायिक स्वरूपाच्या आहेत. घरत, गोंधळेकर, जोग, आवटे, सुबध, महाराष्ट्रशासन-नियुक्त संपादक, का. अ. जोशी, रा. चिं. ढेरे या सर्व अभ्यासकांनी संपादिलेल्या प्रती

सारख्याच अविश्वसनीय आहेत. पाठचिकित्सा-शास्त्राला अनुसरून संहिता-निश्चिती केलेली प्रत अजून तरी सिद्ध झालेली नाही. त्यामुळे अगदी अलिकडे प्रसिद्ध झालेली प्रत त्यातल्या त्यात उपयुक्त ठरेल.

'सकलसंतगाथा (गाथापंचक) खंड दुसरा, संकलन : श्री. नानामहाराज साखरे (इ. स. १९०८) संपादक : रा. चिं. ढेरे, वरदा प्रकाशन, पुणे १६, नवी आवृत्ती, पुनर्मुद्रण, जानेवारी १९८५.'

प्रस्तुत गाथेत ज्ञानेश्वर-चरित्रविषयक पुढील प्रकरणे आलेली आहेत.

| क्र. | विषय | पृष्ठे | अभंग-क्रमांक | अभंग-संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | श्री ज्ञानदेव व श्री नामदेव यांची तीर्थावळी | १५१–१८४ | ६१२–६७० | ५९ |
| २. | श्री ज्ञानेश्वर महाराजांची आदि | १८४–१९३ | ६७१–६९९ | २९ |
| ३. | श्री ज्ञानेश्वर समाधी महिमा | १९३–२२९ | ७००–७५९ | ६० |
| ४. | श्री ज्ञानेश्वर महाराजांची समाधी | २२९–२४३ | ७६०–८३० | ७१ |
| ५. | □श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या भेटीविषयीं श्री नामदेवांची आळ | २७१–२७५ | ९४३–९६६ | २४ |

एकूण अभंग-संख्या २४३

(अन्य सर्व प्रतींतही प्रस्तुत पाच प्रकरणे दिलेली आहेत.)

□ मधल्या पृ. २४३ ते २७१ या २९ पानांत क्र. ८३१ ते ९४२ असे एकूण ११२ अभंग सोपानदेव, चांगदेव, मुक्ताई आणि निवृत्तिनाथ या चौघांच्या समाधींविषयीचे आहेत. ज्ञानेश्वर-चरित्राशी त्या अभंगांचा साक्षात् संबंध नसल्यामुळे त्यांचा विचार येथे केलेला नाही.

तीर्थावळी, आदि, समाधिमहिमा, समाधी आणि आळ अशा एकूण पाच प्रकरणांत ज्ञानेश्वर-चरित्र समाविष्ट झालेले आहे. त्यापैकी तीर्थावळी, समाधिमहिमा व आळ ही तीन प्रकरणे अ-नामदेवकृत आहेत. आदि आणि समाधी ही दोनच प्रकरणे आद्य नामदेवांच्या हातची आहेत. ज्ञानेश्वर-चरित्राचे हे एवढेच खरे दोन आधार आहेत. ज्ञानेश्वरांचे वाडवडील, ज्ञानेश्वरांची भावंडे आणि स्वतः ज्ञानेश्वर यांच्याविषयीची ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची अशी माहिती त्यामध्ये मिळते. त्यातून हाती येणाऱ्या ज्ञानेश्वर-चरित्राची व्याप्ती अजमावली पाहिजे. पण त्याआधी या पाच प्रकरणांचे कर्तृत्व कोणाचे, याचा शोध घेणे जरूरीचे आहे.

## तीर्थावळीची रचना

एकंदर ५९ अभंग-संख्या असलेले तीर्थावळीचे हे प्रकरण आद्य नामदेवांच्या हातचे नसावे, असा साधार युक्तिवाद ज. र. आजगावकर, शं. दा. पेंडसे आणि रा. चिं. ढेरे

यांनी केला आहे. अभंगाच्या लांबीत अकरा चरणांपासून सत्तावीस चरणांपर्यंतची विषमता येथे असून, ती नामदेवीय रचनेशी सुसंगत नाही. ५९ पैकी फक्त एका अभंगात ज्ञानदेव-नामदेवांच्या तीर्थयात्रेचे वर्णन आले आहे. 'पश्चिम प्रभास आदि करोनि द्वारका। पाहिल्या सकळिका मोक्षपुऱ्या ॥' (अभंग क्र. ६२८) या उल्लेखानंतर एकदम 'तीर्थे करोनि नामा पंढरिये आला। जिवलगा भेटला विठोबासी ॥' (अभंग क्र ६३२) अशी हनुमान-उडी यात्रा-वर्णनकाराने मारलेली आहे. अनेक अभंगात 'नामा म्हणे' ही नाममुद्रा नाही. 'धन्य हा हो नामा म्हणती सकळ।' किंवा 'सकळाहूनि पढियंता देवा एक नामा।' असे आत्मोल्लेख नामदेव इथे करतात, ते अप्रस्तुत वाटते. प्रत्यक्ष प्रवास-वर्णनापेक्षा भोजन-वर्णनांची रेलचेल इथे आहे. तीसुद्धा नामदेवांच्या व्यक्तित्वाशी जुळत नाही. अशा अनेक कारणांमुळे तीर्थावळीची रचना नामदेवांची नसून ती रचना त्यांच्या एखाद्या शिष्याची-बहुधा परिसा भागवत यांची असावी, हा आजगावकरांचा तर्क पटण्याजोगा आहे.

तीर्थावळीची रचना नामदेवांची असो वा नसो, पण त्यातून (विशेषत: त्यातील ज्ञानदेव-नामदेव यांच्या संवादांतून) त्यांचे स्वभाव आणि त्यांचे परस्परसंबंध यावर थोडाफार प्रकाश पडतो. 'तुझ्या संगतीचें नित्य सुख घ्यावें' असे ज्ञानेश्वर नामदेवांना म्हणतात. 'पंढरीरायाचा तू प्रेम-भांडारी' या शब्दांत नामदेवांचा अधिकार ते सांगतात. मात्र 'मातेचिया स्नेहें बाळक बोबडं। खेळवी लाडे कोडें नेणे लाजो' या शब्दांत नामदेव आपला विनय आणि ज्ञानेश्वरांची वत्सलता व्यक्त करतात.

परिसा भागवत, नरहरी सोनार, गोरा कुंभार इत्यादी आपल्या प्रभावळीतील संत-सज्जनांना बरोबर घेऊन ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रा केली, असे तीर्थावळीचा कर्ता आपल्याला सांगतो. 'मेळविली मांदी वैष्णवांची' या ज्ञानेश्वर-वर्णनाशी ज्ञानेश्वरांचे हे तीर्थाटन सुसंगत ठरते. त्यामुळे डॉ. शं. दा. पेंडसे म्हणतात त्याप्रमाणे 'तीर्थावळीची कादंबरी' नामदेव-रचित नसली, तरी ज्ञानेश्वर चरित्राची संशोधन-सामग्री म्हणून या प्रकरणाचे मूल्य उपेक्षणीय नाही.

## श्री ज्ञानेश्वर-समाधिमहिमा

एकंदर ६० अभंग-संख्या असलेले हे प्रकरण त्याच्या कर्त्याच्या कल्पनाविलासाचे आणि अतिरंजित वर्णनशैलीचे उत्तम उदाहरण आहे. विठ्ठलाने ज्ञानदेवांच्या मस्तकावर हात ठेवला आणि समाधीसाठी लवकर सिद्ध होण्यास सांगितले. त्यावेळी तेथे इंद्र, चंद्र, ब्रह्मा, वरुण, बृहस्पती, गरुड, लक्ष्मी, सत्यभामा, ध्रुव हे सारे तर जमा झालेच, पण पिशाच्च, गुह्यक यांनीसुद्धा आपली हजेरी लावली. दिव्य सुमनांचा वर्षाव झाला. देवांनी जयजयकार केला; आणि 'परिसा भागवत डुल्लत। विठ्ठल झाला कृतकृत्य' हे सारेच वर्णन अतिरंजित आणि अद्‌भुत आहे. शिवाय समाधीच्या महिम्याचे हे साठ अभंग नामदेवांच्या नेहमीच्या अभंग छंदामध्ये नाहीत. खरे तर त्या ओव्या आहेत. एकंदरीत पाहता महिम्याचे अभंग नामदेवांचे नसून ते तीर्थावळीकाराचे असावेत. 'गगनपंथ शुभ्र

विमानें। देव लक्षिती अधोवदनें।... नामा असे नाचत। पांडुरंगापुढे।' (अ. ७३९) किंवा 'क्षणाक्षणांत पंढरीनाथ। नामयाचा धरूनि हात। ज्ञानदेवासी आठवीत। कंठ सद्‌गदित होऊनि।' (अ. ७५७) अशी अवास्तव वर्णने या 'महिमा' प्रकरणात ठायी-ठायी आढळतात. सारासार विवेकाने त्यातील आशय समजावून घेतला, तर ज्ञानेश्वर-चरित्राच्या दृष्टीने तो उपयुक्त ठरेल, पण त्याचे श्रेय किंवा कर्तृत्व नामदेवांकडे देता येत नाही.

## नामदेवांची आळ

चोवीस अभंगाची ही 'आळ' नामदेवांची आहे असे म्हणणे नामदेवांवर भलता 'आळ' घेण्यासारखे आहे. ज्या गृहीत-कृत्यावर हे 'आळ' प्रकरण आधारलेले आहे, ते गृहीत कृत्यच डळमळीत आहे. 'अलंकापुरीस पांडुरंग गेले। समाधिस्थ केलें ज्ञानदेवा' (अ. ९४४) तेव्हा, नामदेव 'शोकाक्रांत' झाले. ते देवाला म्हणाले, 'ज्ञानाचा वियोग जडला हृद्‌रोग। भेटीचा प्रयोग करा देवा॥ ज्ञानदेव माझा दाखवा या वेळी। जीव तळमळी त्याच्याविण' (अ. ९४५).

– नामदेवांची ही स्थिती पाहून देव विस्मित झाले. ते म्हणाले, 'देव म्हणे नाम्या पाहे। ज्ञानदेव मीच आहे' (अ. ९५०) तरीही नामदेवांचे समाधान झाले नाही. 'नामदेव म्हणे देवा। ब्रह्मज्ञान पोटी ठेवा।' (अ. ९५५) असा सबूरीचा सल्ला उलटपक्षी नामदेवांनीच देवाला दिला, तेव्हा 'देव कळवळले चित्तीं। त्यांसी मायेची संमती।'(अ.९५७) त्यानंतर विठ्ठलाच्या कृपेने (एकदा समाधिस्थ झालेले) ज्ञानदेव प्रकट झाले. 'ज्ञानदेव पाहता डोळा। नामदेवा हर्ष झाला।' (अ. ९६१) ज्ञानदेवांच्या पाठोपाठ निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताबाई आणि चांगदेव हे सर्वजण तेथे प्रगट झाले. चोखोबा, परसा भागवत, सावता माळी, नरहरी सोनार, भानुदास, कान्होपात्रा इत्यादी संत मंडळी तेथे गोळा झाली.

नामदेवांच्या 'आळ' या प्रकरणातील हे सारेच वर्णन म्हणजे कल्पनाशक्तीचा अतिशयोक्त आणि अवास्तव विलास आहे.

## ज्ञानेश्वर महाराजांची 'आदि'

या 'आदि' नामक प्रकरणात एकंदर एकोणतीस अभंग आहेत. त्यातून साररूपाने, ज्ञानेश्वरांचे वाडवडील, ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे यांच्याविषयी जी चरित्रपर माहिती हाती लागते, ती अशी आहे.

ज्ञानदेवादि भावंडांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत असे होते; आणि आईचे नाव रुक्मिणी असे होते. या विठ्ठलपंतांचा रुक्मिणीशी विवाह झाला. त्यांची पीठिका नामदेवांनी दिली आहे. बालपणापासून विठ्ठल हा सदाचारसंपन्न होता. त्याच्या रूपाने जणू डोळस व मूर्तिमंत वैराग्यच जन्माला आले. यथाकाल त्याचा व्रतबंध झाला. त्याने वेदपठण केले. काव्य आणि व्याकरण अभ्यासिले. तो निपुण शास्त्रवेत्ता झाला. मातापित्यांना वंदन करून

त्याने तीर्थाटनाचा मुहूर्त केला. द्वारावती, पुष्कर, मुचकुंद गुंफा, त्र्यंबकेश्वर, ब्रह्मगिरी, भीमाशंकर, पंढरपूर इत्यादी तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेऊन विठ्ठल अलंकापुरीला (आळंदीला) आला. इंद्रायणीच्या पात्रात त्याने स्नान केले. संध्या आणि देवपूजा आटोपली. त्याला शिदोपंत हे 'सुब्राह्मण' भेटले. विठ्ठलाने त्यांना नमन केले. शिदोपंतांनी विचारले, 'आपले नाव काय ? गाव कोणते ? कुठून आलात ? कुठे निघालात ?'

त्यावर विठ्ठलाने सांगितले, 'माझे नाव विठ्ठल. गोदातीरी वसलेले आपेगाव इथला मी राहाणारा. माझे वृद्ध आईवडील तिथे असतात. मी तीर्थयात्रा करीत करीत आळंदीला आलो आहे.' हे ऐकून शिदोपंतांना आनंद झाला. आपल्या घरी ते विठ्ठलाला घेऊन गेले. भोजन झाले. त्यानंतर विठ्ठल झोपी गेला. रात्री शिदोपंतांना झोपेमध्ये पंढरीनाथांचा दृष्टान्त झाला. 'या विठ्ठल ब्राह्मणाला तू सालंकृत कन्यादान कर' असे देवाने शिदोपंताला सांगितले. त्यांना तो दृष्टान्त पटला. असाच दृष्टान्त विठ्ठल ब्राह्मणालाही झाला. 'मूर्तिमंत चारी जन्म इच्या उदरीं । म्हणोनि स्वीकारी, आज्ञा माझी' (अ. ६७६).

आपल्याला मिळालेला स्वप्नातील हा आदेश विठ्ठलाने शिदोपंतांना सांगितला. त्यांनी ग्रामजोश्याकडून घटितार्थ पाहिला. छत्तीस गुण जुळले. त्यानंतर देवक–प्रतिष्ठा, ब्राह्मणभोजन व कुळदेवस्मरण होऊन विधीपूर्वक पाणिग्रहण झाले.

विवाहानंतर विठ्ठल आणि रुक्मिणी हे दांपत्य पंढरपूरला गेले. त्यांनी देवदर्शन घेतले आणि ते दोघेजण आळंदीला परत आले. त्यानंतर खरे तर विठ्ठलाने रुक्मिणीसह प्रपंचाला प्रारंभ करायला हवा होता, पण त्याचे मन तीर्थाटनात गुंतले होते. त्याच्या मनातील हेतू हेरून शिदोपंतांनी 'जावे हो सत्वर यावे स्वस्ति क्षेम' अशा शब्दांत त्याला संमती दिली.

रुक्मिणीला आळंदीस, माहेरी ठेवून विठ्ठलाने (खंडित झालेली) तीर्थयात्रा पुन्हा सुरू केली. श्रीशैल्य व्यंकटाद्री, अरुणाचल, चिदंबर, रामेश्वर, गोकर्ण, कोल्हापूर, कऱ्हाड, माहुली इत्यादी क्षेत्रे करून मोठ्या आनंदाने आळंदीला तो परत आला. शिदोपंतांनी त्याला प्रेमाने क्षेमालिंगन दिले. 'आपेगावला जाऊन मातापित्यांचे दर्शन घ्यावे असे मला वाटते. तरी आपण मला तशी परवानगी द्यावी' अशी विनंती विठ्ठलाने केली. शिदोपंतांनी 'कुटुंबासहित जावे जी दर्शना' असे त्याला सांगितले. त्याला वस्त्रे आणि अलंकार दिले. त्यानंतर विठ्ठल आपेगावला गेला. 'असता सुखरूप मातापिता वृद्ध । वैकुंठा स्वानंदे निघोनी गेली ।' हे कळल्यावर तो आळंदीला परत आला. ती वार्ता ऐकून शिदोपंतांना दुःख झाले. 'देवच तुम्हां उभयतांचा यापुढे सांभाळ करील. तुमची वृत्ती सर्वकाळ प्रपंचाविषयी उदासीन आहे. पण तुम्ही मजवर दया करून यापुढे मला सांभाळावे. सुखानें आळंदी येथेच राहावे. तुम्हांला पुत्रसंतती यथाकाळ होईल. त्यानंतर तुमच्या मनाप्रमाणे काय ते तुम्ही ठरवावे' अशी शिदोपंतांनी विठ्ठलाला विनंती केली.

आपल्या सासऱ्याची ही विनंती विठ्ठलाने मानली. श्रीक्षेत्र आळंदी येथे राहाण्याचा निर्णय त्यानें घेतला. 'नित्य हरिकथा नामसंकीर्तन । संतांचे दर्शन सर्वकाळ । पंढरीची

वारी आषाढी कार्तिकी । विठ्ठल एकाएकी सुखरूप । ' असा त्याचा काळ मोठ्या समाधानात जाऊ लागला.

या आनंदात एक विक्षेप निर्माण झाला. या दांपत्याला मूलबाळ झाले नाही. त्यावर विठ्ठल आपल्या कांतेला म्हणाला, ' संन्यास घ्यावा असे मला वाटते. तू परवानगी दिलीस तर मी वाराणसीला जाईन.' रखुमाईने हे बोलणे आपल्या वडिलांच्या कानावर घातले. ' संततीवाचून संन्यास घेऊ नये ' असे शिदोपंतांनी मुलीमार्फत जावयाला सांगितले. पण एकदा रखुमाई कामात गुंतलेली असताना बेसावधपणे पतीच्या विनंतीला ती ' हो ' म्हणून बसली. पडत्या फळाची आज्ञा घेऊन विठ्ठल वाराणसीला गेला. तिथे त्याने संन्यास घेतला.

इकडे रखुमाई मोठ्या काळजीत सापडली. तिने अश्वत्थवृक्षाची सेवा आरंभिली. उग्र अनुष्ठान केले. एकदा तेथे, वाराणसीचे श्रीपादस्वामी हे थोर पुरुष आले. रखुमाईने त्यांना नमस्कार केला. ' पुत्रवती हो ' असा आशीर्वाद त्यांनी तिला दिला. तिला तो विनोदच वाटला. ती म्हणाली, ' माझ्या पतीने संन्यास घेतला आहे. तो काशीला जाऊन राहिला आहे. तेव्हा तुमचा आशीर्वाद माझ्या प्रत्ययाला येणे कठीण आहे. ' श्रीपादस्वामींनी तिला सर्व तपशील विचारला. तिच्या आईवडिलांना ते भेटले. ते म्हणाले, ' मी रामेश्वरला जाणार होतो, पण तुमच्या मुलीची कथा ऐकून फिरून वाराणसीला जायचे असे मी ठरवले आहे. कारण हिला मी दिलेला आशीर्वाद वाया गेला तर माझे सर्व पुण्य लयाला जाईल. ' त्यांचा हा बेत शिदोपंतांना योग्य वाटला.

त्यानंतर श्रीपादस्वामी वाराणसीस गेले, शिदोपंतांचा जावई विठ्ठल हाच श्रीपादस्वामींचा शिष्य झाला होता आपला विवाह झालेला आहे, ही घटना श्रीपादस्वामींना त्याने सांगितली नव्हती. त्यांच्याकडून विठ्ठलाने संन्यास ग्रहण केला होता. श्रीपादस्वामींनी त्यानंतर ' चैतन्याश्रम ' असे त्याचे नाव ठेवले होते; श्रीपादस्वामींनी त्याला पाचारण केले. त्याचा पूर्वेतिहास त्यांनी विचारला. जे सत्य असेल तेच सांगण्याचा आदेश दिला. चैतन्याने सारी कबुली दिली. पत्नीचा त्याग करून आपण आलो असल्याचे त्यानें मान्य केले. त्यावर श्रीपादस्वामींनी त्याला अभय दिले. परत जाऊन पत्नीचा स्वीकार करावा, गृहस्थाश्रम पुन्हा स्वीकारावा आणि ' सुखरूप स्वधर्म चालवावा ' असा आदेश त्यांनी दिला. ' अविधी कर्माचे न धरावे भय। यासी आहे साह्य जगदीश। ' असा दिलासा श्रीपादस्वामींनी त्याला दिला. (अ. ६८६)

गुरूच्या आज्ञेप्रमाणे चैतन्याश्रम हा संन्यासी ' गृहवासी ' झाला. त्याचे हे आचरण पाहून लोकांनी त्याची चेष्टा केली. ' द्विजी वाळियलें, जगीं सांडियलें। शेखीं उपेक्षिलें आप्तवर्गी। ' (अ. ६८७) असा दारुण अनुभव या दांपत्याला आला. अशी बारा वर्षे निघून गेली. त्या काळात या जोडप्याला चार मुले झाली. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई अशी त्या चौघांची नावे होती. पहिले तीन मुलगे आणि चौथी मुलगी.

यथाकाल तिन्ही मुलगे व्रतबंधास योग्य झाले, पण त्यांची जात ' कुळावेगळी ' पडली. ब्रह्मसभा भरली. सभेपुढे विठ्ठलपंतांनी क्षमायाचना केली. पण ' या अपराधाला देहान्त

प्रायश्चित हेच शासन आहे.' असा ब्राह्मणांनी निर्णय दिला. विठ्ठलपंताने तो निर्णय प्रमाण मानला. आपली पत्नी आणि मुलेबाळे यांना सोडून तो गेला. त्याने आत्मार्पण केले.

त्यानंतर 'आम्हां कवण गती ?' असे निवृत्तिनाथांनी ब्राह्मणांना विचारले. 'तुम्ही पैठणला जाऊन तिथून पत्र आणले तर ते पत्र आम्ही शिरसावंद्य मानू. तुम्हांला जात, कुळ आणि वर्ण यापैकी कशाचाही अधिकार नाही. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांपैकी कोणत्याही वर्णाचे स्थान तुम्हांला नाही.' असे ब्राह्मणसभेने त्या मुलांना सुनावले. ते ऐकून निवृत्तिनाथांनी आपल्या भावंडांची समजूत घातली. 'कुळीचा कुळधर्म अवश्य पाळावा। सर्वथा न करावा अनाचार।' (अ. ६९०) असा विवेक त्यांनी सांगितला. त्यावर सोपानदेव म्हणाले, 'दादा, तुमचे हे म्हणणे मला पटत नाही. पांडवांना तरी कोणते कुळ होते ? दुर्वास, वसिष्ठ, अगस्ती आणि गौतम या ऋषींचे कुळ कोण पुसणार ? व्यास आणि वाल्मिकी यांच्या कुळाची तरी काय वार्ता आहे ? पण ब्रह्मसभेचे म्हणणे दुर्घट असले तरी ते सेव्य आहे, हे मी मान्य करतो.'

यानंतर आळंदीच्या ब्रह्मसभेचे पत्र घेऊन ही भावंडे तीर्थयात्रा करीत करीत पैठणला येऊन पोहोचली. तिथल्या ब्रह्मसभेपुढे आळंदीचे पत्र त्यांनी सादर केले. 'पत्र वाचुनिया सकळ झाले श्रुत। संन्याशाचे पुत्र कळो आले।' (अ. ६९२) विचार करून त्या सभेने या भावंडांना एक उपाय सुचविला. ते म्हणाले, 'अनुतापयुक्त मनाने तुम्ही भजन करा. गाय, खर आणि श्वान यांना वंदन करावे. अंत्यज हे ब्राह्मण आहेत असे समजून त्यांच्यापुढे लोटांगण घालावे' हा आदेश त्या भावंडांनी आनंदाने मानला.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई ही या भावंडांची नावे ऐकून पैठणच्या ब्राह्मणांना हसू आले. एक ब्राह्मण त्यांना म्हणाला, 'नावात काय आहे ? हा समोर दिसणारा 'ज्ञानबा' या नावाचा रेडा पाण्याची पखाल वाहात आहे.' त्यावर ज्ञानदेव म्हणाले, 'तो रेडासुद्धा माझाच आत्मा आहे. आमच्यामध्ये वेगळीक नाही.' ज्ञानेश्वरांचे हे बोलणे ऐकून ब्राह्मण म्हणाले, 'तर मग या रेड्याच्या तोंडून वेद-वाणी आम्हांला ऐकवा.' ज्ञानदेवांनी त्या रेड्याला आदेश केला. तेव्हा त्याच्या तोंडून सर्वांना वेदवाणी ऐकायला मिळाली. तो चमत्कार पाहून ब्राह्मणांना पश्चात्ताप झाला. कर्मठ अभिमानामुळे आपण फसलो आणि 'लटिकेच हुंबरों प्रतिष्ठेसी (अ. ६९३) अशी आमची गत आहे', हे त्यांनी मान्य केले.

'तुम्ही वेदरूप भूदेव प्रत्यक्ष' असे ज्ञानदेव त्या ब्राह्मणांना म्हणाले. त्यानंतर पैठण क्षेत्रामध्ये असलेले अध्यात्मग्रंथ या भावंडांनी अवलोकन केले. 'सांगती पुराण, रात्री हरिकीर्तन। पैठणीचे जन वेधियले.' (अ. ६९४) पैठणच्या ब्रह्मसभेने या भावंडांना अधिकारपत्र दिले. ते घेऊन त्यांनी सर्व ब्राह्मणांना साष्टांग नमन केले.

पैठणहून ही चारी भावंडे नेवासे या गावी आली. तिथे ज्ञानेश्वरांनी गीतेवर आपली मराठी टीका लिहिली. 'प्राकृत पैं केलें गीतेलागी।' (अ. ६९५) त्यानंतर निवृत्तिनाथांच्या

सांगण्यावरून ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव हा ग्रंथही पुरा केला (अनुभव करावा अमृताऐसा।) परतीचा प्रवास करून ती भावंडे आळंदीला आली.

'आदि' या प्रकरणाचा समारोप करताना नामदेवांनी ज्ञानेश्वरांचा महिमा वर्णिला आहे. निगमवल्ली, गीतेचा अलंकार, ब्रह्मानंदलहरी, चैतन्याचा दीप, भवार्णवी उभारलेली नाव अशा शब्दांत ते ज्ञानेश्वरीचा गौरव करतात. 'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।' (अ. ६९९).

अशा रीतीने विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांचा विवाह, विठ्ठलाचे संन्यासग्रहण, गृहस्थाश्रमाचा त्याने पुन्हा केलेला स्वीकार, ज्ञानेश्वरादी चार भावंडांचा जन्म, विठ्ठलपंतांना देहान्त प्रायश्चित्ताची ब्रह्मसभेने फर्मावलेली शिक्षा, त्यांनी या शिक्षेचे केलेले परिपालन, आळंदीच्या ब्रह्मसभेने या भावंडांना नाकारलेला व्रतबंधाचा अधिकार, पैठणच्या ब्रह्मसभेपुढे चारी भावंडांची हजेरी, रेड्याच्या मुखातून ज्ञानेश्वरांनी करविलेले वेदपठण, ब्रह्मसभेस झालेला अनुताप, त्यांनी या भावंडांना दिलेले अधिकारपत्र, पैठणहून चारी भावंडांचे नेवासे येथे गमन, तिथे ज्ञानेश्वरांनी केलेली गीतेवरील मराठी टीकेची रचना, अमृतानुभवाची ज्ञानदेवकृत रचना आणि चारी भावंडांचे आळंदीला पुनरागमन एवढ्या घटना 'आदि' या प्रकरणाच्या आधारे आपल्याला समजतात.

'आदि' मधील दोन गोष्टी खटकतात. श्रीपादस्वामींनी चैतन्याश्रमाला पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा जेव्हा आदेश दिला, तेव्हा त्यांनी त्याला एक भरघोस आश्वासन दिले होते. 'अविधी कर्माचें न धरावें भय। यासी आहे साह्य जगदीश।' (अ. ६८६) या आश्वासनाचे काय झाले? 'पुत्रवती हो' हा रखुमाईला आपण दिलेला आशीर्वाद अनाठायी ठरला, तर आपले सर्व पुण्य लयाला जाईल म्हणून जे श्रीपादस्वामी चैतन्याला पुन्हा गृहस्थधर्म स्वीकारण्याचा आदेश देतात, तेच श्रीपादस्वामी 'न धरावे भय' असे त्याला कशाच्या आधारावर सांगतात? संन्यास धर्मानंतर गृहस्थधर्म आचरण्याचे जे 'अविधीकर्म' चैतन्याने केले, त्याला जगदीशाने साहाय्य केले किंवा कसे, हे श्रीपादस्वामींनी का पडताळून पाहिले नाही? आपल्या आदेशामुळे आपल्या या शिष्याला देहान्ताची शिक्षा होते आणि त्याची मुले–बाळे देशोधडीला लागतात, याची कोणतीच खंत श्रीपादस्वामींना झालेली दिसत नाही.

दुसरा मुद्दा विठ्ठलपंतांची धर्मपत्नी रुक्मिणी ऊर्फ रखुमाई हिच्याविषयीचा. विठ्ठलपंत ब्रह्मसभेचा आदेश मानून एकटेच निघून गेले. मग रखुमाईचे काय झाले? 'आदि' या प्रकरणाने तिच्या बाबतीत मौनच पाळले आहे. या दोन गोष्टी वजा केल्या तर नामदेवकृत 'आदि' या प्रकरणातून ज्ञानेश्वरांची कुळकथा बऱ्याच प्रमाणात आपल्या हाती लागते.

## 'ज्ञानेश्वर महाराजांची समाधि'

नामदेवकृत हे प्रकरण ७१ अभंगसंख्येचे आहे. शके १२१८ मध्ये कार्तिकी यात्रेच्या वेळी ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली. 'संजीवन समाधी' म्हणजे जिवंत समाधी घेण्याचा आपला निर्णय त्यांनी सर्व संतसज्जनांना कळवला. तो बेत समजल्यावर 'पंढरीचा पोहा

आला अलंकापुरी।' (अ. ७६४) पंढरीचे सारे वारकरी आळंदीला जमा झाले. समाधीच्या आधी ज्ञानेश्वर उन्मनी-अवस्थेत गेले होते, त्यांच्या अंतरी तन्मयतेची ज्योत उजळली होती. औटपीठ चक्रावर ऐकू येणाऱ्या अनाहत नादात त्यांची चित्तवृत्ती रंगली होती. हृदयात आत्मज्योती उजळली होती.

ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या वार्तेमुळे हजारो वारकऱ्यांच्या भावनांना प्रचंड उधाण आले होते. खांद्यावर पताका घेतलेल्या वारकऱ्यांची एकच गर्दी झाली होती. त्यांनी इंद्रायणीची दोन्ही तीरे भरून गेली होती. 'अल्याड पल्याड पताकांचे भार। मध्ये मनोहर इंद्रायणी' (अ. ७६८) असे ते अपूर्व दृश्य होते.

नारा, विठा, गोंदा आणि महादा या नामदेवांच्या चारी मुलांनी समाधीची जागा झाडून स्वच्छ केली. भागीरथीचे जल आणून ठेवले होते. गंध, अक्षता, तुळशी व फुले ही सामग्री सिद्ध होती. योगीराज ज्ञानेश्वर समाधी घेण्यासाठी बाहेर पडले. चक्रतीर्थावरचा तो सोहळा देवांनीही पाहावा अशा योग्यतेचा होता. टाळ, विणे आणि वाद्ये यांच्या गजरात ज्ञानेश्वर समाधीच्या स्थळाकडे चालले होते. चांगा वटेश्वर, सावता माळी, गोरा कुंभार, विसोबा खेचर या संतांनी ज्ञानेश्वरांना वंदन केले. नामदेवांना मात्र दुःख अनावर झाले. 'नामा तळमळी वत्सा ऐसे।' ज्ञानेश्वरांनी सर्वांना नमस्कार केला! प्रत्यक्ष श्रीविठ्ठल आणि निवृत्तिनाथ यांनी ज्ञानेश्वरांचे दोन्ही हात आपल्या हातांत धरले होते, त्यानंतर ते समाधीच्या पाळीत उतरले. 'जाऊनी ज्ञानेश्वर बैसले आसनावरी। पुढे ज्ञानेश्वरी ठेवीयली ...तीन वेळा तेव्हा जोडिले करकमळ। झाकियले डोळे ज्ञानदेवे। भीममुद्रा डोळां निरंजन मैदान। झाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव।' हे नामदेवकृत वर्णन (अ. ८२५) अतिशय प्रत्ययकारी आहे. ज्ञानराज ब्रह्मस्वरूपी मिळाल्यानंतर बांधलेल्या तळ्याचा पाट फुटून बारा वाटांनी ओघ वाहावेत किंवा हरिणीवाचून खोप ओस पडल्यावर पाडसे दहा दिशांना भ्रमावीत, तशी संतजनांची दयनीय दशा झाली. 'नामा म्हणे देवा पेटला हुताशन। करा समाधान निवृत्तीचे।'

सर्वांनी खिन्न मनांनी ज्ञानदेवांच्या समाधीवर फुले वाहिली. जयजयकार करून टाळी पिटली. इंद्रायणीत आचमन केले. त्यानंतर सर्वजण तिथून बाहेर पडले. कार्तिक वद्य (त्रयोदशीसह) द्वादशी, शके १२१८ या दिवशी ज्ञानदेवांनी ही समाधी घेतली.

## अमोल ठेवा

नामदेवांनी केलेले समाधीचे हे वर्णन म्हणजे करुणरसाचे जिवंत आणि जागते उदाहरण आहे. संतपरंपरेत ज्ञानेश्वरांविषयी नांदणारे अपूर्व प्रेम नामदेवांच्या या प्रकरणांतून अल्पाक्षर पण अर्थबहुल शैलीमध्ये व्यक्त झाले आहे. अवघ्या एकवीस वर्षात ज्ञानेश्वरांनी आपली जीवितयात्रा सफळ-संपूर्ण केली, हे नामदेवांनीच सांगून ठेवल्यामुळे तुम्हांआम्हांला समजले आहे. धुक्यातून धूसर दिसणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या चरित्र-चित्राचे महत्त्वाचे रंग नामदेवांच्या कुंचल्यातून उमटले आहेत.

नामदेवांनी मराठी माणसाला प्राप्त करून दिलेला हा ठेवा खरोखर लाख मोलाचा आहे! □ □ □

दोन

# श्रीज्ञानेश्वरांची ग्रंथसंपत्ती

**ज्ञानेश्वरीचे उद्दिष्ट । रोचक विषयान्तरे । स्वतंत्र प्रज्ञा-प्रतिभा । नामदेवांचा निर्वाळा । शांकरमताचेच प्रतिपादन । कोऱ्या कागदाची आख्यायिका । सगुणाकडून निर्गुणाकडे । भक्तीचा रसाळ आविष्कार । ज्ञानदेवांची क्रीडासवती । त्रिवेणी संगम ।**

'ज्ञानेश्वरी' ही श्रोतृसंवाद-दीपिका आहे. आपल्या मराठी गीताभाष्याच्या माध्यमातून ज्ञानेश्वरांनी आपल्या श्रोत्यांशी साधलेला तो हृदयसंवाद आहे. 'चांगदेव-पासष्टी' ही ज्ञानेश्वरांची स्नेहसंवादवाहिनी आहे. कोरे पत्र पाठवणारे चांगदेव हे आपले परममित्र आहेत, या भावनेने ज्ञानेश्वरांनी त्यांच्याशी केलेला तो सुख-संवाद आहे. 'अमृतानुभव' हा ज्ञानदेवांचा अपूर्व आत्मसंवाद आहे. 'तुका म्हणे होय मनाशी संवाद । आपुलाचि वाद, आपणासि' या परमोच्च पातळीवरील ज्ञानेश्वरांचा तो आत्मबोध आहे. 'अभंग-गाथा' ही ज्ञानेश्वरांची जन-संवादिनी आहे. 'विश्व हे मोहरे लावून' ज्ञानेश्वरांनी अभंगांतून सादर केलेली स्फुट स्वरूपाची पारमार्थिक भावकविता म्हणजे त्यांची अभंग-गाथा आहे. अमृतातेही पैजा जिंकणारा मराठा बोल आपल्या चारही ग्रंथांतून ज्ञानेश्वरांनी सुप्रतिष्ठित केला आहे.

'पुढती, पुढती, पुढती । इया ग्रंथ पुण्यसंपत्ती ।
सर्व सुखी सर्वभूतीं । संपूर्ण होईजो ।'

(ज्ञानेश्वरी १८-१८०९)

या ग्रंथाच्या पुण्यरूपी संपत्तीने अखिल प्राणिमात्रांनी सर्व सुखांनी उत्तरोत्तर परिपूर्ण व्हावे, अशी आपल्या ग्रंथलेखनामागील सदिच्छा ज्ञानेश्वरांनी व्यक्त केली आहे. लोकोद्धाराची ही प्रेरणा फार मोलाची आहे.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व चांगदेव पासष्टी हे तीन प्रबंध आणि स्फुट अभंग-गाथा असे एकूण चार ग्रंथ संत ज्ञानेश्वरांच्या नावावर नमूद आहेत. त्यापैकी ज्ञानेश्वरी ही गीता-टीका आहे. गीतेमधील अठरा अध्यायांमध्ये एकूण सातशे श्लोक आहेत. त्यावर नऊ हजार ओव्यांचा प्रपंच ज्ञानदेवांनी केलेला आहे. मराठी गीतेचा त्यांनी त्यातून पाया घातलेला आहे.

## ज्ञानेश्वरीचे उद्दिष्ट

ज्ञानेश्वरी कशासाठी लिहिली ? ज्ञानेश्वरीचे उद्दिष्ट काय असावे ?

" मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरें लावावें।
अलौकिका नोहावें। लौकिकाप्रती। "

जो सामान्य मनुष्य आहे, त्याला आपल्या चालीने चालू द्यावे. संस्कृतच्या कपाटामध्ये बंदिस्त असलेली ही जी अध्यात्मविद्या आहे, तिची कुलपे काढावीत आणि त्या विद्येचे झरे मराठीच्या माळरानावर झोपडी झोपडीपर्यंत नेऊन ठेवावेत, या कल्पनेमधून त्यांनी हे लिहिलेले आहे. 'सकळांसि येथ आहे अधिकार।' अथवा, 'म्हणौनि कुळजातिवर्ण। हे आघवेंचि गा अकारण' असे ज्ञानेश्वरांनी सांगून ठेवले आहे. देवाच्या दरबारात माणूस हा इथून तिथून एक आहे; व परमार्थाचा अधिकार सर्व जाति-वर्णांच्या लोकांना सारखाच आहे, असे त्यांचे सांगणे आहे.

ज्ञानेश्वरी हे गीतेवरचे प्रवचन आहे. पण हे प्रवचन काव्यमय आहे. यात पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, निष्कर्ष असे काही नाही, मतामतांचा गलबला नाही. पांडित्याचे प्रदर्शन करावे या हौसेपोटी ज्ञानेश्वरीचा अवतार झालेला नाही. गीतेतील तत्त्वज्ञान सामान्य माणसाला लोकभाषेत सोप्या शब्दांत सांगावे, म्हणून ही 'भावार्थदीपिका' ज्ञानेश्वरांनी लिहिली आहे. 'वारेलग पाखरू गगनीं भरे' असे फारसे कुठे झालेले नाही. जी विषयान्तरे आहेत, त्यांच्यामागेही ज्ञानेश्वरांची योजना आहे.

## रोचक विषयान्तरे

ज्ञानेश्वरीत जी विषयान्तरे आहेत, तीही मूळ विषयाला पुष्टिदायक आहेत; रुचिर आहेत. कुठे विवेचन वाढले तर ज्ञानेश्वर म्हणतात, 'कथेचा पसरू जाहला, श्लोकार्थ दुरी गेला', असे मी होऊ देणार नाही. तेव्हा सरलार्थ सांगणारी ज्ञानेश्वरी ही गीतेवरील खरी भावार्थदीपिका आहे. 'तेथ अभिप्रायोचि अभिप्रायातें विये। भावाचा फुलोरा होत जाये। मतिवरी' या भूमिकेतून ज्ञानेश्वरांनी हे भाष्य लिहिलेले आहे.

संत साहित्याचा अभ्यास काही व्यासंगी मंडळी पाठचिकित्सेसाठी (Textual Criticism) करतात. तेही काम कुणीतरी करायला पाहिजे. काहीजण भाषाशास्त्रीय

आणि व्याकरणिक अभ्यासाच्या उद्देशाने संतवाङ्मयाकडे वळतात. काही लोक त्यामध्ये तेव्हाच्या समाजाचे काय प्रतिबिंब आहे, याचा शोध घ्यायचा प्रयत्न करतात. ती फलश्रुती ह्राही त्यांच्या अभ्यासाचा विषय होऊ शकतो. काही माणसे केवळ पारमार्थिक भूमिकेवरून संतांचे मनोगत समजून घ्यायचा प्रयत्न करतात; आणि काही अभ्यासक वाङ्मयेतिहासाचे एक साधन म्हणून संतसाहित्याकडे पाहतात.

## स्वतंत्र प्रज्ञा-प्रतिभा

संतांनी हे सगळे काव्यलेखन कशासाठी केलेले असावे, याचा आपण खरा शोध घ्यायला पाहिजे. ज्ञानेश्वरी हे प्रतिपद-भाष्य नाही. शंकराचार्यांची गीतेवरची जी टीका आहे, ते प्रतिपद-भाष्य आहे. ते मूर्तिमंत 'लॉजिक' आहे.

ज्ञानेश्वरांनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने आणि प्रतिभेने गीता ही या ठिकाणी सांगितली आहे. त्यामुळे ते असे म्हणतात की, 'बटमोगरा हा एखाद्या माळेमध्ये गुंफलेला असो, किंवा मोकळा असो, त्याच्या गंधामध्ये ज्याप्रमाणे फरक पडत नाही, परिमळामध्ये उणीव येत नाही, त्याप्रमाणे मूळ गीता समोर ठेवून जरी आपण ज्ञानेश्वरी वाचली, तरी ती आपल्याला आवडेलच; आणि ज्ञानेश्वरी हे एक स्वतंत्र काव्य आहे म्हणून आपण जरी पाहिले तरीसुद्धा ती (गीतेचा कुठेही अनुबंध न ठेवता) आपल्याला सेव्य वाटेल.

गीतेवर अनेकांनी टीका केली आहे. शंकराचार्य आहेत, रामानुजाचार्य आहेत, दासोपंत आहेत, वामन पंडित आहेत, लोकमान्य टिळक आहेत, थ्रायडर आहे, ऑटो आहे, प्लासेन आहे. पाश्चात्य आणि पौर्वात्य अशा अनेक लोकांनी गीतेवर टीका केलेली आहे. नुसत्या महाराष्ट्र सारस्वतामध्ये गीताभाष्यांची संख्या एकूण साठ आहे. या सर्व टीकांमध्ये ज्ञानेश्वरी ही 'अनामिका सार्थवती बभूव' अशी आहे. अनन्वय अलंकारासारखी आहे. ज्ञानेश्वरीनंतर आतापर्यंत अनेक ग्रंथ झालेले आहेत. पण ज्ञानेश्वरीच्या तोलामोलाचा, ज्ञानेश्वरीच्या जवळपास पोहोचेल असा एकही ग्रंथ नाही. जगामध्ये दहा उत्कृष्ट ग्रंथ काढून दाखवा, असे म्हटले तर त्यातही आपल्याला ज्ञानेश्वरीचा समावेश करावा लागेल, इतके हे अतिशय उत्कृष्ट असे भाष्य आहे. तत्त्व, काव्य आणि अनुभूती यांचा संगम या ठिकाणी झालेला आहे.

"किंबहुना तुमचें केलें। हे धर्मसंकीर्तन सिद्धीस गेलें।
येथें माझेंचि उरलें। पाईकपण।"

—असे ज्ञानेश्वरांनी म्हटलेले आहे. आपण ज्ञानेश्वरी कशासाठी लिहिलेली आहे, याविषयी ज्ञानेश्वरांची भूमिका ठाम आहे. निश्चित आहे, हे धर्मसंकीर्तन आहे असे ते म्हणतात. अलंकार आलेले आहेत ते अनुषंगाने आलेले आहेत. लाडवामध्ये बेदाणे सहज पेरावेत, रांगोळीमध्ये गुलाल टाकावा, तितके ते एकरूप झालेले आहेत. 'उपमा श्लेष कोंदाकोंदी। झाडा देईन प्रतिपदीं ॥ असे ते सांगतात. ते अतिशय रुचिर, रमणीय असे

काव्य झालेले आहे. पण शेवटी 'अध्यात्मशास्त्रीं इयें, अंतरंगचि अधिकारिये.' अंतरंगालाच ही सगळी अध्यात्माची भाषा कळेल, असे ते सांगतात.

## नामदेवांचा निर्वाळा

अन्य संतांनी ज्ञानेश्वरांबद्दल आणि ज्ञानेश्वरीबद्दल आपल्याला हाच निर्वाळा दिलेला आहे.

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी।
एक तरी ओवी अनुभवावी॥'

ज्ञानेश्वरीची एखादी ओवी कुठेतरी आपल्या जीवनामध्ये, वर्तनामध्ये झिरपावी, उतरावी, त्याचे उपयोजन आपल्याला करता यावे, असे नामदेवांचे सांगणे आहे. ज्ञानेश्वरी हा एक चैतन्याचा दीप आहे.

'सोऽहम् सुकृताच्या सोडोनिया गाठी।
केलीसे मराठी गीता-देवी॥'

परमेश्वराचा अंश तुमच्या आमच्या ठिकाणी भरलेला आहे, हे ज्ञान मराठीमध्ये सांगावे, यासाठी ज्ञानेश्वरीचा अवतार आहे, असा दिलासा नामदेवांनी दिला आहे.

ज्ञानेश्वरांचा दुसरा ग्रंथ 'अमृतानुभव' हा आहे. ज्या क्रमाने – कालानुक्रमाने – हे ग्रंथ ज्ञानेश्वरांनी लिहिलेले असतील, असे मला अभिप्रेत आहे, ज्या क्रमाने मी त्यांचा परामर्श घेतो आहे. आधी ज्ञानेश्वरी लिहिली आणि मग अमृतानुभव लिहिले, असे माझे मत झालेले आहे. वासुदेव बळवंत पटवर्धनांचे मत वेगळे आहे, ते असे म्हणतात की, 'अमृतानुभवामध्ये संस्कृत परंपरेचे, नमनाचे पाच श्लोक प्रथम सांगितलेले आहेत. ही जुनी परंपरा अमृतानुभवाने चालू ठेवलेली आहे. तेव्हा आरंभीच्या या आर्ष काळामधील ती एक कृती असावी, ज्ञानेश्वरीमधले नमन हे मात्र प्राकृतामधले आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी ही नंतर लिहिली गेली असावी. अमृतानुभवामध्ये त्यांनी शांकरमत मांडलेले आहे, आणि ज्ञानेश्वरीचे मत हे रामानुजांच्या भक्तीचे मत आहे. ते प्रतिबिंब – रामानुजांच्या मताचे – त्यामध्ये पडलेले आहे, असाही एक विचार त्यांनी मांडलेला आहे.

## शांकरमताचेच प्रतिपादन

हे दोन्ही विचार तितकेसे बरोबर वाटत नाहीत. ज्ञानेश्वरी काय किंवा अमृतानुभव काय, या दोहोंच्या ठिकाणी शंकराचार्यांचा अद्वैत विचार, शांकरमत हेच ज्ञानदेवांनी प्राधान्याने मांडलेले आहे. नमनाच्या भाषेवरून काव्याचा कालानुक्रम ठरविण्याऐवजी त्याच्या अंतरंगाकडे आपण जर वळलो, आणि अंतःप्रमाण हें जर आपण लक्षात घेतले, तर असेच आढळून येईल की, आधी ज्ञानेश्वरी आणि नंतर अमृतानुभव असाच क्रम असावा. ज्ञानेश्वरीमध्ये 'वाकुडा विचुका पाउली' अशी नम्रतेची भूमिका आहे. अमृतानुभवामध्ये 'उपरी दशोपनिषदे। पुढारा न ढळती पदे' हा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त

केलेला आहे. अमृतानुभवाचा विषय आहे शिव आणि शक्ती यांचं ऐक्य. शब्दखंडन आणि शब्दमंडन हे त्यांनी नंतर मांडलेले आहे. माणसाच्या ज्ञानाचा निरास झाला पाहिजे आणि अज्ञानाचाही निरास, निचरा व्हायला पाहिजे. ज्ञान आणि अज्ञान यांच्या पलीकडची जी पदवी आहे, ती प्राप्त व्हायला पाहिजे. शांकरमताच्याही पुढे गेलेला चिद्विलासवादाचा – स्फूर्तिवादाचा विचार त्यांनी मांडलेला आहे. त्या काळामध्ये ' जग ही माया आहे, तो आभास आहे, ते मृगजळ आहे ' असे शंकराचार्यांनी सांगितले – ते त्याच्यामध्ये आपण गुंतून पडू नये म्हणून सांगितले. पण त्याचा आम्ही चुकीचा अर्थ लावला, आणि मग नैष्ठिक नैष्कर्म्य म्हणजे निष्क्रियता आली. जग ही जर माया असेल, ते जर मृगजळ असेल, तर प्रपंच करायचे काय कारण आहे ? शेती पिकवायचे कारण नाही. घर बांधायचे कारण नाही. लवकरात लवकर परमार्थ मिळवावा. परमेश्वरामध्ये विलीन होऊन जावे, अशी एक निष्क्रियता या समाजामध्ये आली. तेव्हा ज्ञानदेव पुढे जाऊन असे म्हणाले की, ' तू जसा खरा आहेस, तुझ्यामधला जीव जसा खरा आहे, तसेच भासमान होणारे, दृश्यमान होणारे हे जगही खरे आहे. जी सचेतन आणि अचेतन सृष्टी आहे, तीही त्या परमेश्वराचाच विलास आहे. ' माझेंनि निखिलेपणे, हे जगचि मिया वोतिलें । ' परमेश्वराचीच ही सारी निर्मिती आहे. ते निखळ विश्व खरे आहे. या जगावर हाडामासाच्या माणसाप्रमाणे तू प्रेम करायला हरकत नाही,' हा एक चिद्विलासवादाचा, अत्यंत निकोप आणि कालोचित असा तत्त्वविचार अमृतानुभवामध्ये त्यांनी मांडला. पुढं गाथेमध्येही तो आपल्याला अनेक ठिकाणी पहायला मिळतो.

' जग असिकी वस्तुप्रभा ' हे अगदी सुरुवातीला अमृतानुभवामध्ये ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वरीमध्येही तो विचार आपल्याला वाचायला मिळतो. अमृतानुभवामध्ये अनेक समर्पक दृष्टांत ज्ञानदेवांनी दिलेले आहेत. पण आपल्याला अलंकाराच्या बाबतीत इथेच थांबावे लागते. अन्य काव्यांगेही त्यामध्ये फारशी पोसलेली आहेत, असे दिसत नाही. ज्ञानेश्वरी-मध्ये ज्ञानेश्वर हे थोडेसे पराधीन होते. मूळ गीतेवर आपल्याला भाष्य करायचे आहे, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांना बाजूला जाता येत नव्हते दुसऱ्यांनी जे सांगितले, ते सोप्या शब्दांत त्यांना मांडायचे होते./अमृतानुभवामध्ये त्यांच्या स्वतंत्र, स्वायत्त प्रज्ञेचा विलास आपल्याला पाहायला मिळतो. आणि ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेची जी ' साय ' आहे, जो सर्वोत्कृष्ट असा अंश आहे, तो अमृतानुभवामध्येही आपल्याला पाहायला मिळतो. ते अतिशय शुद्ध असे रसायन आहे. या रसायनाला शर्करेची गरज नाही, अनुपानाचीही गरज नाही, असे जे पांगारकर म्हणतात, ते अमृतानुभवाच्या बाबतीत सर्वस्वी खरे आहे.

## कोऱ्या कागदाची आख्यायिका

यानंतर चांगदेव पासष्टीकडे आपण वळणार आहोत. चांगदेवांनी जेव्हा ऐकले की, पैठणला ज्ञानदेवांनी रेड्याच्या मुखातून वेद वदविला, तेव्हा ' हा ज्ञानेश्वर आहे तरी कोण बालयोगी ?' हे कळावे म्हणून त्याला एक पत्र लिहावे, असे त्यांनी ठरविले. ती आख्यायिका आपल्याला असे सांगते, " पत्रामध्ये मायना काय लिहायचा ? हा आपल्या-

पेक्षा वयाने लहान आहे. त्याला नमस्कार लिहिता येत नाही. पण हा अधिकाराने मोठा आहे, त्याला आशीर्वादही देता येत नाही.'' तेव्हा चांगदेवांनी पत्र म्हणून कोरा कागद पाठवला. ते कोरे पत्र पाहिल्यावर मुक्ताबाई म्हणाली, "हा अगदी 'कोरा' राहिला आहे!'' जसे ती गोरोबाला नामदेवांच्या बाबतीत म्हणाली की, 'शून्यभर नाही भाजला कोठे.' तसे! पण निवृत्तिनाथांनी मात्र त्याचा अर्थ वेगळा लावला की, चांगदेवांचे मन या कागदाप्रमाणे कोरे आहे, स्वच्छ आहे. ज्ञानदेवांनी पत्ररूप असं पासष्ट ओव्यांचे उत्तर त्याला पाठवलेलं आहे. अतिशय थोडक्यामध्ये!

गुलाबाच्या फुलांचा अर्क अत्तराच्या एखाद्या थेंबामध्ये असावा, त्याप्रमाणे जे विस्ताराने सांगता येईल, ते अतिशय सूक्ष्मपणाने, सुसूत्र रीतीने, अर्करूपाने ज्ञानदेवांनी 'चांगदेव पासष्टी'मध्ये सांगितलेले आहे किंबहुना, 'अमृतानुभव' स्थूल रूप आहे असे म्हटले, तर 'चांगदेव पासष्टी' हे त्याचे सूक्ष्म रुप आहे असे आपल्याला म्हणता येईल. हाही त्यांचा छोटेखानी, लघुग्रंथ अत्यंत स्वतंत्र आहे. त्यामध्ये त्यांनी चांगदेवांच्यापुढे पूर्णबोध मांडलेला आहे. कुठेही आपण मोठे आहोत, ते कनिष्ठ आहेत अशी भूमिका घेतलेली नाही. अतिशय बरोबरीच्या नात्याने, एक राजयोगी या दुसऱ्या हठयोग्याशी बोलतो आहे, अशा प्रकारची संवादाची भूमिका त्यांनी या ठिकाणी ठेवलेली आहे.

## सगुणाकडून निर्गुणाकडे

हे स्वानुभवाचे रसाळ खाद्य आहे. इथे 'तत्त्वमसि' हे बोधवाक्य आहे. तत् म्हणजे ते – परमेश्वराचे मूळ रूप. त्वम् म्हणजे तूच आहेस, तुझ्या ठिकाणी परमतत्त्व भरून राहिलेले आहे हा उपदेश किंवा हा विचार. 'तत्' साठी त्यांनी तीस ओव्या खर्च केलेल्या आहेत. 'त्वम्' साठी तीस ओव्या खर्च केल्या आहेत. आणि 'असि' या शेवटच्या क्रियापदासाठी पाच ओव्या, असा तीस+तीस+पाच = स्थूलमानाने पासष्ट ओव्यांचा हा हिशेब आहे. ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवामध्ये व्यक्त झालेला जो स्फूर्तिवादाचा विचार आहे, तो पुन्हा चांगदेव पासष्टीत आलेला आहे. स्फूर्तिवाद पुकारून त्यांनी अद्वैतमताची स्थापना केलेली आहे. उत्तरेमध्ये हे सगुणोपासक आणि ते निर्गुणोपासक अशी 'वॉटर टाईट कंपार्टमेन्टस्' आहेत. खरवसाचे तुकडे सुरीने कापावेत, आणि चांदीच्या ताटलीत ठेवावेत आणि मग त्यांचा परस्परसंबंध राहू नये, अशी एक विभागणी उत्तरेमधल्या धर्मसंप्रदायांमध्ये आपल्याला पाहायला मिळते. पण इथे सगुणत्वाकडून निर्गुणत्वाकडे असा प्रवास आहे. मुलाचं पहिल्यांदा बोट धरावे, 'चाल, चाल माते, पायी मोडले काटे' म्हणावं मग हळूच त्याचे बोट सोडून द्यावे; आणि मग ते पळायला लागावे. तसा सामान्य माणसाचा वकूब लक्षात घेऊन, त्याच्या चालीने, सगुणाकडून निर्गुणाकडे, द्वैताकडून अद्वैताकडे असा हा प्रवास ज्ञानदेवांनी आणि त्यांच्या प्रभावळीमधल्या संतांनी आखून दिला आहे.

> 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे।
> सगुण निर्गुण एकु गोविंदु रे॥'

या अभंगाचाही हाच भावार्थ आहे.

शेवटी ज्ञानदेव स्फूर्तिवाद पुकारतात, आणि अद्वैतमताची स्थापना करतात. भांड्यामधले पाणी समुद्रात ओतल्यावर समुद्रातले पाणी कोणते, आणि भांड्यामधले पाणी कोणते हे वेगळे करून दाखवताच येऊ नये, त्याप्रमाणे 'देव भक्तपण नाही, नाही त्यासी आन। किंवा 'राम म्हणता रामचि होशी। भाक घेई मजपाशी' अथवा 'बीज भाजून केली लाही। आम्हा जन्ममरण नाही॥' अशा प्रकारचे हे सगळे रोजच्या व्यवहारामधले दृष्टांत देऊन ही निर्गुणोपासना, हा अद्वैताचा विचार संतांनीं मांडलेला आहे.

## अल्पाक्षर, अर्थबहुल रचना

'पत्र' हा जो अलीकडे थोडा स्थिरपद झालेला वाङ्मयप्रकार आहे, त्याचा शुभारंभ हा आपल्याला चांगदेव पासष्टीमध्ये पाहायला मिळतो. या वाङ्मयप्रकाराचा ज्ञानदेवांनी पाया रचला आहे. त्याचे स्वरूप जे आहे, ते कथात्मक आहे, आणि ते करता करता, दृष्टांत देता देता, अल्पाक्षर पण अर्थबहुल अशी रचना ते करतात. एका सहप्रवाशाशी आपण संवाद करतो, अशी ते भूमिका घेतात. 'स्वस्तिश्री वटेशू' म्हणून चांगदेवांचा ते गौरव करतात, आणि मग आपला जो तत्त्वविचार आहे, तो त्याच्यापुढे ते विचारार्थ मांडतात, अशी त्या ग्रंथाची भूमिका आहे.

चौथा ग्रंथ म्हणजे अभंगांचा संग्रह असलेली ज्ञानदेवांची अभंग-गाथा. पारमार्थिक भावकवितेचा पाया ज्ञानदेवांनी आपल्या गाथेच्या रूपाने रचला आहे, असे आपल्याला म्हणता येईल. भावकवितेमध्ये ('लिरिक') एकेका 'मूड' चे अतिशय चेतोहर आणि उत्कट असे चित्रण असते. लहानपणी मराठी दुसऱ्या-तिसऱ्या इयत्तेत असताना आपण खिशामध्ये पांगाऱ्याची बी लपवून ठेवतो. गुरुजी तिकडे फलकलेखन करायला वळले की, ती बी आपण फरशीवर घासतो; आणि शेजारच्या मित्राच्या मांडीला चटका देतो. इकडे बी घासली की, तिकडे चटका द्यायचा असतो. 'आता बी घासलेली आहे. घंटा होऊ द्यात, नंतर मी चटका देईन' असे नाही. ही तीव्रता, ही उत्कटता 'लिरिक'मध्ये असते. मग विस्मय असेल, अनुकंपा असेल, क्रोध असेल. वात्सल्य असेल. माणसाच्या मनातल्या ज्या ज्या भावोर्मी त्या त्या वेळेला व्यक्त होतात, त्यांचे अतिशय चेतोहर आणि उत्कट. अत्यंत सूक्ष्म, अतिशय सूत्रमय असे चित्रण हे एकेका भावगीतामध्ये असते. एकेक भावकविता हे एकेका भावावस्थेचे चित्रण असते. लौकिक भाषेमध्ये केशवसुतांनी, तांब्यांनी, बालकवींनी भावकविता लिहिल्या. पारमार्थिक स्वरूपाच्या भावकविता या आपल्याला अभंगगाथेमध्ये पाहायला मिळतात.

## भक्तीचा रसाळ आविष्कार

या भावकवितेत मुख्य रस जो असतो, तो 'भक्ती'चा रस असतो. 'रूप पाहता लोचनी। सुख जाले वो साजणी॥' किंवा 'तुझिये निढळी कोटि चंद्र प्रकाशे। कमलनयन हास्य-सदन भासे॥' 'पैल तो गे काऊ कोकताहे। शकुन गे माये सांगताहे।' उड रे काऊ। तुझे सोन्याचे मढविन पाऊ॥' किंवा 'घणु वाजे घुणघुणा। वारा वाहे रुणझुणा॥' 'जिवाचिया

जिवा', 'त्रिभंगी देहुडा ठाण मांडोनि' किंवा 'माझिये जीवीचे आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।।' 'पंढरीचा निळा। लावण्य पुतळा।।' असे त्यांचे अनेक अभंग आहेत. यामध्ये भक्ती हा प्रमुख रस असून, त्या भक्तीचा अतिशय रम्य असा आविष्कार या एकेका अभंगामधून त्यांनी केलेला आहे. 'बाप रखुमादेवीवरू' या नाममुद्रेने अंकित झालेला, गंधित झालेला ज्ञानदेवांचा एकेक अभंग हा भावकवितेच्या तोलामोलाचा आहे, असे आपल्या लक्ष्यामध्ये येते. या भक्तिरसाच्या बरोबरीने ज्ञानदेवांच्या आत्मसाक्षात्काराचे तेज घेऊन त्यांचा अभंग आपल्याला भेटायला येतो. बद्ध, साधक, वंचित यातली कुठलीही अवस्था त्यांच्या ठिकाणी नाही. केवळ आत्मसाक्षात्काराची अवस्था आहे. तुकारामांच्या अभंगामध्ये आपल्याला साधकावस्थेतले अभंग पहायला मिळतील. वंचित दशेतले अभंग पाहायला मिळतील. 'तुका म्हणे आता, उरलो उपकारापुरता।' किंवा 'तुका तुकीं उतरला' असे अनेक अभंग आहेत. परंतु ज्ञानदेवांच्या ठिकाणी आपल्याला जी एकमेव अवस्था पहायला मिळते, ती साक्षात्काराची, साफल्याची. या साक्षात्काराचे तेज घेऊन त्यांचे अभंग आपल्यापुढे येतात. 'अवघ्या बाही म्यां व्योम कवळिले। किंवा 'अवचिता परिमाळु झळकला अळुमाळु।' 'पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती।' 'अधिक देखणे तरि निरंजन पाहणे' किंवा 'सुखी सुख नुरे, तेथ कोण उरे?' 'जगासि गवसणी। ब्रह्मरूपे घातली' 'योगिया दुर्लभ तो हा देखिला साजणीं।' 'काय सांगू तूते बाई।' 'सोनियाचा दिवस आजी अमृते नाहला' किंवा 'इवलेसे रोप लावियले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी' असे अनेक अभंग आहेत. मराठीतल्या सुभाषित रत्नभांडारामध्ये तुकारामाचे अभंग जसे जाऊन बसलेले आहेत, तसे ज्ञानदेवांचेही अभंग आलेले आहेत. तुमच्या-आमच्या मनीमानसी आपण ते घोळवतो आणि त्यातल्या तेजाचे, त्यातल्या सौंदर्याचे आपण पान करतो.

## ज्ञानेश्वरांची क्रीडासक्ती

या अभंग-कवितेचा पाया ज्ञानदेवांनी घातलेला आहे. त्यांचे एक हजार अभंग आहेत. काही ठिकाणी प्राथमिक अशी अवस्था मला आढळली. ज्ञानेश्वर कुठे तरी प्रयोग करताहेत. ते छंदांशी प्रयोग करताहेत. दीर्घ अभंग लिहिताहेत, छोटे अभंग लिहिताहेत. त्यांची क्रीडा चाललेली आहे. ही क्रीडासक्ती ज्ञानदेवांच्या काही अभंगांमधून पहायला मिळते. त्यांचे शंभरएक अभंग निखळ सौंदर्याने विनटलेले असे काढून दाखवता येतात. आणि बाकीचे अभंग हे त्या मानाने बेताचे आहेत. प्रायोगिक अवस्थेमधले आहेत, असे माझे प्रांजळ मत आहे. कोणत्याही थोर कवीच्या स्फुट कवितेच्या बाबतीत आपल्याला हे पाहायला मिळते. आज जर माधव ज्युलियन यांच्या भावकविता निवडायच्या म्हटल्या तर चारपाचापलिकडे त्या निघत नाहीत. तांबे घ्या, केशवसुत घ्या, पाच, दहा, पंधरा यांच्या पलिकडे आपण जात नाही; आणि 'at his best' जो कवी असतो तो फार थोड्या स्फुट कवितांतून पहायला मिळतो. ज्ञानदेवांच्या बाबतीत आपल्याला असे पहायला मिळते की, गाथेमध्ये त्यांच्या नावावर जे एक हजार अभंग आहेत, त्यातले शंभर अभंग ज्ञानदेवांच्या मुद्रेला शोभतील अशा त्या तोलामोलाचे आहेत आणि बाकीचे अभंग हे थोडे प्रायोगिक अवस्थेमधले आहेत.

ज्ञानदेवांच्या विराण्या किंवा गौळणी हे त्यांच्या अभंगांचे खास वैभव आहे. मधुराभक्ती किंवा शृंगारभक्ती म्हणून जी आहे, तिचे खरे सौंदर्य, निथळणारे असे सौंदर्य हे ज्ञानदेवांच्या विराण्यामध्ये किंवा त्यांच्या गौळणींमध्ये आहे. विदग्ध रसवृत्ती त्यांच्या स्फुट अभंगांमध्ये अधिक आहे, असे आपल्याला म्हणता येईल.

ज्ञानदेवांच्या या चार ग्रंथांचा धावता परिचय करून घेतल्यानंतर समारोपादाखल काही विचार आपल्यापुढे मांडता येतील.

ज्ञानेश्वर हे प्रेषित आहेत. ते क्रांतदर्शी प्रज्ञेचे महापुरुष आहेत. ते तत्त्वज्ञ आहेत. कलावंत आहेत आणि कवी आहेत. ज्या वेळी ज्ञानदेव हे नामदेवांना व अन्य संतांना घेऊन तीर्थयात्रेला निघाले, त्या वेळेला त्यांनी नामदेवाला घेऊन जाण्याची विठ्ठलापाशी परवानगी मागितली, असे नामदेवगाथेमध्ये 'तीर्थावळी' या प्रकरणामध्ये म्हटले आहे. ज्ञानदेव विठ्ठलाकडे जातात. 'हा जो तुमचा नामदेव आवडता शिष्य आहे, त्याला आमच्याबरोबर या तीर्थयात्रेला येऊ द्या' असे ते देवाला म्हणतात. तेव्हा विठ्ठल ज्ञानेश्वरांना म्हणतात, (असे नामदेव आपल्याला सांगतात) 'प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ती ज्ञानेश्वर' किंवा,

'म्हणे तू ज्ञानशीळ, चिद्रूप केवळ,
सबाह्य निर्मळ, स्फटिक जैसा ॥
सहज तीर्थरूप, तूंचि निरंतर,
असा हा विचार काय करिसी ? ॥'

ही जी विशेषणे विठ्ठलाच्या मुखामध्ये ज्ञानदेवांच्या संदर्भामध्ये वापरलेली आहेत, त्यामध्ये ज्ञानेश्वरांचे अलौकिकत्व, असाधारणत्व हे नेमके प्रगट होते. परब्रह्ममूर्ती, ज्ञानशील, केवळ चिद्रूप, स्फटिकाप्रमाणे सबाह्य निर्मळ, सहज तीर्थरूप ही विशेषणे किती सार्थ आहेत हे वेगळे सांगायचे कारण नाही.

## त्रिवेणी संगम

ज्ञानेश्वर प्रबंधांमध्ये प्राधान्याने तात्त्विक भूमिका घेतात आणि अभंगांमध्ये साक्षात्काराच्या भूमिकेवरून ते अधिक बोलतात. नाथमत, शांकरमत आणि भक्ती ही तिन्ही ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी खरोखरच एकवटलेली आहेत, पण तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ते स्फूर्तिवादाचा विचार, चैतन्याचा विचार मांडतात, आणि साक्षात्काराच्या दृष्टीने मात्र ते मायावाद स्वीकारतात. ज्ञानेश्वरांचे गृहीत कृत्य या संदर्भामध्ये लक्षात घेऊन मग आपण त्यांचा विचार तपासून घ्यायला पाहिजे. केवळ ज्ञानेश्वर एका ठिकाणी मायावाद मांडतात व दुसऱ्या ठिकाणी साक्षात्कारवाद मांडतात, तर स्फूर्तिवाद मांडणारे ज्ञानेश्वर वेगळे आणि मायावाद मांडणारे ज्ञानेश्वर वेगळे असे आपल्याला म्हणता येणार नाही. एकच मनुष्य वेगवेगळ्या संदर्भामध्ये वेगवेगळ्या भूमिकांवरून एखाद्या मताला जास्त प्राधान्य देतो, याचा अर्थ त्याने आधी मांडलेले, त्याला अभिप्रेत असलेले अन्य मत, तो स्वतःच खोडून काढतो किंवा त्या मताला तो छेद देत असतो, असे नव्हे. या सर्वांचा समन्वय हा

ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी आहे. त्यांच्या ठिकाणी अद्वैत आहे आणि भक्ती आहे, आणि ही दोन्ही एकाच व्यक्तिमत्त्वाची स्पंदने आहेत. एकाच व्यक्तिमत्त्वाचे ते उद्‌गार आहेत. त्यांचा समन्वय करायची ताकद त्यांच्या लेखणीमध्ये आणि वाणीमध्ये होती. ते त्यांनी सिद्ध करून दाखविलेले आहे, हेच खरे ज्ञानदेवांचे वेगळेपण आहे.

□ □ □

तीन

# श्रीज्ञानेश्वरांचे काव्यसौंदर्य

**काव्य आणि तत्त्वज्ञान । वाग्चातुर्यातून गीतार्थदर्शन । अमृतानुभव । चांगदेवपासष्टी । अभंगवाणी । 'ब्रह्मरस सुस्वादे अक्षरें ।'**

ज्ञानेश्वरांचे भाषासौंदर्य ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी आणि अभंगगाथा या त्यांच्या चारही ग्रंथांतून प्रभावीपणाने प्रत्ययाला येते. ज्ञानेश्वरी ही श्रीमद्भगवद्गीतेवरील मराठी टीका आहे. गीता हा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे. त्यावरील आपले भाष्य मराठीत मांडताना, ज्ञानेश्वरांनी तत्त्वचिंतन आणि काव्यसौंदर्य यांचा सुंदर समन्वय साधला आहे. किंबहुना, भागवत धर्माला पायाभूत ठरलेले ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान काव्याच्या माध्यमातून व्यक्त झाले आहे.

## काव्य आणि तत्त्वज्ञान

तत्त्वज्ञानाचा आणि काव्याचा संबंध कितपत मानावा ? एखादे तत्त्वज्ञान सांगणे हा काव्याचा प्रधान हेतू नसला, तरी जीवनभाष्याचे तात्त्विक अधिष्ठान असल्यावाचून काव्याला सौंदर्यशोधाचे नि आनंदबोधाचे आपले उद्दिष्ट पूर्ण करता येत नाही. म्हणूनच काव्यमयता आणि तत्त्वपरता यांत वस्तुतः विरोध नसतो. त्या दोहोंतून मिळून कवीचे समग्र व्यक्तिमत्त्व प्रगट होत असते. काव्यातील भावविलास आणि तत्त्वदर्शनातील विवेकवाद यांच्या समतोलातून कवींच्या समदर्शी वृत्तीचे प्रगटीकरण घडत असते. 'अंतिम

वास्तवाचा प्रत्यय घडविणे हेच खरे काव्यप्रयोजन असल्यामुळे कोणत्याही रचनेला 'काव्य' ही पदवी द्यायची असली, तर ती रचना मूलत: तात्त्विक स्वरूपाची असली पाहिजे,' असे गुरुदेव टागोर सांगतात. 'कोणताही मनुष्य गाढा तत्त्वज्ञ असल्याशिवाय त्याला श्रेष्ठ कवी होता येत नाही, कारण, काव्य हा मानवी ज्ञानाचा, भावनेचा आणि भाषेचा सुगंध आहे,' असे कविवर्य कोलरिज यांनीही म्हटले आहे.

## वाग्चातुर्यातून गीतार्थदर्शन

—काव्यातील तत्त्वचिंतनाचे हे स्थान संत ज्ञानेश्वर पुरेपूर ओळखून होते. 'वाग्विलास विस्तारून गीतार्थाने विश्व भरावे, आणि जगात आनंदाचे आगर मांडावे,' असे त्यांचे प्रतिज्ञोत्तर आहे. 'अध्यात्मशास्त्रीं इये। अंतरंगचि अधिकारिये', असे ते बजावत असले, तरी त्याबरोबरच, 'परि लोकु वाक्चातुर्यें। होईल सुखिया', याचे त्यांना पूर्ण भान आहे. 'ओवी ज्ञानेशाची' जशी तत्त्वघन आहे, तशीच ती काव्यमधुरही आहे. ज्ञानेश्वरी ही जशी 'निगमवल्ली' किंवा 'चैतन्याचा दीप' आहे, तशीच या श्रेष्ठ ग्रंथाची 'एक तरी अनुभवावी' हे संत नामदेवांचे सांगणे रास्तच आहे.

गीतार्थ मराठीत सांगून ज्ञानेश्वरांनी संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांना एकाच सिंहासनावर बसविले आहे; ते म्हणतात :—

> "जैसें अंगाचेनि सुंदरपणें। लेणियासी आंगचि होय लेणें।
> तेथ अलंकारिलें कवण कवणें। हे निर्वचेना ॥"

—सुंदर शरीर हे स्वत:च अलंकाराचे भूषण होतं. तिथं शरीरानं अलंकाराला अलंकृत केलं, की अलंकारानं शरीराला शोभा आणली, हे सांगता येत नाही. तीच गत मूळ संस्कृत वाणी व माझी मराठी भाषा यांची आहे.

> "आजि हा आवडतेयां हि सुकाळु जाला।
> जे गीतार्थं हा आला। मऱ्हाटिया ॥

गीतेचा भावार्थ मराठीत आला, हा लाभ एकट्या अर्जुनालाच झाला, हे कसं म्हणावं? ब्रह्मज्ञान मराठीतून माहित करून घेण्याची पर्वणी सर्वांनाच लाभली आहे. 'हा माझा मऱ्हाठा बोल अमृतालाही पैजेवर जिंकील, अशी 'रसिके अक्षरे' मी मिळवीन.' माय मराठीतील अक्षरांचे कोवळेपण काय वानावे? संगीतातील राग-रागिणीही तिथे फिकी पडेल. या बोलांच्या रसाळपणाच्या लोभानं कानांना जिभा फुटतील. त्यांच्या प्राप्तीसाठी इंद्रियांमध्ये भांडण जुपेल. संपूर्ण पद जिथे तयार होईल, तिथे त्याच्या भेटीसाठी मनच बाहेर धाव घेईल. ज्ञानेश्वर म्हणतात.

> "पहा पां मालतीचे कळे। घ्राणासि कीर वाटले परिमळे।
> परि वरचिली बरवा काई डोळे। सुखिये नव्हती ॥
> तैसे देशियेचिया हवावा। इंद्रिये करिती राणिवा।
> मग प्रमेयाचिया गांवा। लेसा जाइजे ॥

अहो, मालतींच्या कळ्या सुगंधामुळे नाकाला सुखवितात; पण त्या कळ्यांच्या बाह्य शोभेनं डोळ्यांना आल्हाद होत नाही काय ? त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या सौंदर्यानं इंद्रियं राज्य करतील; आणि मग सिद्धान्ताच्या गावाला सहजपणाने जाता येईल. 'बोलु निमे ते बोलणे' मी नागरपणानें निवेदीन, जिथे शब्द खुंटतो, असे बोलणे मी सुंदर शैलीमध्ये सांगेन. 'ते विदग्धा रसवृत्ती । म्हणिपैल कथा.' ही कथा मी चातुर्याने आणि रसाळ पद्धतीने सांगणार आहे. आपल्या गुरुमाऊलीला ज्ञानेश्वर विनवतात, "माझ्या या मराठी टीकेमध्ये तू नवरसांच्या समुद्राची भरती कर. परमार्थ निरूपणाला शोभून दिसतील, अशा अलंकार-रत्नाची खाण इथं तू उघड. या ठिकाणी आत्मविचाररूपी वल्लरीची लावणी करून टाक. मराठी भाषेच्या गावात आत्मज्ञानाची रेलचेल कर. जगाला केवळ ब्रह्मसुखाचीच देवाण-घेवाण करू दे."

## अमृतानुभव

ज्ञानेश्वरीप्रमाणेच अमृतानुभवातील सौंदर्यसृष्टीही विलक्षण देखणी आहे. आत्मवस्तूची लक्षणं म्हणून सत्, चित् आणि आनंद ही तीन पदे सर्वज्ञात आहेत, ही पदे परस्परांशी संवाद साधून द्रष्टा असा जो परमात्मा त्याला भेटतात. ज्ञानेश्वर म्हणतात,

"तेव्हा बरसोनि मेघु । समुद्र होऊनिया वोघु ।
सरे दाऊनि मार्गु । हारतसे जैसा ॥
फळ विये, फूल सुकें । फळ-नाशें रसु पाके ।
तोही रस उपखें । तृप्तिदानीं ॥
कां आहुती अग्नीआतु । घालौनि वोसरे हातु ।
सुख चेवउनि गीतु । उगाचि राहे ॥"

अमृतानुभातील हा संवाद स-रस आहे. मेघाने पाऊस पाडावा, नंतर त्या पाण्याचा प्रवाह समुद्राशी एकरूप व्हावा, म्हणजे मग समुद्राशी मिळून जाण्याचा मार्ग दाखवून तो प्रवाह अदृश्य होतो. फूल सुकतं व फळ निर्माण होतं. पुढं फळाच्या नाशानं सिद्ध झालेला रस इतरांना तृप्ती देण्यात खर्च होतो. आहुती अग्नीला समर्पित करून हात मागे सरतो. आनंदजागृती करून गीत उगे राहाते, त्याप्रमाणेच 'सच्चिदानंद' ही पदे द्रष्टा दाखवून मौनाचा मार्ग अनुसरतात.

## चांगदेवपासष्टी

दृष्टान्त देऊन जटिल विषय सुगम करण्याची ज्ञानेश्वरांची हातोटी चांगदेवपासष्टी मध्येही जाणवते—

"अलंकार येणे नामे । असिजे निखिल हेमे ।
नाना अवयव-संभ्रमे । अवयविया जेवीं ॥
तेंवि शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी ।
प्रकाशें तें एकसरी । संवित्ति हें ॥"

अलंकार नाना प्रकारचे व विविध नावांचे असले तरी त्यातील मूळ सुवर्ण एकच असते. देह एकच असतो, पण त्याचे अवयव अनेक असतात. त्याप्रमाणे एकच एक परम-तत्त्व पृथ्वीतलावर अनेकविध रूपांनी दृग्गोचर होते.

चांगदेव पासष्टीच्या उपसंहारात ज्ञानदेव व चक्रपाणी यांच्यातील अद्वैत विशद करताना पुढील ओवी आली आहे.

" एवं ज्ञानदेव- चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे ।
परस्पर पाहतां कैसे । मुकले भेदा ॥

दोन डोळस आरसे समोरासमोर ठेवल्यावर त्यांची प्रतिबिंबे परस्परात पडून एकत्वाची जाणीव होते, त्याप्रमाणे, ज्ञानदेव आणि चक्रपाणी यांच्यामधील अद्वैत प्रत्ययास आले. या लघुग्रंथातील 'मौनाची भली अक्षरे' केवळ चांगदेवासाठीच नसून, त्याच्या निमित्तानं अध्यात्म विचाराचे सार ज्ञानेश्वरांनी सर्वांसाठी खुले केले आहे.

## अभंगवाणी

ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ही शुद्ध पारमार्थिक भावकविता आहे. 'घणु वाजे घुणघुणा, वारा वाजे रुणझुणा । भवतारकु हा कान्हा । वेगीं भेटवा का ॥' या अभंगात आपला अपार्थिव अनुभव ज्ञानेश्वरांनी पार्थिव जीवनानुभवाच्या पायरीवरून प्रगट केला आहे. 'चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी । कान्हो वनमाळी वेगी भेटवा का ॥' यांतील विरहार्त कामिनीचे दुःख जेवढे खरे, तेवढंच, " अवघेपणे मी तयाचीच झाले । तेचि पावले तदाकारें ॥ " या अभंगातील तृप्त कामिनीचे सुखही प्रत्ययकारी वाटतं. स्फुटता, स्वयं-पूर्णता, केवलता आणि चैतन्यमयता हे विशुद्ध भावकवितेचे धर्म ज्ञानेश्वरांच्या साक्षात्कारी अभंग कवितेत आहेत. चिंतनवस्तू व चिंतकाचे मन ही दोन्ही या कवितेत एकवटतात. त्यामुळे एक वेगळेच काव्यसौंदर्य या अभंगवाणीतून जाणवते. 'रूप पाहता लोचनी', आनंदू रे, आजि परमानंदु रे', 'जाईन गे माये तया पंढरपुरा', 'इवलेसे रोप लावियेले द्वारी', 'सोनियाचा दिवस आजी अमृते पाहिला', 'अवघाचि संसार सुखाचा करीन' असे असंख्य अभंग ज्ञानेश्वरांच्या सौंदर्याचा साक्षात्कार घडवतात.

अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि अभंगगाथा हे ज्ञानेश्वरांचे तीन ग्रंथ आपापल्या परींनी रससिद्ध असले, तरी ज्ञानेश्वरांच्या काव्यात्म प्रतिभेचं उत्तुंग वैभव ज्ञानेश्वरीतच प्रकर्षाने पाहायला मिळते.

## 'ब्रह्मरससुस्वादें अक्षरें'

ज्ञानेश्वरांना आपल्या भाषेच्या सौंदर्याची जाणीव आहे. पहिल्या अध्यायात देवी शारदेला नमन करताना ते म्हणतात,

" आता अभिनववाग्विलासिनी ।
जे चातुर्यार्थ कलाकामिनी ।

ते श्रीशारदा विश्व मोहिनी।
नमिली मिया ॥"

आपला ज्ञानेश्वरी – प्रबंध म्हणजे सारस्वत – वृक्ष आहे. अवधानरूपी अमृताचे सिंचन करून श्रोत्यांनी तो वृक्ष जोपासावा, म्हणजे रसभाव फुलांनी तो बहरेल आणि नानार्थ फळभारांनी सुफलित होईल.

ज्ञानेश्वरीतील रूप – प्रतिमा विलक्षण प्रत्ययकारी आहेत. आपल्या श्रोत्यांचा गौरव करताना ते म्हणतात,

"जैसे शारदियेचें चंद्रकळे –। माजीं अमृतकण कोंवळे।
ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें ॥"

ज्याप्रमाणे शरदऋतूच्या चंद्रकिरणातील अमृताचे कोमल कण चकोराची पिले मृदु मनाने वेचतात, त्याप्रमाणे चित्त अगदी हळुवार करून श्रोत्यांनी ही कथा अनुभवावी. या सौम्य – कोमल रूपकातून रम्य – मुलायम दृश्य उत्कटपणाने दृष्टीसमोर उभे राहते. त्या दृश्याला स्पर्शाची कोवळीक लाभल्याचा चमत्कार घडतो. सुखाची लिपी, पुण्याची पहाट, आपल्या प्रकाशानं त्रैलोक्यालाही थोकडं करणारं बचकेएवढं सूर्यबिंब, कुमुददलाच्या ताटात चोखटे चंद्रकिरण जेवणारा चकोर, धाकुटी दीपकलिका, अविवेकाची काजळी फेडून उजळलेला विवेक – दीप, अमृताचे बोलके समुद्र, अलांछन चंद्रमे, तापहीन मार्तंड ......अशी संपन्न – सुखद प्रतिमासृष्टी ज्ञानेश्वरीत ठायी ठायी पाहायला मिळते. वेधक नादब्रह्म, हळुवार गंध, चैतन्यमय स्पर्श – संवेदना, भव्य दृश्य आणि अपूर्व स्वाद असे पंचेन्द्रियाचे विषय रेखाटून त्यांच्या द्वारे इंद्रियातीत परमतत्त्वाचा प्रत्यय आणून देण्याचे सामर्थ्य ज्ञानेश्वरीतील प्रतिमांतून सामावलेले आहे. ज्ञानेश्वर स्वत: द्वंद्वातीत आहेत; पण जनसामान्यासाठी त्यांनी विविध संवेदनांचे उत्कट रंग साजरे केले आहेत.

मात्र ज्ञानेश्वरीतील भाषासौंदर्य केवळ रसोत्कर्षासाठी अवतरलेले नाही, परतत्त्वाचा स्पर्श हे ज्ञानेश्वरांच्या या भाष्याचं अंतिम उद्दिष्ट आहे.

"तेणें आबाल सुबोधें। वोवियाचेनि बंधे।
ब्रह्मरससुस्वादें। आखरें गुंफिली ॥"

लहान मुलापासून मोठ्या व्यक्तीपर्यंत सर्वांना सहज समजेल अशा छंदोमयी ओवीमध्ये ब्रह्मरसानं रुचकर झालेली अक्षरे ज्ञानेश्वरांनी गुंफलेली आहेत. बोलांच्या ताटात कैवल्यरसाची पक्वान्ने वोगरली पाहिजेत, असे त्यांचे सांगणे आहे. विश्वामध्ये महाबोधाचा सुकाळ व्हावा, यासाठी त्यांनी आपला प्रबंध – प्रपंच मांडला आहे. काव्यानंदाची अंतिम परिणती ब्रह्मानंदात व्हावी, आणि काव्यसौंदर्यातून परब्रह्माचा साक्षात्कार घडावा, यासाठीच ज्ञानेश्वरांच्या समग्र काव्यसंपदेचा अवतार झाला आहे !

□ □ □

चार

# ' ज्ञानदेवें रचिला पाया '

विषयाची व्याप्ती । तत्त्वज्ञानाची संकल्पना । धर्म व तत्त्वज्ञान । अध्यात्मज्ञानाचे अधिष्ठान । तीन मतांचे भक्तीत सामरस्य । चिद्विलासवादाची मांडणी । ज्ञानेश्वरांचा नीतिविचार । प्रेमभक्तीचे अपूर्वत्व । ज्ञानेश्वरांचे गीताप्रेम । गुरुभक्तीचे वस्तुपाठ । ज्ञानेश्वरीतील श्रोतृवंदन । समारोप ।

वारकरी संप्रदायाचे जे अप्रतिम धर्ममंदिर महाराष्ट्रात उभारण्यात आले, त्याचे मार्मिक वर्णन बहिणाबाईंनी एका अभंगात केले आहे. भागवत-धर्मीय संतसज्जनांच्या कृपाप्रसादाने या देवालयाची इमारत बांधून पुरी झाली. ज्ञानदेवांनी या मंदिराची पाया-भरणी केली. त्यांनीच हे देऊळ उभे केले. नामदेव हे ज्ञानदेवांचे दासानुदास होत. नामदेवांनी या वास्तूचा वाढविस्तार केला. जनार्दनस्वामींचे शिष्योत्तम एकनाथ महाराज यांनी आपल्या मराठी एकादशटीकेचा झेंडा मंदिरावर फडकविला. आता भक्त-भाविकांनी या मंदिराच्या सभामंडपात निवांतपणे भजन-कीर्तन करावे. संत तुकाराम हे या भक्ति-मंदिराचे कळस म्हणून शोभून दिसत आहेत. ज्ञानदेवत्व तुकोबामध्ये जणू कळसास पोहोचले आहे.

## विषयाची व्याप्ती

' ज्ञानदेवें रचिला पाया ' ही उक्ती सर्वश्रुत आणि लोकमान्य झाली आहे. पण ज्ञानेश्वरांनी ' पाया रचला ' तो कशाचा आणि कशा प्रकारे ते पाहिले पाहिजे. ज्ञाने-

श्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला. भरभक्कम आणि खोल अशा पायावर बांधलेली इमारत उन्ह खाऊन आणि पावसाचा मारा सोसून जशी वर्षानुवर्षे अभंगपण उभी राहते, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी दिलेल्या आधारावर भागवतधर्म-मंदिर शतकानुशतके खंबीरपणे टिकून आहे. परस्परपोषक अशा दोन गोष्टींचे अधिष्ठान त्यांनी या संप्रदायासाठी सिद्ध करून दाखविले. ज्ञानेश्वरांनी भागवतधर्मास तत्त्वाधार दिला आणि प्रेमाधारही दिला. नुसते तत्त्वज्ञान रुक्ष असते. पंडितांचीही प्रज्ञा ते जिंकून घेते; पण माणसाच्या काळजाला ते स्पर्श करू शकत नाही. नुसते प्रेमही तसेच असमर्थ ठरते; ते माणसांचे अंत:करण ओढून घेते; पण त्यातले भाबडेपण पंथाला दुबळेपण आणते. भोळ्या भक्तीला परंपरेचे बळ लाभू शकत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी भक्तिपंथाला जसे तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले, तसेच प्रेमाचे पाठबळही त्यांनी या पंथाला मिळवून दिले. ज्ञानेश्वरांच्या या दुहेरी कामगिरीचे मर्म शोधणे उपयुक्त ठरेल. त्या दृष्टीने प्रथम तत्त्वज्ञान या संज्ञेची संकल्पना तपासली पाहिजे. तदनंतर ज्ञानदेवांच्या तत्त्वाधारांची विविधांगे शोधली पाहिजेत. शेवटी त्यांच्या प्रेमाधाराचेही पैलू धुंडाळले पाहिजेत. या अभ्यासातूनच 'ज्ञानदेवें रचिला पाया' या बहिणाबाईंच्या उद्‌गारामागील रहस्य उलगडू शकेल.

## तत्त्वज्ञानाची संकल्पना

'तत्त्वज्ञान' ही मराठीतील संज्ञा इंग्रजीतील 'फिलॉसफी' या संज्ञेबद्दल रूढ झाली आहे. 'फिलॉसफी' या शब्दाचा धात्वर्थ 'चिकित्सकपणाची आवड' असा आहे. 'शास्त्रांचे शास्त्र' या अर्थाने 'फिलॉसफी' हा शब्द वापरला जातो. 'प्रत्येक बाबतीत जे सत्यस्वरूप असते त्यावर प्रेम करणारा तो तत्त्ववेत्ता होय' असे प्लेटो यानें आपल्या 'रिपब्लिक' नामक ग्रंथात म्हटले आहे. आपल्याकडील 'तत्त्वज्ञान' ही संज्ञा 'कोणत्याही वस्तूच्या मुळाशी जाऊन पहाणे' हा अर्थ सुचविते. 'तत्' (=ते) + त्व (=पण) 'तत्त्व' = 'तेपण' किंवा 'पदार्थाचे आद्य स्वरूप' होय. वस्तुमानाचे मूळ शोधणे व त्याचा विकास होऊन पदार्थ कसा बनला, याचे ज्ञान करून घेणे म्हणजे तत्त्वज्ञान अभ्यासणे होय. 'जीव, जग व जगदात्मा यांचे स्वरूप व त्यांचे परस्परसंबंध यांचा विचार करणारे शास्त्र' हा भारतीयांचा तत्त्वज्ञानविषयक दृष्टिकोण आहे.

## धर्म व तत्त्वज्ञान

आपल्याकडे धर्म व तत्त्वज्ञान यांचा निकटचा संबंध मानला आहे. 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशन्ति।' (गीता : ९-२१) या न्यायाने पुन्हा जन्म, पुन्हा मरण पत्करून दुःखरूप संसारात गटांगळ्या खाणाऱ्या जीवाला कायमची दु:खनिवृत्ती मिळणे हाच पुरुषार्थ होय. ती दु:खनिवृत्ती मिळविण्याचे साधन म्हणजे तत्त्वज्ञान होय. अर्थातच या विचारसरणीमुळे चेतन व अचेतन या दोन तत्त्वांचे विवेचन करण्याकडे भारतीय विचारवंतांची प्रवृत्ती आहे. ते तत्त्वनिरूपण म्हणजे 'तत्त्वज्ञान' होय. आणि त्या दु:खनिवृत्तीचा उपाय म्हणजे 'धर्म' होय या दृष्टिकोणामुळे भारतात धर्म व तत्त्वज्ञान यांचा एकत्र विचार करण्याकडे शास्त्रांचा कल आहे.

ज्ञानदेव व नामदेव हे यादवकालीन संत होते. यादवकालीन समाजजीवनात धर्म हाच लोकजीवनाचा केंद्रबिंदू होता. कुटुंब, ग्राम, जाती व उपासना-संप्रदाय या सर्व संस्थांच्या प्रामाण्याला धर्माचे अधिष्ठान होते. इह–परत्र–कर्तव्यपूर्ती व धर्माचरण यांचे समीकरणच मानले जात होते. साहित्य, कला, नीती, अर्थव्यवहार यांसारख्या समाज-जीवनाच्या काही अंगाप्रमाणे तत्त्वज्ञान हेदेखील धर्म–भावनेशी निगडित होते. ‘ धर्मसार-मिदं जगत् । ’ धर्म हे जगताचे सारतत्त्व आहे. ‘ जें धर्मजात आघवें। युगीं युगी मियांचि रक्षावें ।’ लोकजीवनाचे प्राणतत्त्व असलेला धर्म लुप्त होऊ नये म्हणून त्याच्या रक्षणाची जबाबदारी परमेश्वराने आपल्या शिरावर घेतलेली आहे, असे ज्ञानेश्वर सांगतात. (ज्ञानेश्वरी, ४–४८) ज्ञानदेव–नामदेवादी संतांची धर्मकल्पना अध्यात्मनिष्ठ होती. आपल्या पारमार्थिक जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांनी स्वतःच्या काव्यातून मुखरित केले आहे. “ म्हणोनि देवो गोसावी । तो धर्माधर्म भोगवीं ।। ” देव हाच स्वामी आहे. तो धर्म व अधर्म भोगाव-यास लावतो. (ज्ञानेश्वरी, १६–३०६) धर्मसत्ता व ईशसत्ता ही दोन्हीं एकरूप आहेत, अशी दृढ श्रद्धा त्यातून व्यक्त झाली आहे.

### अध्यात्मज्ञानाचे अधिष्ठान

महाराष्ट्रातील भागवतधर्माचे जे तत्त्वज्ञान सिद्ध होत गेले, त्याचा उपन्यास ज्ञानदेवांनीच केला आहे. वारकरी संप्रदायातील भोळ्या भक्तिभावाला ज्ञानेश्वरांनी भरभक्कम बैठक प्राप्त करून दिली आहे. वेदोपनिषदांत अडकून राहिलेली ब्रह्मविद्या त्यांनी जनसामान्यांपर्यंत नेऊन पोहोचविली. महाराष्ट्राच्या माळरानावरच्या झोपडी-झोपडीमध्ये परमार्थाचे पोवाडे त्यामुळे ऐकू येऊ लागले. “ सोनार नरहरी न देखे द्वैत । अवघा मूर्तिमंत एकरूप । ” अथवा “ खटनट यावे शुद्ध होवोनिया जावे । दवंडी पिटी भावे, चोखामेळा ।। ” असा आत्मविश्वास अठरापगड जातीतील संतसज्जन व्यक्त करू लागले; या सर्वांचे स्फूर्तिस्थान ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात असलेले जाणवते. “ दिसो परतत्त्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा–। माजी विश्व ।। ” (ज्ञानेश्वरी १३–१७३) परब्रह्म सर्वांच्या डोळ्यांना दिसावे, सुखाचा उत्सव उदयास यावा; आणि सर्व लोकांनी ब्रह्मज्ञानाच्या विपुलतेत प्रवेश करावा, असे ज्ञानेश्वरांचे ईप्सित होते. त्यासाठीच त्यांनी मराठीमध्ये गीताभाष्य सांगून भक्तिपंथाला अध्यात्म-विद्येचे तत्त्वज्ञान प्राप्त करून दिले; व अशा प्रकारे भागवतधर्म मंदिराचा पाया रचला.

ज्ञानेश्वर हे मूळचे नाथपंथी होते. पुढे ते भक्तिपंथाला येऊन मिळाले. साहजिकच आपल्याबरोबर त्यांनी नाथ पंथातील उज्ज्वल तत्त्वविचारांचा वारसा भक्तिपंथाला प्राप्त करून दिला. अद्वैतानंद, योगसाधना, शैव–वैष्णव–ऐक्य आणि लोकवाणीचा वापर ही नाथसंप्रदायाची वैशिष्ट्ये ज्ञानेश्वरांबरोबरच वारकरी संप्रदायाला लाभली. नाथपंथाने ईश्वराद्वैती किंवा शांभवाद्वैती तत्त्वविचार मांडला होता; आणि शुद्ध योगावर अधिष्ठित असलेला परामार्थमार्ग दाखवून दिला होता. शिवशक्तीच्या या कल्पनेचा विकास ज्ञानेश्वरांच्या आत्मानुभूतीतून आणि साक्षात्कारी वाणीतून होत गेला. गहिनीनाथांच्या

कृष्णप्रीतीत अनुस्यूत असलेला भक्तीचा झरा, ज्ञानेश्वरांनी 'बाप रखुमादेवीवरू' च्या भक्तीमध्ये विकसित केला. नाथपंथाकडून लाभलेला कृष्णभक्तीचा वारसा ज्ञानेश्वरांनी विठ्ठलभक्तीत प्रवर्धित केला. त्यामुळे भागवतधर्माच्या विठ्ठलोपासनेला मोठेच बळ मिळाले.

## तीन मतांचे भक्तीत सामरस्य

ज्ञानमार्ग, योगमार्ग आणि कर्ममार्ग हे तीन मार्ग ज्ञानेश्वरांच्या भक्तिपंथाला येऊन मिळाले आहेत. त्या तीन मतांचे भक्तिमतात सामरस्य झाले आहे. ज्ञानेश्वरप्रणीत भक्ति-कल्पना ही ज्ञानोत्तर भक्तीची कल्पना आहे. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. ज्ञान हे भक्तीचे डोळे आहेत; आणि गीता ही ज्ञानामृताची जान्हवी आहे असे ज्ञानेश्वर पुन: पुन्हा सांगतात. भक्तीचे शास्त्र हे 'साच बोलाचे नोहे शास्त्र' असा इशारा ते देतात.

'योगविभवभांडार' म्हणून गौरविलेल्या सहाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी अष्टांग-योगाचे ऐश्वर्य वर्णिले आहे. ज्याला ब्रह्मपद प्राप्तीच्या उच्च स्थितीपर्यंत पोहोचावयाचे असेल, त्याने कर्माचरणापासून आरंभ करून यमनियमादी अष्टांगयोगाच्या पायऱ्यांनी गेले पाहिजे; मग शेवटी ब्रह्मैक्य झाल्यामुळे जेथे साध्य व साधन यांतील भेद नाहीसा होतो, अशी 'समाधी'ची स्थिती त्याला प्राप्त होते. (ज्ञानेश्वरी. ५२–६०). नवव्या अध्यायात देखील त्यांनी 'समाधिश्रियेचे आत्मानुभवराज्यसुख' कसे प्राप्त होते, ते वर्णिले आहे. (ज्ञानेश्वरी, २१३–२१८.) पण लगेच अष्टांगयोगद्वारा होणाऱ्या 'गहन भजना'-पेक्षा नमनमार्गाने करावयाची 'गुरवी भक्ती' त्यांनी अधिक पसंत केली आहे. योगाच्या जटिल मार्गालाही आत्मानुभवाची जोड हवी, असे त्यांना सांगावयाचे आहे.

ज्ञान व योग यांच्या बरोबरीने ज्ञानेश्वरांनी कर्ममार्गाचेही मार्मिक विवेचन केले आहे. ज्ञानेश्वरांचा कर्मसिद्धांत असा आहे: मुख्य म्हणजे विश्व हेच एक विशाल कर्म आहे. नैष्कर्म्य वेगळे व निष्क्रियता निराळी. नैष्कर्म्यामध्ये अहंकाराचा त्याग अपेक्षित आहे. कर्म हे फलाशारहित बुद्धीने केले पाहिजे. प्रत्येकाला कर्म करण्याचा अधिकार आहे; पण फलाकांक्षेचा अधिकार मात्र नाही. निरिच्छ वृत्तीने आणि ब्रह्मार्पण बुद्धीनें कर्म केले पाहिजे. ईश्वरास स्वकर्मकुसुमांनी पूजिले पाहिजे. 'कर्में करावी चांगु, हा निरोप' भगवंतांनी दिला आहे.

अशा रीतीने ज्ञानोपासना, योगसाधना आणि कर्ममग्नता या तिन्ही वाटा भक्ति-मताच्या राजबिदीला येऊन मिळतात. भागवतधर्मीय उपासकांना त्यांनी केलेले हे मार्ग-दर्शन क्रांतदर्शी आहे; पायाभूत आहे.

## चिद्विलासवादाची मांडणी

शंकराचार्यांचा मायावाद काहीसा बाजूला सारून ज्ञानेश्वरांनी आपला चिद्विलासवाद ठासून मांडला व त्या द्वारे भागवतधर्माला संजीवक तत्त्वविचाराचा लाभ करून दिला. ज्ञानेश्वरांनी शांकरमताच्या मायावादाचा क्वचित स्थळी अंगीकार केला

आहे, हे खरे आहे. उदाहरणार्थ, "तैसी हे जाण माया । तू भ्रमत आहासी वायां । शस्त्रे हाणितलिया छाया । जैसी आंगी न रुपे ।" (ज्ञानेश्वरी, २–१४०), असे ते म्हणतात. पण त्यांचे खरे मत विश्वासकट सर्व आत्माच आहे असे आहे. "हे आंतु बाहिरी मियां कोंदले । जग निखिल माझेंचि वोतले ॥" असा चिद्विलासवाद त्यांनी मांडला आहे. (ज्ञानेश्वरी ९-३०२) जगताचा निरास करून ब्रह्म पाहावयाचे म्हणजे चंद्राच्या कळा सोलून काढून चंद्रबिंब पाहाण्यासारखे आहे, असे ते सांगतात. 'सर्वं खल्विदं ब्रह्म ।' अशी त्यांची धारणा आहे. जगताला ते मायाकार्य मानीत नाहीत. विश्व हे आत्म्यापासून काही वेगळे आहे असे त्यांना वाटत नाही. 'तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा' असे ते म्हणतात. (अमृतानुभव, ७–१४६.)

ज्ञानेश्वरांचा हा आत्मसत्तावाद व शंकराचार्यांचा जगन्मिथ्यावाद या दोन्ही मतांचे पडसाद ज्ञानदेवकालीन व ज्ञानदेवोत्तरकालीन संतसाहित्यात उमटले आहेत. 'हा जगडंबर पसरला पाल्हाळ । मायामय सकळ स्वप्न सर्वं' असे नामदेव म्हणतात. (नामदेव–गाथा, अ. १७७२) संसार हा पाण्यावरील बुडबुड्यासारखा किंवा गारुड्याच्या खेळासारखा क्षणभंगुर आहे. असे संत सांगतात, हे मान्य केले पाहिजे. पण प्रश्न आहे तो संतांनी या दोन मतांपैकी कोणत्या मतावर भर दिला आहे ? संतकाव्य बारकाईने तपासले तर संतांनी चिद्विलासवादालाच प्राधान्य दिले आहे असा निर्वाळा देता येतो. तसेच केवळ आध्यात्मिक दृष्ट्या संतांनी मायावाद स्वीकारला असला तरी सामाजिक दृष्ट्या ते स्फूर्तिवादच पसंत करतात, असे म्हणता येईल. "जगासि गवसणी ब्रह्मरूपे देखिली । ते मी अंतरी पांगुरलो अंतरामाजी" (सकलसंतगाथा ज्ञानेश्वर अ. ३८०) या ज्ञानेश्वरांच्या मताचाच अनुवाद त्यांच्या प्रभावळीतील संतकवींनी केला आहे. 'अंतर्बाह्य एक ब्रह्मचि कोंदले । दुजेपण गेले निपटोनि' किंवा 'सर्व हा आकार हरीचे शरीर ।' हे नामदेवांचे म्हणणे म्हणजे 'एतदात्ममिदं सर्वम्' या उक्तीची अथवा, 'तेथ मी तू सरे । सेखी भक्त तोही नुरे' या ज्ञानेश्वरवचनाचा जणू अनुवाद आहे असे जाणवते.

## ज्ञानदेवांचा नीतिविचार

आपल्या भावार्थदीपिकेत आणि स्फुट अभंगवाणीत ज्ञानेश्वरांनी सदाचाराचे स्वाध्याय सांगितले आहेत. सदाचरण हे परमार्थप्राप्तीचे साधनीभूत अंग आहे, अशी त्यांची दृष्टी आहे. स्वतःला अभिप्रेत असलेल्या 'आदर्श' मानवाविषयीची आपली कल्पना त्यांनी ज्ञानेश्वरीत तीन ठिकाणी मांडली आहे.

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायात 'उत्तम पुरुषा'चे निरूपण आले आहे. क्षर व अक्षर पुरुषांहून अगदी वेगळा, श्रेष्ठ, उपाधिरहित व एकाकी असा तो उत्तम पुरुष आहे. 'मी ब्रह्म आहे' या ज्ञानामुळे 'मी देह आहे' हे अज्ञान नाहीसे होते. पुढे 'मी ब्रह्म आहे' हे ज्ञानही ज्या ठिकाणी नाहीसे होते, ते या उत्तम पुरुषाचे रूप आहे. तेथे द्वैत तर नाहीसे होतेच; पण द्वैतापेक्षा अद्वैतही शिल्लक उरत नाही. यालाच लौकिकात 'परमात्मा' म्हणतात. पण तेही जीवदशेत राहूनच. क्षराक्षर पुरुष हे अलीकडचे; पण हा सापेक्ष

उत्तम पुरुष पलिकडचा, म्हणून परमात्मा म्हणावयाचा. याचे दर्शन झाल्यावर पाहाणाराच नाहीसा होतो. मग याचे वर्णन कोण करणार ? पण वर्णन करता येत नाही, म्हणून तो नाही असे मात्र नाही. सर्व विश्व नाहीसे झाले, तरी हा नाहीसा होत नाही. "जो पूर्णतेचा परिमाणु। पुरुषु गा सर्वोत्तमु।" तो सर्वोत्तम पुरुष पूर्णत्वाचेही परिमाण असतो. (ज्ञानेश्वरी १५-५४८)

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायातील हे उत्तम पुरुषाचे लक्षण सर्वस्वी अलौकिक पातळीवर आहे; पण सोळाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी वर्णिलेले दैवी संपत्तीचे लोक मात्र लौकिक जीवनातील त्यांच्या आदर्शत्वाच्या कल्पनेचे नमुने आहेत. ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या सव्वीस दैवी गुणांचे वर्णन ज्ञानेश्वरांनी तेथे केले आहे.

ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय हा कळसाध्याय असून त्यात दिलेली आदर्श मानवाची कल्पनादेखील कळसाप्रमाणे उठावदार आहे.

"चला कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणीचे गांव।
बोलतें जे अर्णव। पीयूषाचे॥
चंद्रमे जे अलांछन। मार्तण्ड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥"

(ज्ञानेश्वरी १८-१७९७, १७९८)

—सदाचारसंपन्न सत्पुरूषांचे ज्ञानेश्वरांनी रेखाटलेले हे चित्र मुख्यतः पारमार्थिक हेतूने अंकित झालेले असले तरी परिणामतः ते चित्रण व्यावहारिक कर्तव्यनिष्ठेला व सामाजिक नीतिमत्तेला पोषकच ठरेल. स्वधर्माचरण-आर्जव-अहिंसा-अक्रोधादी दैवी गुणांचे परिपालन, देहाची व ऐहिक सुखांविषयीची अनासक्ती या सर्वांतून त्यांनी स्वकालीन समाजासमोर आदर्श आचारसंहिता उभी केली आहे. भूतदया-परोपकारादी नैतिक गुणांची जोपासना करणारा ज्ञानेश्वरांचा हा अध्यात्मवाद खरोखर पुरोगामी होता.

ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी या लहानमोठ्या प्रबंधांबरोबर अभंगगाथेची स्फुट रचनाही केली. त्यांच्या प्रबंधनिर्मितीमुळे भागवतधर्माचे तत्त्वज्ञान तर्कशुद्ध रीतीने व बंदिस्तपणे जसे सांगितले गेले, तशीच त्या ग्रंथांनी संप्रदायाला पंडितवर्गात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्फुट अभंग रचनेमुळे या पंथाचा तत्त्वविचार सर्वजनसुलभ रीतीने मांडला गेला व संप्रदायास लोकप्रियता लाभली. विरहिणी, गौळणी, भारुडे, कूटे, आख्याने, व्यक्तिचित्रे, प्रसंगवर्णने इत्यादि लोकप्रिय वाङ्मयप्रकारांतून ज्ञानदेवादी संतांनी रचना केल्यामुळे समाजाच्या विविध थरांत भागवतधर्माचा प्रसार होऊ शकला.

ज्ञानेश्वरांचे काव्यग्रंथ हे आणखी एका दृष्टीने पायाभूत आहेत असे मानले पाहिजे. त्यांच्या ग्रंथातील तत्त्वचिंतन हे प्रतिभाविलासाने मंडित झाले आहे; आणि त्यातील त्यांच्या रससिद्ध काव्यशैलीला तत्त्वविचाराचे वजन लाभले आहे. पांडित्य आणि प्रतिभा यांचा

सुसंवाद कसा साधावा हे ज्ञानेश्वरीच्या रूपाने ज्ञानेश्वरांनी दाखवून दिले आहे. तत्त्वचिंतन आणि कल्पनाविलास यांचे सामरस्य येथें झाले आहे.

" वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवे रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्त्व- । स्पर्शू जैसा ।। " असे ते म्हणतात.

(ज्ञानेश्वरी, १८-३४७)

## प्रेमभक्तीचे अपूर्वत्व

ज्ञानदेवांनी भक्तिपंथाला जो प्रेमाधार दिला आहे तोही खरोखर अपूर्व आहे. आपल्या गीताभाष्यनिरूपणाच्या संदर्भात त्यांनी प्रेमभावनेचा रम्य आविष्कार केला आहे; आणि त्या प्रेमाची सर्वंच ठिकाणी भक्तीमध्ये परिणती झाली आहे. भाष्यविषय असलेला गीताग्रंथ, भाष्यमाध्यम झालेली माय-मराठी भाषा, भाष्यरचनेस स्फूर्ती देणारे स्वतःचे श्रीगुरु, आपली गीता-टीका मनःपूर्वक ऐकणारे सज्जन श्रोते; आणि गीतेतील संवादसुखाची राणीव भोगणारे श्रीकृष्णार्जुन या सर्वांविषयीच्या प्रेमभक्तीची विविधांगी बहार ज्ञानेश्वरांनी समरसतेने वर्णिली आहे. हा त्यांच्या प्रतिभेचा स्वतंत्र आविष्कार आहे. त्यांच्या प्रेमभक्तीचे अनेकविध उन्मेष अभ्यसनीय आहेत.

## ज्ञानेश्वरांचे गीताप्रेम

पार्थास वत्स करून श्रीकृष्णांनी येथे साऱ्या जगात दुभते उपलब्ध करून दिले आहे,

" हे नित्य नूतन देखिजें । गीतातत्त्व ।। "

(ज्ञानेश्वरी, १-७१)

या अमर्याद गीतार्थाचे आकलन कसे होणार ? सूर्याला कोणी उजळावे ? चिलटाने आकाश आपल्या मुठीत कसे ठेवावे ? गीतेची अशी महती असल्यामुळे ज्ञानेश्वर विनवितात,

" जैसे शारदियेचे चंद्रकळे- । माजी अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मने मवाळें । चकोरतलगें ।।
तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणुनियां ।। "

(ज्ञानेश्वरी, १-५६, ५७)

ज्ञानेश्वरांनी घेतलेला मराठीचा कैपक्ष पुढीलांना प्रेरक ठरला. संस्कृताच्या कपाटात बंदिस्त होऊन पडलेली अध्यात्मविद्या, ज्ञानेश्वरांनी मराठीमध्ये गीताभाष्य लिहून अल्पशिक्षितांना व अशिक्षितांनाही उपलब्ध करून दिली. मराठीच्या नगरीत त्यांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. येथे संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांना त्यांनी एकाच सिंहासनावर बसवले. " आजी हा आवडतेयांहि सुकाळू जाला । जें गीतार्थु हा आला । मऱ्हाटिया । "

**गुरुभक्तीचे वस्तुपाठ**-म्हणून ज्ञानेश्वरीतील अनेक स्थळे दाखविता येतील. गुरू हा सुखाचा सागर, धैर्याचा डोंगर व प्रेमाचे आगर असतो. गुरुकृपेने साध्या श्वासोच्छवासां-

नाही प्रबंधाची पदवी प्राप्त होऊ शकते; आणि देशी भाषेच्या क्षोणीमध्ये साहित्य-सोनियांच्या खाणी उघडता येतात. गीतेतील तेराव्या अध्यायातल्या सातव्या श्लोकात आलेल्या 'आचार्योपासनम्' या पदावर ज्ञानेश्वरांनी सव्वाशे ओव्यांचे भाष्य केले आहे· चैतन्यरूपी वृक्षातळी गुरूला गाय कल्पून भक्त हा तिचे वासरू बनतो; किंवा गुरूच्या प्रेमरूपी जळात तो मासोळी होतो, अशा अनेक कल्पना उदात्ततेस व पावित्र्यास पोषक ठरल्या, हे ध्यानात घेतले पाहिजे.

**ज्ञानेश्वरीतील श्रोतृवंदन**–हे तिचे खास वैशिष्टय आहे.

श्रोता व वक्ता यांमध्ये सुसंवादरूपी वारा वाहू लागला की, हृदयाकाशात सारस्वताचे मेघ दाटून येतात; पण तोच श्रोता जर दुर्लक्ष करीत असेल तर व्याख्यानास आलेला रंग वितळून जातो. (ज्ञानेश्वरी, ९–२८) ज्ञानेश्वर म्हणतात,

'सहजें तरी अवधारा। वक्तृत्वा अवधानाचा होय चारा।
तरी दोंदें पेलती अक्षरा। प्रमेयांची॥' (ज्ञाने. ९–२५)

श्रोत्यांच्या कृपादृष्टीच्या ओलाव्याने प्रसन्नतेचे मळे बहरतात. श्रोते हे सुखामृताचे डोहच होत. एवढेच कशाला, या श्रोत्यांसारखी श्रीमंत माहेरे भेटली तर मनोरथांचेही मनोरथ पुरे होतात. अकराव्या अध्यायाच्या आरंभी ज्ञानेश्वर श्रोत्यांना विनवितात, "हे सारस्वताचे गोड। तुम्हीचि लाविले जी झाड। तरी आता अवधानामृते वाड। सिंपोनि की जो।" वक्ता व श्रोता (अथवा ग्रंथकार व वाचक) यांच्यामध्ये हृदयसंवाद उत्पन्न झाल्यावाचून विषयविवेचनात रंग भरू शकणार नाही, हे ज्ञानेश्वरांनी सांगून ठेवले.

कृष्णार्जुनाचे परस्परांविषयीचे ज्ञानेश्वरांनी वर्णिलेले प्रेम हे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभाविलासाचा आणि सहृदय व्यक्तित्वाचा सर्वस्वी स्वतंत्र उद्‌गार आहे.–

'दोन वोठीं एक बोलणें' असावे, तसा कृष्णाचा व अर्जुनाचा संवाद घडला. दोन जवळिकेची सरोवरे उचंबळून यावीत व त्यांची जले परस्परात कालवावीत, तसे कृष्णार्जुनाच्या बाबतीत घडले–

'हृदया हृदय येक जाले। ये हृदयींचे ते हृदयी घातलें॥'

(ज्ञाने. १८–१४२१)

तत्त्वनिरूपणास संवादाचा ढाळ कसा द्यावा आणि संवादातून व्यक्तीचे चैतन्यमय व्यक्तिचित्रण कसे करावे, हे ज्ञानेश्वरांनी कृष्णार्जुन–प्रीतीच्या वर्णनातून यथार्थपणे सांगितलेले आहे.

## समारोप

ज्ञानेश्वरांच्या प्रेमभक्तीची ही अनेकविध रूपे न्याहाळली म्हणजे त्यांचीच पुढील उक्ती आठवते,

" एथ चातुर्य शहाणें झाले। प्रमेय रुचीस आलें।
आणि सौभाग्य पोखलें। सुखाचे एथ॥
आणि पाहता नावेक। रंगी सुरंगतेची आगळीक।
गुणां सगुणपणाचे बिक। वहुवस एथ॥ "

(ज्ञानेश्वरी १-३५ व ३८)

या ग्रंथात चतुरता शहाणी झाली आहे; तत्त्वांना गोडी आली आहे; आणि सुखाचे ऐश्वर्य पुष्ट झाले आहे.......क्षणभर विचार केला तर असे दिसून येते की, विविध रंगांमध्ये सुरंगतेची वाढ झाली आहे; व त्यामुळेच सद्गुणांना चांगुलपणाचे विशेष बळ लाभले आहे.

□ □ □

पाच

# संत नामदेव : व्यक्तित्व आणि कवित्व

**जीवितरेखा । तीर्थयात्रा । काव्यरचनेची ओळख । अभंगवाणीचे अमृतमाधुर्य । व्यक्तित्वाचे गवाक्ष । कार्यकर्तृत्व । समारोप**

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या संत–चतुष्कात संत नामदेव आपल्या व्यक्तिमत्त्वाने, कवित्वाने व कर्तृत्वाने बरेच पृथगात्म आहेत. त्यांच्या स्वायत्त स्थानाची ओळख करून घेणे अनेक दृष्टींनी उपयुक्त ठरेल.

## जीवितरेखा

नामदेवांचा जीवनपट सरळ साधा आहे. ‘ नरसी-बामणी ’ हे त्यांच्या पूर्वजांचे मूळ गाव होय. हे गाव मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यामध्ये आहे. ‘ बामणी ’ या खेड्याजवळची ‘ नरसी ’ म्हणून ती ‘ नरसी–बामणी. ’ या नरसीहून निघून नामदेवांचे वडील दामाशेटी आणि आई गोणाई हे उभयता श्रीक्षेत्र पंढरपूर इथं आले. पंढरीला ते स्थायिक झाले. व्यवसायानं आणि जातीनंही ते शिपी होते. पंढरीला गोणाईच्या पोटी नामदेवांचा जन्म झाला. रविवार, कार्तिक शुद्ध एकादशी, शके ११९२, म्हणजेच दि. २६ ऑक्टोबर १२७० या दिवशी सूर्योदय समयी नामदेव जन्मले.

यदुशेट रेळेकर हे नामदेवांच्या घराण्याचे मूळ पुरुष होत.

आपल्या जन्माविषयीचा तपशील नामदेवांनी एका अभंगात दिला आहे. ते म्हणतात,

माझें जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणें ।
लिहिलें, त्याची खूण सारु ऐका ।
अधिक ब्याण्णव गणित अकरा शतें ।
उगवतां आदित्य रोहिणीसी ।।
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार ।
प्रभव संवत्सर शालिवाहन शके ।
प्रसवली माता मज मळमूत्रीं ।
तेव्हा जिव्हेवरी लिहिले देवें ।।
शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा ।
नाममंत्र खुणा वाचुनी पाहे ।
ऐंशीं वर्षे आयुष्य, पत्रिका प्रमाण ।
नामसंकीर्तन नामया वृद्धी ।।

नामदेवांचे आजोळ मराठवाड्यातील ‘कल्याणी’ या गावी होते. त्यांची आई गोणाई ही तिथल्या ‘गोमा’ शिंप्याची मुलगी. आपल्या आजोळची माहिती देताना नामदेव म्हणतात–

‘कल्याणीचा शिंपी हरि भक्त गोमा ।
त्याची कांता उमा नरहरि भजनीं ।।
सरिता सुकृताचि त्या पोटीं उत्पन्न– ।
झाली संबोधन गोणाबाई ।।
गोणाई–दामाशेटी झालें पाणिग्रहण...... ।’

नामदेवांच्या आजोळ–घरची ही कल्याणी आज परभणी जिल्ह्यात ‘कलानी’ म्हणून प्रसिद्ध आहे. नरसी व बामणी या दोन गावांच्या मधेच ही कलानी आहे.

नामदेवांच्या कुटुंबीय व्यक्तींची माहिती संत जनाबाईंनी दिली आहे. चौदा माणसांचा मोठाच कुटुंब–कबिला नामदेवांच्या घरात होता. जनाबाई सांगतात—

‘गोणाई, राजाई दोघी सासू-सुना ।
दामा-नामा जाण बाप-लेक ।।
नारा, विठा, गोंदा, महादा चौघे पुत्र ।
जन्मले पवित्र त्याचे वशीं ।।
लाडाई, गोडाई, येसाई, साखराई ।
चवघी सुना पाहीं नामयाच्या ।।
लिंबाई ती लेकी, आऊबाई बहिणी ।
वेडीपिशी जनी नामयाची ।।’

दमा आणि करुंड हे महार जातीतलं जोडपं मराठवाड्यातल्या 'गंगाखेड' या गावचं. नामदेवांचे वडील दामाशेटी यांच्याशी या दांपत्याची जुनी ओळख होती. आपली तान्ही लेक जनी हिला घेऊन दमा आणि करुंड पंढरीला देवदर्शनाला आले होते. परतीच्या प्रवासात धोका नको, म्हणून त्यांनी लहानग्या जनीला दामाशेटीच्या स्वाधीन केलं आणि त्यांनी पंढरी सोडली. आपल्या घरी स्वतःच्या मुलीप्रमाणंच दामाशेटींनी जनीला वाढवलं; आणि नामदेवांनीही आपल्या संतमेळ्यात तिला सामावून घेतलं. त्यामुळं जनीचं जिणं सफळ झालं. 'नामयाचें ठेवणें जनीस लाधलें । धन सापडलें विटेवरी ।' असे सफलतेचे उद्‌गार संत जनाबाईंनी काढले आहेत.

आपले आई-वडील आणि आपली मुलं-बाळं यांच्यासह नामदेव पंढरीला स्थायिक झाले होते. तिथं मंदिराजवळच त्यांचं घर होतं. 'देवासमोर तुझें घर । तुझें येणें निरंतर' असं जनानाईला बडवे मंडळींनी बजावलं होतं. 'मोडके खोपट वारा येतो भराभरा । बहु होती कष्ट कोणां सांगो ।' अशी या घराची अवस्था होती.

पंढरी-क्षेत्रातल्या धार्मिक वातावरणात नामदेवांचं बालपण गेलं. बाल नामदेव दोन वर्षांचा झाला, तेव्हापासून त्याला बोलतां येऊ लागलं. दामाशेटींच्या मुखी सतत विठ्ठल-नाम असे. त्यांचं अनुकरण हा बाल भक्त करू लागला. पाचव्या वर्षी तो शाळेत गेला. गुरुजींनी पाटीवर त्याला 'ओ नामा' काढून दिला; पण तो गिरवण्याकडे लक्ष न देता, 'विठ्ठल विठ्ठल' असा नाम-जप तो करीत असे. वयाच्या सातव्या वर्षी या बालभक्तानं पाषाणांचे टाळ केले. त्या टाळांच्या नादात तो भजन करू लागला.

बालपणीचा नामदेवांचा हा देवभक्तीचा नाद एका टोकाला गेला. एकदा दामाशेटी गावाला गेले होते. गोणाईनं बाल नामदेवाजवळ नैवेद्य दिला. 'तो खाल्लाच पाहिजे,' असा हट्ट या बालभक्तानं देवाजवळ धरला. त्याच्या भक्तीला भुलून विठ्ठलानं तो नैवेद्य ग्रहण केला, अशी एक कथा आहे. घरकामाकडं आणि शिवणकामाच्या धंद्याकडं नामदेव मुळीच वळेना. तो आठ वर्षांचा झाला. तेव्हाच्या लोकरीतीला धरून त्याचं लग्न करावं, म्हणजे देवभक्तीचं पिसं जाऊन, तो प्रपंचात रुळेल, असं दामाशेटींना वाटलं.

नामदेवांची प्रपंचकथा ऐकण्यासारखी आहे. गोविंदशेठ सदावर्ते यांची कन्या राजाई हिच्याबरोबर नामदेवांचा विवाह थाटामाटानं साजरा झाला. पण त्यांची विठ्ठलभक्ती वाढतच गेली. त्यांचं देवपिसं मुलखावेगळं ठरलं वास्तविक,

'शिवणें, टिपणें करोनि आपुलें । नित्य चालवणें संसारिक ।'

अशी दामाशेटींची मुलाबद्दल कल्पना होती त्यांचं वय झालं होतं.

'सरलें आयुष्य, उरले थोडे दिस । थोर केली आस होती जीवी '—

पण त्यांचा अपेक्षाभंग झाला. मुलाच्या हातात सुई आणि कात्री दिसावी, पण त्या हातात टाळ आणि चिपळ्या पाहून ते दुःखी कष्टी झाले.

नामदेवांची माता गोणाई ही तर खूपच संतापली. 'तुज नेल्यावाचून नच जाय येथून । पंढरी गिळीन विठोबासहित ।' असा दम तिनं नामदेवांना भरला. पण पालथ्या

घागरीवर पाणी पडावं, तसा प्रकार झाला. नामदेवाचा नादिष्टपणा संपत नाही, हे पाहून गोणाईनं देवाची करुणा भाकली, ती म्हणाली. "अरे विठ्ठला, हा नामा माझा एकुलता एक मुलगा, आणि त्यालाही तू घेऊन चाललास ? माझी एका खांबावरची द्वारका आहे. तो खांबच डळमळू लागला, तर मी काय करावं ? 'आम्ही गा शिंपिये, अनाथें पैं दीने । करू शिवणें-टिपणें पोट भरू ।।"

गोणाईच्या सुरात कुरकुर आहे, पण तिच्या अंगात कर्तृत्व आहे. नवरा थकलेला आणि मुलगा टाळ कुटीत बमलेला, अशा स्थितीत प्रपंचाची सूत्रं तिनं आपल्या हाती घेतली कर्त्या पुरुषाच्या धिटाईनं सावकाराकडून तिनं कर्ज काढून आणलं; आणि मुलाला धंदा उभारून दिला. ते ढासळणारं घर तिनं काही काळ सावरून धरलं.

नामदेवांची पत्नी राजाई हिचं दुःख तर अबोल आणि तीव्र आहे. अवघी भांबडभुतं आपल्या घरात जमतात, आनंदानं नाचतात; आणि ब्रह्मानंदानं डुलतात, हे बघून ती म्हणते, "भोळी सासू गोणाबाई । पांढरा स्फटिक व्यालो पाही ।।" तिच्या माहेरी, तिचे वडील सुईकात्री हातात घेऊन, भरपूर काम करत असत. माहेरी सुबत्ता होती. पण इथं बघावं तर नवऱ्याचा टाळ-वीणेचा छंद सुटत नाही. त्यानं लज्जेचा गाव सोडला आहे. गरिबीमुळं बिचारी राजाई गांजली आहे. काकुळतीनं राजाई रुक्मिणीला विनविते,

"अहो रुक्माबाई, विठोबासी सांगा । भ्रतारासी कां गा वेडें केलें ।।
वस्त्र–पात्र नाही खाया-नेसायासी । नाचे अहर्निशी निर्लज्जसा ।।"

आपल्या आयुष्याची झालेली ही परवड पाहून राजाई उदास झाली, 'अंगोळिये विठा, कडियेसी नारा,' अशी राजाई विठ्ठल-मंदिराच्या महाद्वारापर्यंत आली. तिला तिथं पाहून नामदेवांना राग आला, त्या दोघांची बोलाचाली झाली. 'दैन्य भोगावें आलें जन्मा,' असा उद्वेग तिला वाटला

पण हळूहळू राजाईचा चित्तपालट झाला. नामदेवांचा आध्यात्मिक अधिकार तिला शेवटी समजला. तिचा गैरसमज दूर झाला. पतीच्या पुण्याईने प्रत्यक्ष श्रीमुखाचं दर्शन तिला घडलं, ती मनोमन सुखावली. 'आता ये संसारीं मीच धन्य जगीं । जे तुम्हा अर्धांगी विनटलें ।।,' असे साफल्याचे उद्‌गार तिच्या तोंडून बाहेर पडले.

नामदेवांच्या विठ्ठलभक्तीला असा कौटुंबिक विरोध झाला असला, तरी त्या विरोधाची धार तेवढी तीव्र नाही. त्यांच्या आईनं आणि पत्नीनं आपला असंतोष प्रगट करून पाहिला; पण घरातल्या या विरोधात थोडी ओलाव्याची ठिकाणंही आहेत 'नामयाची दासी जनी' हिला त्यांच्या पारमार्थिक अधिकाराबद्दल आदर होता. नामदेवांची मुलं आपल्या वडिलांचा मोठेपणा ओळखून होती. 'नामयाचा महादा बळकट झाला । विठोबा आणला चौबारात ।।' अशी महादाची साक्ष आहे. 'नामा विठ्ठलासी नाही द्वैतपण ।' हे गोंदानं ओळखलं आहे. आपण 'नामयाच्या चरणीचे रज' आहोत, अशी भावना विठानं व्यक्त केली आहे.

स्वत: नामदेव हे मात्र या प्रशस्तीच्या किंवा उपेक्षेच्या अतीत होते. ' निंदा–स्तुति ज्याला समान पैं झाली । त्याची स्थिती आली समाधीसी ।।' हे त्यांनी स्वत: केलेलं भक्तवर्णन त्यांनाच लागू पडतं. प्रपंच आणि परमार्थ यांतील समतोल ते साधू शकले.

### तीर्थयात्रा

नामदेवांनी आपल्या आयुष्यात दोन मोठ्या तीर्थयात्रा केल्या. आरंभी ज्ञानेश्वरांच्या संगतीत आणि संतमेळ्यातील गोरा कुंभार, नरहरी सोनार अशा इतर संतांच्या सहवासात, नामदेवांना पहिली तीर्थयात्रा घडली. ' भूतळींचीं तीर्थें पहावया नयनीं । असे आर्त मनीं विष्णुदासा ।। ' ही ज्ञानेश्वरांची इच्छा प्रमाण मानून, नामदेव त्यांच्याबरोबर उत्तर भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांचं दर्शन घेऊन आले. यात्रा सफल-संपूर्ण झाल्यावर पंढरपूरला मावंद घालण्यात आलं. त्यानंतर ज्ञानेश्वरांनी आळंदीला संजीवन-समाधी घेतली. नामदेवांना मित्र–वियोगाचं अपार दुःख झालं. मुंग्यांच्या विवराला आग लागावी, तसा कोलाहल झाला. ' हरिणीविण खोपी पडियेली ओस ' अशा शब्दांत नामदेवांनी ते करुण चित्र रंगवलं आहे. ' ज्ञानाचा वियोग, जडला हृद्रोग ' अशी नामदेवांची अवस्था झाली. संत अंतरला, सखा झाला दूर । आता पंढरपूर कैसे कंठूं ।।"... असं त्यांना वाटलं. 'ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतरच्या आपल्या उदास मनःस्थितीत नामदेव म्हणतात,

" ऐसे मी करीन, जाण विठोबा राया । पंढरीचे ठाया मोडवीन ।
राहे ना मी आता, जाईन दूर देशा । भक्तीची हे आशा, सोडोनिया ।
उदास हें चित्त माझे झाले देवा । जाईन केशवा, मायबाप ।
आपुल्या सांगाते, नेईन पंढरी । नेईन संतनगरी भिवरजना ।।
येथे हे पंढरी, होती ऐसे लोक । म्हणतील देख पुढे देवा ।। "

पंढरपूर सोडून दूर देशाला जावं, आपण जाऊ तिथं पंढरीचा महिमा स्थापन करावा, असा निश्चय नामदेवांनी केला. आपला उत्तरायुष्यात त्यांनी उत्तर भारताचा पुन्हा प्रवास केला. द्वारका, मथुरा, हरद्वार, राजस्थान अशी ही त्यांची भ्रमणयात्रा झाली. या, प्रवासात ते पंजाबात गेले. हिंडता हिंडता गुरुदासपूर जिल्ह्यातल्या घुमान या गावी ते पोहोचले. नामदेवांना ते स्थान आवडलं. अठरा अर्ष त्यांनी तिथं वास्तव्य केलं. पंजाबात त्यांचा मोठा लौकिक झाला. अनेक शिष्य तिथं त्यांना मिळाले. ' श्री गुरुग्रंथसाहिब या शिखांच्या धर्मग्रंथात नामदेवांची एकसष्ट पदे समाविष्ट झाली. ' बाबा नामदेघजीकी मुखबानी ' म्हणून ही रचना ओळखली जाते. गुरुग्रंथात एकंदर सोळा संत कवींची पदे आहेत. जयदेव, त्रिलोचन, रामानंद, रोहिदास, पीपा, नानक इत्यादी विविधकालीन भक्तांच्या बरोबरच नामदेवांच्या हिंदी पदांनाही त्या ग्रंथात स्थान मिळालं आहे.

' जिकडे पाहे तिकडे विठोबा अवघा । बाहेरी भीतरी, सर्व निरंतरी ।। ' असं देवांचं सर्वव्यापी स्वरूप नामदेव आपल्या मराठी अभंगात मांडतात, तर ' इभै बीठलु, ऊभै बिठलु, बीठल बिनु संसारु नही । ' अशा शब्दांत गुरुग्रंथामध्ये ते विठ्ठलाचा नामघोष

करतात. ‘ नामाचा प्रताप जाणवेना कोणा । समुद्री पाषाण तारीयेले ।। ’ हा मराठी अभंगातला नाममहिमा, ‘ देवा, पाहन तारिअले । राम कहत जन कस न तरे ।। ’ या शब्दांत गुरुग्रंथात त्यांनी व्यक्त केला आहे. ‘ निंदा—सुती ज्याला समान पैं झाली । त्याची स्थिति आली समाधीसी ।। ’ अशी आपली विकसित भावस्थिती नामदेव एका अभंगात सांगतात; आणि ‘ जनु नामा सहज समानिया । ’ म्हणजे ‘ मी परमेश्वर स्वरूपात सहजपणे सामावून गेलो, ’ असा आत्मप्रत्यय ‘ मुखबानी ’त ते व्यक्त करतात. नामदेवांचे मराठी अभंग आणि गुरुग्रंथातील त्यांची ‘ मुखबानी ’ या दोहोंतून एकाच विकसनशील व्यक्तिमत्त्वाचे सुसंगत दर्शन आपल्याला घडतं.

घुमान इथं अठरा वर्षांचं दीर्घ वास्तव्य केल्यानंतर, आपलं तिथलं धर्मकार्य पूर्ण झाल्याचं नामदेवांना जाणवलं. पंढरीचा पांडुरंग या आपल्या दैवताच्या दर्शनासाठी त्यांचं मन तळमळू लागलं. त्यांनी पंजाबचा आणि तिथल्या भक्तजनांचा निरोप घेतला. मजल-दरमजल करीत ते पंढरीला आले. एव्हाना ते ऐंशी वर्षे वयोदशेस येऊन पोहोचले होते. आपलं अवतारकार्य संपल्यावर ज्ञानेश्वरांनी जशी श्रीक्षेत्र आळंदी इथं समाधी घेतली, तशीच नामदेवांनीही श्रीक्षेत्र पंढरपूर इथं समाधी घेतली. मात्र पंढरीला श्री विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराच्या खालच्या पायरीजवळ, ते समाधिस्थ झाले. मंदिरात जाणाऱ्या साधुजनांचा पदस्पर्श आपल्याला सतत घडावा, अशी नम्र भावना त्यांच्या मनात होती. ‘ नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे । संत पाय हिरे देती वरु ।। ’ या शब्दांत आपली ही भूमिका नामदेवांनी व्यक्त केली आहे. आषाढ कृष्ण त्रयोदशी, शके १२७२ म्हणजे दि. ३ जुलै १३५०, शनिवार, या दिवशी नामदेव विठ्ठल-चरणी विलीन झाले.

## काव्यरचनेची ओळख

ऐंशी वर्षांच्या आपल्या दीर्घायुष्यात नामदेवांनी विपुल काव्यरचना केली आहे. मराठी अभंग, हिंदी पदं आणि गुरुग्रंथातली ‘ मुखबानी ’ अशा त्रिविध स्वरूपात त्यांची काव्यसंपदा पहायला मिळते. ही सारीच कविता म्हणजे स्फुट रचना आहे. ज्ञानेश्वरांची भावार्थ-दीपिका किंवा नाथांचं भागवत अशी प्रबंध रचना नामदेवांच्या नावावर नाही. त्यांचे सव्वादोन हजारांच्या घरातील मराठी अभंग आणि शंभरएक हिंदी पद सांप्रदायिक गाथेत उपलब्ध असून, त्यांची ‘ मुखबानी ’ गुरुग्रंथात समाविष्ट झालेली आहे.

अन्य संतांच्या काव्यसंपदेप्रमाणं नामदेवांची ही कविता नकलकारांच्या प्रमादा-पासून मुक्त नाही. गोंधळेकरप्रत, घरतप्रत, जोगप्रत, आवटेप्रत, सकलसंतगाथेतील नामदेवांचे अभंग, सुबंधकृत सहा भागातील सार्थ गाथा, शासकीयप्रत अशा नामदेव-गाथेच्या विविध प्रती वेळोवेळी छापून प्रसिद्ध झालेल्या आहेत. यापैकी पहिली गाथा इसवी सन १८९२ मधली आहे, तर शेवटची शासकीय गाथा १९७० मधली आहे, म्हणजे नामदेवांच्या सप्तम जन्म शताब्दीच्या संवत्सरात प्रसिद्ध झाली आहे. या सर्व गाथा सारख्याच अविश्वसनीय आहेत. विष्णुदास नामा, नामा पाठक, नामा यशवंत अशा इतर

नामदेवांची कविता जशी या गाथांतून आली आहे, तशीच नामदेवोत्तरकालीन संतांची चरित्रे त्यात नामदेवांच्या नावावर दिलेली आहेत. कबीर, कमाल किंवा बोधले बाबा हे संत नामदेवांच्या नंतर होऊन गेले. गाथांतून छापलेली त्यांची चरित्रं आद्य नामदेवांची नव्हेत. नामदेवांची अभंग-संहिता गढूळलेली आहे. त्यात अ–नामदेवकृत कवितेचा काला झाला आहे. "या सर्व वाणसवद्यात जुनं शंभर-नंबरी सोनं खचित मिसळलेलं आहे; आणि नवा मालमसालाही आहे," हे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांचं म्हणणं लक्षात घ्यावं लागतं.

त्यातल्या त्यात १९५३ मध्ये प्रसिद्ध झालेली आवटे प्रतीची चौथी आवृत्ती बरीच व्यवस्थित आहे. या प्रतीत एकूण अभंग–संख्या २३७५ आहे. ही रचना आठ विभागांत दिली आहे. ईशस्तुती, ज्ञानेश्वरादी भावंडांची चरित्रं, नामदेवांचं आत्मचरित्र, उपदेशपर रचना, हिन्दुस्थानी पदं म्हणजेच हिंदी रचना, पौराणिक चरित्रं व कथानकं, संतचरित्रं, आणि भूपाळ्या व आरत्या अशी ही विभागणी आहे.

मंगलाचरण, देवाचं गुणवर्णन, बालक्रीडा, श्रीकृष्णलीला, राममहिमा, विठ्ठलमहिमा, पंढरीमहिमा, शिवरात्रिमहिमा, शिवस्तुती, तुलसीमाहात्म्य आणि नाममहिमा असे विषय 'ईशस्तुती' या पहिल्या विभागात आले आहेत.

ज्ञानेश्वरांची 'आदि' म्हणजे त्याचे आई–वडील, भावंडं व स्वतः ज्ञानेश्वर या सर्वांचं पूर्ववृत्त, तीर्थावळी म्हणजे ज्ञानेश्वरांनी आपल्या प्रभावळीतील संतांना बरोबर घेऊन केलेली तीर्थयात्रा, आणि ज्ञानेश्वर व त्यांची भावंडं यांनी विविध ठिकाणी घेतलेल्या समाधी हे विषय दुसऱ्या विभागात आलेले आहेत. ज्ञानेश्वरांचं हे त्रिप्रकरणात्मक चरित्र लिहून, नामदेवांनी मराठी माणसावर मोठेच उपकार करून ठेवले आहेत.

नामदेव हे मराठीतील आद्य आत्मचरित्रकार आहेत. आपलं वंशवृत्त, जन्मकाळ, बालपण, विवाह, व्यवसाय, गृहस्थिती आणि मुलंबाळं यांचा तपशील देऊन, स्वतःचं लौकिक आत्मवृत्त ते प्रथम सादर करतात. त्यानंतर संतांची भेट, स्वतःचा गर्व-परिहार, गुरुकृपा, परमार्थ साधना, आत्मसुखप्राप्ती अशा टप्प्याटप्प्यांनी आपली पारमार्थिक जीवनाची वाटचालही ते विशद करतात.

यानंतरच्या उपदेशपर रचनेत नामदेवांनी वेषधारी भक्त, क्षुद्र दैवतांचे उपासक, दुर्जन, सांसारिक आणि मुमुक्षू यांना उद्देशून परमार्थाचा उपदेश केला आहे.

यानंतर गोंधळ, डाक, पांगुळ, वासुदेव, पिंगळा, खेळिया, कुळवाडी, उदीम, धेनू इत्यादी विषयांवर नामदेवांनी रचलेली पारमार्थिक रूपकं आली आहेत. नामदेवांचं हे रूपकात्मक काव्य म्हणजे नाथांच्या भारुडांचं प्रसादचिन्ह आहे.

नामदेवांची हिंदी रचना म्हणजे बऱ्याच अंशी त्यांच्या मराठींतील पौराणिक कथा-काव्याचा हिंदी तर्जुमा आहे. या हिंदी पदांचं 'मऱ्हाठपण' सहज ध्यानात येतं.

'पौराणिक चरित्रं' या पुढच्या विभागात दशावतार वर्णन, शुकाख्यान,

श्रियाळचरित्र, म्हाळसेनकथा, ध्रुवचरित्र, भीष्मप्रतिज्ञा, रावण-मंदोदरी संवाद अशी आख्यानपर रचना आहे. वारकरी पद्धतीच्या कीर्तनाला उपयुक्त पडेल, अशी ही काव्य-सामग्री आहे.

यानंतर 'संतचरित्रं' हा विभाग येतो. भानुदास, जगमित्र नागा, जनाबाई, सावता माळी, गोरा कुंभार, चोखामेळा अशा स्वकालीन संतजनांची अल्प चरित्रं नामदेवांनी दिली आहेत.

भूपाळ्या आणि आरत्या या शेवटच्या विभागात नामदेवांची लोकप्रिय रचना आली आहे 'उठा उठा साधुसंत। साधा आपुलाले हित ॥' 'आजिचा दिवस आम्हा सोनियाचा।' 'लाजलें गे माय आता कोणा ओवाळू। जिकडे पहावे तिकडे चतुर्भुज गोपाळू ॥' युगें अठ्ठाविस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥' 'घालीन लोटांगण, वंदीन चरण। डोळयांनी पाहीन रूप तुझें ॥' ही नामदेवांची अभंग-कविता भक्त-भाविकांच्या नित्य पठणातली आहे.

## अभंगवाणीचे अमृतमाधुर्य

नामदेवांचं कवित्व म्हणजे त्यांचं प्रगट चिंतन आहे. कीर्तनाच्या रंगात नाचून जगी ज्ञानदीप लावण्याची प्रतिज्ञा करणारे संत नामदेव अभंग लिहितात, ते परमार्थाच्या प्रीतीनं. उत्कृष्ट भावकाव्याला आवश्यक असलेले उत्कटता, रसवत्ता, प्रसाद इत्यादी गुण नामदेवांच्या अभंगांत सहजच येतात. त्यामुळं त्यांची आत्मपर रचना अभिजात काव्याच्या कसोटीला उतरते. 'हासे, नाचे, प्रेमे फुंदतु, डुल्लतु। अर्हनिशी गातु नाम तुझें ॥' अथवा, 'प्रेमपिसें भरले अंगीं। गीतसंगें नाचो रंगीं।' अशी त्यांच्या काव्याची कथा आहे.

काव्याविषयीची नामदेवांची विस्मृती केवळ अपूर्व आहे. हे नेणिवेतलं काव्य आहे. नामदेव म्हणतात—

"कोण वेळे काय गाणें। हें तों भगवंता मी नेणें ॥
वारा वाजे भलतया। तैसी माझी रंगछाया ॥
टाळमृदुंग दक्षिणेकडे। माझें गाणें पश्चिमेकडे ॥"

नामदेवांच्या कवित्वाची रीत 'आपुला संवाद आपणाशी' अशी आहे. 'क्षण एक मना बैसोनि एकान्ती। विचारी विश्रांत कोठे आहे?" अशी त्यांची वृत्ती अंतर्मुख आहे.

नामदेवांची अभंगवाणी ही भक्तिरसाची मंदाकिनी आहे. उत्कट प्रेमभक्तीचं उदाहरण द्यायचं झालं, तर 'यथा नामदेवस्य' असंच म्हणावं लागेल. 'मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें। तुझे दारीं वसें ऐसे करी।' एवढंच त्यांचं मागणं आहे. 'एक तुळशीदल पुरें।' अशी त्यांची वृत्ती अल्पसंतुष्ट आहे. 'काखें पान अंगणीं उभें उगें। भोजन मागे, रामनाम ॥' यातून व्यक्त झालेली नामदेवांची पायरी परमार्थानं बरीच वरची आहे. त्यांच्या प्रेमळपणात याचकाची आर्तता, लेकराचा लडिवाळपणा आणि

चातकाची अनन्यता आहे. 'पाजि प्रेमपान्हा पांडुरंगे।' किंवा 'विठाई माऊली कृपेची कोवळी।' अशा अभंगांतून भक्तिरस आणि वत्सलरस हे परस्परात मिसळून गेले आहेत.

नामयाची अभंगवाणी अमृत–मधुर आहे 'अमृताहुनी गोड नाम तुझे देवा। मन माझें केशवा, का वा न घे ॥' – अशी गोडी या कवितेत आहे. 'वाटुली पाहता शिणले डोळुले। अवस्था दाटली हृदयामाजी' अशी ही रचना आर्त आहे 'पंढरीचा वास चंद्रभागें स्नान। आणिक दर्शन विठोबाचें ॥' असं समाधान या अभंगवाणीतून प्रगट झालं आहे.

'लिरिक' किंवा 'भावकविता' या काव्यप्रकाराचं रमणीय दर्शन नामदेवांच्या अभंगवाणीत घडतं. विठ्ठलाच्या भेटीचा आनंद व्यक्त करताना दृश्य, नाद, रस, स्पर्श आणि गती या सगळ्या संवेदना एकवटतात. आपल्या मनातली कृष्णदर्शनाची आतुरता शब्दरूप करताना नामदेव म्हणतात –

"मल्हार महुडें गगनीं दाटलें। विजु खळें गर्जिन्नलें गे माय ॥<br>
गोविंद पहाया लौंकरी। कैसें वरुषताहे मधुधारीं गे माय ॥<br>
आनदें मयूरें नाचती आपैसे। प्रेमें नीळकंठ झालें तें कैसें ॥<br>
नामया स्वामी दृष्टी सोज्ज्वळ। जीव लागला गोपाळ गे माय ॥"

– कृष्णाच्या मोहक रूपड्याचा वेध नामदेवांच्या मनाला लागला आहे. त्यांच्या मनोभावना निसर्ग-संवेदनांशी सहरूप होऊन उचंबळून येतात. आभाळात घनगंभीर ढग दाटून आले आहेत. विजेच्या चपल गर्जना होत आहेत. पर्जन्य मधुधारांनी बरसत आहे. मोर आनंदाने नाचू लागले आहेत. कृष्णावरील प्रेमानं मेघ 'नीलकंठ' बनले आहेत.

'मल्हार महुडें' यातील 'म'कार आणि 'ह'कार यांची द्विरुक्ती त्या सुंदर दृश्याला अधिक सुंदर बनवते. 'महुडे' ही संज्ञा त्या चित्राला कोवळीक देते. दाटून आलेल्या मल्हार महुड्याशी, नामदेवांच्या मनात दाटलेले उभड संवाद साधतात. या घनगंभीर दृश्याला विजेच्या गर्जनेची भव्य साथ आहे. सगळं वातावरण एका उदात्त प्रतीतीसाठी सिद्ध झालं आहे, आतुरलं आहे. बरसणाऱ्या मधुधारांची रसप्रतिमा या गांभीर्याचं सौंदर्य वाढवते. त्या आर्द्र सौंदर्याला तोलणारा 'गे माय'चा लाडिक ठेका आहे. 'आनंदे आपैसे' नृत्य करणारे मयूर डौलदार गतिचित्र रेखाटतात. या 'नीलकंठ मयूरांना लाभलेला निळा रंग म्हणजे त्यांच्या कृष्णप्रीतीचं फलित आहे. गंभीरता, आर्द्रता, आनंदमयता, नृत्यपरायणता आणि रंगमयता यांच्या तालावर नामदेवांचं मन डोलू लागत.

नामदेवांची कविता विविध काव्यगुणांनी मंडित आहे. ही कविता प्रासादिक आहे. 'संसारी असावे, असोनि नसावें।' अथवा 'आकारलें तितुकें आहे नाशिवंत।' किंवा 'झाड जाणावें फुलें। मानस जाणावें बोलें।' असा त्यांच्या रचनेतून रेशमाच्या लडीप्रमाणं अर्थ उलगडत जातो. माधुर्य हा काव्यगुणही या कवितेत भरून राहिला आहे. 'पंढरीरायाचा तू प्रेमभांडारी।' अथवा, 'संतरज उधळले। तेणें सर्वांग डवरलें ॥' किंवा 'भूमीचे मार्दव। सांगे कोंभाची लवलव' अशा वर्णयोजनेमुळे त्यांच्या काव्यातील भाव

श्रवणमधुर होतो. 'ध्यान सावळे गोकुळिचें ।' किंवा, 'पाहू द्या रे मज विठोबाचे मुख ।' असे अनेक कुसुमकोमल अभंग नामदेवांनी रचले आहेत.

नामदेवांचं कवित्व 'अर्थु बोलाची वाट पाहे ।' या कुळीतलं आहे. त्यांच्या घरची शब्दरत्न अर्थपूर्ण, अपूर्व आणि अमोल आहेत. असोस, अमूप, आळुका, आराणूक, इतुकले, उभड, अंकणा, कुडावा, केणे, खेव, खळेदान, गोमटा, घराचार, चळथा, चोखट, चाळवण, जगजेठी, जायजणा, झेंगट, टवाळ, डिंगर, डौर, तुळिका, दादुला, दारवंटा, दोंद, धणी, नव्हाळी, निंबलोण, पोहा, पाटोळा, पसा, पडिभर, पढियंता, पेंडवळा, पसायदान, फलकट, बुंधी, बिरडें, बोणी, भातुकें, भाक, मांदुस, मैत्र, मुखवटी, राणीव, रूपडें, रुणझुण, लाव, वोवरी, वारीकर, शिराणी, शहाणीव, सांडोवा, सणकांडी, हिंपुटी, हळुवट, होड असे अर्थपूर्ण शब्द त्यांनी योजिले आहेत. रंगमाळा, देवपिसे, प्रेमखूण, पंढरीपाटण, मूळपीठ, चित्रशाळा, प्रेममुद्रा, कमलकोंदण, नटनाटय, रजरेणू असे समर्पक सामाजिक शब्द त्यांना सहजपणानं सुचतात. त्यामुळं, 'काव्य म्हणजे भाषेतलं संगीत' ही उक्ती त्यांच्या अभंगवाणीला लागू पडते. 'नामयाचें बोलणें नव्हे हें कवित्व । हा रस अद्‌भुत निरोपमु ॥' अशी रसिकराज ज्ञानेश्वरांची साक्ष आहे, तर "दुधावरील साय तें मी वाणू काय । तेंसें गाणें गाय, नामदेव ।' असं मार्मिक वर्णन परिसा भागवतांनी केलं आहे. नामदेवांच्या वाणीला कवित्वाची प्रेरणा झाली, भक्तिरसानं ओथंबलेल्या त्यांच्या मनानं ती प्रेरणा पूर्णरूप बनवली, आणि त्यांच्या अनुभूतीतील परतत्त्व-स्पर्शानं या कवित्वाला उदात्ततेची कांती मिळवून दिली.

**व्यक्तित्वाचे गवाक्ष**

नामदेवांच्या कवित्वातली हीच उदात्तता त्यांच्या व्यक्तित्वातही प्रतीत होते. त्यांचं कवित्व हे त्यांच्या व्यक्तित्वाचं उघडं गवाक्ष आहे. स्वतः नामदेव हाच त्यांच्या काव्याचा विषय आहे. कवी आणि त्याची कविता किती एकरूप असू शकतात, याचा उत्तम नमुना म्हणजे नामदेवांचा एकेक अभंग आहे. त्याचं हृदय जणू त्यांच्या ओठावरच होतं. आपले कुटुंबीय, स्वतःचं गृहजीवन, विठ्ठलभक्ती, पारमार्थिक अनुभूती, जीवनदृष्टी या सर्व गोष्टींचं चित्रण नामदेवांनी हृदयंगम रीतीनं आपल्या अभंगवाणीतून केलं आहे. त्यांच्या सात्त्विक मनाचे अनुभव त्यांच्या काव्यात 'अभंग' झाले आहेत. अमृताच्या खाणीतून निघालेल्या अभंग-रत्नांनी त्यांचं जीवन उजळून गेलं आहे.

'शिंपियाचे कुळीं जन्म मज झाला ।' अशा आपल्या लौकिक जीवनाच्या आरंभापासून ते आत्मनिवेदन करतात; आणि 'घरोघर ओवाळणी । विठ्ठल देखिला नयनीं ।' असे पारमार्थिक सफलतेचे उद्‌गार काढून आपल्या आत्मवृत्ताची ते परिपूर्ती करतात. त्यांच्या लौकिक आणि पारमार्थिक व्यक्तित्वाचं कमल अनेक पाकळयांनी उमलत जातं. साधकावस्थेपासून सिद्धावस्थेपर्यंतचा, नामदेवांचा मनोविकास कसा होत गेला, याचा चित्रपट नामदेव-गाथेतून आपल्यापुढं उभा राहतो.

नामदेवांची कविता हीच त्यांची आत्मकथा आहे. त्यांच्या आत्मिक विकासाच्या

सहा अवस्था या कवितेनं चित्रित केल्या आहेत बद्ध, मुमुक्षू, साधक, वंचित, सिद्ध आणि जीवन्मुक्त अशा त्या सहा अवस्था आहेत. यांपैकी प्रत्येक अवस्था म्हणजे नंतरच्या अवस्थेची पूर्वतयारी आहे.

ज्ञानदेवादी संतांची आणि नामदेवांची भेट झाली, त्यावेळी नामदेवांचं मन बद्धावस्थेत होतं. ते प्रपंचात गुरफटलेले होते. देवाशी आपलं सख्य आहे, याचा अहंकार त्या मनाला झाला होता 'अंगें परब्रह्म मजपाशी।' असं त्यांना वाटत होतं. त्या वेळी मुक्ताईच्या सांगण्यावरून, गोरोबा काकांनीं हातात थापटणं घेऊन, एकेका संताची कसोटी घेतली. निवृत्तिनाथ 'निका परब्रह्म' असल्याचं त्यांना जाणवलं. पण नामदेवांच्या बाबतीत मात्र 'डोई चोळू मोहरे रडो आले।' असा विपरीत प्रकार घडला, त्यातूनच पुढं, 'जव सद्‌गुरूचे नाही सेवन। तव मी जैसे स्वप्नीचे धन॥' असा श्री विठ्ठलानं नामदेवांना दृष्टान्त दिला.

यावर नामदेवांनी आपल्या मनाला, 'मृगजळ डोहो का उपससी वाया?' असा उपदेश केला. ते मुमुक्षू झाले. परमार्थाच्या मार्गाला लागले. यानंतर संतसंग आणि नाममंत्र या दोन श्रद्धास्थानांच्या बळावर, नामदेवांनी साधकावस्थेची पूर्वयोजना केली. त्याच्या जोडीला प्रपंच–विरक्ती आणि चित्तशुद्धी यामुळे त्यांच्या भक्तीचं दृढीकरण झालं. औंढयाला नागनाथाच्या मंदिरात नामदेवांची आंधळी भक्ती डोळस झाली. तिथं देवाच्या पिंडीवर पाय ठेवून निजलेल्या, विसोबा खेचर यांना त्यांनी पाहिलं, 'कैसा हा प्राणी या देवो नेणे,' असं नामदेवांना आरंभी वाटलं. पण तेच नामदेव गुरुकृपेनंतर मनोमन तृप्त झाले 'नामा पाहे अवघा जिकडे तिकडे देव। कोठें रिता ठाव न देखेंचि।' असा दिव्य अनुभव त्यांना आला विसोबांनी सांगितलेला नाममंत्राचा जप ही नामदेवांची अखंड साधना झाली

प्रपंचातील त्रिविध तापांनी पोळलेले नामदेव संसारातून मनानं मुक्त झाले. 'कण्याभाकरीचें खाणें। गाठीं रामनाम नाणें।' हेच वैष्णवांचं वैभव असल्याचं ते मानू लागले. विठाई हीच त्यांच्या डोळयातील बाहुली झाली. श्रीमुखावरून चंद्रबिंबाची कुरवंडी करावी असं त्यांना वाटलं. 'नारायण, नारायण' हेच त्यांचं पारायण झालं. 'भोगावरी आम्ही घातला पाषाण' असं ते म्हणू लागले. 'पाहू द्या रे मज विठोबाचें मुख। लागलीसे भूक डोळा माझ्या॥' असं आर्त त्यांच्या मनात उत्पन्न झालं.

नामदेवांनी हिरीरीनं साधना सुरू केली. पण चिरवांच्छिताची दुष्प्राप्ती हा मानवाला नियतीचा दारुण शाप आहे, याचा अनुभव त्यांना येऊ लागला. देवदर्शन घडेना. यामुळं त्यांचं मनं खापरावरच्या लाहीप्रमाणं तडफडू लागलं. साधकाच्या जीवनातली आत्म्याची ही काळोखी रात्र, नामदेवांच्याही आयुष्यात येऊन गेली. ते म्हणाले, "विठ्ठला, मी तुझा दास आहे. मग मला उदास का करतोस? समर्थाचं बाळ वाकळ पांघरील तर त्याची लाज कुणाला? देव असता दैन्य उरतं तरी कसं?"

पण नामदेवांच्या पारमार्थिक प्रवासातली ही आत्मिक रात्र अवचितपणानं संपली.

त्यांचा शोक पाहून, तो पुरुषोत्तम द्रवला. आत्मसाक्षात्काराच्या सूर्योदयानं ते आनंदित झाले. देव नामदेवांपुढं उभा ठाकला. ' उचलोनि दोही बाही । नामा धरिला हृदयी ॥ ' विठ्ठलाची सावळी मूर्ती त्यांच्या हृदयात बिंबली. हरिकंठीची सुमनमाळा सुटून खाली आली. ती माळ नामयानं हृदयी धरली.

' कोटि दिवाळचा दसरे । आम्हां हेंचि झालें पुरें ।
घरोघरीं ओवाळणी । विठ्ठल देखिला नयनीं ॥ '

नामदेवांच्या डोळयांचं पारणं फिटलं. त्यांना सुखाचा शेजार घडला. ' परेहुनीं परतें घर । तेथे नांदू निरंतर ॥' – नामदेव देवस्वरूप झाले.

पण या सिद्धावस्थेत नामदेव थांबले नाहीत महाद्वारी कीर्तरंगात नाचत असताना नामदेवांना ' उरलो उपकारापुरता ' असा अनुभव आला. " कैंचे रे बंधन आम्हां जीवन्मुक्ता ? ' असे ते म्हणाले, ' पाजळला दीपू फिटला अंधकारू वो । ' असा आत्मप्रत्यय त्यांना आला. बिंदूपासून सिंधूपर्यंत विकास व्हावा, तसा नामदेवांचा हा आत्मिक प्रवास घडला.

## कार्यकर्तृत्व

आत्मविकासाबरोबरच नामदेवांनी केलेला पंथप्रसार आणि लोकोद्धार महत्त्वाचा आहे. ज्ञानेश्वरांनी ज्या वारकरी संप्रदायाची पायाभरणी केली, त्या संप्रदायाचा वाढविस्तार नामदेवांनी आपल्या सर्व शक्तीनिशी केला. ज्ञानेश्वरांचं तत्त्वज्ञान नामदेवांनी आपल्या मधुमधुरा वाणीनं सोपं करून सांगितलं भक्तितत्त्वावर अचल निष्ठा ठेवून स्वबांधवांनाही त्या प्रेमभक्तीचा संदेश सांगावा, या हेतूनं त्यांनी अभंगरचना केली. नामदेवांच्या कवित्वातून नामभक्तीचा, सदाचाराचा व कळवळयाचा निरोप आहे. ज्ञानीयांच्या राजानं प्रामुख्यानं ज्ञान सांगितलं व कर्म सुप्रतिष्ठित केलं. नामदेवांनी भक्तीचा अलोट जिव्हाळा निर्माण केला; आणि महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही विठ्ठलभक्तीचा ध्वज फडकावला. अशा रीतीनं कर्म, भक्ती व ज्ञान यांच्या संगमानं हा संप्रदाय धन्य झाला.

भक्तिपंथाच्या विस्तारासाठी नामदेवांनी बजावलेली कामगिरी महत्त्वाची आहे. ' आम्हां सापडलें वर्म । करू भागवत धर्म ' ही आपली प्रतिज्ञा अभंग रचनेच्या आधारे त्यांनी सफळ-संपूर्ण केली. काव्यप्रकारांच्या नव्या वाटा त्यांनी शोधल्या. ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडं यांची **चरित्रं** नामदेवांनी लिहिली. जनाबाई, गोरोबा, चोखोबा इत्यादी समकालीन संतांची **व्यक्तिचित्रं** त्यांनी रेखाटली. स्वतःचं **आत्मचरित्र** त्यांनी सादर केलं पांगुळ, उदीम, वासुदेव अशा अनेक भारुडांची **लोककविता** त्यांनी रचली. नामदेवांची **कूटरचना** प्रसिद्ध आहे. ' तीर्थावळी ' या प्रकरणातून **प्रवासवर्णन** पुसट स्वरूपात आलं आहे. दशावतार, भीष्म-प्रतिज्ञा, नक्रोद्धार अशी **आख्यान-कविता** त्यांनी लिहून ठेवली, मुमुक्षू संसारी जन, खलदुर्जन इत्यादींसाठी **उपदेशपर कविता** त्यांनी रचली

आहे. नामदेवांची अभंग-कविता ही **पारमार्थिक भावकविता** (मेटॅफिजिकल लिरिक) आहे. भूपाळ्या, आरत्या ही त्यांची **भक्तिगीतं** आहेत. अशा रीतीनं भिन्न भिन्न रुचींच्या लोकांचं समाराधन करणारी बहुकक्ष कविता नामदेवांनी लिहिली आहे. यांपैकी अनेक काव्यप्रकारांचे पहिले प्रवर्तक म्हणून नामदेवांचा नामनिर्देश करावा लागेल. ही कविता नित्यनूतन आहे. 'श्रीगुरुग्रंथसाहिब' या शिखांच्या धर्मग्रंथातील नामदेवांची 'मुखबानी' ही आंतरभारतीची पहिली **प्रसन्न** खूण आहे.

नामदेवांची दृष्टी पुरोगामी आहे. त्यांची शिकवण कर्तव्यनिष्ठेला आणि सामाजिक नीतिमत्तेला पोषक आहे. जातिनिरपेक्ष धर्म विचार नामदेवांनी 'तीर्थावळी' या प्रकरणात मांडला आहे. संतांनी तीर्थयात्रेचं मावंदं घातलं. त्यावेळी जातीनं शिंपी असलेल्या नामदेवांना विठ्ठलानं 'प्रत्यक्ष सांगाते जेवविले,' हे पाहून तिथं आलेले ब्राह्मण अस्वस्थ झाले. त्यावर आपली प्रतिक्रिया नामदेवांनी विठ्ठलाच्या मुखातून व्यक्त केली. देव म्हणाले,

"देह म्हणाल तरी वोडबर पाचांचें । अंबरीं आभासाचें अभ्र जेवी ॥
नामा ऐसें नांव कवणिया अवयवा । सांगा तुम्ही देवा, साच करोनि ॥
भेदभ्रम तुमचा नाही मावळला । भ्रमुचि उरला संदेहेसी ॥

मुक्तीच्या आणि भक्तीच्या मार्गात जातीला महत्त्व नाही. देवाच्या दरबारात माणूस हा इथून तिथून समान आहे, ही गोष्ट नामदेवांनी स्पष्ट केली आहे.

नामभक्तीचा सुलभ–सोपा मंत्र नामदेवांनी सांगितला. त्यांचा 'नामवेद' हा जणू पाचवा वेद आहे. 'नामाविणें वेद आणि नाही' असं ते सांगतात. 'न पढावे वेद, नको शास्त्रबोध। नामाचे प्रबंध पाठ करा ॥' अशी सुगम नामभक्ती त्यांनी मांडली आहे. आपल्या अभंगातून त्यांनी कोरडी तत्त्वचर्चा केली नाही. प्रेमभक्तीचा मंत्रजागर त्यांनी केला आहे. विठ्ठलभक्तीची अमृतवल्ली नामदेवांनी लोकांना दाखवली. तिला आत्मज्ञानाची जोड दिली; आणि भागवतधर्म सुप्रतिष्ठित केला.

वारकरी भक्तभाविकांच्या कल्याणासाठी नामदेवांनी आयुष्यभर कष्ट केले. नामदेव हे स्वतः जसे थोर भक्त होते, तसेच ते कुशल संघटकही होते. भक्तिपंथाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानेश्वरांच्या हयातीत तर केलेच, पण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतरही चौपन्न वर्षे त्यांनी विठ्ठलभक्तीचा सर्वदूर प्रसार केला, अठरापगड जातींना विठ्ठलप्रेमाने भारले, नामसंकीर्तनाची परंपरा सुरू केली; आणि भागवतधर्म प्रभावशाली बनविला.

कुलपरंपरेनं चालत आलेला आपला उद्योग–व्यवसाय विठ्ठल–स्वरूप करण्याची किमया नामदेवांजवळ होती. एवढंच नव्हे, तर ईश्वरार्पण बुद्धीनं आपलं नियतकर्म करण्याची एक परंपरा संतपरिवारात नामदेवांमुळे सुरू झाली. 'सुई आणि सातुळी, कात्री गज दोरा । मांडिला पसारा सदाशिवी ।' अथवा, 'मन मेरे गजु जिव्हा मेरी काती । मपि मपि काटऊ जनमकी फांसी ।' या शब्दांत नामदेवांनी परमार्थातही आपलं शिंपी-

काम चालू ठेवलं. त्यांच्या या वस्तुपाठाचं अनुकरण अनेक संतांनी केलं. 'दळिता कांडिता तुज गाईनं अनंता ।।' असं जनाबाई म्हणतात. 'कांदा, मुळा, भाजी । अवघी विठाबाई माझी ।।' असं सावता महाराजांना जाणवतं. 'देह बागेसरी जाणें । अंतरात्मा नाम सोनें ।।' असा प्रत्यय नरहरी सोनारांना येतो. प्रपंच आणि परमार्थ यांत समतोल आणि समन्वय साधणारे पहिले किमयागार म्हणून नामदेवांचा निर्देश करावा लागेल.

संतप्रणीत उदारमनस्कता नामदेवांच्या ठायी होती. त्यामुळं विविध थरांतील व्यक्तीच्या मनोभूमिकांशी ते समरस होऊ शकले. ज्ञानेश्वर आणि परिसा भागवत या उच्च वर्णीय संतांपासून ते जनाबाई आणि चोखोबा या शूद्र वर्णीय संतांपर्यंत सर्वांनाच नामदेवांनी आपल्या उदारमतवादानं जिंकलं आहे. संतत्व हे सर्वसमावेशक असतं. नामदेवांनी जनाबाईंना आपल्या कुटुंबियांच्या इतमामानं वागवलं. आपला पारमार्थिक वारसा तिला दिला. 'नामयाचें ठेवणें जनीस लाधलें' अशी पावती तिनं दिली आहे. तीच गोष्ट चोखोबांची. त्यांच्या अपघाती निधनानंतर नामदेव मंगळवेढ्याला गेले. कोसळलेल्या गावकुसातून चोखोबाच्या अस्थी नामदेवांनी पारखून आणल्या; आणि महाद्वारासमोर त्यांनी चोखोबांची समाधी उभारली.

नामदेवांनी विठ्ठल-भक्तीचं विकसन केलं. देव दगडात नाही, तो हृदयात आहे; सर्वभूती आहे. ज्ञानापेक्षा भक्ती चांगली. पण ती डोळस हवी. व्रतवैकल्यांचा व कर्मठपणाचा धर्म खरा नाही. नाम हेच धर्माचं सारसर्वस्व आहे. भक्ताला कळीकाळाच भय नसतं. संसारात राहून ईश्वरप्राप्ती होते.— नामदेवांनी मांडलेले हे विचार मूलगामी आहेत. त्यांच्या द्वारे नामदेवांनी जनतेचं बाह्यतः दरिद्री असलेलं जीवन सुसह्य केलं. आपल्या तत्त्वज्ञानानं सामान्य जनांचं आंतरजीवन त्यांनी आनंदमय केलं. भक्तिविचाराचा भव्य आदर्श मांडून लोकांत जीवननिष्ठा उत्पन्न केली.

—या विचारदर्शनाबरोबरच नामदेवांनी विशुद्ध नैतिक वर्तनाचे वस्तुपाठ आपल्या अभंगवाणीतून मांडले. क्षमा, कर्तव्य, भूतदया, परोपकार इत्यादी मूल्यं स्वजनांना सांगितली. त्यांना सदाचारसंपन्नता शिकवली. ऐहिकाच्या उत्कर्षासाठी संसारात अलिप्ततेनं, पण स्वाभिमानानं कसं राहावं, याची शिकवण त्यांनी दिली. नामदेव म्हणतात—

"दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां । येथे साधूं प्रेमा राघोबाचा ।।
अवघे हातोहातीं तरो भवसिंधु । आवडी गोविंदु गाऊं गीती ।।
हिताचिया गोष्टी सांग एकमेका । शोक, मोह, दुःख निरसू तेणें ।।"

—नामदेवांची ही शिकवण व्यावहारिक कर्तव्यनिष्ठेला आणि सामाजिक नीतिकल्पनेला उपकारक आहे. स्वधर्माचरण, कुलधर्मपालन वर्णनिरपेक्ष भक्तियोग आणि क्षमाशांतीचं परिपालन या सर्वांतून नामदेवांनी स्वकालीन समाजासमोर आदर्श आचारधर्म उभा केला. 'जना दाखवावें वर्तोनिया' हेच नामदेवांचं आवाहन आहे.

## समारोप

मध्ययुगीन भारताचं सांस्कृतिक जीवन संपन्न करणाऱ्या अनेक धर्मपंथांत, संत शिरोमणी नामदेवांच्या वारकरी पंथाचं स्थान मानाचं आहे. 'पंढरीचा देव प्रत्यक्ष उदार। बाळचा-भोळचा पार दावीतसे ।।' असं आश्वासन नामदेवांनी भक्तिपंथाच्या वतीनं सर्व-सामान्य जनतेला दिलं. सोप्या नामभक्तीच्या बळावर समाजात नवचैतन्य ओतले; आणि वारकरी पंथ लोकाभिमुख केला. विठोबाच्या राज्यात 'भेदाभेद भ्रम अमंगळ' आहेत, अशी उघड घोषणा वारकरी संतांनी केली. नामदेवांनी आपलं ऐंशी वर्षांचं आयुष्य भक्तिपंथाच्या मुळाशी शिंपलं; आणि त्या पंथाच्या शाखोपशाखा भारतभर पसरल्या. राजकीय, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रांतली आक्रमणं पचवून या पंथाची कीर्तिपताका अजूनही उंच फडकत आहे. कितीतरी शतकं उलटली. समाज-जीवनात अनेक बदल घडले. तरीपण पंढरीच्या वाटेवरील वारकऱ्यांच्या दिंडीत खंड पडला नाही. 'पुंडलीकवरद हरि विठ्ठल' हा जयघोष महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आजही घुमतो; आणि दिगंत दुमदुमून टाकतो. 'विठ्ठल रखुमाई, विठोबा रखुमाई,' या घोषाच्या तालावर भान विसरून नाचणारी वारकऱ्यांची पावलं, भजनाचं रिंगण धरताना आजही सर्वत्र आढळ-तात. आषाढी-कार्तिकीला लक्षावधी वारकरी विठ्ठलाच्या महाद्वारात जमतात; आणि गोपाळकाल्याचा कवळ एकमेकांच्या मुखात घालतात.

भागवत धर्माच्या उज्ज्वल परंपरेत नामदेवांचं कर्तृत्व उठून दिसतं. त्यांची भक्ति-कल्पना भोळी-खुळी नाही. तिला ज्ञानाची, म्हणजे आत्मज्ञानाची जोड लाभलेली आहे. गोरोबांनी घेतलेली परीक्षा, विसोबांकडून लाभलेलं परमज्ञान आणि ज्ञानेश्वरांच्या सह-वासातून झालेला आत्मबोध यामुळं नामदेवांच्या विठ्ठलोपासनेला तत्त्वज्ञानाचं अधिष्ठान लाभलं. त्यांची भक्तिकल्पना अंधश्रद्धेवर आधारलेली असती, तर त्यांच्या माघारी ती क्षीणप्रभ झाली असती, नुसत्या भोळ्या भावाचं बळ परंपरेनं टिकण्यासारखं नसतं. 'जगी ज्ञानदीप लावण्या'ची नामदेवांनी केलेली प्रतिज्ञा सफल झाली. त्यांनी पुरस्कारि-लेला वारकरी संप्रदाय काळाच्या प्रवाहात खंबीरपणानं टिकून राहिला; एवढंच नव्हे, तर हा संप्रदाय सतत वर्धिष्णू होत गेला. पूर्ण प्रवृत्ती आणि पूर्ण निवृत्ती या दोन टोकांच्या मतांतील समतोल नामदेवांनी साधला. अव्यक्तोपासना आणि सगुणोपासना यांचाही त्यांनी समन्वय केला. एकीकडे हठयोगासारख्या कष्टप्रद मार्गातले धोके त्यांनी जसे स्पष्ट केले, तसेच क्षुद्र दैवतांच्या उपासनेचा त्यांनी परखडपणानं निषेधही केला. पारमार्थिक तत्त्वज्ञान आणि धार्मिक आचार यातील विवेकाचं नामदेवांनी केलेलं विवेचन सांप्रदायिक भक्त-भागवतांना मोठंच मार्गदर्शक झालं. नामदेवांचं पावन चरित्र आणि प्रेरक व्यक्तित्व यांचा हृदयंगम आविष्कार करणारी त्यांची अभंगवाणी ही वारकऱ्यांची अमृत-संजीवनीच ठरली.

'आम्हां कीर्तन कुळवाडी। आणिक नाही उदीम जोडी।।' या समर्पित भावनेनं नामदेवांनी भक्तिमंदिराचा विस्तार केला. इतिहास घडविणाऱ्या नामदेवांच्या या कार्याची

आठवण वारकरी पंथानं सतत जागी ठेवलेली आहे. भारताच्या अनेक राज्यांतील असंख्य गावांतून वारकरी पंथाचं भजन-कीर्तन आजही तुमच्या-आमच्या कानामनावर संस्कार करतं. 'बोलू ऐसे बोल । जगें बोलें विठ्ठल डोले' हे नामदेवांचे बोल टाळ-मृदुंगाच्या तालासुरात ऐकू येतात. भजन-कीर्तनसमाप्तीच्या क्षणी वारकऱ्यांचे ओठ नामदेवांची आरती गाऊ लागतात—

"घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रूप तुझें ॥
प्रेमे आलिंगीन आनंदें पूजीन । भावें ओवाळीन, म्हणे नामा ॥"

□ □ □

सहा

# ज्ञानदेव आणि नामदेव

**व्यक्तित्वांचा शोध। काव्यसंपदांचे विशेष। विचारधनातील एकरूपता। दोन संतांचे जीवितकार्य। दोन आक्षेपांचा परामर्श। समारोप.**

संत बहिणाबाईंनी एका अभंगात महाराष्ट्रातील भागवतधर्मावर एक सांग रूपक गुंफले आहे. ज्ञानदेवांनी या भक्तिमंदिराची पायाभरणी केली, नामदेवांनी त्याचा वाढ-विस्तार केला, नाथांनी आपल्या भागवत-ग्रंथाचा ध्वज त्या मंदिरावर फडकाविला आणि तुकोबा हे त्या मंदिराचे कळस म्हणून शोभले; असा बहिणाबाईच्या अभंगाचा भावार्थ आहे. ज्ञानदेव (शके ११९७ ते १२१८), नामदेव (शके ११९२ ते १२७२), एकनाथ (शके १४५५ ते १५२१) आणि तुकाराम (शके १५२० ते १५७१) या संत-चतुष्टकाच्या कार्याचे मार्मिक वर्णन संत बहिणाबाईंनी प्रस्तुत अभंगात केले आहे. या चार संतांपैकी ज्ञानदेव व नामदेव हे दोघेजण समकालीन असून एकनाथ व तुकाराम हे उत्तरकालीन आहेत. ज्ञानदेव-नामदेवांचा सहवास, सह-प्रवास व स्नेह सर्वश्रुतच आहे. नाथांनी धर्म-संस्थापनेचा संदेश ज्ञानदेवांकडून घेतल्यामुळे 'ज्ञानाचा एका' म्हणून ते ओळखले जातात, तसेच तुकोबांना नामदेवांकडून कवित्वाची प्रेरणा लाभल्यामुळे 'नामाचा तुका' म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. अशा रीतीने भक्तिपंथाच्या या चार आधारवडांचे परस्परांशी विलक्षण हार्द होते. त्यातही ज्ञानदेव व नामदेव या संतद्वयाचा सख्यभाव विशेष लक्षणीय आहे. "सखा विरळा ज्ञानेश्वर नामयाचा जो जिव्हार" या शब्दात संत जनाबाईंनी या दोघांच्या स्नेहाचे वर्णन केले आहे. खुद्द ज्ञानदेव व नामदेव या दोघांनीही परस्परांविषयीचा प्रेमादर अनेक स्थळी व्यक्त केला

आहे. 'तीर्थावळी'च्या समयी ज्ञानदेव हे नामदेवांना 'अद्वैत आत्मया प्रेममूर्ती' असे संबोधतात. 'प्रेमाचा जिव्हाळा हृदयी तुझ्या आला' असून 'पंढरीरायाचा तूं प्रेम-भांडारी' आहेस, अशी नामदेवांची प्रशस्ती ते करतात. ज्ञानदेव समाधी घेण्यास सिद्ध झाले, तेव्हाही 'प्रेमाचा पुतळा नामदेव' असा नामदेवांचा गौरवपूर्ण उल्लेख ते करतात. "सिंधूहूनि सखोल सरस तुझे बोल। आनंदाची वोल नित्य नवी।" असे प्रशस्तिपत्र त्यांनी नादेवांना दिले आहे (९२५). नामदेवांनाही ज्ञानदेवांविषयी परमादर वाटत होता. 'प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर' अशी त्यांची श्रद्धा होती (९१७). ज्ञानदेवांसारख्या श्रेष्ठ वैष्णवांचे आपण दासानुदास आहो, असे ते अभिमानाने सांगत होते. (९२४). 'केवळ ईश्वरू ज्ञानाचा हा' अशी त्यांची ज्ञानदेवांविषयी धारणा होती (१०९०). अशा रीतीने ज्ञानदेव व नामदेव या दोघांनाही परस्परांचा पारमार्थिक अधिकार व कर्तृत्वशक्ती याविषयी यथार्थ जाणीव होती. म्हणूनच त्या दोघांची व्यक्तिम्त्वे, काव्यसंपदा, विचारधन व कार्यकर्तृत्व यांचा परामर्ष घेणे उपयुक्त ठरेल.

## व्यक्तित्वांचा सोध

ज्ञानेश्वरांचा जन्म ब्राह्मण कुळात झाला होता. वंशपरंपरेने विद्याभ्यासाचा संपन्न वारसा त्यांना लाभला होता. अवघी एकवीस वर्षांची आयुर्मर्यादा त्यांना लाभली. इह-लोकीच्या या अल्पकालीन जीवित यात्रेतील त्यांची अक्षरयात्रा मात्र चिरस्मरणीय ठरली आहे. गीता, भागवत, शांकरभाष्य, योगवासिष्ठ, वेद, उपनिषदे इत्यादी अध्यात्मग्रंथांचा स्पष्ट ठसा ज्ञानदेवांच्या वाङ्मयावर उमटलेला आहे. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या आरंभी त्यांनी जे गणेशस्तवन केले आहे, त्यात वेदांत, षड्दर्शने, दशोपनिषदे इत्यादींचे निर्देश रूपकाच्या आश्रयाने आले आहेत. 'भाष्यकारांते वाट पुसत' ग्रंथ रचना करणारे ज्ञानदेव हे स्वतःच एक अधिकारी भाष्यकार आहेत; प्रज्ञावंतांचे मेरुमणी आहेत.

"अध्यात्मविद्येचें दाविलेसे रूप। चैतन्याचा दीप उजळिला।" या शब्दांत नामदेवांनी ज्ञानदेवांचा अधिकार विशद केला आहे (९१२). स्वतः नामदेवांचे ग्रंथपठण मात्र जरुरीपुरतेच आहे. 'नव्हे बहुश्रुत नव्हे ज्ञानशील' हे त्यांनी स्वतःविषयी मोकळेपणाने म्हटले आहे (९२४). "न लगती कथा व्युत्पत्ति उलथा। वाउग्या चळथा ग्रंथांचिया" अशा शब्दांत त्यांनी पढिकतेचा निषेधच केला आहे (७३५). मात्र त्यांचे सामान्य ज्ञान लक्षणीय आहे. वेद, पुराणे, उपनिषदे यांच उल्लेख त्यांनी अनेक ठिकाणी केले आहेत. 'महाभाष्यसूत्रा' चा निर्देश ते करतात (७९९). गीता व ज्ञानेश्वरी हे ग्रंथ त्यांना विशेष प्रिय आहेत. 'गीता महिमा बोलवेना वाचे' हाच त्याचा अनुभव आहे. (९१०). रामायण, महाभारत व भागवत यांतील कथोपकथांचा उपयोग करून आपले विषयनिरूपण त्यांनी सुलभ केले आहे. "शिंपियाचे कुळीं जन्म मज झाला। परि हेतु गुंतला सदाशिवी" असे आत्मनिवेदन करून नामदेवांनी केवळ अभंगरचना केली.

ज्ञानदेवांनी मात्र स्फुट अभंगकवितेबरोबर ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व चांगदेव-पासष्टी हे लहानमोठे प्रबंधही लिहिले. "तुम्ही एकले अवधान देऊन माझे निरूपण ऐकले

तर जगातील सर्व सुखांना पात्र व्हाल " असे ज्ञानदेवांचे आपल्या श्रोत्यांना प्रतिज्ञोत्तर आहे, तर "अभंगांची कळा नाही मी नेणत " ही अभिजात शालीनता नामदेवांच्या रोमरोमांत भिनली आहे.

ज्ञानदेव हे ब्रह्मचारी संत आहेत, तर नामदेवांच्या संतत्वाला गृहस्थधर्माची जोड आहे. तसेच या दोघांच्या दोन आश्रमधर्मांचे काही खास वेगळेपणही आहे. ज्ञानदेव हे संन्याशाचे संतान आहेत. या 'लोकविरुद्ध जन्महेतू'ची पुरेपूर किंमत त्यांना मोजावी लागली आहे, पण व्यक्तिगत जीवनात स्वतःला आणि भावंडांना सोसाव्या लागलेल्या दारुण उपेक्षेविषयीची कडवट प्रतिक्रिया त्यांच्या समग्र वाङ्मयात अंशमात्रही आढळत नाही. ही लोकसंस्था सर्वथा रक्षणीयच आहे, असे त्यांनी आग्रहाने सांगितले आहे. कवी शेली याच्या स्कायलार्कप्रमाणे ज्ञानदेवांचे चरित्र सर्वस्वी अपार्थिव आहे असे म्हटले पाहिजे.

शरीराने जनान्तात राहाणारे ज्ञानदेव मनाने सदैव एकान्तातच होते. नामदेव हे मात्र कुटुंबशील होते आई-वडील, पत्नी, चार मुलगे, चौघी सुना, बहीण, दासी जनी व स्वतः नामदेव असे चौदा माणसांनी गजबजलेले हे एकत्र कुटुंब पंढरपूरला राहात होते. ज्ञानदेवांना समाजाकडून विरोध झाला असला तरी त्यांची तिन्ही भावंडे त्यांच्या परमार्थविचाराशी सर्वस्वी समरसच झालेली होती. नामदेवांना समाजाकडून, विशेषतः ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील अन्य संतांकडून मोठेच सहकार्य लाभले. नामदेवांच्या विठ्ठलभक्तीला कौटुंबिक विरोध झाला असला, तरी त्या विरोधाची धार फारशी तीव्र नव्हती. आई-वडील व पत्नी या तिघांनी नामदेवांच्या प्रपंचविषयक औदासीन्याविषयी आरंभी असमाधान व्यक्त केले असले, तरी पुढे त्यांना नामदेवांचा आध्यात्मिक अधिकार उमगतो व ती कृतार्थ होतात. "आतां ये संसारीं मीच धन्य जगीं । जे तुम्हां अर्धांगी विनटले" असे साफल्याचे उद्गार त्यांच्या पत्नीच्या तोंडून बाहेर पडतात (१३३२). तसेच नामदेवांची चारी मुले व दासी जनी यांना नामदेवांच्या परमार्थसाधनेविषयी आरंभापासूनच आदरभाव वाटत होता. "नामयाचें ठेवणें जनीस लाधलें । धन सापडलें विटेवरी ।" अशी तृप्तीची पावती जनाबाईंनी दिली आहे.

ज्ञानदेव व नामदेव यांच्या पारमार्थिक व्यक्तित्वातही बराच फरक असल्याचे जाणवते. म्हणजे असे की, साक्षात्काराची अवस्था ही ज्ञानदेवांच्या बाबतीत एक घटना (event) आहे, तर नामदेवांच्या बाबतीत ती एक घडण (process) आहे. बद्ध, मुमुक्षू, साधक, वंचित, सिद्ध व जीवनमुक्त या आत्मिक विकासाच्या सहा अवस्था नामदेवांच्या पारमार्थिक जीवनात आढळून येतात. 'कुटुंबकाबाडी सदा कानकोंडा' अशा एका मामुली प्रापंचिकाने 'परब्रह्म होऊनि ठेलों' ही आत्मानंदाची अपूर्व अवस्था क्रमशः कशी प्राप्त करून घेतली, याचा चेतोहर आलेख नामदेवांच्या आत्मनिवेदनपर अभंगवाणीतून पाहायला मिळतो. उत्कंठा, उत्कटता, अधीरता, आर्तता, अनुताप इत्यादी भावोर्मींच्या प्रवाहांचे स्फटिक-विमल दर्शन त्यांच्या जीवनात घडते. प्रयत्नांची शिकस्त करूनही देवदर्शनाचा दिव्यानुभव आपणास येत नाही, म्हणून निराशेच्या अंधारात अगतिकतेने ठेचकाळणाऱ्या साधकाच्या आत्म्याची काळोखी रात्र (दि डार्क नाइट ऑफ दि सोल)

नामदेवांच्या आयुष्यात येऊन गेली. त्या पारमार्थिक पर्युत्सुकतेचा परमोत्कर्ष त्यांच्या अभंगवाणीतून व्यक्त झाला आहे. "शिणले डोळुले पाहतां वाटुली। अवस्था दाटली हृदयामाजी" अशी तळमळ नामदेवांना लागून राहिली होती.

ही वंचितावस्था ज्ञानदेवांना अनुभवाची लागली नाही. त्या अलौकिक साधकाच्या आत्म्याला अज्ञानाच्या रात्री दुस्तर प्रवास करावा लागला नाही. "विचरे विश्व होऊनी। विश्वामाजी" असा पारमार्थिक सामरस्याचा अद्वयानंद ज्ञानदेव सहजपणे निवेदितात (२·३६७). बापरखमादेवीवरूला विठ्ठलाची भेट सहजपणे घडते. आत्मज्ञानाच्या स्वच्छ प्रकाशाचे दर्शन ज्ञानदेवांना एकदमच घडते. त्यांचा आत्मा जन्मतःच बाल हनुमंताप्रमाणे चित्सूर्याकडे निर्भयपणे झेप घेतो.

ज्ञानदेव व नामदेव यांची साक्षात्कारवाणी एकात्म स्वरूपाची आहे. या दोन्ही संतांना जो सगुण-साक्षात्कार झाला, तो प्रकाशाचा झाला. "तुझिये निढळीं कोटिचंद्र प्रकाशे' असे ज्ञानदेवांना जाणवले; तर "कोटी सूर्य प्रभादीप्ती। गगनी झळकली अवचिती" असे नामदेवांनी अनुभवले. "ज्योतीचीही निजज्योती असणाऱ्या परमात्म-ज्योतीचा हा सर्वव्यापक प्रकाश आहे... अच्युत व अमृत अशा या ज्योतिप्रकाशाचा साक्षात्कार नामदेवांना भक्तिमार्गाने बाहेर आणि ज्ञानदेवांना योगमार्गाने अंतरात झाला." "घरोघरी ओवाळणी। विठ्ठल देखिला नयनीं।" हा आत्मानुभव घेत असताना नामदेवांच्या डोळ्यांचे पारणे फिटले, सर्वांठायी आनंद दाटला व त्यांना सुखाचा शेजार घडला. 'परेहुनी परतें घर' त्यांना नांदण्यास मिळाले. श्रीहरीच्या मुरलीच्या अनाहत नादात त्यांची समाधी लागली. नामदेव हे देवस्वरूप झाले. पंढरीच्या विठ्ठलाचे सावळे, सगुण रूप मनात धारण करून, म्हणजेच ध्यानयोगाच्या मार्गाने त्यांना अपरोक्ष साक्षात्कार झाला.

ज्ञानदेवांनीही आपण सर्वच ग्रंथांतून आत्मसाक्षात्काराची साक्ष दिली आहे. अमृतानुभवातील विवेचन काहीसे तात्त्विक आहे. शेवंतीच्या फुलाचे एकपण त्याच्या अनेक पाकळ्यांनी जसे बिघडत नाही, त्याप्रमाणे आत्मज्ञानी पुरुष बाह्यतः विविध अनुभव घेत असला तरी त्याच्या अद्वयानंदात बिघाड उत्पन्न होत नाही. आपल्या सहस्त्र किरणांनी अंधारास कवळू पाहणाऱ्या सूर्याप्रमाणे आत्मज्ञानी पुरुष सर्व व्यवहार करूनही शेवटी आत्मज्ञच राहतो (अमृ०९.१–१५). आत्मसाक्षात्कारी पुरुषाचे ज्ञानेश्वरीतील चित्रण बहारीचे आहे. आत्मसुखाने विषयध्यानाचा निरास होतो व इंद्रियांची कसमस मोडते, यात नवल ते कोणते? कुमुददळाच्या ताटावर शुद्ध चंद्रकिरणे जेवणारा चकोर कधीतरी वाळवंट चुंबील काय? (५·१०८) अर्जुनास देवाचे विश्वरूप आतबाहेर सर्वत्र दिसत होते. पुष्पकोशात सापडलेल्या भ्रमराच्या योगाने जलावरील कमळकलिका जशी आंदोलावी, त्याप्रमाणे आतील सुखोर्मीने अर्जुन बाहेर कापू लागला. त्याच्या अंगी अष्टसात्त्विक भाव दाटले, त्याच्या जिवाला ब्रह्मानंदाची जाणीव लाभली (११·२८२). आत्मानंद अनिर्वचनीय असतो, असे आपल्या अभंगवाणीतून ज्ञानदेवांनी म्हटले आहे. फुलांचा सुवास जसा गुंफिता येत नाही, त्याप्रमाणे ईश्वरस्वरूपाचा निर्धार करता येत नाही (अभंग गाथा, ७७५).

**काव्यसंपदाचे विशेष**

ज्ञानदेव-नामदेवादी संतांचे काव्य परतत्त्वस्पृष्ट आहे. आपल्या आध्यात्मिक 'वस्तू 'शी हे संत एकरूप झाले; आणि त्या सामरस्यातील सौंदर्य व्यक्त करण्याचे काव्य हे सुलभ साधन आहे, एवढ्याच दृष्टीने त्यांनी वाङमयनिर्मिती केली. ब्रह्मास्वादसहोदर असलेला काव्यानंद लुटण्यासाठी त्यांनी ग्रंथरचना केली नसून, प्रत्यक्ष ब्रह्मास्वादाच्या अलौकिक आनंदाने हरखून जाऊन त्यांनी काव्यातून आत्मानुभव निवेदिला.

मायबोलीतून परमार्थविचार रससिद्ध काव्यशैलीमध्ये सांगण्याचा शुभारंभ ज्ञानदेवांनी केला. वारकरी संप्रदायाचा सर्वदूर प्रसार होण्यासाठी आपल्या वाङमयाचे आवाहन समाजातल्या सगळ्या थरांतील लोकांना केले पाहिजे, हे ज्ञानदेवांनीच सर्वप्रथम हेरले. त्या दृष्टीने त्यांनी भावार्थदीपिका, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी या दार्शनिक प्रबंधनिर्मितीबरोबरच हरिपाठ व अभंगगाथा ही स्फुट काव्यरचनाही केली. भागवतधर्माचे तत्त्वज्ञान प्रबंधांतून जसे तर्कशुद्ध रीतीने बंदिस्तपणे सांगितले गेले, तशीच त्या ग्रंथांनी या पंथाला पंडितवर्गात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्फुट अभंगरचनेमुळे भक्तिपंथाचा तत्त्वविचार सर्वजनसुलभ रीतीने मांडला गेला व संप्रदायास लोकप्रियता लाभली. विरहिणी, गौळणी, भारुडे, कूटे, आख्याने, व्यक्तिचित्रे, प्रसंगवर्णने इत्यादी लोकप्रिय वाङमयप्रकारांतून अभंगगाथा सिद्ध करण्याचा पहिला वस्तुपाठ ज्ञानदेवांनी मांडला. ज्ञानदेवकालीन व ज्ञानदेवोत्तरकालीन संत कवींनी हा पाठ कौशल्याने गिरविला असल्याचे आढळून येते. लोकजीवनातील अनुभवांशी सुसंवादी असलेले व लोकभाषेतच लिहिलेले हे अभंगवाङमय भागवतधर्माच्या प्रसारास अतिशय पोषक ठरले.

ज्ञानदेवांचे काव्यग्रंथ आणखी एका दृष्टीने पायाभूत ठरले. त्यांच्या ग्रंथातील तत्त्वचिंतन हे प्रतिभाविलासाने मंडित झाले आहे; आणि त्यांच्या रससिद्ध काव्यशैलीला तत्त्वविचारांचे वजन लाभले आहे. पांडित्य व प्रतिभा यांचा येथे सुसंवाद आहे. 'तैसे अध्यात्मशास्त्री इये। अंतरंगचि अधिकारिये।' असे ज्ञानदेव जसे बजावतात, त्याप्रमाणेच, 'परी लोकु वाक्‌चातुर्ये होईल सुखिया।' असे सांगण्यासही ते विसरत नाहीत (१८.३४७). कवित्व हे वाणीला शोभादायक असावे, त्यात सुरसतेची बहार असावी व सुरसतेत परमात्मवर्णनाचा संबंध यावा, असे ते सांगतात. अशा प्रकारे कवित्व व परतत्त्वस्पर्श या दोन भूमिकांतील त्यांनी साधलेला समतोल त्यांच्या प्रभावळीतील संतांना मार्गदर्शक ठरला. उपमा-श्लेष कौदाकोंदी करूनही प्रतिपदी ग्रंथार्थाचा झाडा देण्याचे ज्ञानदेवांचे प्रतिज्ञोत्तर भाष्यकाराने कित्ता म्हणून पुढे ठेवण्यासारखे ठरले.

ग्रंथलेखन हे ज्ञानदेवांचे जीवितकार्य आहे, तर नामसंकीर्तन हे नामदेवांचे जीवनध्येय आहे. ज्ञानदेवांची गीताटीका ही 'ज्ञानेश्वरी' आहे, तर नामदेवाची अभंगगाथा ही 'वागीश्वरी' आहे. 'भक्तीचे डोळे ज्ञान' असे ज्ञानदेवांचे सांगणे आहे. कर्मप्रधान ज्ञानोत्तर भक्तीचा संदेश देण्यासाठी ज्ञानदेवीय वाङ्मयाचा अवतार आहे, तर कीर्तनाच्या रंगात नाचून नामवेदाचा प्रचार करण्यासाठी नामदेवांची अभंगवाणी स्फुरलेली आहे.

'कविता गोमटी नामयाची,' "दुधावरिल साय तें मी वाणूं काय। तैसें गाणें गाय नामदेव" किंवा, 'हा रस अद्‌भुत निरूपम' असे नामदेवीय कवित्वाचे रूप आहे. माझे काव्य म्हणजे प्राकृत पाठांतर नव्हे, येथे जाणीवशहाणीव पाहू नये, असा इषारा स्वतः नामदेवांनीच दिला आहे (९७०) नामदेव म्हणतात :

कोण वेळे काय गाणें । हें तों भगवंता मी नेणे ॥
वारा वाजे भलता ठाया । तैसी माझी रंगछाया ॥
टाळमृदुंग दक्षिणेकडे । माझें गाणें पश्चिमेकडे ॥ १५१९

कवित्व-लेखन करताना ज्ञानदेवांपुढे लोकोद्धाराचे ध्येय होते. लोकांना श्रवणसुख मिळावे म्हणून प्रमेयांच्या जोडीने ते वाक्चातुर्याचा उपयोग करतात. पण 'विश्व हें मोहरें लावण्या'चे आपले ईप्सित ते थोडेही विसरत नाहीत. नामदेवांच्या काव्याचा उद्देश मात्र, "बोलूं ऐसे बोल । जेणें बोले विठ्ठल डोले ।" हाच आहे (१५२२). त्यांच्या अभंगाचा रोख निव्वळ तत्त्वज्ञान सांगण्यापेक्षा भक्ती वाढविण्याकडे अधिक आहे. त्यांची काव्यसाधना विठ्ठलप्राप्तीसाठी नसून, विठ्ठलप्रीतीसाठी त्यांच्या कवित्वाचा अवतार आहे. "ही भक्ति-कल्पना नुसत्या ध्येयाच्या तात्त्विक स्वरूपाशी रमत नाही; तिला ध्येयाचे व्यवहारातील परिणाम अधिक प्रसन्नत्ता आणतात."[४] देवाने भक्तांचा उद्धार कसा केला, भक्तांवर संकटे कशी येतात व ईशकृपेने त्यांतून ते कसे पार पडतात, अशा कथांमध्ये नामदेवांच्या भक्तिकाव्याला रंग चढतो. भक्तीचा भर बुद्धीपेक्षा इतर सामान्य इंद्रियांच्या विषयांवर जास्त असतो. त्या विषयांच्या परिभाषेने भक्तीचा व्यापार चालतो. बालक्रीडा, रूपकरूपी उपदेश, पौराणिक आख्याने, संतचरित्रे इत्यादी प्रकरणांतून नामदेवांनी भक्तिविलास साधला आहे. 'भक्त्यर्थं कल्पितं द्वैतं अद्वैतादपि सुन्दरम् ।' या वचनाचा प्रत्यय नामदेवांच्या कवितेतून येतो. काव्यरचना हा त्यांच्या दृष्टीने विठ्ठलभक्तीचाच एक पावन प्रकार आहे त्यांचे काव्य हे प्रकट चिंतन आहे. त्यांच्या काव्याचे स्वरूप त्यांच्या भाववृत्तीनेच निश्चित केले आहे. निराकार सद्‌वस्तूच्या साक्षात्कारासाठी साकार प्रतिमेचे ध्यान करीत भावोत्कट मनःस्थितीत त्यांनी आपली समग्र कविता लिहिली आहे. 'प्रेमपिसें भरलें अंगी । गीतसंगे नाचों रगीं ।' या अनुभूतीने हरखलेला नामदेवांचा एकेक अभंग म्हणजे पारमार्थिक भावगीत आहे.

नामदेवांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांनी अभंगबद्ध केलेले ज्ञानदेवचरित्र. नामदेव हे ज्ञानदेवांचे आद्य चरित्रकार आहेत. आदि तीर्थावळी व समाधी या तीन प्रकरणांतून ज्ञानदेवांची जीवनगाथा नामदेवांनी गुंफली आहे. ज्ञानदेवांच्या वाड-वडिलांचे मूळ व ज्ञानदेवादी भावंडांचे बालपण यांविषयीची ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाची अशीं माहिती 'आदि' या प्रकरतात मिळते. 'तीर्थावळी'चा विषय ज्ञानदेव-नामदेवांच्या उत्तरेतील तीर्थाटनाचा असला, तरी त्यात भक्ती व ज्ञान या दोन साधनमार्गांची त्या दोघांनी केलेली चर्चाच अधिक आहे. शेवटच्या प्रकरणात ज्ञानदेवादी चार भावंडे व चांगदेव यांच्या समाधीची करुणोत्कट वर्णने आली आहेत. ज्ञानदेव समाधिस्थ झाल्यावर

त्यांच्या आप्तसखेजनांना झालेले दुःख नामदेवांनी आर्त शब्दांत व्यक्त केले आहे. '**नामा म्हणे देवा गेली पार उडोन। बाळें दानादान पाडियेली ॥**' (१०९७) किंवा '**हरिणीविण खोपी पडियेली ओस। दशदिशा पाडस भ्रमताती ॥**' (१०९४) असे त्या प्रत्यक्षानुभूतीचे जिवंत चित्र नामदेवांनी काढले आहे. अनुभूतीचा ताजेपणा, देवसृष्टीचा समकालीन मानवी सृष्टीशी एकरूपत्व दाखविणारा कल्पनाविलास व भावमधुर भाषाशैली यांचा आल्हाद-कारक संगम या चरित्रचित्रणात झाला आहे.

ज्ञानेश्वरी व नामदेवगाथा या दोन ग्रंथांतून एकाच अर्थप्रक्रियेने अक्षरशः असंख्य शब्द आले आहेत. वानगीदाखल काही शब्दांची उदाहरणे देता येतील :

| क्रमांक | नामदेवगाथा | अभंग | अर्थ | ज्ञानेश्वरी |
|---|---|---|---|---|
| १ | असोस (वि.) | १२८६ | अमर्याद | १३·८३३ |
| २ | आपैता (वि.) | ९६६ | स्वाधीन | ११·१६९ |
| ३ | आराणूक (ना.) | १२४६ | समाधान | २·८० |
| ४ | उंडा (ना.) | ४६९ | गोळा | १३·१०९८ |
| ५ | उभड (ना.) | १५६३ | उसळी | ७·६७ |
| ६ | ओरसु (ना.) | ९३० | पान्हा | १४·६२ |
| ७ | कानडे (वि.) | ३२१ | अनाकलनीय | ६·१२० |
| ८ | कील (ना.) | १३४५ | प्रभा, तेज | १४·१२३ |
| ९ | केणें (ना.) | २०५९ | दोरी | ६·३९२ |
| १० | चोजवणे (क्रि.) | ५८० | कळून येणे | ६·५ |
| ११ | जैत्य (ना.) | ५१० | जय | ९·२१७ |
| १२ | नाहो (ना.) | ६६७ | नाथ | ३·३७३ |
| १३ | पायकी (ना.) | ५४६ | सेवा | १३·३८३ |
| १४ | प्राचीन (ना.) | ५७३ | पूर्वकर्म | १६·१९२ |
| १५ | पाटण (ना.) | ६९६ | नगर | १५·४१३ |
| १६ | पुलक (ना.) | १७२६ | रोमांच | ११·२४६ |
| १७ | बुंथी (ना.) | ३३७ | खोळ | ६·२०१ |
| १८ | बाप (संबो.) | ९६३ | अरे | ३·१०२ |
| १९ | माजवण (ना.) | ११०० | उत्तेजक पदार्थ | ११·४२ |
| २० | येसणा (वि.) | १००९ | इतका | १·२६१ |
| २१ | वोरस (ना.) | ३५५ | पान्हा | १८·६१ |
| २२ | वारिका (ना.) | ५१४ | वाहन | ६·२७० |
| २३ | वितंड (वि.) | ७६१ | प्रचंड | ११·३७५ |
| २४ | विंदान (ना.) | ९८५ | कौशल्य | ७·२१ |
| २५ | होड (ना.) | १८०० | पैज | ६·५६ |

ज्ञानदेवांच्या शब्दकळेचे यथायोग्य उपयोजन नामदेवांनी आपल्या अभंगवाणीतून अनेक ठिकाणी केले आहे. नामदेवगाथेची संहिता-निश्चिती करताना नामदेवांच्या व ज्ञानदेवांच्या शब्द-रूपांतील हे साधर्म्य पाहणे उपयुक्त ठरेल.

**विचारधनातील एकरूपता**

नामदेवांनी ज्ञानदेवांच्या सहवासात काही काळ घालविला होता. ज्ञानदेवांच्या बरोबर त्यांनी तीर्थयात्रा केली. त्या प्रसंगी ज्ञानदेवांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व पाहून त्यांच्याविषयीचा नामदेवांचा आदरभाव दुणावला. "परि भानुसी देखणें करिजे अनुतेजें । तैसें ज्ञान माझें स्वामीप्रती ॥" अशा शब्दांत नामदेवांनी त्यांना गौरविले. ज्ञानेश्वरीतील विचारदर्शनाने नामदेव आकर्षित झाले. **नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी** ॥ (९१२), या श्रद्धेतून ज्ञानदेवांचा तत्त्वविचार ते नेमका बोलून दाखवितात. "ज्ञानदेव व नामदेव या दोन संतांचे काही उद्‌गार म्हणजे जसे काही समोर ठेवलेले दोन डोळस आरसेच होत."[५] विचारसादृश्याची काही स्थळे अशी :

(१) ज्ञानदेव : म्हणोनि सुखदुःखां सरिसें । कांटाळे आचरे ऐसे ॥ १४–३०९
नामदेव : सुखदुःखें दोन्ही आम्हांसी सारखीं ।
प्रतीती पारखी मना आली ॥ १२५७

(२) ज्ञानदेव : सांडोनि अंगिची खोळी । सर्पु रिगाला पाताळीं ।
ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥ १४–३१२
नामदेव : त्वचा टाकोनिया सर्प गेला बिळीं ।
मग ते सांभाळी कोण सांगा ॥ ८४७

(३) ज्ञानदेव : देहवंकल्याचा वारा । म्हणे लागेल सुकुमारा ॥ ८–१२२
नामदेव । अहंकाराचा वारा न लागो राजसा । ८३३

(४) ज्ञानदेव : म्यां बोलविल्या वेदु बोले ।
म्यां चालविल्या सूर्यु चाले ॥ ९–२८३
नामदेव : तुझिया सत्तेनें वेदासी बोलणें ।
सूर्यासी चालणें तुझिया बळे ॥ ४६६

(५) ज्ञानदेव : करतळावरी वाटोळा । डोलतु देखिजे आवळा ॥ १३–६५१
नामदेव : केले करतळमळ ज्ञानयानें । १०५७

(६) ज्ञानदेव : सोनियाचा दिवस आजि अमृतें पाहिला । ज्ञा. गा. ४५१
नामदेव : धन्य दिवस झाला आजि सोनियाचा । ९६३

पारमार्थिक विचारांतील या साम्याप्रमाणे ऐहिक व्यवहाराचे साधर्म्यही या दोघांच्या काव्यात काही स्थळी आढळते. उदाहरणार्थ, दोघांच्या वाङ्‌मयात सोन्याचा दर एकच सापडतो.

ज्ञानदेव : कां साडेपंधरया रजतवर्णी । १०–१५
नामदेव : साडेपंधरा होतें सोनें पालवण्या । ६०३

ज्ञानदेव व नामदेव तीर्थयात्रेत असताना मारवाडच्या निर्जल देशात नामदेवांच्या आळवणीमुळे विठ्ठलाने विहीर पाण्याने तुडुंब भरून टाकली, अशी कथा आहे. तो अनुभव नामदेव पुढील शब्दांत सांगतात :

गडगडीत कूप उदकें वोसंडला ।
कल्पांती खवळला सिंधु जैसा ।। ९३१

ज्ञानदेव म्हणतात :

तृषार्ता मरु देशीं । झळे अमृतें वोळसी जैसी ।
कीं अंधालागी डोळियासी । सूर्यचि जाला ।। १८–६१

परमार्थजीवन व लौकिक जीवन यांतील वेधक अनुभवांचे आविष्कार या दोघा संतकवींनी समरूपतेने केले आहेत. थोडा फरकच विशद करावयाचा झाला, तर असे म्हणता येईल की, ज्ञानदेवांचा अल्पाक्षर पण अर्थबहुल असा तत्त्वविचार नामदेव आपल्या प्रासादिक शैलीत सुमग करून सांगतात. 'तो मूर्तिचेनि मेळे । अमूर्तचि होऊनि खेळे ॥ (५–८१) ही ज्ञानदेवांची कल्पना सहजपणे आकलनाच्या टप्प्यात येत नाही पण तीच कल्पना हा 'निर्विकल्प देव येतसे रूपा । करावया कृपा भक्तजनां ।(९५७) या शब्दांत नामदेवांनी मांडली की ती सुलभ होऊन जाते. आंतुवट वस्तुविचारें। मी तेंचि तें ।। (९-४११) हा ज्ञानदेवांचा तत्त्वविचार नामदेवांच्या कवितेत अंतर्बाह्य एक ब्रह्मचि कोंदले । दुजेपण गेलें निपटोनि । (१२५७) असा सौम्य वेष धारण करतो. सूर्याचा प्रखर प्रकाश घेऊन चंद्राने शीतल चांदण्याच्या रूपाने जगाला त्याचे प्रतिदान करावे, त्याप्रमाणे ज्ञानदेवांच्या भव्य कल्पनेला नामदेवांच्या काव्यशैलीत मधुमधुर रूप प्राप्त होते.

ज्ञानदेवांच्या काव्यातील निवेदनशैली प्रज्ञाप्रभव व साहित्यिक स्वरूपाची आहे. त्यांचे आवाहन बुद्धीला आहे. नामदेवांचे निवेदन भावनांकित व प्रायः निरलंकृत आहे. त्यांचे आवाहन भावनेला आहे. ज्ञानदेव हे ज्ञानभक्तीचे मराठीतील पहिले आचार्य होत, तर नामदेव हे प्रेमभक्तीचे पहिले पाईक होत. एथ ज्ञान हे उत्तम होये । आणिकही एक तैसें कें आहे । जैसें चैतन्य कां नोहे । दुसरें गा ।। (४–१७९) हे ज्ञानदेवांचे वैशिष्ट्य आहे. उलटपक्षी, आम्हां सांपडलें वर्म । करूं भागवतधर्म ।। (१४२९) हे सर्वांगाचे ठायी प्रेम मिरविणाऱ्या नामदेवांचे सांगणे आहे. ज्ञानदेव हे 'रूपीं बुडी देऊनि ठेले' अशा ज्ञानी भक्तांच्या कोटीतले एक अधिकारी अंतरंग आहे. त्यांच्या कवितेत कृतार्थतेचा व साक्षात्काराचा ध्वनी आहे, तर भक्तितत्त्वावरील अनन्यनिष्ठा हा नामदेवांच्या जीविताप्रमाणेच त्यांच्या कवितेचाही एकमेव विषय आहे. ज्ञानदेव हे मुख्यतः तत्त्वज्ञ आहेत, तर नामदेवांची प्रधान भूमिका भक्ताची आहे. "ज्ञानेश्वरीत भक्तीचे लाघव वर्णितानासुद्धा भक्तीच्या प्रतिपादनाला तत्त्वज्ञानाचे पाणी चढते...ज्ञानेश्वर काहीही सांगो, त्याची बैठक तत्त्वज्ञानाची असते; आणि नामदेव कोणाचेही प्रतिपादन करो, तो प्रेमळपणाच्या तडागात शिरल्याशिवाय राहात नाही."[६]

ज्ञानदेव व नामदेव या दोघांनीही आपल्या काव्यांतून सदाचाराचे स्वाध्याय सांगि-

तले आहेत. म्हणोनि कुळ जाति वर्ण । हे आघवेचि गा अकारण ।। (९-४५६) तसेच, भेदभ्रम तुमचा नाही मावळला । भ्रमुचि उरला संदेहेसी ।। (९४५) असे विचार मांडून दोघांनी धार्मिक समतेचे एक नवे व्यासपीठ उभारले. ज्ञानदेवांनी आसुरी संपत्तीच्या लोकांची जशी लक्षणे सांगितली, तसाच नामदेवांनी खलदुर्जनास व वेषधारी कृतक भक्तांस उपदेश केला. ज्ञानदेवांनी दैवी संपत्तीच्या पुरुषांचे आदर्श चित्र जसे रंगविले, तसाच नामदेवांनी मुमुक्षूंस उपदेश करून संतलक्षणे सांगितली. विश्वात्मक देवाजवळ ज्ञानदेवांनी मागितलेले पसायदान आणि हरीच्या दासांना नामदेवांनी मागितलेले आकल्प आयुष्य या दोन्ही मागण्यांमागील मानव्यप्रेम एकाच जातकुळीचे आहे. "ज्ञानदेव व नामदेव ही एकाच विभूतिमत्त्वाची दोन अंगे असून ती परस्परांना पूरक आहेत."[७]

## दोन संतांचे जीवितकार्य

ज्ञानदेवांनी भागवतधर्ममंदिराची पायाभरणी केली तत्त्वज्ञान आणि प्रेमभक्ती यांचे भरभक्कम अधिष्ठान त्यांनी भक्तिपंथास मिळवून दिले. नामदेवांनी या मंदिराच्या वास्तूचा विस्तार केला; पंढरीपासून पंजाबपर्यंत वारकऱ्यांचा ध्वज त्यांनी मानाने मिरवीत नेला. " इभै बीठलु, उभै बीठलु, बिठलु बिन संसार नही " या शब्दांत विठ्ठलाचा नामघोष श्रीगुरुग्रंथसाहेबातही त्यांनी निनादत ठेवला.

ज्ञानदेवांनी भागवतधर्मास तत्त्वाधार व प्रेमाधार यांची जी बैठक प्राप्त करून दिली, तिचे मर्म पाहिले पाहिजे. नुसते तत्त्वज्ञान रुक्ष असते. पंडितांची प्रज्ञा ते जिंकून घेते, पण माणसाच्या काळजाला ते स्पर्श करू शकत नाही. नुसते प्रेमही असेच असमर्थ असते. प्रेमामुळे माणसाचे अंतःकरण ओढले जाते; पण प्रेमातील भाबडेपण पंथास दुबळेपण आणते. म्हणून तत्त्वचिंतन व प्रेमभक्ती यांतील समतोल साधून ज्ञानदेवांनी भक्तिपंथाची उभारणी केली. वारकऱ्यांच्या भोळ्या भक्तिभावाला त्यांनी तत्त्वविचाराची जोड दिली. वेदोपनिषदांत अडकून राहिलेली ब्रह्मविद्या त्यांनी सामान्यजनांपर्यंत नेऊन पोहोचविली. परब्रह्म सर्वांच्या डोळ्यांना दिसावे, सुखाचा उत्सव उदयास यावा व सर्वांनी ब्रह्मज्ञानाच्या विपुलतेत प्रवेश करावा, असे त्यांचे ईप्सित होते (१३-१७३). हें धर्मजात आघवें । युगीं युगीं मियाचि रक्षावें ।। (४-४८). लोकजीवनाचे प्राणतत्त्व असलेला धर्म लुप्त होऊ नये, म्हणून त्यांच्या रक्षणाची जबाबदारी परमेश्वराने आपल्या शिरावर घेतली आहे, असे ज्ञानदेव सांगतात.

भक्तिपंथाला तत्त्वाधार देण्याची ही जी अजोड कामगिरी ज्ञानदेवांनी बजावली, तिची काही अंगे विशेष लक्षणीय आहेत. एकतर त्यांनी गीतेवर ' देशींकार लेणें ' चढविले. मायमराठीच्या नगरीत त्यांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. ' अमृतातेंही पैजा जिंके ' असा मराठा बोल त्यांनी लिहिला. संस्कृतच्या तीरावर त्यांनी मराठीच्या पायऱ्या बांधल्या व अध्यात्मवाहिनी सामान्य माणसाच्या आटोक्यात आणली दुसरे असे की, ज्ञानमार्ग, योगमार्ग व कर्ममार्ग यांचे त्यांनी भक्तिमार्गात सामरस्य करून टाकले. ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार त्यांनी केला. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. गीता ही ज्ञानामृताची जान्हवी आहे.

भक्तिशास्त्र हे " साच बोलाचें नोहे शास्त्र ", तर ते ' संसारु जिणतें शास्त्र ' आहे. ज्ञानाबरोबरच योगमहिमाहीं ज्ञानदेवांनी गायिला आहे. सहाव्या अध्यायात ' योगविभवभांडार ' व नवव्या अध्यायात ' समाधिश्रियेचे आत्मानुभवराज्यसुख ' वर्णून, योगाच्या जटिल मार्गाला आत्मानुभूतीची जोड हवी हे त्यांनी विशद केले आहे. ज्ञान व योग यांच्या बरोबरीने ज्ञानदेवांनी केलेले कर्मयोगनिरूपण भक्तितत्त्वाच्या पुरस्काराला साहाय्यकारी ठरले आहे. विश्व हेच एक विशाल कर्म आहे. कर्म हे धुवून-पुसून देवाच्या हाती दिले पाहिजे. ईश्वरास स्वकर्मकुसुमांनी पूजिले पाहिजे. ' कर्मे करावीं चांगु ' हा भगवंताचा निरोप ज्ञानदेवांनी स्वजनांना सांगितला आहे.

अशा रीतीने ज्ञानोपासना, योगसाधना व कर्ममग्नता या तिन्ही वाटा भक्तिमताच्या राजबिदीला येऊन मिळतात; आणि ईश्वरोपासनेचे हे चारही मार्ग परस्पराश्रयी व परस्परपोषकच आहेत, असा समन्वय-द्धासिन्त ज्ञानदेवांनी सर्वप्रथम मांडला आहे. भागवतधर्मीय उपासकांना त्यांनी केलेले हे मार्गदर्शन पायाभूत आहे; क्रान्तदर्शी आहे.

साक्षात्काराच्या दृष्टीने ज्ञानदेवांनी शंकराचार्यांचा मायावाद मांडला असला, तरी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने स्वतःच्या चिद्विलासवादावरच त्यांनी भर दिला आहे. त्यांची ही तत्त्वदृष्टी सर्वस्वी कालोचित आहे. ' तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वायां । शस्त्रे हाणितलिया छाया । जैसी आंगीं न रुपे ॥ ' (२–१४०) असे साधकाला ते सांगतात. पण खरे म्हणजे विश्वासकट सर्व आत्माच आहे असे जनसामान्यांना त्यांनी आवर्जून सांगितले आहे. ' हें आंतु बाहिरी मियां कोंदलें । जग निखिल माझेंचि ओतलें ॥ ' (९–३०२) असा स्फूर्तिवादच त्यांना प्रामुख्याने अभिप्रेत आहे. " तुझ्या जिवाइतकेच हे जगही खरे आहे " हा संदेश भक्तभाविकांना देऊन त्यांनी प्रवृत्तिपर धर्मभावनेचा विकास केला. जगताचा निरास करून ब्रह्म पाहावयाचे म्हणजे चंद्राच्या कळा सोलून काढून चंद्रबिंब पाहाण्यासारखे आहे असे ते म्हणतात. जगताला ते मायाकार्य मानीत नाहीत.

तत्त्वज्ञानाच्या या विशाल व विविधांगीं अधिष्ठानाबरोबरच ज्ञानदेवांनी भागवतधर्माला प्रेमभक्तीची भक्कम बैठक प्राप्त करून दिली आहे. आपल्या गीताभाष्य–निरूपणाच्या संदर्भात त्यांनी प्रेमभावनेचा रम्य आविष्कार केला आहे. भाष्यविषय असलेला गीताग्रंथ, भाष्यमाध्यम झालेली माय-मराठी भाषा, भाष्यरचनेस स्फूर्ती देणारे स्वतःचे श्रीगुरू, आपला भाष्यग्रंथ मनःपूर्वक ऐकणारे सज्जन श्रोते आणि गीतेतील संवादसुखाची राणीव भोगणारे श्रीकृष्णार्जुन या सर्वांविषयीच्या प्रेमभक्तीची विविधांगी बहार ज्ञानदेवांनी समरसतेने वर्णिली आहे. ही बहार म्हणजे त्यांच्या प्रतिभेची स्वतंत्र अभिव्यक्ती आहे. गीतेतील प्रतिपाद्याचे अनुसंधान कायम ठेवून भाष्यकाराची आपली भूमिका स्वायत्तपणे सांभाळण्यातील असाधारण कौशल्य त्यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळेच " या ग्रंथात चतुरता शहाणी झाली आहे. तत्त्वांना गोडी आहे. सुखाचे ऐश्वर्य पुष्ट झाले आहे. " (१–३५).

ज्ञानदेवप्रणीत तत्त्वविचार आणि भक्तिभावना यांचे पडसाद नामदेवगाथेत बरोबर

उमटले आहेत. अन्य सर्व साधनमार्ग भक्तीत समाविष्ट होतात, असे ज्ञानदेवांप्रमाणेच नामदेवही सांगतात. ज्ञानियांचे ज्ञेय, ध्यानियांचे ध्येय, तपस्वियांचे तप, जपकांचे जाप्य, योगितांचे गौप्य, तेजकांचे तेज, गुरुमंत्रांचे गुज व पूजकांचे पूज्य, या सर्व गोष्टी अखेरीस भीमातीरी असलेल्या विठ्ठलमूर्तीत सामावतात, अशी नामदेवांची धारणा आहे (३२४).

ज्ञानदेवांच्या स्फूर्तिवादास नामदेवांनी प्राधान्य दिले आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।' या शांकरमताचे पुसट प्रतिध्वनी नामदेवगाथेत उमटले आहेत, हे खरे आहे. "आकारलें तितुकें आहे नाशवंत" (१७७२) किंवा "हा जगडंबर पसरला पाल्हाळ । मायामय सकळ स्वप्न सर्व" (१७७७) असे उद्‌गार त्यांनी काढले आहेत. पण त्यांच्या विवेचनाचा मुख्य भर चिद्विलासवादावरच आहे. "अंतर्बाह्य एक ब्रह्मचि कोंदलें" (१२५१) अशी त्यांना प्रचीती येते. "तेथ मी तूं सरे । सेखीं भक्त तोही नुरे ॥" (सकल. ज्ञाने. ५९९) असा ज्ञानेश्वर मुमुक्षूस उपदेश करतात, तर "देवभक्तपण । नाही नाही त्यासी आन" (१५६७) असे नामदेव साधकास सांगतात. "आपणचि झाला विश्व हरि" (६९६) अशीच त्यांची धारणा आहे.

ज्ञानदेवांप्रमाणेच नामदेवांनीही प्रवृत्तिप्रधान धर्मविचाराचा पुरस्कार केला व निवृत्तीच्या वैराण वाळवंटातील बिकट वाट टाळली. "अर्जुना देऊनि निजसमाधी। सवेंचि घातला महायुद्धी" असे ज्ञानदेव सांगतात. वैराग्य म्हणजे वैताग नव्हे वारकऱ्यांचे ध्येय सिद्धावस्थेनंतरची कर्मशीलता आहे. 'उरलों उपकारापुरता' ही तुकोबांची उक्ती याच अनासक्त कर्मयोगाचा पुरस्कार करते. आत्मानुभव येताच बंधमोक्षाच्या भ्रामक कल्पनेचा निरास होतो व जीवन्मुक्त दशा लाभते. प्रपंचात राहूनही विठ्ठलभक्ती करता येते, असे नामदेवांचे सांगणे आहे. "न लगती डोंगर चढावें। हळुंच पाऊल धरावें" असे ते म्हणतात. मानवी जीवनाचे मोल विशद करताना नामदेव सांगतात :

दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां । येथें साधूं प्रेमा राघोबाचा ।
अवघे हातोहातीं तरों भवसिंधू । आवडी गोविंदु गाऊं गीतीं ॥
हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां । शोक मोह दुःख निरसूं तेणें ।
एकमेकां करूं सदा सावधान । नामीं अनुसंधान तुटो नेदूं ॥
घेऊं सर्वभावें रामनामदीक्षा । विश्वासें सकळिकां हेंचि सांगो ।
नामा म्हणे शरण रिघा पंढरिनाथा । नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ॥ १०६९

अशा रीतीने ज्ञानदेवांच्या विचारांशी सुसंवाद राखून नामदेवांनी अध्यात्मप्रधान कर्मयोगाची शिकवण दिली. गृहस्थधर्म सांभाळून व लोकाभिमुख राहून विठ्ठलभक्तीचा प्रचार त्यांनी केला. "विश्व हे मोहरे लावावे व लौकिकाप्रती अलौकिक होऊ नये" हा ज्ञानदेवांचा संदेश त्यांनी मनोमन मानला. भक्ती व प्रवृत्ती यांचा ज्ञानदेव-नामदेवांनीं साधलेला हा समतोल तत्कालीन समाजास उपकारक ठरला.

'कीर्तनाचेनि नटनाचें। नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे ॥' या शब्दांत ज्ञानेश्वरीच्या

नवव्या अध्यायात कीर्तनमहिमा वर्णिलेला आहे. त्यास अनुसरूनच "नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं" अशी प्रतिज्ञा नामदेवांनी केली. वारकरी कीर्तनाच्या नव्या वाक्पीठाची उभारणी करून नामदेवांनी सामूहिक एकतेचा मंत्रजागर केला. "नामा वाळुवंटी कीर्तन करी" हे दृश्य शूद्रातिशूद्रांना दिलासा देणारे ठरले. केवळ देवळाच्या सभामंडपातच चालणारे कीर्तन वाळवंटात नेऊन नामदेवांनी ते अधिक जनताभिमुख बनवले. भक्तिश्रियेचे राऊळ सर्वजनसुलभ आहे हे नामदेवप्रणीत कीर्तनसंस्थेने सिद्ध करून दाखविले.

भक्तिपंथाची तत्त्वमीमांसा ज्ञानदेवांनी केली असली, तरी भक्तिपंथाचे प्रत्यक्ष संघटन नामदेवांनीच केले. नामदेव हे जसे थोर भक्त होते, तसेच ते कुशल संघटकही होते. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यावर 'उदास हें चित्त झालें' अशी निराशा त्यांना काही काळ आली. पण ते मनोमालिन्य झटकून ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराचा ज्ञानदीप आणि विठ्ठलभक्तीचा ध्वज पन्नास वर्षेपर्यंत त्यांनी सर्वदूर मिरवीत नेला. अठरापगड जातींना विठ्ठलप्रेमाने भारले व वारकरी पंथ प्रभावशाली बनविला. 'तेणें केलासे विस्तार' हेच त्यांच्या कार्याचे नेमके वर्णन आहे. "पंढरीचा देव प्रत्यक्ष उदार। बाळयाभोळया पार दावितसे" 'अशी बळिया परमधीर' देणारी नामयाची वाणी सामान्य जनांनाही स्फूर्तिदायक ठरली.

'म्हणौनि भलतेणें येथ सद्भावें नाहावें। प्रयागमाधवविश्वरूप पाहावें ।।' असे व्यापक आवाहन ज्ञानदेवांनी केले आहे. भक्तिपंथाच्या या 'उदारमतवादा'चे प्रत्यक्ष उपयोजन नामदेवांनी स्वतःच्या जीवनातच करून दाखविले. ज्ञानदेव व परसा भागवत या उच्च-वर्णीय संतांबरोबरच जनाबाई व चोखामेळा या शूद्रवर्णीय संतांचीही चरित्रे नामदेवांनी लिहिली. शिष्याने लिहिलेले 'गुरुचरित्र' अन्य धर्मपंथात आढळेल, पण गुरूने लिहिलेले 'शिष्यचरित्र' हे भक्तिपंथाचे आगळे वैशिष्टय आहे. दुसरे असे की, जनाबाईसारख्या शूद्र स्त्रीस स्वतःच्या घरी सांभाळून आपला पारमार्थिक ठेवा त्यांनी तिला दिला व चोखोबांची समाधी स्वतःच त्यांनी पंढरीच्या महाद्वारासमोर बांधली. 'जना दाखवावें वर्तोनिया' ही उक्ती आपल्या आचरणाने त्यांनी खरी करून दाखवली.

## दोन आक्षेपांचा परामर्श

ज्ञानदेव-नामदेवांच्या काव्यसंपदेच्या जुन्या-नव्या अभ्यासकांनी तिचे असाधारणत्व विशद केले आहे. पण तसे करतानाही थोडा समजुतीचा घोटाळा झाला असावा, असे दिसते. जुन्या संशोधकांपैकी सारस्वतकार भावे यांनी ज्ञानदेवांच्या बुद्धिवैभवाचा गौरव करण्याच्या भरात नामदेवांच्या पदरी भाबडेपणा बांधला आहे, तर आधुनिकांपैकी डॉ. वि. भि. कोलते यांनी नामदेवांच्या भक्तिकल्पनेचे कौतुक करण्याच्या आवेगात ज्ञानदेवांचे तेवढ्यापुरते अवमूलन केले आहे. म्हणजे असे की, सारस्वतकारांनी ज्ञानदेवां-साठी नामदेवांना कमी लेखले आहे; आणि डॉ. कोलते यांनी नामदेवांचा मोठेपणा मांडण्यासाठी ज्ञानदेवांना खर्ची घातले आहे. दोन्हीकडे अन्यायच झाला आहे.

कै. वि. ल. भावे लिहितात, "त्याची (नामदेवाची) भक्ती थोडीफार भोळी व खुळी झाली. भक्तीला समजाची व ज्ञानाची जोड राहिली नाही."[८] ज्ञानदेवांचा पाठ गिरविताना नामदेवांकडून थोडासा अपपाठ झाला, असे सारस्वतकारांना म्हणावयाचे आहे. भाबड्या बालकांना 'माझी आई' या भावनेत जे प्रेम वाटते, तेच आंधळे प्रेम नामदेवांचे ईश्वराच्या ठिकाणी जडले, असेही सारस्वतकार सांगतात. पण त्यांचे हे म्हणणे टिकण्यासारखे नाही.

"दुध पिऊं गोविंदे राइ। नाही त घर को बापु रिसाई"[९] अशी विठ्ठलास विनंती करणारा बालभक्त नामदेव भोळाखुळा असेलही; पण गोरोबाकाकांनी परीक्षा घेतल्यानंतर, विसोबा खेचरांकडून गुरूपदेश मिळाल्यावर व ज्ञानदेवांबरोबर शास्त्रचर्चा करीत तीर्थयात्रा करून आल्यानंतरही नामदेवांची ईश्वरभक्ती ही आंधळी प्रीती राहिली असेल, असे वाटत नाही. त्यातूनही ती तशीच राहिली असेल तर ते नामदेवांना जसे भूषणावह नाही, तसेच किंवा त्यापेक्षाही अधिक स्वरूपात गोराबा. विसोबा व ज्ञानेश्वर या तीन अधिकारी अंतरंगांना ते कमीपणा आणणारे आहे. 'परेहून परत्या घरी निरंतर नांदण्याची' प्रतिज्ञा करणारे व "प्रस्तराचा देव बोलतो भक्तातें। सांगते–ऐकते दोघे मूर्ख" असे परखडपणे सांगणारे नामदेव हे भोळे भक्त आहेत, हे मत मान्य होण्याजोगे नाही.

दुसरे असे की, नामदेवांची भक्तिकल्पना नुसत्या भावनेवर उभी राहिली असती, तर ती त्यांच्या माघारी कोलमडली असती. कारण भावनेचे बळ परंपरेने पुढे पोहोचविता येत नाही. उलट, नामदेवांच्या भक्तिपंथास तत्त्वज्ञानाची खंबीर बैठक लाभली होती. त्यामुळेच तो पंथ कालप्रवाहात टिकून राहिला. जगी ज्ञानदीप लावण्याची प्रतिज्ञा ज्या नामदेवांनी खरी करून दाखविली, त्यांच्याच भक्तीला ज्ञानाची जोड राहिली नाही, हा आक्षेप अगदीच फोल वाटतो.

दुसरा आक्षेप डॉ. वि. भि. कोलते यांनी घेतला आहे. 'तीर्थावळी' या नामदेवलिखित प्रकरणाच्या आधारे डॉ कोलते यांनी पुढील दोन निष्कर्ष काढले आहेत :[१०]

(१) ज्ञानदेवांना नसती भक्ती नको होती; त्यांना ज्ञानयुक्त भक्ती हवी होती. पण परमेश्वर–प्राप्तीसाठी आर्त भक्तीची आवश्यकता आहे हे रहस्य ज्ञानदेवांना तीर्थाटनात नामदेवांच्या संगतीने समजले.

(२) यज्ञयागादिकांची व तीर्थक्षेत्रांची आवश्यकता प्रतिपादन करणाऱ्या ज्ञानदेवांवर तत्कालीन ब्राह्मणधर्माचा जबरदस्त पगडा होता. पण तीर्थयात्रा करीत असताना नामदेवांबरोबर केलेल्या विचारविनिमयामुळे व अनुभवाने ज्ञानदेवांच्या विचारात बदल झाला. तो बदल घडवून आणण्याचे कार्य नामदेवांनी केले.

डॉ. कोलते यांचे हे दोन्ही आक्षेप एकांगी आहेत. ज्ञानदेवांची भक्ती ज्ञानयुक्त होती, तरी तिच्यात आर्तत्व होतेच व नामदेवांच्या आर्त भक्तीला ज्ञानाचे वावडे नव्हते. 'पाहुणे पंढरी राऊ। कै घरा येती ?" या ज्ञानदेवांच्या प्रश्नात आर्तता व्यक्त होत नाही काय ? 'निर्गुण चैतन्य सदा सुखराशी। त्या दिलीं चौऱ्यांशी सोंगे ॥' (२०६६) या

शब्दांत वासनेची करणी विशद करणारे नामदेव ज्ञानास पारखे होते, असे कसे म्हणावे ? दुसरे असे की, भक्ती व ज्ञान यांच्या सीमारेषा बऱ्याच जवळ जवळ आहेत. आत्मज्ञानासच खरे ज्ञान म्हणतात व खरी भक्ती आत्मप्रतीती आणून देते. आर्त नामभक्ती ही ज्ञानदेवांना पूर्वज्ञात होती. "जेथे माझा बरवा नामघोष चाललेला असतो, तेथेच मी हारपला गिवसतो" (९–२०८) असे भगवंताचे म्हणणे असल्याचे ते सांगतात. उलट नामदेवांच्या सगुण भक्तीला ज्ञानदेवादी भावंडांनीच ज्ञानाचा डोळा दिला आहे.

आता दुसरा आक्षेप यज्ञकर्मे व तीर्थक्षेत्रे यांच्याविषयीचा. या गोष्टींची प्रसंगोपात्त असलेली आवश्यकता ज्ञानदेवांनी मांडली आहे हे जितके खरे, तितकीच त्यातली निरर्थकताही त्यांनी प्रतिपादिली आहे. भक्तांनी 'यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविली ॥' (९–१९८) हे त्यांनी ठामपणे म्हटले आहे. दुसरे असे की, तीर्थाटनसमयी ज्ञानदेवांनी नामदेवांबरोबर केलेल्या चर्चेत यज्ञदाने व तीर्थक्षेत्रे हे विषय आल्याचा स्पष्ट असा पुरावा कोठेच मिळत नाही. आक्षेपकांनी करून घेतलेला तो एक सोयीस्कर समज असावा इतकेच. वर्णाश्रमधर्माचे समर्थन ज्या ज्ञानदेवांनी केले, त्यांनीच 'कुळजाति वर्ण । हे आघवेचि गा अकारण ॥' (९–४५६) असे मनःपूर्वक म्हटले आहे. तात्पर्य, दोन जवळिकेच्या सरोवरांप्रमाणे ज्ञानदेव-नामदेवांची हृदये एकवटली आहेत. "विश्वाचा पसारा पाहात दोन गरुड पक्षी उंच डोंगराच्या खडकावर बसलेले असावे, तसे नामदेव व ज्ञानदेव हे दिव्य प्रतिभाशाली मुमुक्षू भीवरेच्या तीरावर बसले होते."[११] असे प्रा. माटे यांनी समर्पकपणे म्हटले आहे.

## समारोप

नामदेवांना ज्ञानदेवांविषयी परमादर वाटत होता. 'प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर' (९१७) अशी त्यांची श्रद्धा होती. ज्ञानदेवांसारख्या श्रेष्ठ वैष्णवांचे आपण दासानुदास आहो (९२४) असे मनोमन मानणाऱ्या नामदेवांनी ज्ञानदेवांचे परमार्थ प्रांतातले किंकरत्व पत्करले; आणि ज्ञानेश्वरप्रणीत तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. ज्ञानदेव हे अल्पायुषी होते, तर नामदेवांना दीर्घायुष्य लाभले. ज्ञानदेव समाधिस्थ झाल्यावर पुढे पन्नासएक वर्षांचे आयुष्य नामदेवांना लाभले. ज्ञानदेवांनी भक्तीचे तत्त्वदर्शन घडविले व नामदेवांनी तत्त्वविस्तार केला. या दोघांच्या कार्याचे स्वरूप काहीसे पृथगात्म आहे, यास त्यांच्या आयुर्मर्यादेतील फरक हे एक बाह्य कारण तर आहेच; पण त्यापेक्षाही खरे म्हटल्यास त्याची स्वभावभिन्नता हीच विशेष कारणीभूत आहे. ज्ञानदेव हे अल्पवाक् होते. त्यांना एकान्ताची प्रीती व जनपदाची खंती होती. त्या मानाने नामदेवांची वृत्ती अधिक समाजोन्मुख असल्यांने कीर्तनरंगात दंग होऊन ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीमध्ये ते वावरू शकले. त्यामुळेच "याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें नांव भव्य देवाचें" हे मोरोपंतांनी नामदेवांना दिलेले प्रशस्तिपत्र यथार्थ ठरते.

नामदेवांना प्रत्यक्ष स्फूर्ती ज्ञानदेवापासून लाभली होती. "अध्यात्मविद्येचें लाविलेसें रोप । चैतन्याचा दीप उजळला "अशा शब्दांत ज्ञानदेवांचे ऋण नामदेवांनी मान्य केले.

आहे. ज्ञानदेवांनी निर्माण केलेल्या संतपरंपरेचे नामदेव हे थोर अनुयायी आहेत. ज्ञानदेव हे लोकोत्तर प्रतिभाशाली पुरुष असल्याने त्यांचे विचारदर्शन दिव्य वाटते. ज्ञानदेवापासून ज्ञानदीप घेऊन पुढे वाटचाल करणारे नामदेव हे मात्र तुमच्या-आमच्यातले वाटतात. त्यांचे काव्य वाचताना जवळीक उत्पन्न होते. कवितेमागचा कवी नामदेवीय अभंगांतून पारदर्शकपणे प्रतीत होतो. कवी व आपण यांच्यात एक अनामिक नाते निर्माण होते. ज्ञानदेवांच्या ठिकाणी काव्यदृष्टी जागृत आहे. 'बोलीं अरूपाचें रूप दावीन' अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. त्यांच्या कवितेत 'रंगी सुरंगतेची आगळीक' आहे; आणि त्यांना त्याची जाणीव आहे. नामदेवांचे काव्य मात्र नेणिवेतील आहे. "काय म्यां मागावें, किती माझी मती ?" हीच येथे भूमिका आहे. 'ज्ञानियांच्या राजा 'ने प्रामुख्याने ज्ञान सांगितले व कर्म सुप्रतिष्ठित केले. नामदेवांनी भक्तीचा अलोट जिव्हाळा उत्पन्न केला; आणि महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही विठ्ठलोपासनेचा ध्वज फडकाविला. अशा रीतीने कर्म, भक्ती व ज्ञान यांच्या त्रिवेणी-संगमाने वारकरी संप्रदाय धन्य झाला.

---

१. वहिणाबाईची अभंग-गाथा, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९५६. अभंग २२९.
२. नामदेवमहाराज यांच्या अभंगाची गाथा, त्र्यंबक हरि आवटे, इंदिरा प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौथी, १९५३, अभंग क्रमांक ९२२, ९२४, ९२५ व १२३९.
(येथून पुढे प्रस्तुत आवटेप्रतच उपयोजिली असून, त्यातील अभंगाचे संदर्भ मजकुराच्या पुढे, लगेच कंसात दिले आहेत.)
३. शं. दा पेंडसे, ज्ञानदेव व नामदेव, १९६९, पृ. ३११.
४. ज. र. आजगावकर, 'संतशिरोमणी श्रीनामदेव व त्यांचे समकालीन संत,' १९४१, पृ. २१.
५. पं. पांडुरंग शर्मा, 'नामदेवाचा निर्णय,' भा. इ. सं. मं., त्रैमासिक अंक १ ते ४, शके १५४७.
६. श्री. म. माटे, 'संत, पंत व तंत,' १९५७, पृ. ६८.
७. शं. गो. तुळपुळे, पांच संतकवि, १९६२, पृ. १८७.
८. वि. ल. भावे, महाराष्ट्र सारस्वत, आवृत्ती पाचवी, १९६३, पृ. १३५.
९. शं. पु जोशी, पंजाबातील नामदेव, १९४०, पृ. १२६.
१०. प्र सी. सुबंध (संपा.), श्रीनामदेवरायांची सार्थ गाथा, १९४९, प्रस्तावना : डॉ. वि. भि. कोलते.
११. श्री. म. माटे, उनि., १९५७, पृ. ७०.

□ □ □

सात

# संत नामदेवांचे कुटुंबीय

**पंधराजणांचे एकत्र कुटुंब । कुटुंबीय व्यक्तींची अभंग-संपदा । घरातील मुलेबाळे । दामाशेटी आणि नामदेव । गोणाई आणि नामदेव । नामदेव आणि राजाई । नामदेव आणि नारा । नामदेव आणि विठा । नामदेव आणि गोंदा । नामदेव आणि महादा । नामदेव आणि लाडाई । नामदेव आणि लिंबाई । नामदेव आणि आऊबाई । नामदेव आणि जनाबाई । अन्य कुटुंबीय । श्रीविठ्ठल आणि नामदेव । समारोप.**

घरातल्या कर्त्या पुरुषाचा ध्येयवाद त्याचा त्यालाच एकटेपणाने चालवावा लागतो, असे चित्र अनेक कुटुंबांतून पहायला मिळते. असा कर्ता पुरुष आपले ध्येयजीवन मंतरलेल्या मनःस्थितीत आणि झपाटलेल्या अवस्थेत व्यतीत करीत असतो त्याच्या घरातली इतर माणसे मात्र केवळ लौकिक पातळीवर आपल्या मनांचे चलनवलन सांभाळीत असतात. त्यामुळे कुटुंबातला कर्ता माणूस आणि अन्य कुटुंबीय व्यक्ती यांच्यातील सूक्ष्म/स्थूल संघर्ष (Confrontation) चालू राहतो.

या संघर्षमय वातावरणाला लौकिकात तसेच पारलौकिकातही काही थोडे सन्मान्य अपवाद आढळून येतात. मोतीलाल, जवाहरलाल, इंदिरा आणि राजीव, अशा नेहरू घराण्यातील चार पिढ्या राजकारणात भरीव कामगिरी बजावताना आढळतात. आनंदवनाचे बाबा आमटे यांच्या कार्यात त्यांची पत्नी, मुलेबाळे आणि सुना समरस झालेल्या आहेत.

एकाच उद्दिष्टाविषयीची ही सर्वांची समरसता पारमार्थिक क्षेत्रातही क्वचित् कोठे प्रत्ययाला येते. संत चोखामेळा आणि संत नामदेव या दोघांच्याही घरातील सर्वजण त्यांच्या विठ्ठलभक्तीत एकरूप झाले होते. निर्मळाबाई, सोयराबाई, बंका प्रभृती चोखोबांच्या घरातील सर्व माणसे त्यांच्यासारखीच विठ्ठलोपासनेत दंग झाली होती. हाच प्रकार थोड्याफार फरकाने नामदेवांच्या घराण्यातील विविध व्यक्तींच्या संदर्भात आढळून येतो.

**पंधरा जणांचे एकत्र कुटुंब**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे संत नामदेवांचे एकत्र कुटुंब नांदत होते. या कुटुंबाचा पसारा मोठा होता. या संदर्भात संत जनाबाईंचा पुढील अभंग सूचक आहे–

गोणाई, राजाई दोघी सासू-सुना । दामा, नामा जाणा बाप-लेक ॥
नारा, विठा, गोंदा, महादा चवघे पुत्र । जन्मले पवित्र त्याचे वंशी ॥
लाडाई, गोडाई, येसाई, साखराई । चवघी सुना पाही नामयाच्या ॥
लिंबाई ती लेकी, आऊबाई बहिणी । वेडीपिशी दासी त्याची जनी ॥

(शासकीय नामदेव गाथा, १९७०, जनाबाईचे अभंग, पृ. ९८५, अभंग क्र. ४१७.)

नामदेवांच्या घरातील कुटुंबीय व्यक्ती खालीलप्रमाणे होत्या–

१. दामाशेटी – नामदेवांचे वडील.
२. गोणाबाई (गोणाई) – नामदेवांची आई.
३. आऊताई – नामदेवांची बहीण (दामाशेटीचे ज्येष्ठ अपत्य.)
४. नामदेव – दामाशेटीचे दुसरे अपत्य.
५. राजाबाई (राजाई) – नामदेवांची पत्नी (गोविंदशेट सदावर्ते यांची कन्या.)
६. नारा (नारायण) – नामदेवांचा ज्येष्ठ पुत्र.
७. लाडाई – नाराची पत्नी.
८. विठा – नामदेवांचा दुसरा मुलगा.
९. गोडाई – विठाची पत्नी.
१०. गोंदा – नामदेवांचा तिसरा मुलगा.
११. येसाई – गोंदाची पत्नी
१२. महादा – नामदेवांचा चौथा मुलगा.
१३. साखराई – महादाची पत्नी.
१४. लिंबाबाई ( लिंबाई ) – नामदेवांची मुलगी ( पाचवे अपत्य)
१५. जनाबाई – नामदेवांच्या घरची ( शूद्र ) दासी.

हे पंधरा कुटुंबीय तीन पिढ्यांचे प्रतिनिधी होते. संत नामदेव आणि त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती यांचे परस्परसंबंध कसे होते, तसेच लौकिक जीवन आणि पारलौकिक जीवन या दोन्ही क्षेत्रांत त्यांचे भावबंध कोणत्या तोलामोलाचे होते, याविषयीचा शोध घेणे उपयुक्त ठरेल.

## कुटुंबीय व्यक्तींची अभंग-संपदा

हा शोध घेण्यासाठी उपयुक्त साधन म्हणजे त्यांच्यापैकी अनेकांच्या नावांवर उपलब्ध असलेली, नामदेव–गाथेतील त्यांची अभंग-संपदा. शासकीय नामदेव गाथेत (१९७० ची प्रत) त्यांचे खालील अभंगकाव्य दिलेले आहे.

| क्र. | अभंगकर्ता | पृष्ठे | अभंग-क्रमांक | एकूण अभंग-संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | संत नामदेव | ००३ ते ८७२ | ०००१ ते २३३७ | २३३७ |
| २. | नारा | ८८५ ते ८८८ | ००२६ ते ००३८ | ००१३ |
| ३. | विठा | ८९५ ते ९१८ | ००५७ ते ०१४४ | ००८८ |
| ४. | गोंदा | ८७८ ते ८९५ | ००३९ ते ००५६ | ००१८ |
| ५. | महादा | ८७६ – | ०००३ – | ०००१ |
| ६. | लिंबाई | ८७६ – | ०००६ – | ०००१ |
| ७. | आऊबाई | ८७६ – | ०००५ – | ०००१ |
| ८. | जनाबाई | ९२१ ते १०१२ | ०१४५ ते ०४८४ | ०३४० |
| | | | एकूण | २७९९ |

नामदेवांच्या कौटुंबिक जीवनाविषयीची माहिती खुद्द नामदेवांपेक्षा त्यांच्या कुटुंबीय व्यक्तींनी केलेल्या अभंगांवरून अधिक मिळते. नामदेवांची मुले आणि 'नामयाची दासी जनी' यांचे अभंग या दृष्टीने उपयोगी पडतात 'गोणाई, राजाई, दोघी सासू-सुना' हा जनाबाईंचा अभंग वर दिलेलाच आहे. याशिवाय 'धरा सतराचा हो मेळा' हा अभंग, तसेच 'नामदेवाचे घरीं । चौदाजण स्मरती हरी' असे आणखी दोन अभंग जनाबाईच्या नावावर आहेत. पण त्यापैकी 'धरा सतराचा हो मेळा' या अभंगातील 'कारखाना,' 'हुंडा,' 'दमामे पैलू' इत्यादी शब्द यादवकालीन भाषेतले वाटत नाहीत. सतराचे गणतही जमत नाही. 'चवदा मनुष्ये आहेत माझ्या घरी' असे नामदेव-पत्नी राजाई हिनेही म्हटले आहे. तेव्हा राजाई धरून पंधरा माणसे नामदेवांच्या कुटुंबात होती, हेच खरे ठरते. 'नामयाची दासी नागी दुसरी जनीं ।' असे नामदेव पुत्र गोंदा म्हणतो. पण या नागीचा ठावठिकाणा इतर कोणीही देत नाही. आऊबाई ही नामदेवांची बहीण होती, हे 'आऊबाई कन्या झाली गोणाईसी' या अभंगावरून ध्यानात येते.

---

*टीप – १ संत जनाबाईच्या अभंगांत आऊबाई या नामदेव-भगिनीचा उल्लेख नाही.
टीप – २ शासकीय नामदेव-गाथेतील परिशिष्ट 'ब' मधील पृ. १०१५ ते १०४० यामध्ये क्र. ४८५ ते ५४८ असे एकंदर ६५ अप्रकाशित अभंग दिले आहेत. त्यांचा विचार येथे केलेला नाही.

## घरातील मुले-बाळे

नारा, विठा, गोंदा आणि महादा या चार पुत्रांपैकी लहान-थोर कोण, हे ठरविणे

थोडे अवघड आहे. पण नारा हा सर्वांत मोठा मुलगा असावा, असे मानता येते. जनाबाई, व गोंदा या दोघांनीही नामदेव-पुत्रांच्या यादीत नाराचे नाव प्रथम दिले आहे. बारशाच्या वेळी मुलाचे नाव 'नारायण' ठेवले आणि आंगडे, टोपडे, शेला वगैरे कपडे देऊन बारशाचा थाट केला, असे जनाबाई सांगते. साधारणपणे पहिल्या मुलाचे बारसे विशेष थाटात करण्याचा प्रघात आहे.

विठा हा क्रमांक दोनचा मुलगा असावा. गोंदा हा क्रमांक तीन आणि महादा हा क्रमांक चारचा मुलगा. 'नारा, विठा, गोंदा, महादा' हाच क्रम बहुतेकांनी दिला आहे. नाराची पत्नी लाडाई ही नामदेवांची थोरली सून. 'पूर्व संबंधें मज दिधलें बापाने ।' 'आपली पूर्व-पुण्याई मोठी म्हणून नामदेवांसारख्या थोर पुरुषाच्या घरी आपल्याला देण्याची बुद्धी आपल्या पित्याला झाली.' बाळंतपणासाठी या लाडाईला नामदेवांच्या आजोळच्या गावी, म्हणजे कल्याणी येथे पाठवले होते. तिथे तिला मुलगा झाला. त्याचे नाव मुकुंद असे ठेवले होते. मुकुंदाच्या जन्मसमयी, म्हणजे आषाढ कृष्ण १३, शके १२७२ मध्ये नामदेवांच्या कुटुंबातील सर्व मंडळींनी पंढरपूरला समाधी घेतली. आपण त्या वेळी प्रसूतीसाठी कल्याणी या दूरच्या गावी होतो. त्यामुळे त्यांच्या दर्शनाचे भाग्य आपल्याला लाभले नाही, अशी हळहळ लाडाईने व्यक्त केली आहे नामदेवांच्या हयातीत त्यांच्या नातवाचा (मुकुंदाचा) जन्म झालेला दिसत नाही. मुकुंद हा तर नामदेवांच्या मोठ्या मुलाचा मुलगा. त्यामुळे इतर तीन पुत्रांना नामदेवांच्या हयातीत संतती झाली असेल असे वाटत नाही.

लिंबाई ही नामदेवांची एकुलती एक मुलगी. तिचे लग्न झाले होते का, याची माहिती मिळत नाही. ती दुखी-कष्टी होती. नामदेवांच्या घरीच ती राहात होती असे तिच्या अभंगावरून समजते. त्या कृपाळू केशवाने आपल्याला सांभाळावे, अशी आर्तता तिच्या उद्‌गारात आहे. ती पडली सर्वांत लहान. चारी भाऊ आपापल्या प्रपंचात रमलेले. वडील संसारातून मनाने विरक्त झालेले. आई नेहमी त्रासलेली. अशा स्थितीत घरामध्ये तिची सदैव उपेक्षा होत असावी. आपल्या उपवर मुलीच्या लग्नाची काळजी पतीला नाही, अशी राजाईची तक्रार आहे. 'कन्या आणि पुत्र झाली उपवर । अजूनि न धरी घर प्राणनाथ' असे नामदेव पत्नी राजाई हिचे दुःख आहे.

नामदेवाना एकच बहीण होती. तिचे नाव आऊबाई. ती आपली चित्तवृत्ती विठ्ठली ठेवून शून्यी सामावलेली होती. ती वयाने मोठी होती. तिच्या पाठीवर नामदेवांचा जन्म झाला. ('आऊबाई कन्या झाली गोणाईसी । पुढे देवा नवसी पुत्रासाठी ॥") आपल्या धाकट्या भावाच्या, म्हणजे नामदेवांच्या परमार्थ–जीवनाशी ती समरस झाली होती. आऊबाई आणि नामदेव अशी दोनच मुले दामाशेटींना होती. नामदेवांना भाऊ नव्हता. दामाशेटींचे ते एकुलते एक पुत्र होते. ('एक बाळ माझे धरिली त्याची आस ।' –गोणाई)

नामदेव-गाथेत नामदेव आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यातील भावबंध सूचकतेने प्रकट झाले आहेत. त्यांचा मागोवा घेणे उपयुक्त ठरेल.

## दामाशेटी आणि नामदेव

दामाशेटींनी नामदेवांचा विवाह थाटामाटाने साजरा केला. त्यावरून दामाशेटींच्या उभारीच्या काळात शिवणकामाचा त्यांचा जातिविशिष्ट व्यवसाय चांगला चालला असावा आणि त्यांची सांपत्तिक स्थिती समाधानकारक असावी, असा कयास करता येतो.

दामाशेटी विठ्ठलभक्त होते पंढरीच्या पांडुरंगाला रोज सकाळी ते नैवेद्य दाखवीत असत. एके दिवशी ते गावाला गेले होते. म्हणून गोणाईने नैवेद्याचे ताट नामदेवांजवळ दिले. बालभक्त नामदेवांच्या निरागस भावभक्तीला भुलून विठ्ठलाने तो नैवेद्य ग्रहण केला, अशी एक कथा प्रचलित आहे. पण नामदेव-गाथेत ती आलेली नाही.

नामदेवाचे मन लग्नानंतर तरी प्रपंचात रमेल, संसाराच्या ओढीने तो धंद्यात लक्ष घालील, अशी दामाशेटींची स्वाभाविक अपेक्षा होती. पण ती अपेक्षा फोल ठरली. दामाशेटी नामदेवांना म्हणतात, 'शिवण-टिपण करून तू संसार चालवशील, असं मला वाटलं होतं. पण तुझं वागणं वेगळं आहे' 'गणगोतामाजी बरें केलें नाव । माझें सत्त्व सर्व बुडविलें ।...तू भक्त निधडा देव हा धडफुडा । मेळविला जोडा येरवेरा ।' खांद्यावर भोपळा घेऊन आणि गळ्यात तुळशीमाळ घालून नामाचा जप करीत हिंडतोस. आपलं कूळ तू बुडवलंस, लोकलाज सोडून दिलीस.' (अ. १२९०)

आपला त्रागा वाया जात आहे हे पाहून दामाशेटी नामदेवाला प्रेमाने चार गोष्टी सांगतात. 'कुटुंब चालविणें तुझं । वृद्धपण आले मज' असे आवाहन ते त्याला करतात. त्याचा काही उपयोग होत नाही.

नामदेवांच्या विठ्ठलभक्तीला दामाशेटींचा विरोध नाही, कारण ते स्वतःच विठ्ठल-भक्त आहेत. परभणी जिल्ह्यातले नरसी-बामणी हे आपले मूळ गाव सोडून ते श्रीक्षेत्र पंढरपूर येथे सहकुटुंब आले आहेत. तिथेच ते स्थायिक झाले आहेत. रोज देवदर्शन घडावे हा तर त्या मागचा हेतू आहे. पण प्रपंच सोडून विठ्ठलभक्तीचा अतिरेक करणे त्यांना मंजूर नाही. म्हणूनच आपल्या परीने त्यांनी नामदेवाला विवेकाच्या गोष्टी सांगून पाहिले आहे. त्यांनी आपली नाराजी नोंदविली आहे; पण त्रागा केलेला नाही.

## जन्मदा गोणाई

दामाशेटीपेक्षा गोणाईने व्यक्त केलेली प्रतिक्रिया अधिक प्रखर आहे. तिचा मोठाच विरस झाला आहे. नामदेवांनी प्रपंचाकडे पाठ फिरवली. ते विठ्ठलभक्तीत गुंगून गेले. पंढरीचा पांडुरंग त्यांच्या अंतरीचा सखा झाला. एके दिवशी तर त्यांच्या या भक्तीचा कळस झाला. नामदेव सकाळी उठून देवदर्शनास निघाले. ते गरुड-पाराजवळ आले. 'मेघश्याम मूर्ती डोळस सावळा' असे विठ्ठलाचे ध्यान त्यांनी पाहिले. तेव्हा 'सबाह्य अभ्यंतरी स्वरूप कोंदलें । द्वैत निरसलें दृश्याकार ॥ आनंदघन अवचिता वोळलासे अंबरीं । वर्षाव सहस्रधारी होतो येथें ।' अशी दिव्य अनुभूती त्यांना आली. त्यांच्या अंगावर रोमांच दाटून आले. त्यांची तहानभूक हरपली. एखाद्या पुतळ्यासारखे ते मंदिरातच खिळून उभे राहिले.

इकडे घरी गोणाई अस्वस्थ झाली. नामदेव अजून का आले नाहीत, याची चिंता तिला लागून राहिली. घरून ती धावत निघाली. नामदेवांना पाहायला ती महाद्वाराजवळ आली. नामदेव तिला दिसले, पण कसे ? 'तो तंव पांडुरंगासन्मुख देखिला। चित्रींचा लिहिला पुतळा जैसा ॥ नाही चलनवलन तटस्थ नयन । केलें निंबलोण योगी जनीं ॥' लेकराचा हा नादिष्टपणा पाहून गोणाई रागावली नामदेवांच्या हाताला हिसका देऊन रागानं तिनं त्यांना जोरानं ओढलं. नामदेव बेसावध होते. त्या धक्क्यानं ते जमिनीवर पडले. त्यांची शुद्धबुद्ध हरपली.

पोटच्या पोराची ती अवस्था पाहून गोणाई कळवळली. तिनं नामदेवांना उचलून पोटाशी धरलं. 'माझ्या कान्हाड्याला काय झालं ?' अशी चिंता तिला वाटली. अरे बाळा, माझ्यावर का बरं असा रुसलास ?' असं तिनं कळवळून विचारलं. तेवढ्यात नामदेव शुद्धीवर आले. त्यांनी डोळे उघडून पाहिले. समोर आपली माता त्यांना दिसली. गोणाईनं मुलाला प्रेमानं आलिंगन दिलं 'घरी चल' असं ती त्याला विनवू लागली. नामदेवांनी ते साफ नाकारलं आपण देवाच्या पायाशीच थांबणार, असं त्यांनी तिला बजावलं. 'नामा म्हणे माते, जाई हो येथुनि । मला जाई निरवुनि विठोबासी ।'

गोणाईचा दारुण अपेक्षाभंग झाला. तिने नामदेवांना फैलावरच घेतले. ती म्हणाली, "अरे नाम्या, नऊ महिने तुला मी उदरात वागविले, त्याचा पांग असाच फेडलास काय ? 'सज्जन सोयरीं सांडियली लाज । झालासी निर्लज्ज एकसरा ॥' विठ्ठलानं तुला प्रेमपिसं लावलंय. संतसनकादिकांनाही त्यानं आपला वेध लावला. त्यांनी संसाराची उपाधी सोडली. तुलाही याच विठ्ठलानं झपाटलं आहे. हे देवपिसं सोडून दे बळंच घर बुडवू नकोस. सुदैवाची लेकरं कसा नीटनेटका प्रपंच करताहेत तू मात्र कुलक्षय आरंभला आहेस. हा देव घरघेणा आहे."

गोणाईच्या या विनवणीचा काही उपयोग होईना. नामदेव शांतच राहिले. तेव्हा ती पुन्हा म्हणाली,

"शिवण्या-टिपणासी घातलेसें पाणी । न पाहसी परतोनी घराकडे ॥
कैसी तुझी भक्ति लौकिकावेगळी । संसाराची होळी केली नाम्या ॥"

आपल्या आईचे हे सारं बोलणं ऐकून नामदेव तिला म्हणाले, "हे बघ आई, मी आवंढ्या नागनाथाच्या देवळात गेलो होतो. तिथं मला गुरूपदेश मिळाला. तेव्हापासून मी देहमनानं विठ्ठलाचा छंद घेतला. लौकिक व्यवहार मला आठवेनासा झाला. टाळ-दिंडी घेऊन मी रंगणात नाचू लागलो की, माझं मन अपार सुखानं भरून येतं. या देह- घर- संसाराचा मला आता कंटाळा आला, म्हणून तर मी गोपाळाला शरण गेलो. 'पुत्र-कलत्र येथें कायसी बापुडी ?' संसारसुख सत्य आहे असं तुला वाटतं; पण मला तर ते केवळ व्यर्थच भासतं."

– नामदेवांचं हे सारं बोलणं गोणाईला नुसतं तर्कटच वाटलं. 'विठ्ठल तुझं वाटोळं करील.' असंही तिनं नामदेवांना बजावलं. त्यावर नामदेवांनी तिला विठ्ठलाचं मोठेपण

पटवून दिलं. ते म्हणाले, "अग आई, 'मज आहे पोसिता पांडुरंग.' तो जनिताजीवविता आहे. सर्वज्ञ प्रतिपाळिता आहे. शरणागतांचा कळवळा त्याला समजतो. हाच माझा इष्टमित्र-बंधू-सज्जन-सोयरा आहे. जन्माची विश्रांती याच्या पायाशीच मला लाभणार आहे."

आता मात्र गोणाई संतापली. तिनं नामदेवांची निर्भर्त्सना केली. ती उद्गारली, "नामदेवा, गणगोतामध्ये छान नाव काढलेस! हाती टाळ घेऊन आणि चरणी घागऱ्या बांधून या देवापुढे तू निर्लज्जपणानं नाचतोस! हातात भोपळा घेऊन फिरतोस! अरे, मी आहे तोवर ही तळमळ! माझ्या माघारी तुझा सांभाळ कोण करील? 'बरवे पुत्रपण झालासी उत्तीर्ण!' मी तुला बजावून ठेवते, 'तुज नेल्यावाचून नच जाय येथून! पंढरी गिळीन विठोबासहित'!"

केवळ नामदेवांनाच असं खडसावून गोणाई गप्प बसली नाही. तिनं आपला मोहरा खुद्द श्रीविठ्ठलाकडे वळवला. आपला लेक ज्याच्या नादानं प्रपंचाकडं पाठ फिरवतोय, त्या पांडुरगालाच तिनं जाब विचारला. गोणाई विठ्ठलाला म्हणाली, "अरे बाबा, तुझ्या-सारखं श्रेष्ठ दैवत दुसरं नाही, अस वाडवडील आम्हाला सांगत आले, पण तुझा खाक्या वेगळाच दिसतो. तुझ्या दर्शनाला जो कोणी येईल त्याची परतीची वाटच तू अडवून ठेवतोस. माझं बाळ तुझ्या दर्शनाला आलं, तर तू त्याला चांगलंच नादाला लावलंस. माझा नामदेव तहान-भूक विसरून पिसाट झालाय. मला तो ओळखतही नाही अरे विठ्ठला, लोकांच्या लेकरांना तू असं का बर चाळवतोस? तुझं वर्म एकट्या पुंडलिकाला समजलं. त्याने तुझे पाय विटेवर जडवून तुला खिळवून ठेवलं. पण विठ्ठला, माझ्या लेकराला तू का बरं वेडं केलंस? आम्ही असं तुझं काय वाकडं केलंय? 'तुझें काय खादलें। त्वां काय दिधलें। भलें दाखवलें देवपण'॥"

–गोणाईचा हा सगळा त्रागा पाहून श्रीविठ्ठल तिला म्हणाले, "तुझा नामदेव तुला परत हवाय हे खरं, पण त्यासाठी आम्ही काय करू शकणार? मर्यादा सांडून तू कठीण शब्द बोललीस; पण हे बोलणं वायाविण आहे. पण मी तुला एक उपाय सांगतो. ज्या सुखाच्या लोभानं नामदेवाचं मन मागं मोहरेल, असं काही अनुपम सुख तुझ्यापाशी आहे का? अग गोणाई, नामदेवाचं खरं हित तुला कळतं, तर त्याच्या चित्ताला एवढा त्रास होऊन प्रपंचातून तो कशाला उठला असता?"

अर्थातच विठ्ठलाची ही समजावणी गोणाईला पटणं शक्य नव्हतं. विठ्ठल आपल्याला दाद देत नाही, असं पाहून तिनं वेगळाच पवित्रा घेतला. राही, रखुमाई आणि सत्यभामा यांना तिनं आवाहन केलं. ती म्हणाली, "मातांनो! कसले हे तुमचे विठ्ठलस्वामी! देव काय आम्ही कधी ऐकले नाहीत? पण या विठ्ठलाची तऱ्हा सगळी वेगळीच! 'या देवासी भेटी, जन्ममरण तुटी, मावळली गोठी संसाराची!' तुम्ही अवघ्याजणी विठ्ठलाच्या सांगातिणी आहात. त्याच्या मनात काय आहे, हे तरी तुम्ही काढून घ्या माझा नामा माझ्या ताब्यात द्या, नि मगच मला वाटेला लावा!"

गोणाईचा हा होराही चुकला. विठ्ठलाच्या 'सांगातिणी' मूग गिळून गप्प बसल्या. त्यांनी गोणाईची फिर्याद नीट ऐकूनही घेतली नाही पण गोणाई काही हिपुटी झाली नाही. तिनं संतजनांना गाठून आपलं गाऱ्हाणं त्यांच्यापुढं मांडलं. 'विठ्ठलीं मीनला नामदेव' हे तिनं त्यांना सांगितलं. संतांनी तरी नामदेवाला चार गोष्टी सांगून ताळ्यावर आणावं, अशी इच्छा तिनं प्रकट केली. पण इथंही तिला प्रतिसाद मिळाला नाही. संतजन गोणाईस म्हणाले,

"नामयासारिखें निधान तुझे कुसीं । धन्य तूं वो होसी जगामाजी ।।
धन्य तुझा नामा ज्याची भेटी आम्हां । धन्य त्याचा प्रेमा नित्य नवा ।।"

आपले सारे प्रयत्न विफल झालेले पाहून गोणाई उदास झाली. शेवटी देवालाच तिची दया आली. 'मातेसी निष्ठुर होऊ नये' असे त्यांनी नामदेवांना सांगितले. गोणाई-बरोबर त्यांनी नामदेवांना घरी पाठवलं. 'हा घे तुझा नामा, काय चाड आम्हां' असं ते गोणाईला म्हणाले. पण देवळातून घराकडं जाताना 'देव झाला नामा, नामा झाला देव!' गोणाईचा भाव पाहण्यासाठी देवांनी घटकाभर ही लीला केली. नामदेवांच्या ठिकाणी विठ्ठलाला पाहून गोणाई म्हणाली,

"अग माझ्या बापा तूं कोणा हवासी । मज दुर्बळासी काय होय ।।
सोळा सहस्र मुख्य अष्ट तुझ्या कांता । त्या माझ्या घाता प्रवर्ततील ।।"

मग मात्र देवांनी आपली लीला आवरली. 'खराखुरा' नामदेव त्यांनी गोणाईच्या हाती सोपवला. 'हातीं धरोनिया गेली । गोणाई तेव्हा आनंदली ।।'

अशा रीतीनं, गोणाई आणि नामदेव यांचे भावबंध नामदेवगाथेत बहारीनं वर्णिलेले आहेत. आपल्या परमार्थप्रीतीत दंग झालेले नामदेव आणि प्रपंचासक्तीत त्यांना गुंतवू पाहणारी गोणाई, यांच्यातील प्रेमकलह हा चिरंतन स्वरूपाचा द्वंद्वयोग आहे. नामदेवांनी विठ्ठलाला वश तर केलेच; पण गोणाईचंही मन राजी ठेवलं. त्यांनी परमार्थ आणि प्रपंच यामधील समतोल साधला. अनासक्त प्रपंचयोग आणि अपूर्व परमार्थसाधना यांचा वस्तुपाठ त्यांनी मांडून दाखवला.

## नामदेव आणि राजाई

प्रपंचाकडे पूर्णपणे पाठ फिरवून नामदेव विठ्ठलनामाच्या छंदात गढून गेले होते. नामदेवांची पत्नी राजाई हिने मोठ्या उमेदीने संसाराला सुरुवात केली. पण नामदेवांच्या प्रपंच-विन्मुखतेमुळे तिचा दारुण आशाभंग झाला. तिचे दुःख असाधारण आहे. अवघी भांबडभुते आपल्या घरात जमतात, आनंदाने नाचतात, एकमेकांच्या पाया पडतात; आणि ब्रह्मानंदाने डुलतात, हे पाहून ती म्हणते, 'भोळी सासू गोणाबाई । पांढरा स्फटिक व्याली पाही ।।' तिच्या माहेरी तिचे वडील सुई-कात्री हातांत घेऊन भरपूर काम करीत असत. यामुळे माहेरी सुबत्ता होती. पण इथे पाहावे, तर नवऱ्याचा टाळवीणेचा छंद सुटत नाही. त्याने लज्जेचा गाव सोडला आहे. घरातल्या गरिबीने बिचारी राजाई गांजली आहे. एकदा कधी नव्हे तो तिचा भाऊ तिला भेटायला एवढ्या लांबून पायी चालत आला.

काही रांधून त्याला जेवायला घालावे, तर घरात धान्याचा कण नाही. नवऱ्याला सांगावे तर तो म्हणतो, आज दशमी ही तिथी आहे. आज एकभुक्त राहायचे असते. तेव्हा आता संध्याकाळचे जेवण कशाला हवे ? ‘उदईक हरिदिनीं उपवास जागरण । ऐकावें कीर्तन चार प्रहर ॥’ हे ऐकून नामदेवांचा मेहुणा हादरलाच. ‘क्षुधातुर पोटीं निद्रा नलगे कांही। वर्षाएवढीं पाही रात्र झालीं ॥’ अशी त्याची अवस्था झाली. सासरच्या या हलाखीने राजाई काकुळतीने रुक्मिणीला विचारते,

“अहो रुक्माबाई, विठोबासी सांगा । भ्रताराशी कां गा वेडें केलें ॥
वस्त्र पात्र नाही खाया-नेसायासी । नाचे अहर्निशी निर्लज्जसा ॥”

आपल्या आयुष्याची झालेली परवड पाहून राजाई उदास झाली. ‘अंगोळिये विठा कडियेसी नारा,’ अशी राजाई महाद्वारापर्यंत आली. तिला तेथे पाहून नामदेवांना राग आला. त्या दोघांची बोलाचाली झाली असल्या माणसाशी आपल्या बापाने आपले लग्न लावले तरी कशाला, असा उद्वेग तिला वाटला. ‘दैन्य भोगावें आलें जन्मा ।’

शेवटी मात्र राजाईचा चित्तपालट झाला. नामदेवांचा आध्यात्मिक अधिकार जेव्हा तिला समजला, तेव्हा तिचा गैरसमज दूर झाला. आपल्या पतीच्या पुण्याईने प्रत्यक्ष श्रीमुखाचे तिला दर्शन घडले, तेव्हा तर साफल्याचे उद्‌गार तिच्या तोंडून बाहेर पडले–

‘आतां ये संसारी मीच धन्य जगीं । जे तुम्हां अर्धांगी विनटलें ॥’

## नामदेव आणि नारा

आपले वडील संत नामदेव आणि आपल्या कुळीचे दैवत श्रीविठ्ठल यांच्याविषयी नारा याने कृतज्ञता व्यक्त केली आहे. ‘नारा म्हणे नामयाचा’, ‘विष्णुदास नारा’ अशी नाममुद्रा त्याने आपल्या अभंगातून दिली आहे. देव आणि भक्त यांतील अद्वैत त्याला अभिप्रेत आहे. सरिता आणि सिंधू, तसेच लवण आणि जळ यांच्या दृष्टांतातून हा ऐक्य-भाव त्याने व्यक्त केला आहे. ‘मुरकुंडी घाली’, ‘आहाळले पोळले’, ‘वेव्हार’, ‘गुढिया’ अशी खास मराठी शब्दकळा तो वापरतो. ‘नारा म्हणे माझ्या बापाचे साधन । सापडली खूण अंतरीचीं ।’ असे साफल्याचे समाधान त्याने प्रकट केले आहे. साक्षात्काराचा दिव्यानंद सांगणारा त्याचा खालील अभंग लक्षणीय आहे–

सुखदुःखा भेटों गेलें । चित्त चैतन्या मिळालें ॥
आला अनुभव नामाचा । ठेवा लाधला प्रेमाचा ॥
जन्ममरणाची काळजी । तुटोनी गेली तये वेळी ॥
सरले संकल्प–विकल्प । हृदयीं देखिलें विठ्ठलरूप
शून्य जाले भावाभाव । अवघा आतुडला केशव ॥
नारा म्हणे नामयाचा । मज विश्वास नामाचा ॥ (अ. ३८)

हरिकीर्तन हाच आपला विषय आहे, प्रेमधन हे खरे भांडार आहे, एकादशी हे आमचे व्रत आहे, अशी उत्कट भक्ती नाराच्या हृदयात भरून राहिली आहे.

## नामदेव आणि विठा

विठाच्या नावावर सर्वाधिक, म्हणजे ८८ अभंग आहेत. ' निज ठेवा-प्राप्तीविषयी विठाचे धरणे ' (३८ अभंग), ' करुणापर मागणे (४८ अभंग), ' गौळण ' (१ अभंग) व ' गोंधळ ' (१ अभंग) अशा चार विषयांत हे ८८ अभंग विभागता येतील.

यांपैकी ' धरणे ' या पहिल्या विभागात विठाने आपणास पारमार्थिक ठेवा पितृ-पुण्याईने लाभल्याची कृतज्ञता व्यक्त केली आहे. १ ) आमुचा नामा गेला तुज निरवोनि २) आमुचे ठेवणे जुगादीचे नाणे । जातां नामयाने सांगितले ।। ३ ) आमुचा बाप अग्रज तुझा । तूं बा आम्हां होती आजा ।। ४) माझिया बापाचा तुजपाशी ठेवा । ५) माझिया बापाची मिराशी गा देवा । तुझी चरण सेवा पांडुरंगा ।। ६) पंढरीराया माझिया बापे । प्रसन्न केले तुज प्रतापे । असे विठ्ठलास उद्देशून केलेले अनेक संबोधनपर निर्देश त्याच्या अभंगांत आढळतात.

विठाचे ' करुणापर मागणे ' म्हणजे स्वतः विठाने श्रीविठ्ठलांशी केलेला भावोत्कट हृदय-संवाद आहे. १) मी तुझा पोसणा अगा नारायणा २) माय वेल्हाळी वेल्हाळी । ब्रह्मरसा पान्हावली ।। ३) धरोनि हनुवटी । मेळवीन दृष्टादृष्टी ।। ४) घेता-देता तू तिही लोकी उदार । माझा का अव्हेर केला बापा ।। अशा काही अभंगांतील विठाचे आवाहन करुणरम्य आहे. तसेच, ' मरण हे पेरणे, जन्म हे उगवणे ' किंवा ' आम्हा वैष्णवाचा कुळधर्म कुळींचा । घोष हरिनामाचा सदा वाचे ।।' अथवा, ' बोले जे अव्यक्त स्वरूपविचारू । ब्रह्म बोल सारू विठा म्हणे ।।' यांतील परमार्थ-चिंतन अल्पाक्षर पण अर्थबहुल आहे.

' कृष्ण गौळियाचे लोणी चोरी ' ही एकमेव गौळण पारंपारिक स्वरूपाची आहे. मात्र ' त्रैलोक्या माझारी एक विठाबाई सुंदरी हो ।' हा गोंधळ प्रत्ययकारी आहे. ' नामयाचा विठा कैसा गोंधळी नेटका हो । वडिलांची विठाई कुलस्वामिनी अंबिका हो,' या शब्दांत विठाने या यशाची समर्पक कारणमीमांसा दिली आहे.

## नामदेव आणि गोंदा

बालभक्त नामदेवाने श्रीविठ्ठलाला आपल्या हातचा नैवेद्य ग्रहण करायला लावला, या प्रसंगाची तपशीलवार कथा नामदेवपुत्र गोंदा याने सहा अभंगांत सांगितली आहे (अभंग क्रमांक ३९ ते ४४). अर्थात ही कथा सर्वश्रुत आणि लोकप्रिय असली पाहिजे. त्यामुळेच नारा ती कथा अभंगबद्ध करू शकला असावा. याशिवाय नामदेव-पत्नी राजाई हिने नारा आणि महादा या तान्ह्या मुलांना घेऊन (गरिबीला वैतागून) भीवरेच्या डोहात उडी मारली, तेव्हा विठ्ठलाने त्यांना पैलथडीला नेऊन वाचविले. मेलेला सर्प राजाईने शिजवला, तेव्हा विठ्ठलाच्या कृपेने सर्पाच्या ठिकाणी सोने निर्माण झाले. ' केशवशेट ' व्यापाऱ्याने नामदेवांच्या घरी येऊन राजाईजवळ ' वराईची गोणी ' दिली, तेव्हा त्यातून सोन्याचे होन निघाले; पण राजाईने ते होन शिलकीत टाकायचे ठरवले, तेव्हा तिच्या हाताला कोळसे लागले, इत्यादी चमत्कार-कथा गोंदा याने रसाळपणाने दिल्या आहेत.

पंढरपूरला विठ्ठलमंदिराच्या महाद्वाराच्या पायरीजवळ आपली समाधी बांधावी, अशी अंतिम इच्छा नामदेवांनी व्यक्त केली होती ('नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे। संत पाय हिरे देती वरु ॥' -नामदेव) नामदेवांची ही इच्छा पूर्ण झाली. कारण ह्याच उल्लेख गोंदानेही केला आहे. गोंदा म्हणतो.

"आवडला नामा देवा विठ्ठलासी । ठेवी चरणापासी अखंडित ॥
नामयाची कुडी घातली पायरी । येता-जाता हरी पाय देती ॥"
(अभंग ५३)

नामदेवांच्या या भाविक पुत्राने कीर्तन-महिमा सांगितला आहे. निष्काम मनाने देवाचे कीर्तन करावे. मन आशाबद्ध करू नये. शरीराचे भय सांडावे. रणशूर योद्ध्या-प्रमाणे जिवावर उदार होऊन पांडुरंगाच्या ठायी मन निर्धाराने गुंतवावे. "देव जोडियेला तया काय उणे । गोंदा म्हणे मन धीट करा ॥" (अ. ५४) एवढेच गोंदाचे सांगणे आहे.

## नामदेव आणि महादा

महादाचा एकच अभंग उपलब्ध आहे. तो म्हणतो, "हे विठ्ठला ! श्रीकृष्णा ! यादवांच्या कुळात तुझ्यासारखा दुसरा कुणी 'झोंड' जन्माला आला नाही. आमच्या बाबांना तू लपवून ठेवले आहेस. हे विठोबा, आमचे हे ठेवणे तू आम्हांला परत कर तू माझे ऐकले नाहीस तर मी तुझे हे बिंग फोडीन. 'नामयाचा महादा बळकट पैं जाला। विठोबा आणिला चौबारांत ॥"

## नामदेव आणि लाडाई

नामदेवांची थोरली सून लाडाई हिचा एकुलता एक अभंग उपलब्ध आहे. ती म्हणते;

"द्वादशबहात्तरी कृष्ण त्रयोदशी । आषाढ हे मासी देवद्वारी ॥
सर्वांनी हा देह अर्पिला विठ्ठली । मज का ठेविलें पापिणीसी ॥"

यातील 'सर्वांनी' हे पद सावधपणेच स्वीकारले पाहिजे. कारण नामदेवांच्या माघारी त्यांचे पुत्र बरीच वर्षे हयात होते, अशी त्या पुत्रांच्याच अभंगातील अंतःसाक्ष आहे. नामदेवांबरोबर गोणाई, राजाई आणि अन्य संबंधित व्यक्तींनी महाप्रयाण केले असावे, एवढेच या संदर्भात म्हणता येईल.

## नामदेव आणि लिंबाई

लिंबाई या नामदेव-कन्येच्या नावावर एक अभंग आहे. नामदेवांची ही एकुलती एक लेक त्यांच्या माघारी एकटीच बाजूला पडली आहे. चारी भाऊ लग्न होऊन प्रपंचात गुंतले आहेत. आई-वडील नाहीत. लिंबाई अजून अविवाहितच आहे असे दिसते. ही उपेक्षित मुलगी काहीशी उदासवाणी होऊन विठ्ठलाला विनविते, "हे पंढरीनाथा, तूच

आता माझा मायबाप आहेस तू अनाथांचा नाथ आहेस, असे सनकादिक मुनींनी म्हटले आहे. त्यांच्या वचनावर विश्वास ठेवून मी तुझी कास धरली आहे. 'नामयाची लेकी लिंबाई म्हणे देवा । कृपाळू केशवा सांभाळावे ॥'

नामदेवांचे मुलगे प्रपंच करून परमार्थही साधत होते. लिंबाई ही मात्र स्वतःचा प्रपंच उभा करू शकली नाही; आणि परमार्थाचा वाराही तिला लाभला नाही.

## नामदेव आणि आऊबाई

आऊबाई ही नामदेवांची एकुलती एक बहीण. तिच्या नावावर फक्त एक अभंग आहे. त्याची रचना कूटपर आहे. जेथे आकार नसतो, तेथे शून्याकार दिसतो–भासमान होणाऱ्या विश्वाची जाणीव जेथे नष्ट होते, तेथे परब्रह्म प्रतीत होते. या महाशून्यात चराचर सामावले आहे. एवढेच नव्हे, तर 'नामयाची बहीण आऊबाई शून्यीं सामावली । विठ्ठलीं राहिली चित्तवृत्ती ।' असा अपूर्व अद्वैयानंद तिने प्राप्त करून घेतला आहे.

## नामदेव आणि जनाबाई

आजच्या मराठवाड्यातील परभणी या जिल्ह्यातल्या गंगाखेड नावाच्या गावी दमा आणि करुंड हे विठ्ठलभक्तीत रमलेले शूद्र दांपत्य राहत होते. जनाबाई ही त्यांची मुलगी. ती पाच-सहा वर्षांची झाल्यावर दमाने तिला नामदेवांचे वडील दामाशेटी यांच्याकडे पंढरपूरक्षेत्री स्वाधीन केले. तिची आई आधीच वारली होती. नंतर दमा हासुद्धा निधन पावला 'माय मेली, बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला' या जाणिवेने जनी दामाशेटीच्या घरी राहिली. दामाशेटीच्या घरच्या चौदा जणांच्या कुटुंबात 'पंधरावी ती दासी जनी' असा उल्लेख खुद्द जनाबाईंनीच केला आहे.

दामाशेटीचे घराणे पूर्वापार वारकरी सांप्रदायी होते. तिथे जनाबाईला भगवंताचा ध्यास लागला. नामदेवांच्या बालपणापासून जनाबाईने त्यांना अंगाखांद्यावर खेळवले. पुढे नामदेव अधिकारी संत झाले. त्यांना आपला सर्वाधार मानून जनाबाई शरण गेली. 'जनी म्हणे जोड झाली विठोबाची । दासी नामयाची म्हणोनिया ॥' नवऱ्या मुलाच्या संगतीने वऱ्हाडी मंडळींना मांडे खायला मिळतात, त्याप्रमाणे नामदेवांचे दासीपण मिरवल्यामुळे आपल्याला श्रीविठ्ठलाची प्राप्ती झाली असे ती सांगते. 'नामयाचे ठेवणें जनीस लाभलें । धन सापडलें विटेवरी ॥" नामदेव वाळवंटावर कीर्तन करीत तेव्हा, जनाबाई हाती टाळ घेऊन मागे उभी राहत असे. नामयाची कृपा म्हणूनच 'जनी अंगें ब्रह्म जाली ।'

नामदेवांप्रमाणेच जनाबाईची अभंग-रचना म्हणजे पारमार्थिक भावकविता आहे. भक्ती, परमार्थ-जीवन, संत-महिमा, आख्यान-कविता, स्फुट-रचना अशा अनेकविध विषयांवरील कविता तिच्या अभंगगाथेत आलेली आहे.

नामदेवांच्या परमार्थजीवनाशी जनाबाईचे परमार्थजीवन सुसंगत आहे. एका सांसारिकाचा साक्षात्कारी संत कसा झाला, याचा चेनोहर चित्रपट नामदेवांच्या

अभंगसंपदेतून पाहायला मिळतो. तीच गोष्ट जनाबाईची. एका मामुली मोलकरणीची अधिकारी संत कवयित्री कशी झाली, याचा विकासपट जनाबाईच्या आत्मनिवेदनपर अभंग-कवितेतून प्रतीत होतो. बद्ध, मुमुक्षू, साधक, वंचित, सिद्ध व जीवन्मुक्त या क्रमाने विकसित होत जाणाऱ्या अवस्था नामदेव आणि जनाबाई या गुरू-शिष्यांच्या पारमार्थिक जीवनात पाहायला मिळतात.

'ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर ॥
मरोनिया जावें। बा माझ्या पोटीं यावें ॥

–या वडिलकीच्या भूमिकेतूनही ज्ञानेश्वरांविषयी जनाबाईने व्यक्त केलेला हा वात्सल्यभाव लक्षणीय आहे. नामदेव हे तर तिचे साक्षात् गुरू. नामदेवांच्या कीर्तनभक्तीचे व परमार्थसाधनेचे जनाबाईने मनोमन कौतुक केले आहे "सुंबाचा करदोडा रकटयाची लंगोटी। नामा वाळुवंटी कीर्तन करी" या दृश्याचे सुख वर्णनातीत आहे, असे ती सांगते. नामदेवांचा आणि आपला सेव्यसेवकसंबंध केवळ आजचा नसून, तो संबंध युगायुगाचा आहे, अशी तिची श्रद्धा आहे.

सहजसुलभ गेयता, शब्दयोजनेतील ताल व मांडणीमधील रेखीवपणा या बाह्य विशेषांबरोबरच अनुभूतीतील अभिजात भावोत्कटता आणि शैलीतील रसाळपणा या अंतरंगाच्या सौंदर्यामुळे जनाबाईचे अभंग आपल्या मनात खडीसाखरेसारखे घोळत राहतात. १) येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई॥ २) विठो माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा॥ ३) संतभार पंढरीत। कीर्तनाचा गजर होत॥ ४) धरिला पंढरीचा चोर। गळा बांधोनिया दोर॥ ५) दळिता कांडिता। तुज गाईन अनंता॥ ६) सुंदर माझें जातें गे फिरे बहुतेकें। ओव्या गाऊ कौतुकें॥ तू ये रे बा विठ्ठला॥ ७) पक्षी जाय दिगंतरा बाळकासीं आणी चारा–अशा अनेक अभंगांची गोडी अवीट आहे. कवितेमागचा कलावंत ज्यांना पहायचा असेल त्याने नामदेव आणि जनाबाई यांची अभंग-कविता पाहावी.

## अन्य कुटुंबीय

अशा रीतीने नारा, विठा, गोंदा, महादा, लिंबाई, आऊबाई, आणि जनाबाई या नामदेवांच्या घरातील सात व्यक्तींच्या अभंगवाणीच्या आधारे नामदेवांशी असलेले त्यांचे भावनिक नाते तपासता येते. मात्र नामदेवांच्या चार सुना, नामदेवांचे वडील, नामदेवांची आई आणि नामदेवांची पत्नी या उरलेल्या सात जणांची स्वतंत्र रचना उपलब्ध नाही. तरीपण स्वतः नामदेवांच्या उद्गारांतून वडील, आई आणि पत्नी यांच्याविषयीचे त्यांचे भावबंध जाणता येतात. त्या काळच्या युगधर्मास अनुसरून नामदेवांच्या चारी सुना आपल्या पतींच्या जीवनाशी आणि घरातील एकूण वातावरणाशी एकरूप झालेल्या होत्या.

## मोक्षदा विठाई

संत जनाबाईने दिलेल्या चौदा जणांच्या यादीत श्रीविठ्ठलाचा समावेश अर्थातच

केलेला नाही. पण विठ्ठल आणि नामदेव, यांचे नाते तसे अनामच आहे. 'परमार्था'ने श्रीविठ्ठल हा नामदेवांचा एक कुटुंबीयच आहे श्रीविठ्ठल नामदेवांच्या लेखी 'विठाई' आहे देव ही भक्ताची माता आहे. ज्ञानदेव-नामदेवादी भागवतधर्मीय संतांची विठ्ठलभक्ती ही वत्सलतेची पावन गंगा आहे. महानुभावांची कृष्णभक्ती बऱ्हंशी पुष्टिमार्गाच्या वळणावर आहे. वल्लभपंथीय भक्तांनी या वृत्तीला मोकाट सोडून तिला धार्मिक स्वरूप देण्याचा बळेच प्रयत्न केला. पण वारकरी संतांनी या भावनेचे दैवीकरण करून तिच्यामध्ये पावित्र्य आणले. देव-भक्तांचे नाते म्हणजे प्रियकर प्रेयसींची कामुक प्रीती नसून, माय-लेकरांच्या वात्सल्यवृत्तीवर आधारलेला तो शुद्ध भाव आहे, असे संतांनी सांगितले. 'विठ्ठल माऊली प्रेमपान्हा पान्हावली' ही वारकरी भक्तीची धारणा आहे. ज्ञानदेवांनी वर्णिलेल्या गुरुकृपानगरीतच नव्हे, तर प्रत्यक्ष ज्ञानेश्वरीतही 'तो भेटे माऊली आत्मा' असा प्रत्यय भाविकाला येतो, (ज्ञाने १६–४४३), 'तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें' असा भगवंतांचा संदेश आहे. (ज्ञाने ३–१८८) गोपाळांचा मेळा संगे घेऊन चाललेला विठो 'लेकुरवाळा' आहे, असा जनाबाईंचा सांगावा आहे. 'तू माय माऊली । जीवीं जीवनकळा । भक्तांचा लळा । पुरविसी या' अशा शब्दांत संत भानुदासांनी विठ्ठलाला आळवलं आहे. नाथांच्या भारुडात 'देव एकनाथांचा बछडा' झाला आहे. 'विठ्ठल माझी माय । आम्हा सुखा उणें काय ?' अशा समाधानात तुकोबा तृप्त आहेत. मातृभक्तीत आणि वत्सलरसात न्हाऊन निघालेली ही भक्तिकल्पना संतसज्जनांनी सुप्रतिष्ठित केली आहे.

आपल्या वत्सल विठाईचा महिमा वर्णिताना नामदेव म्हणतात, "निर्गुणीचे वैभव भक्तिमिषाने आले आहे. विठ्ठलवेषाने ते ठसावले आहे. आम्हा अनाथांसाठी निडारलेल्या नयनांनी ते आमची वाट पाहत आहे. यशोदेचे सुकुमार बाळ विटेवरी समचरण, सुंदर स्वरूपात उभं आहे. 'भेटली, भेटली विठाई माऊली । वासना निवाली जिवातील' हाच माझा अनुभव आहे. माता, पिता, बंधू, भगिनी, इष्टमित्र कुळाचार, माहेर, जिव्हार... सारं काही विठ्ठलच आहे. बिठाई ही दीनांची माऊली आहे. 'डोळयांतील बाहुली माझी विठाई झाली । घनानंद मूर्ति माझ्या ध्यानासी आली,' असा प्रत्यय मला आला आहे.'

आपल्या अनेक सरस-सुंदर अभंगांतून नामदेवांनी विठाईला आळवलं आहे 'डोळुले शिणले पाहता वाटुली,' 'तू माझी माऊली मी वो तुझा तान्हा । पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ।', 'येई गे विठ्ठले अनाथाचे नाथे ।,' 'जननिये जिवलगे ये वो पांडुरंगे ।' इत्यादी अभंगांतून मातृभक्तीचा वत्सलरस ओतप्रोत भरून राहिला आहे, नामदेवगाथेत भक्तीची भावगंगा दुथडी भरून वाहत आहे. विठाईने नामदेवांवर मातृवात्सल्याची मायापाखर घातली आहे. देव आणि भक्त यांच्यामध्ये विटेइतकाही अंतराय उरत नाही, याची साक्ष नामदेवांच्या काव्यवाहिनीने दिली आहे.

## समारोप

जन्मदा गोणाई आणि तिचे पुत्र नामदेव यांच्यात 'विरोधी भक्ती' आहे. कारण या माय-लेकरांच्या जीवनदृष्टीतच मूलभूत व मोठे अंतर आहे. विठाई ही नामदेवांची

देव-माता आहे; आणि त्यांच्यात सख्य भक्ती आहे, कारण नामदेवच देवरूप झाले आहेत. नामदेवांचे देवपिसे गोणाईच्या डोळ्यांत सलत होते, तर भक्तीच्या अपूर्व आवेगात विठाई हीच आपल्या ' डोळ्यांतली बाहुली ' झाली आहे, असा अपूर्व प्रत्यय नामदेवांना आला आहे. माता-पिता आणि मुलेबाळे हे सर्वजण नामदेवांच्या लौकिक जीवनातले सगेसोयरे आहेत, तर पारलौकिक जीवनाच्या वाटचालीत स्वतः नामदेव हे ' विश्वैक्य धाम ' –वासी विठाईच्या ' परेहून परत्या घरात निरंतर नांदणारे ' कुटुंबीय बनले आहेत !

□ □ □

विविध ३३८३
दा. क्र. २६९९६
२८।५।८०

आठ

# श्रीज्ञानेश्वरांची प्रभावळ

**' संतकृपा झाली – ' । द्विविध काव्यरचना । व्यापक सहानुभाव । प्रभावळीचा ' भूगोल ' । ज्ञानेश्वरांचा वारसा । समारोप.**

परंपरेचा अभाव हा महाराष्ट्राला नियतीचा जणू शापच आहे. समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात अनन्वय अलंकारासारखे शोभून दिसणारे एकेक धुरंधर कार्यकर्ते/संस्थापक होऊन गेले; पण त्यांच्या माघारी त्यांच्या कार्याची परंपरा चालू ठेवणारे मातबर अनुयायी काही निर्माण झाले नाहीत. गोपाळ गणेश आगरकरांची समाज-सुधारणेची कामगिरी त्यांच्या मृत्यूनंतर कुंठित झाली. जोतिबा फुले यांनी सुरू केलेले दलितोद्धाराचे कार्य त्यांच्या एवढया समर्थपणाने कोणीही पुढे चालू ठेवले नाही. धोंडो केशव कर्वे यांनी हाती घेतलेला स्त्री-शिक्षणाचा वसा तेवढयाच निष्ठेने सांभाळणारा कर्तबगार अनुयायी निर्माण झाला नाही. एकेका कार्यक्षेत्रात एकेकच असामान्य व्यक्ती निर्माण व्हावी, हेच निसर्गाला कदाचित अभिप्रेत असावे. निसर्ग प्रतिभावंत व्यक्तीला जन्माला घालतो पण त्यानंतर निसर्ग आपल्या हातातला साचा मोडून टाकत असावा. त्यामुळेच श्रेष्ठ अशा संस्थापकाला तुल्यबळ असलेली त्याच्या अनुयायांची परंपरा खंडित होत असावी.

### ' संतकृपा झाली– '

निसर्गाच्या या नियमाला मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहासात एक असाधारण अपवाद आढळून येतो. हा अपवाद आहे, वारकरी संप्रदायाच्या प्रभावी परंपरेचा. संत

बहिणाबाईंनी या परंपरेवर एक सांग रूपक रचले आहे. संतकृपेने वारकरी सांप्रदायाची भक्कम इमारत उभी राहिली. संत ज्ञानेश्वरांनी भक्तिपंथाच्या मंदिराची पाया भरणी केली. त्यांनीच हे मंदिर उभे केले. संत नामदेव हे स्वतःला ज्ञानेश्वरांचे किंकर किंवा सेवक मानीत होते. नामदेवांनी भक्तिमंदिराचा वाढ-विस्तार केला. मधल्या कालावधीत या वास्तूला अधिक आधाराची आवश्यकता निर्माण झाली. संत एकनाथ त्यासाठी पुढे आले. त्यांनी नाथभागवताचा खांब या मंदिराला लावला. भक्तिभाविकांनी या मंदिराच्या सभामंडपात सुखा-समाधानाने नामसंकीर्तन करावे. संत तुकारामांच्या अभंगाचे गायन करावे. तुकोबा हे या मंदिराचे कळसच आहेत.

संत बहिणाबाईंचा मूळ अभंग असा आहे–

"संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार ॥
जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवता ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥
बहेणी फडकती ध्वजा । निरुपण केले वोजा ॥

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे वारकरी संप्रदायाचे चार प्रमुख आधारस्तंभ होते. त्यांच्या कामगिरीचे महत्त्व बहिणाबाईंनी येथे मार्मिकपणे सूचित केले आहे. ज्ञानदेवांनी या पंथाला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिले. नामदेवांनी पंढरीपासून पंजाब-पर्यंत या पंथाचा प्रसार केला. नाथभागवताच्या आधाराने आणि तुकोबाच्या रससिद्ध अभंगवाणीच्या बळावर या पंथाने जनसामान्यांची मने जिंकली.

संत बहिणाबाईंनी चार पंथप्रवर्तकांचा नामनिर्देश करून यादवकालापासून शिव-कालापर्यंतच्या संतपरंपरेचे संसूचन केले आहे. संत जनाबाईंनी मात्र असाच एक रूपकात्मक अभंग रचून ज्ञानेश्वरकालीन संतमेळा वर्णिला आहे. जनाबाई म्हणतात—

"विठो माझा लेकुळवाळा । संगे गोपाळांचा मेळा ॥
निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ॥
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।॥
गोरा कुंभार मांडीवर । चोखा जीवा बरोबरी ॥
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ॥
जनी म्हणे वो गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ॥

'ज्ञानदेवें रचिला पाया' असे संत बहिणाबाई सांगतात, तर 'पुढे चाले ज्ञानेश्वर' अशी संत जनाबाईंची साक्ष आहे. सारांश संतमेळ्याचे नेतृत्व ज्ञानेश्वरांनी केले, हे त्या दोघींनाही मान्य आहे. मात्र ज्ञानेश्वरांची भावंडे किंवा ज्ञानेश्वर समकालीन संतकवी यांच्यापुरताच हा संतमेळा मर्यादित नाही. निवृत्तिनाथांपासून निळोबांपर्यंत ही संतपरंपरा आहे, असे सांप्रदायिकांचे मत आहे. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू आणि त्यांचे

गुरु निळोबा हे संत तुकारामांचे शिष्य. तेव्हा निवृत्तिनाथ ते निळोबा अशी सुमारे चारशे-साडेचारशे वर्षांची परंपरा या ठिकाणी अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरांची प्रभावळ असे ह. भ. प. ल. रा. पांगारकरांनी या परंपरेला नांव दिले आहे. 'प्रभा (तेज) + आवली (रांग) = प्रभावली म्हणजेच प्रभावळ किंवा तेजस्वी व्यक्तींची परंपरा.

ज्ञानेश्वर (व निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताई ही त्यांची भावंडे.), नामदेव (व त्यांची शिष्या जनाबाई, तसेच त्यांचे पुत्र, सुना, मुलगी इत्यादी कुटुंबीय) गावगाड्यांतील ज्ञानेश्वरकालीन अन्य संत (सावतामाळी, नरहरी सोनार, चोखामेळा व त्यांचे कुटुंबीय, गोरा कुंभार इत्यादी। पुढील काळातले संत एकनाथ (व नाथपंचकातील दासोपंत, विठा रेणुकानंदन इत्यादी), त्यानंतरचे तुकाराम (व त्यांचे संत सांगाती) हे सारेजण तर त्या प्रभावळीत सामावतात, पण आधुनिकांपैकी विष्णुबुवा जोग, सोनोपंत दांडेकर, स्वामी स्वरूपानंद, दादा महाराज साखरे, किसनमहाराज साखरे, गुलाबराव महाराज, धुंडा महाराज देगलूरकर, शंकर महाराज खंदारकर प्रभूती सज्जन ज्ञानेश्वरांच्या या प्रभावळीतच सामावतात. या दृष्टीने ही प्रभावळ अधिक व्यापक आहे; आणि दीर्घकालीनही आहे. असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरांच्या या प्रभावळीची काही पृथगात्म वैशिष्टये आहेत. महानुभाव, दत्त, नाथ व समर्थ या प्रमुख धर्मसंप्रदायांपासून ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीचा हा वारकरी संप्रदाय या वैशिष्टयांमुळे आपले स्वतंत्र स्थान टिकवून राहिला आहे. त्या वैशिष्टयांचा विचार येथे करायचा आहे.

## द्विविध काव्यरचना

या प्रभावळीतील संतकवींनी दोन पातळयांवर काव्यनिर्मिती केली. प्रामुख्याने ज्ञानेश्वरांची प्रभावळ ही अभंगकारांची प्रभावळ आहे; आणि गौणतः ती प्रबंधकारांची प्रभावळ आहे. ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका ही गीता – टीका लिहिली. अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टी हे दोन प्रबंध त्यांनी लिहिले. संत एकनाथांनी श्रीमत् भागवताच्या एकादश स्कंधावर नाथ भागवत हे भाष्य सादर केले. भावार्थ-रामायण आणि रुक्मिणी स्वयंवर हे नाथांचे ग्रंथही कथात्मक प्रबंधच आहेत. रंगनाथ स्वामी मोगरेकर (योगवासिष्ठ), त्र्यंबकराज (बालबोध), रमा वल्लभदास (चमत्कारी टीका), शिवकल्याण (नित्यानंदक्य दीपिका) इत्यादी ग्रंथकार प्रामुख्याने पंडित कवी असले, तरी त्या सर्वांनी ज्ञानदेवांचे ऋण मान्य केलेले आहे.

प्रबंध-रचना करून या प्रभावळीतील कवींनी दोन गोष्टी साधल्या. त्यातून त्यांनी पंडितजनांची प्रज्ञा जिंकली. वारकरी पंथ हा केवळ भोळयाभाबडया भाषिकांचा पंथ नाही, तर त्याला विवेकाचे आणि तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे हे त्यांनी दाखवून दिले. दुसरे म्हणजे, त्यातून त्यांनी मायमराठीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. संस्कृतातील अध्यात्म विद्या समर्थपणाने मराठीतून मांडता येते, हे त्यांनी सिद्ध केले. संस्कृतीच्या कपाटात बंदिस्त असलेली परमार्थविद्या त्यांनी मराठीत आणली. तिचे झरे मराठीच्या माळरानावर झिरपत गेले. मराठी मन त्यात चिंब न्हाऊन निघाले.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीने प्रबंध-रचनेबरोबरच अभंग निर्मितीही केली. 'बापरखुमा देवीवरू' या नाममुद्रेने अंकित झालेले अभंग ज्ञानेश्वरांनी लिहिले. अभंगगाथेचा जणू पायाच त्यांनी रचला. ही गाथा कशी असावी याचा आदर्श वस्तुपाठ ज्ञानेश्वरांनी सादर केला. अभंगाचे जे इवलेसे रोप त्यांनी श्रीक्षेत्र आळंदीच्या द्वारी लावले, त्याचा वेल खरोखरच कालांतराने गगनावरही गेला. 'नामा म्हणे,' 'जनी म्हणे,' 'एकाजनार्दनी' 'तुका म्हणे' अशा नाममुद्रिकांनी या अभंगकाव्याने अवघी पंढरीच नव्हे. तर उभा महाराष्ट्र दुमदुमून गेला. आपापल्या अभंगगाथांतून संतकवींनी आपल्या परमार्थ प्रवासातल्या पाऊलखुणा नोंदवून ठेवल्या. साधक, वंचित आणि सिद्ध या अवस्थांचे चेतोहर चित्रण अभंगांतून संतांनी केले. विठ्ठलाशी तल्लीन होऊन आणि आत्मानंदात हरखून जाऊन संतांनी गाईलेला एक एक अभंग म्हणजे खरोखरच 'पारमार्थिक भावगीत' आहे. सामान्य माणसाच्या काळजाला जाऊन भिडण्याचे भावबळ या अभंग कवितेत आहे.

### व्यापक सहानुभाव

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीने सर्वसामान्य माणसाला उदंड आत्मिक बळ दिले. धार्मिक क्षेत्रातील संधि-समानतेचे दर्शन दोन स्तरांवर घडते. पहिले म्हणजे पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही परामार्थ साधनेचा अधिकार प्राप्त झाला. एकेका संतकवीच्या सहवासाने आणि अनुग्रहाने रससिद्ध संत कवयित्री पुढे आल्या. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी साद घालणाऱ्या संत मुक्ताबाई ज्ञानेश्वरांच्या कनिष्ट भगिनी होत्या. नामयाची दासी जनी अशा शालीनतेने आत्मनिर्देश करणाऱ्या संत जनाबाईचे उभे आयुष्य नामदेवांच्या घरीच व्यतीत झाले. चोखियाची महारीण' अशी नाममुद्रा धारण करणाऱ्या संत सोयराबाई चोखोबांच्या धर्मपत्नी होत्या'. संत कृपा झाली' असे धन्योद्‌गार काढणाऱ्या बहिणाबाईंना तुकोबाचा अनुग्रह लाभला होता. या साऱ्याजणींची अभंगवाणी रसाळ आणि भावमधुर आहे. विठ्ठलभक्तीच्या आनंदलाभामुळे त्यांच्या जीविताची कहाणी सफळ संपूर्ण झाली आहे. 'स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास' असा दिलासा त्यांना लाभला आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राने स्त्रियांना मिळवून दिलेला धर्मक्षेत्रातील हा आत्मविश्वास लक्षणीय आहे.

स्त्रियांच्या बरोबरीने ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीने अठरापगड जातीतील बांधवांना सामावून घेतले. त्यांना धर्मसंकीर्तनाचा अधिकार दिला मात्र 'अठरापगड जाती' ही संज्ञा मोघम आहे. गावगाडा किंवा जुनी ग्रामव्यवस्था बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार यांची मिळून झालेली आहे. कृषिजीवन ज्यांच्या प्रत्यक्ष सहकार्यावाचून अडून राहते, ते बलुतेदार: महार, सुतार, लोहार, चांभार. कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी आणि चौगुला हे बारा व्यावसायिक म्हणजे बारा बलुतेदार किंवा कारु. शेती किंवा कोंडावा ज्यांच्या मदतीशिवाय करता येतो ते बलुतेदार किंवा नारु. त्यामध्ये तेली, तांबोळी, साळी, सणगर, शिंपी, वाणी, गोंधळी, डौऱ्या, भाट, ठक्कर, गोसावी, जंगम, वाजंत्री, मुलाणी, घडशी, कलावंत, तराळ आणि भोई या अठरा व्यावसायिकांचा समावेश होतो.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीत महार (चोखोबा, जनाबाई, निर्मळा, सोयराबाई, बंका इत्यादी), कुंभार (गोरोबा), न्हावी (सेना), सोनार (नरहरी) आणि गुरव (काशीबा : सावतामाळी यांचा लेखक) हे पाच प्रमुख बलुतेदार आहेत. तसेच माळी (सावता), शिंपी (नामदेव), तेली (जोगा), वाणी (तुकोबा) असे चार प्रमुख अलुतेदार आहेत. म्हणजे बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार अशा गावगड्यातील तीस व्यावसायिकांपैकी जेमतेम तिसरा हिस्सा मंडळी या प्रभावळीत आहेत.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीत ब्राह्मण संत आहेत. पण गाववाड्यात ब्राह्मणांचा उल्लेख आलेला नाही. स्वतंत्र वर्ण म्हणून त्यांचा विचार झाला असावा. चांगदेव, सच्चिदानंदबाबा (ज्ञानेश्वरीचे लेखक) विसोबा खेचर, परिसा भागवत, जगमित्र नागा, भानुदास, जनार्दन स्वामी, एकनाथ, बहिणाबाई आणि निळोबा असे आठ ब्राह्मण संत या प्रभावळीत आहेत.

गाववाड्यात ज्यांचा समावेश होऊ शकला नाही, असेही संत या प्रभावळीत आहेत. त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल.

१) ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे यांना वर्ण नाही आणि जातही नाही. संन्याशाचीं पोरे म्हणून त्यांना समाजाने वाळीत टाकलेले आहे. अन्य सर्व संतांना गाववाड्यात लहानमोठे स्थान किंवा दर्जा आहे; पण या भावंडांना असा कोठलाच दर्जा नाही.

२) कान्होपात्रा ही देवदासी ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतीलच आहे. पण गावगाड्यात तिला स्थान नाही.

३) तीन गोष्ट अविध संतांची. दादू पिंजारी, लतिफ शाह, शेख महंमद प्रभृती मंडळी या प्रभावळीतच मोडतात; पण गाववाड्यात अविधाना स्वतंत्र स्थान नाही. उदाहरणार्थ मुसलमान शिकलगार हे लोहारकाम करतात; म्हणून त्यांच्या व्यवसायावरून गावगाड्यात त्यांचे स्थान ठरते.

गावगाड्याच्या संदर्भात या प्रभावळीतील संतांचो वर्गवारी अशी :–

ब्राह्मण (१०), शिंपी (६), कुंभार (१), महार (५), न्हावी (१), माळी (१), सोनार (१), तेली (१), वाणी (१), देवदासी (१), अविध (३) व जातिहीन (४) असे स्थूलमानाने एकूण ३५ संतकवी ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीत होते. (ही संख्या पाच-सहा नावांनी वाढूही शकेल.

या पस्तीस संतांपैकी आठ संत (ज्ञानेश्वर, सच्चिदानंदबाबा, परिसा भागवत, चांगदेव, निवृत्तिनाथ, सोपानदेव, एकनाथ व शेख महंमद) हे सर्वजण जसे प्रबंधकर्ते आहेत, तसेच ते अभंगकर्तेही आहेत. नामदेव, सावता, सेना, तुकाराम इत्यादी उरलेले सर्वजण केवळ अभंगकर्ते आहेत.

## प्रभावळीचा 'भूगोल'

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीचा भूगोल तपासून पाहणे उद्बोधक ठरेल. पंढरपूरच्या संदर्भामध्ये नामदेव, परिसा भागवत, जनाबाई, कान्होपात्रा, चोखामेळा, सेना न्हावी आणि नरहरी सोनार या सात संतकवींचा उल्लेख होतो. पैठणचे एकटे एकनाथ आहेत. जनार्दन-

स्वामी देवगिरीचे, तुकोबा देहूचे, निवृत्तिनाथ ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई हे चार संत आळंदीचे. ज्ञानेश्वरांचा संबध नेवासे या गावाशीही आहे. निवृत्तिनाथांचा संबंध त्र्यंबकेश्वराशी आहे. सोपानदेवांची समाधी सासवडला आहे. मुक्ताबाई नगर जिल्ह्याच्या मेहूणची, चांगदेव पुणतांब्यांचे, सच्चिदानंदबाबा नेवाशाचे, शेख महंमद श्रीगोंदे या गावाचे, निळोबा हा नेवाशाचा. तेव्हा नगर जिल्ह्याशी एकूण सहा संत संबंधित आहेत.

या प्रभावळीचा संबंध सोलापूर जिल्ह्याशी आला आहे. पंढरपूर ही अनेक संतांची जन्मभूमी किंवा कर्मभूमी आहे. गोरोबा कुंभार, तेरढोकीचे, सावता माळी अरणभेंडचे, चोखामेळा मंगळवेढ्याचे, जोगा परमानंद बार्शीचे, त्र्यंबकेश्वराचे निवृत्तिनाथ हे एकटेच नाशिक जिल्ह्याच्या वाटणीला येतात.

नवलाची गोष्ट अशी की, अनेक संतांची मूळ गावे मराठवाड्यात असली तरी त्यांची जन्मभूमी किंवा कर्मभूमी पुणे, सोलापूर, नगर या भागात आहे. ज्ञानेश्वर हे मराठवाड्याच्या आपेगावचे; पण त्यांचे कार्य आळंदीशी संबंधित आहे. जनाबाई परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड या गावची; पण तिची हयात पंढरीसच गेली, याच परभणी जिल्ह्यातली नरसी बामणी ही नामदेवांची मूळ भूमी, पण ती निमित्तमात्र ठरली. त्यांचे कार्यक्षेत्र पंढरीपासून पंजाबपर्यंत विस्तारत गेले. विसोबा खेचर आवंढ्या नागनाथचे. जगमित्र नागा हा परळीवैजनाथचा, जनार्दन स्वामी, तसेच नरहर सोनार हे दोघेही देवगिरीचे, तेव्हा मराठवाड्याच्या वाटणीला नऊ संत येतात. पंढरीशी सात संतांचा अनुबंध आहे. चौघेजण आळंदीशी संबंधित आहेत. नगर जिल्ह्यात सहाजण आहेत. चौघांचा सोलापूर जिल्ह्याशी संबंध आणि नाशिक जिल्ह्याच्या वाटणीला एक संत आला आहे.

'उभ्या महाराष्ट्रातील अठरापगड जातींतून संत पुढे आले' असे मोघम विधान अनेकदा केले जाते; पण ती अत्युक्ती कशी आहे हे वरील तपशीलावरून ध्यानात येईल. मराठी मातीच्या कोणत्या भूभागाला संतत्व अधिक मानवले किंवा संतपणाचे पीक हे महाराष्ट्राच्या कोणत्या भागात अधिक निघाले, याचा हा आढावा विचारार्ह ठरेल.

## ज्ञानेश्वरांचा वारसा

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील संत सज्जनांनी ज्ञानेश्वरांचा कोणता वारसा घेतला; आणि त्यांना तो कितपत झेपला याचा बोध घ्यायला हवा. ज्ञानेश्वरांनी गीतेतील योगमार्ग, ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि भक्तिमार्ग हे परमेश्वर प्राप्तीचे चारही मार्ग ज्ञानेश्वरीत सोपे करून सांगितले. तसेच पहिले तिन्ही मार्ग भक्तीच्या राजमार्गाला त्यांनी आणून पोहोचविले. 'सगळे रस्ते जसे रोमला जाऊन मिळतात', तसे या मार्गांचे सामरस्य त्यांनी भक्तीमध्ये साधले. प्रभावळीतील सर्व संतांची अभंग कविता ज्ञानेश्वरांच्या या विचारधारेत सुस्नात झाली आहे.

संतांनी चमत्कार केले, यापेक्षाही संत होऊन गेले हाच मोठा चमत्कार आहे.

'दळिता कांडितां तुज गाईन अनंता' अशा शब्दांत जनाबाईसारखी एक मामुली मोलकरीण परमार्थाचे पोवाडे गाते. हाच मोठा चमत्कार आहे. मध्ययुग ते अंधारयुग होते. शेतकरी आणि त्यांच्या नांगराचा फाळ यांची किंमत येथे सारखीच मानली जात होती. किंबहुना नांगराचा फाळ महाग होता त्याला बंदा रुपया मोजावा लागत होता. माणूसच मातीमोल होता. दैन्य, दारिद्रय, वैकल्य आणि वैफल्य यांनी लौकिक जीवनात तो गांजला होता. अशा वेळी विठ्ठलाच्या पायाशी सर्वांनाच जागा आहे, देवाच्या दरबारात माणूस हा इथून तिथून एक आहे, असा दिलासा संत कवींनी सामान्य माणसाच्या मनात निर्माण केला. नामदेवांसारखा शिंपी, नरहरीसारखा सोनार किंवा गोरोबासारखा कुंभार हा आपल्याप्रमाणेच स्वतःच्या पोटापाण्याचा धंदा सांभाळून विठ्ठलाची भक्ती करतो, आणि भजन करताना त्याचे शिंपीकाम, सोनारकाम किंवा कुंभारकाम व्यवस्थित चालू असते, हे लोकांना जाणवले. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालता येते हे त्यांना उमगले. 'कांदा, मुळा आणि भाजी हीच माझा विठाबाई आहे' हे सावतोबांचे म्हणणे लोकांना पटले. 'देह बागेसरी जाणे! अंतरात्मा नाम सोने' या नरहरी सोनाराच्या उद्‌गारातील मर्म त्यांना मनोमन समजले. संतजन हे आपल्यासारखेच सामान्य प्रापंचिक असूनही परमार्थाची पदवी त्यांनी प्राप्त करून घेतली, हे लोकांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यातून त्यांचा भिणेभाव पळाला. त्यांचा आत्मविश्वास वाढला. आकांक्षेची ज्योत पेटली. त्यामुळे महाराष्ट्राचे चित्र काहीसे बदलले. संतांच्या अभंगवाणीने पांडित्यापेक्षा जीवनानुभूतीला अधिक महत्त्व दिले. व्युत्पन्नतेपेक्षा अंतःकरणप्रवृत्ती त्यांनी प्रमाण मानली. तत्त्वजडतेपेक्षा साक्षात्कार त्यांनी अधिक महत्त्वाचा मानला. संतांच्या प्रभावळीचे हे विवेक मंडण महाराष्ट्राला मानवले. पारमार्थिक लोकशाहीची पायाभरणी त्यातून घडू शकली

ज्ञानेश्वरांच्या उदात्त जीवनदृष्टीचा प्रभाव त्यांच्या प्रभावळीतील संतजनांच्या कवितेवर पडला आहे. या संदर्भात ज्ञानेश्वरीतील पसायदानाचे उदाहरण पुरेसे होईल. कुसुमाग्रज सांगतात त्याप्रमाणे हे पसायदान म्हणजे ज्ञानेश्वरीच्या उत्तुंग देवळाचा कळस आहे. आपण पसायदानाशी येतो, तेव्हा चैत्रातील सुंदर सोनेरी सकाळ आपल्याभोवती उजाडत आहे असे वाटते. दुष्टजनांच्या मनातले तिमिर नष्ट व्हावे, विश्वाला स्वधर्माच्या सूर्याचे दर्शन घडावे, प्राणीमात्रांत परस्परांचे मैत्र जडावे आणि ज्याला जे हवेसे वाटते ते त्याला लाभावे असे प्रसादाचे मागणे ज्ञानेश्वर मागतात.

ईश्वरनिष्ठाच्या मांदियाळीतील सर्वच संतांनी या पसायदानाचा पाठपुरावा केला आहे. संत नामदेव म्हणतात–

"आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा।
माझिया सकळा हरीच्या दासा॥
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी।
हे संत मंडळी सुखी असो॥
अहंकाराचा वारा न लागो राजसा।
माझ्या विष्णुदासा भाविकासी॥

नामा म्हणे तया असावे कल्याण ।
ज्या मुखी निधान पांडुरंग ।।

ज्ञानेश्वरांच्या पसायदानाप्रमाणे नामदेवांच्या या कल्याणचिंतनात आदर्श विश्व-व्यवस्थेचे एक सुंदर स्वप्न रंगवलेले आहे. या स्वप्निल मन:स्थितीत तुकोबांनाही वृक्षवल्ली आणि वनचरे ही आपली सोयरी-धायरी असल्याचा प्रत्यय येतो.

मराठी संतांचे हे पसायदान आधुनिक कवींनीही सादर केले आहे. केशवसुत म्हणतात,

" सावलीत गोजिरी मुले ।
उन्हात दिसती गोड फुले ।।
बघता मन हर्षून डुले ।
ती माझी, मी त्यांचा, एकच ओघ आम्हांतुनि वाहे । "

याच जाणिवेतून ' मानव तेही मानव आम्ही ' असे कवी अनिल यांनी म्हटले आहे.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील संतकवींच्या जीवनदृष्टीतील या साधर्म्याप्रमाणे त्यांची काव्यदृष्टीही एकरुप आहे.

" प्रांजळ ओवीप्रबंधे । गोष्टी सांगिजेल विनोदे ।
निवृत्तिप्रसादे । ज्ञानदेवो म्हणे ।। "

(ज्ञानेश्वरी : २१-१०७)

माझे गुरु निवृत्तिनाथ यांच्या चरणकृपेने ही भारत कथा सुगम अशा ओवी छंदात मी सुलभतेने सांगेन, असे ज्ञानेश्वर सांगतात. " आता त्याचे कृपावसे येईल वाचे सरिसे । कळेल काही तैसे निवेदीन " (नामदेव गाथा : तीर्थावळी अभंग ९२४) श्रीविठ्ठलाच्या कृपाप्रसादाने सहजपणे माझ्या वाणीतून जे प्रगटेल, तसेच माझ्या अल्पमतीला जेवढे समजेल, तेच तेवढे मी अभंगातून सांगेन, असे संत नामदेव म्हणतात. " साळुंखी मंजुळ बोलतसे वाणी । बोलविता धनी वेगळाचि ।। " अशी तुकोबांची साक्ष आहे.

**समारोप**–

या प्रभावळीतील संतजन लोकोद्धाराच्या तळमळीतून आपल्याजवळचा परमार्थाचा ठेवा सर्वांना खुला करीत आहेत. ' विश्व हे मोहरे लावावे ' अशी ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा आहे. ' ज्ञानदीप लावू जगी ' असा निर्धार नामदेव व्यक्त करतात. " बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणवुनि कळवळा आम्हा लागी ।। " या जाणिवेने तुकोबा ' सेवितो हा रस वाटितो आणिका ' असा पुकारा करतात.

ज्ञानेश्वरप्रभृती संतांनी महाराष्ट्रास नवे जीवनदर्शन घडवले. विविध मानवी मूल्यांतील समतोल व समन्वय साधून संतांनी मराठी माणसाच्या जीवनाचे संवर्धन केले. संत वैदिक आहेत, पण वेदांचा कर्मठपणा त्यांच्याजवळ नाही. त्यांची भक्तिकल्पकता प्रवृत्तिपर आहे. पण सकाम भक्तीचे त्यांना वावडे आहे. ते आतुर भक्त आहेत; पण भीतिजन्य उपासना आणि स्वार्थसापेक्ष श्रद्धा त्यांना नको आहे. शैव वैष्णववादाला मूठमाती देऊन

तसेच क्षुद्र दैवतांच्या उपासनेचा निषेध करून संतांनी एकेश्वरवादाचे प्रवर्तन केले. पण त्याबरोबरच सर्वसमावेशक भक्तीची प्रतिष्ठापनाही त्यांनी केली. ज्ञानेश्वरांनी पुरस्कारिलेला हा भागवतधर्म कालप्रवाहात खंबीरपणे टिकुन राहिला, एवढेच नव्हे तर सतत वर्धिष्णू होत राहिला. हा ज्ञानदीप सतत तेवत ठेवण्याचे लाख मोलाचे काम ज्ञानेश्वरांच्या प्रभावळींतील संतांनी अखंडपणे चालू ठेवले. परतत्त्वाच्या स्पर्शाने पल्लवित झालेला ज्ञानेश्वरांचा भक्तिपंथ त्यामुळेच तुम्हा आम्हा मराठी माणसांचा वारसा बनला आणि ज्ञानेश्वरांचे हे धर्मसंकीर्तन सिद्धीस गेले.

□□□

नऊ

# एकनाथ – पंचक

**संत एकनाथ । दासोपंत । रामा जनार्दन । विठा रेणुकानंदन । जनी जनार्दन । समारोप.**

संत एकनाथ (इ. स. १५३३ ते १५९९) हे मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक अस्मितेचे आणि सांस्कृतिक एकतेचे एक प्रमुख शिल्पकार होत. एकनाथांची म्हणून एक स्वतंत्र प्रभावळ आहे. नाथपंचक आणि नाथ परंपरेतील अन्य कवी यांच्यातून ही प्रभावळ सिद्ध होते. दासोपंत, रामा जनार्दन, विठा रेणुकानंदन, जनी जनार्दन आणि स्वत: एकनाथ अशा पाच जणांचे मिळून 'नाथपंचक' मानले जाते. महालिंगदास, कृष्ण याज्ञवल्की, मधुकर कवी, मृत्युंजयस्वामी, त्र्यंबकराज, शिवकल्याण, माधवदास, कृष्णदास मुद्गल, रंगनाथस्वामी, रमावल्लभदास, मोरया गोसावी, लोलिंबराज, सदानंद, रामानंद, शीतलिंग, अमृतानंद, श्रीपतिदास आणि मुद्गल दादोसुत हे अठरा अन्य कवी, हे सर्व मिळून नाथांच्या प्रभावळीत समाविष्ट होतात.

नाथ-वाणीच्या प्रासादिकतेने त्यांच्या समकालीनांची जीवने आणि कवने भारावून गेली. तसेच नाथांचे असाधारण कर्तृत्व, विमल चारित्र्य आणि विविधरूपिणी ग्रंथसंपदा उत्तरकालीन कवींनादेखील प्रेरक ठरली. त्यांच्या जीवनावर आणि काव्यलेखनावर एकनाथांचा प्रभाव पडला. त्यामुळे त्या सर्वांचा समावेश एकनाथांच्या प्रभावळीत करता येतो.

या प्रभावळीपैकी नाथपंचकातील दासोपंत, रामा जनार्दन, विठा रेणुकानंदन आणि जनी जनार्दन या चार प्रमुख कवींचे व्यक्तित्व व कवित्व यांचा परामर्श येथे घेतला आहे.

**दासोपंत** (शके १४७३ ते १५३७)

एकनाथपंचकातील नाथांच्या खालोखाल महत्त्वाचा असा हा कवी आहे. नाथांचा तो गुरुबंधू असून नाथांना तो 'दयेचे अधिष्ठान' समजतो. दासोपंतांचे चरित्र व त्यांचे वाङ्मय यांच्या अभ्यासाची प्रमुख साधने पुढीलप्रमाणे आहेत.

१) **दासोपंत : चरित्र आणि वाङ्मय** (शोधनिबंध) – डॉ. स. ल. कात्रे, (मराठी संशोधन–पत्रिका, मुंबई, वर्ष २२, अंक १, ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर १९७४, पृ. १–२१.)

२) **मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा,** १९३५ – ल. रा. पांगारकर (पृ. १४३–१७४)

३) **महाराष्ट्र सारस्वत, आवृत्ती पाचवी.** १९६३–वि. ल. भावे (पृ. २२५–२३६) पुरवणी–शं. गो. तुळपुळे. (पृ. ७७५–७७७)

वरील साधनांच्या आधारे दासोपंतांचे जीवनवृत्त व त्यांची काव्यसंपदा यांचा परिचय येथे करून दिला आहे.

दासोपंतांचा जीवनपट सलगपणे उलगडून दाखविण्याइतपत त्यांची माहिती उपलब्ध आहे. वडील दिगंबरपंत देशपांडे हे बेदर पातशाहीतील नारायण पेठ गावचे संपन्न गृहस्थ होते. हे देशपांडे घराणे देशस्थ ब्राह्मण होते. दिगंबरपंतांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई. भाद्रपद कृष्ण अष्टमी, शके १४७३, सोमवार या दिवशी दासोपंतांचा जन्म झाला. त्यांची मुंज वयाच्या पाचव्या वर्षी व लग्न सोळाव्या वर्षी थाटाने झाले. पण दासोपंतांच्या विवाहाच्या वर्षी बेदर प्रान्तात दुष्काळ पडला. दिगंबरपंतांकडे गावचे देशपांडेपण होते. त्यांनी भूतदयेने सरकारी खंडाचे, दोन लाख रुपयांचे धान्य गोरगरिबांस वाटून टाकले. पण त्यामुळे रसद वेळेवर पोहोचली नाही. त्यानंतर पादशहाने दासोपंतास ओलीस ठेवून घेतले. महिनाभरात रकमेचा भरणा केला नाही, तर दासोपंतास बाटवून मुसलमान केले जाईल, अशी धमकी दिली. त्या बंदिप्राय अवस्थेत दासोपंतांनी दत्तात्रेयाची आराधना केली. दत्ताने कृपा केली व रसदीची परस्पर व्यवस्था करवून दासोपंतांचे संकट दूर केले. आपल्याकरिता परमेश्वरास क्लेश पडले; पण त्याचे दर्शन मात्र घडले नाही, याची खंत त्यांच्या मनास वाटत राहिली. एका मध्यरात्री ते कोणासही न कळवता घराबाहेर पडले.

अनेक क्षेत्रांच्या ठिकाणी हिंडत हिंडत दासोपंत दत्तात्रेयाचे सिद्धक्षेत्र मातापूर (माहूर) येथे गेले. तेथे त्यांनी बारा वर्षे प्रखर तपाचरण केले. तेथेच त्यांना ईश्वरी दृष्टान्त झाला. पुढे राक्षसभुवनला जाऊन त्यांनी दत्ताच्या पादुका घेतल्या. नंतर भक्त–भाविकावर अनुग्रह करीत अनेक क्षेत्रस्थाने त्यांनी धुंडाळली. वाणीसंगम या क्षेत्री त्यांची

माता, पिता व पत्नी यांच्याशी भेट झाली. त्यांना घेऊन ते आंबेजोगाईस गेले; व तेथेच राहू लागले. त्यावेळी त्यांचे वय पस्तीस वर्षांचे होते.

येथून पुढची तीस वर्षे दासोपंतांनी भक्तांना मार्गदर्शन करण्यात व ग्रंथलेखनात घालविली. रोज या लेखनासाठी त्यांना एक ढबू पैशाची शाई लागे, अशी आख्यायिका आहे. त्यांच्या पारमार्थिक अधिकाराची आणि व्यासंगशीलतेची कीर्ती सर्वत्र पसरली. एकनाथांनी आंबेजोगाईस जाऊन त्यांची भेट घेतली.

वयाच्या पासष्टाव्या वर्षी आंबेजोगाईस माघ वद्य षष्ठी, शके १५३७, गुरुवार या दिवशी दासोपंत समाधिस्थ झाले. त्यांच्या अंतसमयी त्यांचे दोन्ही मुलगे, असंख्य शिष्य व चाहते त्यांच्याजवळ होते. आंबेजोगाईस नृसिंहतीर्थाजवळ दासोपंतांची समाधी आहे.

दासोपंतांच्या नाममुद्रेविषयी थोडा खुलासा केला पाहिजे. एक तर या कवीच्या कोणत्याही ग्रंथात 'दासोपंत' हे नाव आढळत नाही. 'दिगंबरानुचरु', 'दिगंबरु' किंवा 'दास' या मुद्रिका मात्र आल्या आहेत. त्यावरून 'दास' या नावाचेच लोकांनी आरंभी 'दासो' व पुढे 'दासोपंत' असे रूप बनविले असावे. (जसे, दत्त-दत्तो-दत्तोपंत), दुसरे असे की, या कवीचे नाव दास किंवा दासो व त्यांच्या वडिलांचे नाव दिगंबर असे असले, तरी 'दासोदिगंबर' म्हणजे हा कवी नव्हे. 'दासोदिगंबर' हा अगदी वेगळा कवी असून त्याने 'संतविजय' नामक ग्रंथ (नाभाजीच्या 'भक्तमाला'चा उपयोग करून) लिहिला आहे; तसेच तो स्वतःची कोणतीही माहिती अथवा ग्रंथरचनाकाल देत नाही. गीतार्णवकार दासोपंत हा नाथकालीन कवी असून त्याचा व या दासोदिगंबराचा काहीही संबंध नाही.

## ग्रंथसंपदा

संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांतून दासोपंतांनी प्रचंड ग्रंथरचना केली आहे.

### संस्कृत ग्रंथ

१) **प्रणवव्याख्या** – ॐकाराची तत्त्वचर्चा करणारा प्रवचनपर ग्रंथ.
२) **गायत्रीमंत्रभाष्य** – वैदिक गायत्री मंत्रावरील सविस्तर टीकाग्रंथ.
३) **पुरुषसूक्तार्थप्रकाश** – सृष्टीचे उत्पत्तिविज्ञान विशद करणारा पुरुषसूक्तावरील भाष्यग्रंथ.
४) **उपनिषदर्थप्रकाश** – वैदिक उपनिषदांवरील भाष्यग्रंथ.
५) **बोधप्रक्रिया** – वेदान्त चर्चात्मक ग्रंथ
६) **दत्तात्रेयमहात्म्य** – दत्तात्रेय अवतारांची व दत्तोपासनेची महत्ता सांगणारा ग्रंथ.
७) **सिद्धराजागम्** – दत्तोपासनेचे तंत्रशास्त्र सांगोपांग विशद करणारा प्रचंड ग्रंथ.
८) **अद्वैत श्रुतिसार** – दत्तोपासनेच्या मुळाशी असलेले दार्शनिक सिद्धान्त विशद करणारा निबंध ग्रंथ.

९) **गीतार्थबोध** – गीतेवरील विस्तृत भाष्यग्रंथ.

१०) **दत्तात्रेयसहस्रनाम स्तोत्र** – शंकराचार्यांच्या विष्णुसहस्रनामस्तोत्रभाष्याच्या धर्तीवर लिहिलेला विस्तृत टीकाग्रंथ.

या ग्रंथसंपदेशिवाय गीतास्तोत्र. गुरुस्तोत्र, षोडशस्तोत्र. भक्तिराजकवच, वज्रपंजरकवच इत्यादी अनेक स्तोत्रे, तसेच दशोपनिषद्भाष्य, दत्तजन्मप्रस्ताव इत्यादी प्रकरणे दासोपंतांच्या संस्कृत रचनेच्या सूचीमध्ये दिली जातात. पण ही सारी स्फुट रचना या कवीच्या मोठ्या संस्कृत ग्रंथरचनात अंतर्भूत असावी व भक्तांच्या सोयीसाठी म्हणून ही काही पृथक् हस्तलिखिते तयार झाली असावीत, असे डॉ. कात्रे यांचे म्हणणे आहे.

**मराठी ग्रंथ**

दासोपंतांची मराठी ग्रंथसंपदाही अफाट आहे. या रचनेचे केवळ विहंगदर्शन घेणे शक्य आहे.

१) **गीतार्णव** : कवीने गीतेला 'अर्णव' म्हणजे 'समुद्र' असे म्हटले आहे. तसेच 'दासोपंतीं केला गीतार्णव मानवा सवा लाख' असे मोरोपंतांनी सांगितले आहे. त्यावरून प्रस्तुत ग्रंथाच्या प्रचंड स्वरूपाची कल्पना येईल. सारस्वतकारांनी आपल्या 'महाराष्ट्र कविमाले'त या ग्रंथाच्या एकंदर तेरा हजार ओव्या प्रसिद्ध केल्या आहेत. यात कित्येक मनोरंजक कथा आहेत. ज्ञानेश्वरी व गीतार्णव ही दोन्ही गीताभाष्येच खरी; पण दोहोंच्या भूमिकांत फार फरक आहे. 'प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती' असा श्रोत्यांचा गौरव करून ज्ञानेश्वरांनी आपले व्याख्यान त्यांना सांगितले; तर 'न पाहे श्रोतयांचे वदन' अशी दासोपंतांची प्रतिज्ञा आहे. 'हा एवढा ग्रंथ दासोपंताने दूर डोंगरात वसून केवळ कडुलिंबाची पाने व फळे यावर राहून लिहिला,' असे कै. भावे सांगतात. 'भाष्यकारांतें वाट पुसतु' आपण गीताभाष्य सांगितले, असे ज्ञानेश्वर सांगतात; तर 'न करीं भाष्याधारें विवरण। स्वस्वानुभवें हें मनन' असे दासोपंत बजावतात. पण ज्ञानेश्वरांप्रमाणेच दासोपंतांनाही मराठीचा उत्कट अभिमान आहे. संस्कृतांत नुसता 'घट' हा शब्द आहे; पण हारा, डेरा, रांजण, मुडा, पगडा, सुगड, घागरी इ. घटभेद दाखवावेत मराठीनेच! गोटा, चिरा, गारगोट्या, सिरसाळा, किनरी इत्यादी पाषाणप्रकारही जिला स्पष्ट करता येत नाहीत, ती संस्कृत भाषा अजाणत्यांना जाणते करण्यास उपयोगी पडायची नाही, असे काहीसे गमतीचे तर्कशास्त्र या संदर्भात त्यांनी लढविले आहे.

दासोपंतांचे भाषाप्रभुत्व व त्यांची वर्णनशैली यांची चांगली ओळख गीतार्णवात पटते. सुमारे शंभर ओव्यात कवीने रेखाटलेले एका पुराणिकाचे सुंदर शब्दचित्र कै. भावे यांनी उद्धृत केले आहे. तसेच कवीच्या शुद्ध मराठीचा नमुना म्हणून अनेक वर्णनप्रसंग पांगारकरांनी उद्धृत केले आहेत. वृक्षावर बसलेला राक्षस पाहून भयभीत झालेल्या लोकांचे हे वर्णन पहा :

अवचट देखिना नयनीं। जैसा टसवला होता मनीं॥
दचकू गेला अंत:करणीं। भूलि आली॥

श्रवणीं बैसली टाळी। शरीर पडलें भूमंडळीं।
गात्रें कांपतीं हृदयउखळीं। कांडिती प्राण॥
नयनीं पडली झांपडी। कढती सर्वांगींच्या नाडी।
रसनेची जाली घडी। शब्दु हारपला॥

क्षेत्र-क्षेत्रज्ञ, सद्‌गुरुमहिमा, पंचीकरण, साधनयोग, जीवन्मुक्तदशा, अभेदावस्था, समाधियोग इत्यादी जटिल विषयांचे दासोपंतांनी केलेले विवेचन सहजसुंदर उतरले आहे. 'एका अधिकारी, विद्वान् व धार्मिक हरिदासाचे हे एक मोठे थोरले गीतादेवीचे कीर्तनच आहे.'

२) **गीतार्थचंद्रिका :** एकट्या गीतेवरच दासोपंतांच्या पाच-सहा टीका आहेत. असे कै. भावे सांगतात, पण त्यांपैकी गीतार्णव व गीतार्थचंद्रिका या दोनच टीका प्रत्यक्ष उपलब्ध झालेल्या आहेत.

गीतार्थचंद्रिकेची ओवीसंख्या सुमारे नऊ हजार आहे. मूळ गीतेप्रमाणे हिचे अठरा अध्याय आहेत. या टीकेत गीताश्लोकावर प्रथम संस्कृत भाष्य व नंतर मराठी टीका असा क्रम आहे. या ग्रंथाचा केवळ पहिला अध्याय औरंगाबादच्या मराठवाडा साहित्य परिषदेने प्रसिद्ध केला आहे.

३) **पदार्णव :** दासोपंतांनी रचलेल्या भक्तिपर व अद्वैतप्रतिपादनपर पदकवनांचा हा संग्रह आहे. मुळात सव्वा लाख पदे होती असे म्हणतात. सध्या सुमारे तीस हजार पदे उपलब्ध आहेत. त्यापैकी कै. भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वत' मासिकात १३९४ पदे छापली, व वाईचे काशिनाथ वामनशास्त्री लेले यांनी स्वतःच्या 'मोदवृत्त' छापखान्यात १६०५ पदे १९०७ च्या सुमारास छापून प्रसिद्ध केली. ही पदे मराठवाड्यात लोकप्रिय असून तिकडील भक्तांच्या नित्य पठनात आहेत.

'सुंदरू आणि सावळा। भाळी टिळकु पिवळा,' 'आठवसी प्रतिक्षणी। प्रीति भरली सगुणी', 'निढळावरी बाहें। वाटुली मी पाहे', 'बहुत दिवस क्रमिले सखये। मी काय करू?', 'जातयां येतयां मी पुसैन वाटुली', 'प्रेम दे मज प्रेम दे। सर्व सुखमय प्रेम दे' इत्यादी पदांची माधुरी अवीट आहे. देवभक्तांच्या एकांतात, रुसव्याफुगव्यात व आत्मरंगात स्फुरलेली ही पदे भक्तीच्या सुगंधाने दरवळणारी आहेत.

४) **ग्रंथराज** – या ओवीबद्ध ग्रंथाचे आठ अध्याय असून एकंदर ओवीसंख्या सुमारे बाराशे आहे. हा ग्रंथ वेदांतपर आहे. नीती, सदाचार, संसाराची नश्वरता इत्यादी विषयांवरील प्रवचने या ग्रंथात मनोरंजकपणे व समरसतेने केलेली आहेत. या ग्रंथाचा परिणाम रामदासांवर विशेष दिसतो. दासोपंतांचा हा ग्रंथराज समर्थांच्या दासबोधाचा पूर्वावतार कसा आहे, हे पांगारकरांनी मार्मिकपणे दाखवून दिले आहे. दासोपंतांच्या 'प्रतीती' व 'प्रबोध' या संकल्पनांना रामदासांनी 'प्रयत्नां'ची जोड दिली. दासोपंतांच्या हरिकथा-निरूपणाबरोबर राजकारण, सावधपण व साक्षेप यांचे महत्त्व सांगून समर्थांनी दासबोधाची मांडणी केली. दासबोधाचे त्यांनी 'ग्रंथराज' हे जे दुसरे नाव ठेवले, त्याचेही

मूळ दासोपंतांच्या ग्रंथराजातच आहे; तसेच समर्थांच्या 'रामदास' या नाममुद्रेतील 'दास' हे पद म्हणजे दासोपंतांच्या नाममुद्रेचा प्रतिध्वनी आहे. दासोपंतांचा 'ग्रंथराज' कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी संपादिला असून तो शके १८३६ मध्ये भारत इतिहास-संशोधक मंडळाने प्रसिद्ध केला आहे.

५) **पंचीकरण ऊर्फ 'पासोडी'** : पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या मूळ पाच महातत्त्वांचे विभिन्न अंशांत परस्परात मिश्रण होऊन हे दृश्यमान होणारे विश्व कसे उत्पन्न झाले, हा विषय वेदांतशास्त्रात 'पंचीकरण' म्हणून ओळखला जातो. या विषयावर अनेक मराठी कवींनी लहानमोठी पंचीकरणे रचली आहेत.

दासोपंतांचा हा ग्रंथ पंधराशे ओव्यांचा आहे. त्यांनी स्वहस्ते या ग्रंथाचे लेखन, चार फूट रुंद व चाळीस फूट लांब अशा आकाराच्या एका सलग, जाड चादरीवर केले असून, हा पटलेख दासोपंतांची 'पासोडी' म्हणून ओळखला जातो. हे ग्रंथलेखन कवीने सचित्र व कलात्मक रीतीने केले आहे. हा ग्रंथ याच नावाने न. शे. पोहनेरकर यांनी संपादिला असून काही वर्षांपूर्वी भूतपूर्व निजाम-हैदराबाद शासनाने तो प्रकाशित केला आहे. 'दासोपंतांची पासोडी हे मराठीचे महावस्त्र आहे', असे डॉ. तुळपुळे यांनी 'सारस्वतपुरवणी'त (आ. ५ वी, पृ. ७७७) मार्मिकपणे म्हटले आहे.

६) **पंचीकरणप्रबोधन** : ही एक वेगळी रचना दासोपंतांच्या नावावर नमूद आहे. पण ती उपलब्ध मात्र झालेली नाही.

७) **दत्तमहात्म्य** : दत्तजन्माख्यान व कौशिकमुनीच्या पतिव्रतेचे मार्कंडेय पुराणातील उपाख्यान असे दोन विषय या ग्रंथात आले आहेत. त्याचे सहा अध्याय असून ओवी-संख्या ५४८ आहे. विशेष म्हणजे, एवढ्याच एका ग्रंथात कवीची प्रवृत्ती विस्ताराऐवजी संक्षेपाकडे अधिक आहे. यातील प्रसंगवर्णन, स्वभावचित्रण व संवादलेखन सुरस व मनोवेधक आहे. प्रस्तुत ग्रंथ 'मराठी संशोधन पत्रिके'तून (व. १९ अं. ४, व. २० अं. १, २ व ४; व. २१ अं. २ व ३) क्रमशः प्रसिद्ध झाला आहे.

८) **अवधूतराज** : या ग्रंथाचे २२ अध्याय असून ओवीसंख्या पाच हजार आहे. 'अवधूत' संज्ञक दत्तावतारांचे चरित्र व उपासना याचे विवेचन यात असावे अशी नोंद आढळते. पण प्रत्यक्ष ग्रंथ मात्र उपलब्ध झालेला नाही.

९) **प्रबोधोदय** : हा ग्रंथ ओवीबद्ध असून त्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. ग्रंथ अद्वैत तत्त्वज्ञानविषयक असावा, अशी नोंद मिळते.

१०) **वाक्यवृत्ति (गद्यात्मक)**

११) **वाक्यवृत्ति (पद्यबद्ध)** : प्रस्तुत ग्रंथ वेदान्तपर आहे. तो पद्यात्मक नसून गद्यात्मक आहे, हे विशेष होय, असे कै. भावे लिहितात. पण शंकराचार्यांच्या सुप्रसिद्ध 'वाक्यवृत्ति' या ग्रंथावर या अनुक्रमे गद्यमय नि ओवीबद्ध विस्तृत व्याख्या असाव्यात असे डॉ. कात्रे सांगतात.

१२) **सार्थ गीता** : गीतेचा अर्थ या ग्रंथात अठरा अध्यायांत दिला असावा. पण तो गद्यात की पद्यात, हा प्रश्नच आहे. याशिवाय स्थूलगीता, अवधूतगीता, अनुगीता या दासोपंतांच्या मराठी रचना असून, याच नामांच्या संस्कृत गीता-ग्रंथांची ती ओवीबद्ध रूपान्तरे असावीत.

महापूजा, मंगलमूर्तिपूजा, मानसिक पूजा, यंत्रपूजा, अत्रिपंचक, प्रधानयंत्र, सिद्ध-मालामंत्रस्तोत्र इत्यादी प्रकरणेही दासोपंतांनी लिहिली असून, पूजनविधी, पूजासंज्ञक स्तोत्रे, नामावळ्या वगैरे विषय त्यात आले आहेत. वाङ्मयीन दृष्ट्या या प्रकरणाचे फारसे महत्त्व नाही; पण दासोपंतांच्या उपासनासंप्रदायाच्या तंत्राचे स्वरूप त्यावरून समजण्यासारखे आहे.

दासोपंतांच्या ग्रंथसंपत्तीचे उल्लेखनीय विशेष पुढीलप्रमाणे आहेत.

१) ही ग्रंथरचना अक्षरशः प्रचंड आहे. आंबेजोगाईत उपलब्ध झालेल्या त्यांच्या संस्कृत अनुष्टुभ रचनांचे ग्रंथमान एक लक्ष असून मराठी ओवीसंख्या चार लक्ष असावी, असा तज्ज्ञाचा अंदाज आहे.

२) कवीचे सर्व सिद्धान्तप्रतिपादन शंकराचार्यांच्या अद्वैतमतास धरून आहे. पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, कोटिक्रम, आक्षेप, परिहार, समन्वय व निष्कर्ष या क्रमाने प्रत्येक लहानमोठ्या कूटस्थळांचे विस्ताराने विशदीकरण करण्याची कवीची पद्धती आहे.

३) या दार्शनिक विवेचनाबरोबरच व्यवहारज्ञान सांगणारी प्रवचनेही कवीच्या लेखनात जागोजागी येतात. दृष्टान्त देताना कवी अनेक संवादात्मक कथा व आख्यायिका सांगतो; तसेच लोकव्यवहारावर भाष्य करतो.

४) दासोपंत हे संस्कृत भाषेचे महापंडित होते. संस्कृतातील त्यांचे टीकाग्रंथ, वेदान्तपर प्रबंध आणि तंत्रशास्त्रविषयक निबंध त्यांच्या पांडित्याचा प्रत्यय आणून देणारे आहेत.

५) दासोपंतांना मराठीचा जाज्वल्य अभिमान आहे. मराठी ही केवळ व्यावहारिक-दृष्ट्या सोयीची आहे, एवढेच नसून संस्कृतपेक्षा ती अधिक समृद्ध व उपयुक्त अशी भाषा आहे, हे त्यांनी कोटिक्रमाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

६) एकनाथांविषयी दासोपंतांनी परमादर व्यक्त केला आहे. ‘नमो एकनाथ पंत सत साधु भला रे।’ असे त्यांचे एक पद आहे. नाथांच्या द्वारी प्रत्यक्ष दत्तात्रेय हे चोप-दारांच्या वेषांत उभे आहेत, असा दासोपंताना दृष्टान्त झाला होता; व त्यानंतर नाथां-विषयी त्यांना आदर वाटू लागला, अशी एक आख्यायिका आहे.

नाथांप्रमाणेच दासोपंतांनी प्रवंधरचनेबरोबर स्फुट कविताही लिहिली आहे. दोघांनीही मराठी भाषेविषयीचे आपले प्रेम स्पष्टपणे प्रकट केले आहे. उपासनेच्या बाबतीत पाहिले, तर दोघेही दत्तभक्त होते. एक फरक मात्र जाणवतो; नाथ लोकोन्मुख होते,

समाजमनस्क होते; दासोपंत या बाबतीत सर्वस्वी विमनस्क वाटतात. 'मानेल तेणें घ्यावें, नावडे तेणें नेघावें,' असा तुटकपणा त्यांनी दाखविला आहे. निंदक व वंदक हे दोन्ही श्रीगुरूसमान मानणारे एकनाथ लोकप्रिय झाले. दासोपंताचे प्रमुख ग्रंथ विस्तारशील असल्यामुळे व त्यांच्या काहीशा एकलकोंड्या मनोवृत्तीमुळे स्वत: ते व त्यांचे ग्रंथ बरीच वर्षे मागे पडले. औरंगाबादची मराठवाडा साहित्य-परिषद व मुंबईचे मराठी संशोधन मंडळ या संस्थांनी 'काळाच्या मुखी पडत चाललेले' दासोपंती वाङ्मय प्रकाशात आणण्याचा उपक्रम अंगीकारलेला आहे, असे दिसते.

## रामा जनार्दन (शके १४९१ चा सुमार)

"नाथपंचकातल्या रामा जनार्दनस्वामीविषयी तर आपणास मुळीच काही माहिती नाही. याची अनंतभुजाची आरती व ज्ञानेश्वरांची आरती अशा दोन आरत्या मात्र प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरावर याने आरती रचिली आहे. यावरून एकनाथांप्रमाणेच या रामा जनार्दनाचेही ज्ञानेश्वरांवर आणि त्यांच्या ग्रंथांवर फार प्रेम होते, असे म्हणण्यास हरकत नाही." सारस्वतकार भावे यांनी दिलेली रामाजनार्दनांची माहिती एवढीच आहे.

खानदेशातील रामाजी जनार्दन या लेखकाने आळंदीस शके १५६५ मध्ये ज्ञानेश्वरीची जी हस्तलिखित प्रत तयार केली, ती प्रत पुण्यास आनंदाश्रमात ठेवलेली आहे; पण हे रामाजी जनार्दन म्हणजे आपले रामा जनार्दन नव्हेत.

रामा जनार्दन हे जनार्दनस्वामींचे 'स्वकुलगोत्र' शिष्य होते, असे श्री. वि. वा. जोशी सांगतात. रामा जनार्दनांच्या पूर्वजांचे मूळ गाव गंगातीरी 'ओझरे' म्हणून होते. पुढे ते पाटण येथे राहू लागले. त्यांचे मूळ आडनाव बहुकुले (बुर्कुले) असे होते. जनार्दनस्वामींनी आपली देशपांडेपणाची वृत्ती रामा जनार्दनांना शके १४९१ मध्ये बहाल केली, तेव्हापासून चाळीगासवच्या देशपांडेपणाचा हक्क रामा जनार्दनांच्या घराण्याकडे अव्याहतपणे चालू आहे. श्री वि. वा. जोशी यांनी रामा जनार्दनांपासूनची वंशावळ दिली आहे

रामा जनार्दन हे जनार्दन स्वामींचेच शिष्य होते, हे स्पष्ट करणारी एक आरती प्रकाशात आली आहे.

> जयजय सद्गुरुनाथा स्वामी श्री जनार्दना।
> आरती ओवाळूं पंचही प्राणा ॥

असे या आरतीचे ध्रुपद आहे.

'आरती अनंतभुजा। विठो पंढरीराजा' ही रामा जनार्दनांची दुसरी आरती 'अनंतभुज' विठ्ठलाचे विराट दर्शन घडविते.

वारकरी मंडळींमध्ये या कवीची ज्ञानेश्वरांवरील आरती अतिशय प्रिय असून, भजनकीर्तनाच्या शेवटी ती म्हटली जाते. ती आरती अशी –

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा।
सेविती साधुसंत। मनु वेधला माझा ॥ धृ.॥
लोपलें ज्ञान जगीं। हित नेणती कोणी।
अवतार पांडुरंग। नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥
प्रगट गुह्य बोले। विश्व ब्रह्मचि केलें।
रामा जनार्दनीं। पायीं टकचि ठेलें ॥ २ ॥

विठ्ठलभक्ती व ज्ञानदेवमहिमा यांत रंगलेले रामा जनार्दन भक्तिपंथाच्या परंपरेचे एक मातबर अनुयायी आहेत.

## विठा रेणुकानंदन (शके १५०० चा सुमार)

डॉ. रा. चिं. ढेरे यांनी विठा रेणुकानंदन या कवीचा सविस्तर परिचय करून दिला आहे. 'विठा रेणुकानंदन सोनठाणे गोलटगावकर' ही नाममुद्रा धारण करणारा हा कवी नाथपंचकातील एक प्रमुख कवी होय; व त्यामुळेच तो नाथांचा समकालीन असल्याची पारंपरिक समजूत आहे. त्याचे विद्यमान वारस वेल्हो रेणुकानंदन यांची विठापासून तेरावी पिढी चालू आहे. एक पिढी तीस वर्षांची असे गृहीत धरल्यास विठा रेणुकानंदन सोळाव्या शतकात होऊन गेला असावा, असे म्हणता येते. राजवाडे यांनी शके १५०० चा सुमार, असा या कवीचा जो काळ मानला आहे, तो या तर्कास पुष्टी देणारा आहे.

या कवीचे मूळ गाव नगर जिल्ह्यातले अकोळनेर हे होय. त्याचे वडील मनोहर बडवे हे तिथले कुलकर्णी होते. घराण्यात माहूरच्या रेणुकेची उपासना पूर्वापार रूढ होती. विठाच्या चौदाव्या वर्षी त्याला रेणुकेचा दृष्टान्त झाला. माहूरला जाऊन देवीचे दर्शन घेण्यासाठी विठा यात्रेकरूंबरोबर माहूरच्या यात्रेला निघाला. ही मंडळी वाटेत गोलटगावी पोहोचली. (हे गाव औरंगाबादपासून चोवीस मैलांवर आहे.) तेथे विठाचे आजोळ होते. मामांनी त्याला पुढे जाऊ न देता घरी ठेवून घेतले. गोलटगावजवळच्या एका टेकडीवर रेणुकादेवीचे मंदिर होते. त्या देवीची विठाने अखंड उपासना केली. पुढे त्याला देवीचा साक्षात्कार झाला. देवीने आपला पुत्र म्हणून विठाचा स्वीकार केला; व म्हणून विठाने 'रेणुकानंदन' हे बिरुद स्वतःच्या नावास जोडले. 'विठा नाही रेणुकानंदन काई। आई आदिपुरुष तोहि कैचा वो माय।' असे 'आई आदिपुरुष' हे नाव विठाच्या पदांच्या समाप्तिमुद्रेत गुंफलेले आढळते. 'आई' म्हणजे जगन्माता भवानी व 'आदिपुरुष' म्हणजे जगत्पिता शिव होय.

विठाचे लग्न अकोळनेर मुक्कामी झाले. पुढे ते गोलटगावी सपत्नीक येऊन राहिले. त्यांच्या मुलाचे नाव 'गणेश' असे होते. वृद्धपणी नातवंडे पाहिल्यावर विठांनी देहत्याग केला. पौष शुद्ध चतुर्दशी हा त्यांचा समाधिदिन होय. गोलटगावी त्यांची समाधी आहे. विठाच्या नाममुद्रेत गोलटगावाखेरीज ज्या 'सोनठाणे' या गावाचा उल्लेख आहे, तेथे त्यांची शिष्यशाखा आहे. गोलटगावचे विठाचे वंशज 'रेणुकानंदन' हे बिरुद मठपरंपरेत

उपनामासारखे आजही वापरतात; व सोनठाणे येथील शिष्यशाखा 'रेणुकानंदनदास' म्हणून ओळखली जाते.

प्रत्यक्ष रेणुकादेवीकडूनच विठा रेणुकानंदनांना परमार्थाचा बोध झाला, असे परंपरा मानते. गुरू व उपास्यदेवता या दोन्ही भूमिका रेणुकादेवीने सांभाळल्या. प्रत्यक्षात विठाने एखाद्या मानवी गुरूचे शिष्यत्व स्वीकारले किंवा कसे, हे समजण्यास साधन नाही.

'यैसे प्रसन्न श्रीगुरुनाथ । जेणें मस्तकीं ठेविला हात ॥' असा उल्लेख एका पदात आढळतो. रेणुकानंदन म्हणजेच परशुराम हा विठा रेणुकानंदनांचा आदर्श पुरुष आहे.

या कवीने 'सीतास्वयंवर' लिहिले असे ऐकण्यात आहे, असे पांगारकर लिहितात, पण ते काव्य उपलब्ध नाही. दहाबारा अभंग व पदे, वीस कडव्यांचा एक 'धावा' व एकवीस कडव्यांचे 'उत्तर' नामक प्रकरण, एवढी रचना आजही गोलटगावी कवीच्या वंशजांच्या संग्रही असल्याचे डॉ. ढेरे लिहितात.

परमेश्वराची भेट न झाल्यामुळे तळमळणाऱ्या आपल्या जिवाचे आक्रंदन कवीने 'धाव्या' मध्ये पुढील शब्दांत प्रकट केले आहे :

देवा संसारी गांजलों, नश्वर भववेदना ।
माया–मोहो प्रपंच निवारीं तूं जगजीवना ॥
तूं भक्तांचा कैवारी तऱ्ही कायसी यातना ।
न पावसी लौकरी तऱ्ही उणें स्वामीपणा रे ॥

पुढे 'आई–आदिपुरुषा'चा स्वतःला झालेला साक्षात्कार कवीने पुढील शब्दांत व्यक्त केला आहे :

उघडेचि लोचन उघडेंचि निधान ।
उघडिया आत काय सेवों वो माय ॥
मनाचें मुरलेपण तेथें कैचें मीपण ।
श्रुति हारपली खूण कैंची वो माय ।
जाणीव म्हणों तरी जाणतेंचि नाही ।
तेथें सांगतें ऐकतें तेंही कैचें वो माय ॥
विजूच्या प्रकाशें डोळे जाले आरिसा ।
नयन बुबुळ ठसा कैंचा वो माय ॥

सिद्धावस्थेतील हा अनुपम अनुभव कवीस आला. 'रेणुकानंदन सुखिया जाला । मग राहियला नित्यसुखें ॥' अशी अपूर्व प्रचीती त्यास आली.

एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या कोणा वासुदेवस्वामी द्रविडांचा शिष्य शंकर याने रचलेला विठा रेणुकानंदनांचा ओवीबद्ध चरित्रग्रंथ त्यांच्या वंशजांजवळ असल्याचे डॉ. ढेरे सांगतात. महीपतीबोवांनी भक्तविजयाच्या ५७ व्या अध्यायात विठांचा उल्लेख केला आहे. त्याच्या पारमार्थिक शक्तीवर लुब्ध होऊन औरंगजेबाने त्यांना नऊ गावे

इनाम दिली, अशी आख्यायिका आहे. आजही गोलटगावी या कवीच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा केला जातो.

## जनी जनार्दन (समाधी शके १५२३)

जनी जनार्दनांच्या चरित्राचे विश्वसनीय वृत्त उपलब्ध नाही. त्यांच्या वंशात मौखिक परंपरेने चालत आलेली माहिती डॉ. ढेरे यांनी दिली आहे. या कवीचे मूळ नांव जनार्दन, पित्याचे नाव वासुदेव व आडनाव गोसावी. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून यांची कुलदेवता माहूरची रेणुका होय. हे विजापूरच्या पातशाहीत कमावीसदार होते. जनार्दनाची आई ही भूम येथील देशमुखांची मुलगी. तिचे माहेरचे नाव जनी व सासरचे नाव देवकी असे होते. जनार्दनांचा जन्म कृष्णाष्टमीच्या शुभमुहूर्तावर आजोळी (भूम या गावी) झाला. 'जनी जनार्दन' या जोड नावातील 'जनी' हे आपल्या आईचे माहेरचे नाव त्यांनी स्वत:च्या नावाशी निगडित केले.

जनार्दन वयात आल्यावर त्यांचा विवाह गुणवती नामक मुलीशी विजापूर येथे थाटाने साजरा झाला. कालांतराने जनार्दनांचे आई-वडील निधन पावले. वडिलांच्या माघारी जनार्दन हे कमावीसदार म्हणून काम पाहू लागले. एकदा दामाजीपंतांप्रमाणे यांनीही दुष्काळप्रसंगी गोरगरिबांचे प्राण वाचविण्यासाठी सरकारी कोठारे लुटविली. नंतर पातशहाचे गंडांतर आले व त्याने संतापाच्या भरात जनार्दनपंतांना हत्तीच्या पायाखाली तुडविण्याचा हुकुम केला. पण या शांतिब्रह्माला स्पर्श करण्याचे धाडस त्या माजलेल्या पशूलाही झाले नाही. तेव्हा पातशहास पश्चात्ताप झाला व त्याने यांना सोडून दिले. पुन्हा यवनांची नोकरी करावयाची नाही, अशी यांनी शपथ घेतली. विजापूर सोडून यानी पंढरीची वाट धरली. मार्गात गोदावरीच्या पात्रात त्यांना गणेशमूर्ती सापडली. ती प्रसादमूर्ती बरोबर घेऊन ते पंढरपूरला आले. तेथे काही काळ परमार्थसाधना केल्यावर त्यांना दृष्टांत झाला. त्याप्रमाणे पैठणजवळच्या गगामसले या गावी जाऊन तेथे त्यांनी गणेशमूर्तीची स्थापना केली (पुढे अडीचशे वर्षांनी पेशवाईतील प्रसिद्ध मुत्सद्दी हरिपंत फडके यांनी या स्थळाचा उद्धार केला). तेथे जनार्दनांनी बारा वर्षे गणेशाची उपासना केली. त्यांच्या या तपाने मंगलमूर्तीचा त्यांना साक्षात्कार झाला त्यानंतर जनार्दनस्वामी काशीयात्रेस गेले. तिथे त्यांनी संन्यास स्वीकारला. पुन्हा भूमला येऊन आपल्या कुटुंबियांना ते भेटले. त्यांचे चित्त विकारशून्य बनले होते; त्यामुळे संन्यस्त असूनही ते बीड येथे कुटुंबियांसह राहू लागले. तिथल्या देशमुखांनी या सत्पुरुषास आपल्या बागेत घर बांधून दिले.

जनार्दनस्वामींच्या साधुत्वामुळे अनेक लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. अनंत बोडले हा त्यांच्या शिष्यांपैकी प्रमुख होता. संत एकनाथही बीडला येऊन जनार्दनस्वामींना भेटून गेले. भूम येथे श्रावण वद्य सप्तमीस अभिजित मुहूर्ती, शके १५२३ मध्ये जनी जनार्दन समाधिस्थ झाले.

जनी जनार्दनांची गुरुपरंपरा आदिनाथ-कंथडीनाथ-धुंडिराज-जनार्दन अशी आहे. (देवगिरीच्या जनार्दनस्वामीचे ते शिष्य होते, ही समजूत बरोबर नाही). या गुरुपरंपरेमुळेच जनी जनार्दनाचा उल्लेख 'ढुंढि जनार्दन' असाही केला जातो. ('ढुंढि जनार्दन दुंडिराजयाते। पूर्ण मोदक अर्पिले संपूर्ण हो' असे गिरिधरस्वामींनी आपल्या 'समर्थप्रताप' या ग्रंथात म्हटले आहे) 'ढुंढि-दुंढि-धुंडि' म्हणजे गणेश हे जनी जनार्दनांचे जसे उपास्यदैवत होते, तसेच त्यांच्या गुरूचेही तेच नाव होते.

जनी जनार्दन हे अशा प्रकारे परंपरेने नाथपंथी व उपासनेने गाणपत्य असले, तरी त्यांचा पारमार्थिक प्रवास भक्तिपंथाच्या निर्भर वातावरणातच झालेला आहे. त्यांचे कविमन राम-कृष्णांच्या नामसंकीर्तनात रंगलेले आहे. म्हणून परंपरेने नाथपंचकात त्यांचा समावेश केलेला दिसतो.

जनी जनार्दनांच्या नावावर मोडणाऱ्या 'निर्विकल्प ग्रंथ' व 'चौरिकलीला' या रचना त्यांच्या नसून त्यांच्या शिष्यांच्या आहेत. जनी जनार्दनांचे 'जानकी-स्वयंवर' हे काव्य धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळाने प्रकाशित केले आहे. या काव्याचे ३५ प्रसंग असून एकूण ओवीसंख्या २८४० आहे. कथावर्णनाच्या ओघात पारमार्थिक हेतूने कवीने अनेक ठिकाणी साङ्ग रूपके योजिली आहेत.

> जानकी अवतारू मायेचा। रामु अवतारू आत्मयाचा ॥
> वेगें संयोग दोघांचा। घडे शिवाचा मनोरथु ॥

प्रभू रामचंद्र हे साकार परमात्मा असून सीता ही आदिमाया आहे, या भूमिकेतून कवीने ही 'रम्य रामायणी कथा' भक्तिभराने गायिली आहे. जिच्या उदरी अनंत ब्रह्मांडे सामावली आहेत, अशी 'आदिमाया सीतेच्या रूपाने प्रगट झाली असल्यामुळे तिची 'थोरी' शब्दात सांगणे अशक्य आहे. 'रामु सेवक जिये अधरो। ते वैखरी केवी वर्णू ?' असे कवी म्हणतो. विविध घटना- प्रसंगांचे वर्णन करताना कवीची शैली प्रसन्न-रमणीय रूप धारण करते.

> चंपक सुमन कळियाते। केतकी उभारूनी हाते ॥
> 'द्यावे' म्हणती रामाते। पैं पुष्पांते सुजाति ॥

रामाने मिथिलेत प्रवेश केला, तेव्हा साऱ्या निसर्गातच त्याचे स्वागत फुलून आले होते. भक्तिपरिमलाने गंधित झालेले हे स्वयंवर-काव्य पारमार्थिकांना व काव्यरसिकांना सारखेच आवडेल.

जनी जनार्दनाची तीस-पस्तीस स्फुट पदे व अभंग मिळतात. आपल्या 'महाराष्ट्र कविचरित्र' मालेच्या तिसऱ्या भागात ज. र. आजगावकरांनी या कवीचे पुढील पद उद्धृत केले आहे.

> धरणी रक्षावया परब्रह्म हरी। गौळियांचा घरी प्रगटला।
> तिन्ही लोकी जाला परमआनंदु। आनंदाचा कंदु गोपिनाथु ॥
> संपूर्ण अवतारू नंदाचा नंदनु। म्हणत जनार्दनु भक्तिप्रियु ॥

पांगारकरांनी या कवीचे असेच आणखी एक सुरेख पद दिले आहे.

चंद्रीच्या अमृता भोक्ते ते चकोर । नेणती गावार काक अंध ॥
तैसे स्वये सुख सेविती साधुजन । नेणती अज्ञान पासी असतां ॥
पद्मिनी पराग सेविती मधुकर । नेणती दर्दूर पंकभोक्ते ॥
धेनुस्तनी क्षीर नेती ते श्रीमंत । गोचिडा शोणित जन्मभरी ॥
जनार्दनु म्हणे न चले काही योगू । त्याचा कर्मभोगू काय कीजे ॥

'जनी जनार्दनाची हिन्दी भाषेतही काही पदे आहेत,' असे सारस्वतकार भावे लिहितात; पण ती उपलब्ध झालेली नाहीत. मराठी पदांतून मात्र त्यांनी मनुष्यदेहाची महती गाऊन 'देहो लावी हरिकारणी' असा उपदेश कुठे केला आहे; कुठे सत्संगाचा महिमा गाईला आहे, तर कुठे स्वतःच्या पारमार्थिक अनुभवाचे प्रकट निवेदन केलेले आहे. म्हणूनच मराठी भक्तिपरंपरेत जनी जनार्दनांच्या अल्पोपलब्ध कवित्वाचेही महत्त्व विशेष आहे.

## समारोप

'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' पांगारकरांनी दिली आहे. नामदेव, जनाबाई, चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार प्रभृती संतकवी ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीत येतात. त्यांनी ज्ञानेश्वरांप्रमाणे प्रबंध-रचना केली नसली, तरी ज्ञानेश्वरांप्रमाणे स्फुट अभंग-रचना केली आहे. 'बाप रखुमादेवीवरू' या नाममुद्रेने ज्ञानदेवाचा अभंग मुद्रांकित झाला आहे. 'नामा म्हणे'; नामयाची दासी जनी'; 'गोरा म्हणे' अशा नाममुद्रांनी प्रभावळीतील संत कवींनी आपली अभंग-कविता केली आहे. ही सर्व अभंग-कविता म्हणजे अभिजात भावकविता आहे. ग्रांथिक तत्त्वविवेचनापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभूतीतून ती रचना स्फुरली आहे. ज्ञानेश्वर हे स्वतः प्रेषित, कलावंत आणि कवी आहेत. त्यांच्या प्रभावळीतील संतकवी सुद्धा (प्रेषित नसले तरी) कलावंत आणि कवी आहेत.

एकनाथ हे प्रवक्ते, पुराणिक आणि पंडित आहेत. त्यांच्या काव्याचा पुराणिकी थाट व त्यांचे पंडिती वळण त्यांच्या प्रभावळीतील कवींनी गिरविले आहे. एकनाथ आणि त्यांची प्रभावळ यांच्यातील अनुबंध विविध दृष्टिकोनांतून विशद करता येतो.

नाथांचे ज्ञानेश्वरविषयक प्रेम नाथपंचकातील कवींनीही व्यक्त केले आहे. 'एका जनार्दनी पूर्वपुण्य फळलें । श्रीगुरु भेटले ज्ञानेश्वर' असा आदरभाव नाथ प्रकट करतात, तर महाकैवल्यतेजस्वरूप ज्ञानराजा'ची आरती रामा जनार्दन हे गातात.

नाथांचा मराठीविषयीचा प्रेमा हा दुसरा समान धागा आहे. 'संस्कृत वाणी देवें केली । आणि मराठी काय चोरापासोनि झाली ?' असा खडा सवाल नाथांनी केला आहे, तर 'प्राकृत म्हणोनि दूषिती । तेचि यया ज्ञाना वंचिती' असे दासोपंत बजावतात.

नाथांप्रमाणेच नाथपंचकातील काही कवींनी प्रबंध-रचना करून व तत्त्वपर प्रकरणे लिहून शांकरमताचा पुरस्कार केला आहे; आणि व्युत्पन्न पंडिताची आपली भूमिका

मांडली आहे. नाथभागवत, चतुःश्लोकी भागवत असे प्रबंध नाथांनी सादर केले, तर गीतार्णव, गीतार्थचंद्रिका असे प्रबंध दासोपंतांनीही लिहिले.

रुक्मिणी-स्वयंवर ही नाथांची रचना म्हणजे ' अनुभव—कसवटीवर चाललेली रसाळ कृष्णकथा ' आहे, तर जनी जनार्दनाचे ' जानकी स्वयंवर ' म्हणजे 'रम्य रामायणी कथा' आहे.

भारुडे ही नाथांचीच. नाथपंचकातील कवींनी मात्र भारुडसदृश लोककविता लिहिलेली दिसत नाही. पण भारुडाची ही कसर त्या कवींनी नानाविध पदरचना करून भरून काढली आहे. ' रडत माझे बाळ तान्हे,' ' भिंगाचे भिंगुले, खांद्यावरी अंगुले ' ' वारियाने कुंडल हाले ' अशी नाथांची अनेक रसाळ पदे आहेत. अशीच गोड पदे नाथपंचकातील कवीनीही रचली आहेत. ' चंद्रीच्या अमृता भोक्ते ते चकोर ' (जनी जनार्दन) किंवा ' सुंदरू आणि सावळा । भाळी टिळकू पिवळा ' (दासोपंत) अशा गोड पदरचना या कवींच्या नावावर आढळतात.

अशा रीतीने नाथांच्या व्यक्तित्वाची छाप नाथपंचकातील चारही कवींवर पडलेली आहे. नाथांच्या विपुल व विविध ग्रंथसंपदेतून त्यांच्या त्यांच्या व्यक्तित्वाचे आविष्कार झाले आहेत. नाथपंचकातील कवींना या व्यक्तित्वाच्या ज्या शलाका विशेष आवडल्या, त्यांच्या प्रकाशात त्या कवींनी आपल्या रचना केल्या. त्या रचनांच्या द्वारे नाथपरंपरेशी असलेले आपले नाते नाथपंचकातील कवींनी ' अभंग ' स्वरूपात सिद्ध केले आहे.

□ □ □

दहा

# प्राचीन मराठीचा वाङ्मयेतिहास

वाङ्मयेतिहासाचे शास्त्र। वाङ्मयेतिहासाचा विषयानुक्रम। संकल्पित ग्रंथाची रूपरेषा। (भूमिका, पूर्वपीठिका, प्रारंभीचे वाङ्मय, विविध धर्मपंथ, चक्रधर, महानुभावीय चरित्र–वाङ्मय, महानुभावीय काव्य, ज्ञानदेव, नामदेव, ज्ञानदेव–नामदेवांची प्रभावळ, मुकुंदराज, संकीर्ण काव्य, संकीर्ण गद्य व यादवकालीन साहित्य विचार), उपसंहार आणि पाच सूची.

## वाङ्मयेतिहासाचे शास्त्र

आपल्याकडे वाङ्मयेतिहासाचें शास्त्र अजूनही सिद्ध झालेले नाही. प्रारंभ ते इसवी सन १३५० हा प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा कालखंड मानला जातो. या कालखंडाचा इतिहास मांडताना तर शास्त्रीय भूमिकेची ही उणीव विशेषत्वाने जाणवते. धर्मसंप्रदायांचा इतिहास म्हणजे प्राचीन वाङ्मयेतिहास, धर्मसंप्रदायांचे प्रणेते आणि त्यांचे अनुयायी यांच्या चरित्रांचा, साहित्याचा व कामगिरीचा आढावा म्हणजे वाङ्मयेतिहास, कालक्रमानुसार घडलेल्या वाङ्मयीन/सांस्कृतिक घटना आणि त्या घटनांचे कर्तेकरविते स्त्री-पुरुष यांच्याविषयीची समालोचने म्हणजे हा इतिहास, अशी काही समीकरणे ठरवून हे इतिहासलेखन केले जाते.

या व अशा त्रुटी टाळून प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास संपादित करण्याचा एक संकल्प पुण्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठी मी केला होता. (१९७६-७९ या

तीन वर्षांसाठी मी परिषदेच्या कार्यकारिणीचा सदस्य होतो, तेव्हाची ही हकीकत आहे.) डॉ. प्र. न. जोशी, डॉ. मु. श्री. कानडे, डॉ. व. दि. कुलकर्णी, डॉ. वि. रा. करंदीकर, डॉ. ल. रा. नसिराबादकर, डॉ. विलास खोले, कै. डॉ. ना. ग. जोशी, प्रा. नि. ना. रेळेकर, डॉ. निशिकांत मिरजकर, डॉ. उषा देशमुख आणि डॉ. म. प. पेठे या व्यासंगी समीक्षकांनी या इतिहास-लेखनासाठी साहाय्य करण्याचे योजिले होते. मी स्वतःही त्यातील दोन विषयांवर लेखन करणार होतो. या समीक्षकांच्या तीन-चार बैठकीतून चर्चा करून वाङ्मयेतिहासाच्या या प्रथम खंडाचा आराखडाही मी निश्चित केला होता.

काही ना काही अडचणी येत गेल्या. 'काशीस जावें, नित्य वदावें' या न्यायाने संपादनकार्य पुरे करून संकलित खंडाची मुद्रणप्रत सिद्ध करण्याचे मी मनोगत योजिले. पण 'काहीच वेंचिलें नाही, शेवटी हात झाडिले।' असेच या संकल्पाचे झाले. मात्र या निमित्ताने तयार केलेला आराखडा अन्य अभ्यासक-संशोधकांना उपयुक्त वाटेल, या अपेक्षेने तो येथे सादर करीत आहे. एखाद्या जिद्दीच्या व जाणकार संपादकाने याचा उपयोग करून घेऊन या प्रकल्पाची पूर्ती केली, तर महाराष्ट्र सारस्वताच्या अभ्यासकांची मोठी सोय होईल.

## वाङ्मयेतिहासाचा विषयानुक्रम

**(मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, प्रारंभ ते इ. स. १३५०)**

| प्रकरण क्रमांक | विषय | मुद्रित पृष्ठे डेमी |
|---|---|---|
| ००) | भूमिका | ०५ |
| १) | पूर्वपीठिका | २५ |
| २) | मराठीतील प्रारंभीचे वाङ्मय | ४० |
| ३) | विविध धर्मपंथ व मराठी वाङ्मय | ५० |
| ४) | चक्रधर : आचारधर्म, तत्त्वज्ञान व पंथीय कार्य | ४० |
| ५) | महानुभावीय चरित्र-वाङ्मय | ५० |
| ६) | महानुभावीय काव्य | ५० |
| ७) | ज्ञानदेव : चरित्र, वाङ्मय व कार्य | ५० |
| ८) | नामदेव : चरित्र, वाङ्मय व कार्य | ४० |
| ९) | ज्ञानदेव-नामदेवांची प्रभावळ | ५० |
| १०) | मुकुंदराज : चरित्र व वाङ्मय | ३० |
| ११) | संकीर्ण व स्फुट काव्य | ४० |
| १२) | संकीर्ण व स्फुट गद्य महानुभावीय व इतर | ५० |
| १३) | यादवकालीन साहित्यविचार | ३० |
| १४) | उपसंहार | ५० |
| ००) | पाच सूची : (अ) उल्लेख सूची (आ) संदर्भ साहित्य सूची (इ) ग्रंथनाम सूची (ई) व्यक्तिनाम सूची (उ) लेखक-परिचय सूची | ३० |
| | एकूण पृष्ठे | ६३० |

वरील चौदा प्रकरणे व पाच सूची यांची रूपरेषा आणि व्याप्ती पुढीलप्रमाणे अभिप्रेत आहे.

## भूमिका : (पृष्ठे ५)

प्रस्तुत खंड पहिला : प्रारंभ ते १३५० ही कालमर्यादा–या खंडाचे एकूण वाङ्मयेतिहासात स्थान व महत्त्व.

खंड १ च्या पूर्वाभ्यासाचे स्वरूप-अभ्यासाची उपलब्ध साधने –

प्रस्तुत ग्रंथाची व्याप्ती व अभ्यासाची दिशा – हा मुख्यत: **वाङ्मयेतिहास** आहे याचे विशेष भान – वाङ्मयेतिहासाच्या विविध पद्धती – त्याचे शास्त्र अजून अनिश्चित – पण म्हणूनच आपण वाट शोधायची आहे.

धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांप्रदायिक व सांस्कृतिक स्थितिगतीचे चित्रण जेवढे अपरिहार्य असेल तेवढेच देणे – तेही वाङ्मयेतिहासाच्या अनुषंगाने व त्याच्या आकलनासाठी जरूर तेवढेच द्यावे.

वाङ्मय–दर्शनाच्या संदर्भात आवश्यक तेवढेच भाषिक तपशील देणे. (भाषिक इतिहासाचा स्वतंत्र खंड हवा.)

वाङ्मयेतिहासाच्या आकलनासाठी जरूर तेवढेच चरित्रचित्रण व तत्त्वनिरूपण.

विषय–विवेचनासाठी जरूर तेथे मूळ उद्‌धृत करणे, आवृत्तीचा नेमका संदर्भ देणे.

संदर्भ-टीपा, या पदटीपा म्हणून न देता प्रकरणाच्या अखेरीस सलगपणे देणे.

## प्रकरण पहिले : पूर्वपीठिका (पृष्ठे २५)

**रूपरेषा**

(१) 'महाराष्ट्र' व 'मराठी' या संकल्पनांचा उगम व त्यांचे स्वरूप.
(२) महाराष्ट्राच्या भौगोलिक कक्षा.
(३) महाराष्ट्रवासी लोक.
(४) राजकीय वातावरण.
(५) धर्मजीवन.
(६) समाजस्थिती.
(७) सांस्कृतिक प्रेरणा.
(८) भाषिक स्थिती.
(९) वाङ्मयीन वातावरण.
(१०) मराठीचे भाषाकुल.
(११) मराठीचा उगम व विस्तार.
(१२) यादव–मराठीचे स्वरूप.

(१३) संस्कृत व महाराष्ट्री अपभ्रंश.
(१४) संस्कृत पंचमहाकाव्ये (लौकिक काव्ये).
— मराठीच्या संदर्भात विवेचन.
(संदर्भ–सूची स्वतंत्रपणे दिलेली नाही.)

## प्रकरण दुसरे : मराठीतील प्रारंभीचे वाङ्मय (पृष्ठे ४०)

रूपरेषा

(१) मराठी भाषेची पूर्वपीठिका.
(२) मराठी भाषेच्या उत्पत्तीचा विचार : ओझरता आलेख.
(३) प्राचीन मराठी कोरीव लेख.
(४) प्राचीन मराठी लोकवाङ्मयाचे अवलोकन.
(५) श्रीपतीची ज्योतिषरत्नमाला व तत्सम ललितेतर लेखन.
(६) वैजनाथ कलानिधी, विवेकसिंधू, लीळाचरित्र व आद्य मराठी ग्रंथविषयक चर्चा.
(७) तत्कालीन मराठी लेखकांची पूर्वतयारी; त्यांची वाङ्मयीन भूमिका; त्यांच्या लेखनामागील अंत:प्रवाह, इत्यादी.
(८) निष्कर्ष.

प्रमुख संदर्भ :

(१) यादवकालीन मराठी भाषा : डॉ. शं. गो. तुळपुळे
(२) प्राचीन मराठी कोरीव लेख : डॉ. शं. गो. तुळपुळे
(३) महाराष्ट्र सारस्वत: वि. ल. भावे
(४) प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा : डॉ. श्री. रं. कुलकर्णी
(५) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला : ल. रा. पांगारकर
(६) साहित्य आणि संशोधन : व. म. भुसारी
(७) विवेकसिंधू : संपा. कृ. पां. कुलकर्णी
(८) ज्योतिषरत्नमाला : संपा. मु. ग. पानसे
इत्यादी ग्रंथ, तसेच पुढील दोन लेख :
(९) ताडपत्रावरील ज्ञात एकच मराठी ग्रंथ : 'कलानिधी'
— अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन पत्रिका, वर्ष १३, अंक १, ऑक्टोबर १९६५, पृष्ठे १ ते १६
(१०) ताडपत्रावरील एकच मराठी ग्रंथ : 'कलानिधी'
— श्री. शं. खानवेलकर, मराठी संशोधन पत्रिका, वर्ष १३, अंक ३ एप्रिल १९६६, पृष्ठे ६१ ते ६४.
— इत्यादी, इत्यादी.

## प्रकरण तिसरे : विविध धर्मपंथ व मराठी वाङ्मय (पृष्ठे ५०)

**१. प्रास्ताविक :** प्राचीन मराठी वाङ्मय-निर्मितीच्या प्रमुख प्रेरणा धार्मिक. हा देवधर्म प्रामुख्याने वैयक्तिक अभ्युदयासाठी, मोक्षासाठी जपजाप्य, व्रत–वैकल्ये, ध्यान–धारणा, यज्ञयाग यांच्यासारख्या बाह्य कर्मकांडाने परिपूर्ण. नव्या काळाचा प्रभाव, नव्या धर्मपंथांचा उगम, वैदिक, वैदिकेतर, जैन, बौद्ध अशा धर्मपंथ प्रवाहांची निर्मिती, त्यांचा विकास, परस्परांतील वैचारिक संघर्ष, जनमानसावर त्यांचा प्रभाव व वाङ्मयनिर्मितीशी त्यांचा संबंध.

**२. वैदिक धर्म :** वेदांचे प्रतिपाद्य – त्यांचा आविष्कार – वैदिक देवता – त्यांच्या प्रार्थना – वेदांतील भक्ती – परमार्थविचार – तीन ऋणे – वर्णव्यवस्था – आश्रमपद्धती – चार पुरुषार्थ – तात्त्विक विचार – या दृष्टींनी चार वेद, वेदांगे, उपवेद, उपनिषदे, सहा शास्त्रे, विविध दर्शन–वेदान्त: द्वैत–अद्वैत विचार, गीता, रामायण-महाभारतादी ग्रंथ-पुराणे यांचे निरीक्षण – ज्ञानेश्वर–नामदेवादिकांचे वेदानुसरण.

**३. वैदिकेतर धर्म :** आर्य–आर्येतर प्रश्न – द्रविड – नाग कोण होते ? महाराष्ट्र भूमीवर त्यांचे मीलन–येथील आदिवासी–द्रविड भाषिकांचा प्रभाव, सगुणपूजा, योगसाधना आगमोक्त तंत्रविद्या, मंत्रतंत्र, जारणमारण, जादुटोणा, यातु विद्या यांचा वाढता प्रभाव, वैदिक व अवैदिकांची सरमिसळ, हिंदू धर्माचे नवे रूप.

**४. शैव पंथ :** वैदिकांचा रुद्र – कल्याणकारी शिव – त्याचा निवास – त्याचे रूप, त्याचा परिवार, त्याचे अवतार – त्याची पुराणे, त्याची व्रते – त्याची मंदिरे – त्याचे उपपंथ – काश्मिरी शैवागम – पाशुपत – कापालिक व कालमुख – शाक्त व तांत्रिक – कौलमार्गी इ. इ. ज्ञानेश्वर–नामदेवादिकांवर शैव प्रभाव.

**५. वैष्णव पंथ :** त्रिभुवन व्यापणाऱ्या आदित्य–सूर्य–सविताचे विष्णूत रूपान्तर रामायण – महाभारत – पुराणात विष्णूच्या अवतारकथा–त्याचे रूपवर्णन, त्याचा परिवार, त्याची विविध नावे, त्याची उपासनापद्धती – दक्षिणेकडील अळवार संत – नाथमुनींचा श्रीसंप्रदाय-रामानुज – निंबार्क – मध्व – विष्णुस्वामी-इत्यादींच्या विचारधारा-ज्ञानेश्वर-नामदेवादिकांचा वैष्णवी आचारधर्म.

**६. जैन–बौद्धांचा प्रभाव :** महावीराचे व आधीच्या तीर्थंकरांचे धर्मविचार–स्याद्-वाद – आचारपद्धती – चातुर्यामधर्म मुनी, श्रमण, श्रावक यांची चर्चा – पंचमहाव्रते, पाच अणुव्रते – धर्मग्रंथ – पंथभेद – उपासना व कर्मकांड – संस्कार – गौतम बुद्धाचा महाराष्ट्रावर प्रभाव–त्यांचे धर्म विचार – आचार धर्म, दार्शनिक विचार – विहार चर्या – उपासना व साधना–सण व व्रते–बौद्ध धर्माची अवनती-महायान, हीनयान, मंत्रयान, वज्रयान, सहज-यान, इ. उपपंथांची स्थितिगती – ज्ञानेश्वर नामदेवादिकांवर प्रभाव.

**७. नाथपंथ :** शिव व विष्णू यांच्या ऐक्याचा प्रयत्न–योग व भक्ती यांचा समन्वय-आदिनाथ – मत्स्येन्द्रनाथ – गोरक्ष – गहिनी परंपरा – भैरवमेळा – सिद्धांचा परिवार –

नाथप्रमुखांचे कार्य–आचार व तत्वज्ञान–प्रमाण ग्रंथ व उपास्यदेवता – क्षेत्रस्थान – पंथभेद प्राचीन मराठी वाङ्मयाशी संबंध.

८. **लिंगायत** : वीरशैवांचा उगम – रामय्या व बसवेश्वर – बसवेश्वर व अल्लम प्रभू – अल्लमप्रभू व गोरखनाथ–तत्त्वज्ञान–आचार पद्धती–साधना व उपासना–पट्स्थल-विचार–विधिविधान–अष्टावरण–पंथाचार–ज्ञानेश्वर–नामदेवादी संत व लिंगायत.

९. **महानुभाव** : स्थूल रूपरेषा-विविध नामे–चक्रधर व त्यांची प्रभावळ–तत्त्वज्ञान–आचारधर्म–विधिनिषेध–प्रमाणपंथ–उपासना व साधना.

१०. **वारकरी** : पुराणोक्त भागवतधर्म–देवदेवता प्रामाण्य–ग्रंथ, उपास्य दैवत, आचार व तत्त्वज्ञान, साधनमार्ग, उपपंथ ' ज्ञानदेवे रचिला पाया ' याचा धर्मप्रेरित अर्थ–समन्वयाचा प्रयत्न–भविष्यातील लोकप्रियता.

११ **सूफींची धर्मसाधना** : सूफींची पूर्वपीठिका–उपसंप्रदाय-अली–उल–हुजवेरी, ख्वाजा मोईनोद्दीन चिश्ती–कुतुबुद्दीन बख्तियार काकी, फरोद्दीन गंज शक्कर, निजामोद्दीन अवलिया इत्यादींचे कार्य-धर्मसाधना–तत्त्वज्ञान–आचार–मराठी संतांशी साधर्म्य.

१२. **लोकधर्माचे स्वरूप** : राम, कृष्ण, देवी, गणेश, हनुमंत इत्यादी लोकप्रिय देवता-कुलदेवता व ग्रामदेवता–पांढर, चव्हाटा, डोंगर, सीमा, नदी इत्यादींचा आश्रय-स्कंद खंडोबा, जोतिबा, बहिरोबा, यमाई–तुकाई इत्यादींचा प्रभाव, त्यांची उपासना, त्यांची व्रते, वृक्ष व प्राण यांची पूजा, विविध देवदेवतांच्या यात्रा–जत्रा–पुराणोक्त लोकदेवांची सूची त्यांच्या कथा, विविध जातिजमातींचे देव–आयुधे. नद्या, पर्वत, वृक्ष, स्तूप व चैत्य, समाध्या व थडगी यांची उपासना व भूत–पिशाचसाधना-यक्ष, गंधर्व, किन्नर, राक्षस, नाग, दैत्य, वानर यांचा लोकमानसावर प्रभाव–चौऱ्यांशी सिद्ध, बावन्न वीरू, नऊ नाथ व चौसष्ट योगिनी यांची लोकप्रियता. स्फुट पद्यरचना व भारुडे, इत्यादी, इत्यादी.

## प्रकरण तीन : भूमिका व आनुषंगिक मुद्दे

१) धर्मचिकित्सेच्या बाबतीत प्राचीन कालाविषयी संक्षेपाने लेखन व मराठी वाङ्मयावर प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या गोष्टींचा सविस्तर विचार.

२) ख्रिस्ती धर्माच्या प्रभावाचा शोध, षड्दर्शने, द्वैत–अद्वैत, पंथोपपंथीय झगडे व महानुभावांची उपासनापद्धती यांचे उल्लेख यावेत.

३) महानुभावीय परिभाषेच्या उगमाचा शोध.

**संदर्भग्रंथसूची**


(१) लक्ष्मणशास्त्री जोशी : वैदिक संस्कृतीचा विकास

(२) ल. रा. पांगारकर : मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड १ ला

(३) श्री. व्यं. केतकर : प्राचीन महाराष्ट्र : भाग १ व २

(४) कर्वे–जोगळेकर–जोशी : महाराष्ट्र परिचय
(५) गं. बा. सरदार (संपा.) : महाराष्ट्र जीवन : खंड १ व २
(६) शं. दा. पेंडसे : महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास
(७) मु. ग. पानसे : यादवकालीन महाराष्ट्र
(८) र. रा. गोसावी : पाच भक्तिसंप्रदाय
(९) प्र. न. जोशी : नाथसंप्रदाय : उदय व विस्तार
(१०) सेतु माधवराव पगडी : सूफी संप्रदाय
(११) चिं. ग. कर्वे : महाराष्ट्र लोकसाहित्यमाला : पुष्प १ व २
(१२) सरोजिनी बाबर : कुलदैवत, नंदादीप
(१३) विलास संगवे : आदिवासींचे सामाजिक जीवन
(१४) वासुदेवशरण अग्रवाल : प्राचीन भारतीय लोकधर्म
(१५) हजारीप्रसाद त्रिवेदी : मध्यकालीन धर्मसाधना
(१६) परशुराम चतुर्वेदी : मध्यकालीन प्रेमसाधना
(१७) महाराष्ट्र सेन्सस ऑफिस : 'फेअर्स अ‍ॅण्ड फेस्टिव्हलस् इन् महाराष्ट्र'

**प्रकरण चौथे : चक्रधर (चरित्र, आचारधर्म, तत्त्वज्ञान व पंथीय कार्य) पृ. ४०**

१. चरित्र :

(अ) पूर्वचरित्र
(ब) एकाक अवस्थेतील भ्रमंती
(क) अवतार स्वीकारानंतरची वाटचाल (पूर्वार्ध आणि उत्तरार्ध)
(ड) अखेर (शिरच्छेद, पुनरुत्थान व उत्तरपंथे प्रयाण)

२. आचार धर्म :

'असती परी' आणि प्रमुख वैशिष्ट्ये.
(परमेश्वरप्रणीत विधिनिषेधांचे परिपालन)
(अ) विकार विकटपशून्यता (उपभोग्य विषयांचा संपूर्ण त्याग)
(आ) स्वभाव नियमन (स्वभाव-मात्रा), भिक्षाव्रताची महती आणि तिचे स्वरूप, वस्त्रप्रावरणासंबंधीचे नियम, अटन–विजन.
(इ) निरावलंबित्व
(ई) देवतास्मरण (दृष्ट स्मरण व श्रुत स्मरण)
(उ) जन्म–क्षेपणे
(ऊ) महानुभावीय – परिभाषा (जैनांचा प्रभाव)
(ए) महानुभावांचे वैराग्य व कर्मसन्यास

## पारमार्थिक साधना

(अ) गुरुभक्ती

(आ) सत्संग (साधकाचा आचार व गुण)

(इ) शास्त्र चर्चा

(ई) मुनिमार्गातील व संसारातील उपासना साधन

## तत्त्वज्ञान

द्वैती तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन करणारे स्वतंत्र दर्शन

(१) चार पदार्थ (नित्य व स्वतंत्र)

जीव – बद्धमुक्त : पण मुक्त होण्याला पात्र.

देवता – नित्यबद्ध : अनेक देवतांचे मिळून एक प्रचंड देवताचक्र. जीवाना त्यांच्या कर्माची फळे देणे हे कार्य.

प्रपंच – जड

परमेश्वर – नित्यमुक्त. सच्चिदानंदस्वरूप. ईश्वर व ब्रह्म यांचे भिन्नत्व. ईश्वर-स्वरूप अव्यक्त असले तरी अवतारांच्या रूपाने व्यक्त होते. याला जीवोद्धरणाचे व्यसन आहे. ब्रह्मस्वरूप निरंतर अव्यक्त. ईश्वरस्वरूप भक्ताला तर ब्रह्मस्वरूप ज्ञान्याला मोक्ष देते.

परमेश्वराचे अवतार–धारण तीन प्रकारांनी होते.

(१) गर्भी येणे

(२) खडणे

(३) पतित उठविणे

ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग असे ईश्वर प्राप्तीचे दोन मार्ग, भक्ताला मिळणारा आनंद अन्यत्र मिळणाऱ्या आनंदाहून श्रेष्ठ.

विठ्ठल नामदेव यांचे महानुभावीय उल्लेख

## पंथीय कार्य

(१) एका स्वतंत्र, द्वैताधिष्ठित धर्मपंथाची उभारणी

(२) स्त्री–पुरुषांना समान भूमिकेवर पंथात प्रवेश

(३) उच्चवर्णीय व हीनवर्णीय यांना भक्तिमार्गात सारखेच मानण्याचा उपदेश

(४) अन्नव्यवहाराबाबत जातिभेद पाळू नयेत असे सांगून चातुर्वर्ण्यातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न.

(५) बाह्य कर्मकांडापेक्षा आंतरिक शुचितेचे महत्त्व.

(६) मराठीला धर्मभाषेचे स्थान दिल्यामुळे चक्रधरांनी स्वत: लेखन केले नाही तरी उत्तरकालीन शिष्यांनी सख्येने विपुल, प्रकारांनी विविध आणि गुणांनी समृद्ध अशी ग्रंथनिर्मिती केली.

(अभ्यासाची संदर्भसाधने स्वतंत्रपणे दिलेली नाहीत.)

## प्रकरण पाचवे : महानुभाव चरित्र – वाङ्मय (पृ. ५०)

**स्थूल रूपरेषा –**

महानुभाव चरित्र वाङ्मय : प्रेरणा व स्वरूप–चरित्रकार म्हाइंभट : स्थूल चरित्र व लेखनकर्तृत्व. म्हाइंभट : लेखक, संकलक की संपादक ? नागदेव, म्हाइंभट, नरेंद्र व परशराम यांचे स्मृतिसंकलन– 'सातीरूपचरित्र', 'श्रीदत्तात्रेय चरित्र', 'श्रीकृष्णचरित्र', 'श्रीचक्रपाणिचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र', 'लीळाचरित्र', 'स्मृतिस्थळ', कालनिर्णय – वादस्थळे – वाङ्मयीन स्वरूप–शैली (कथाकहाणी – संवाद, प्रसंगरचना इ.) भाषाविचार (लोक भाषेचा ताजेपणा)–मूळ कथा व त्यांचे परिवर्धन : स्वरूप व कारणे–' स्मृतिस्थळा'चे वाङ्मयेतिहासदृष्टचा महत्त्व, दत्तात्रेयचरित्र, श्रीकृष्णचरित्र आदि चरित्रांपेक्षा लीळाचरित्र–स्मृतिस्थळादि ग्रंथांचे वेगळेपण कशामुळे – पूजावसरा 'त व्यक्तिजीवनाचा विचार तर लीळाचरित्रांत व्यापक समाजजीवनाचे दर्शन. प्राचीन मराठी चरित्र वाङ्मय व महानुभाव चरित्रे. (पृष्ठसंख्या मुद्रित ५०).

**अभ्यासाची साधने**

(१) सातीरूपचरित्र (सं. माधवराव पंजाबी).
(२) श्रीदत्तात्रेय चरित्र.
(३) श्रीचक्रपाणिचरित्र (सं. य. खु. देशपांडे).
(४) श्रीकृष्ण चरित्र (सं. ढेरे, तुळपुळे, कुलकर्णी, पारखे).
(५) श्रीगोविंद प्रभु चरित्र (सं. डॉ. वि. भि. कोलते).
(६) लीळाचरित्र (सं. नेने, तुळपुळे, कोलते).
(७) स्मृतिस्थळ (सं. वा. ना. देशपांडे, तुळपुळे, पारखे. पठाण).

**संदर्भ ग्रंथ**

(१) श्रीचक्रधर चरित्र – वि. भि. कोलते.
(२) महानुभाव पंथ व त्याचे साहित्य – शं. गो. तुळपुळे.
(३) महानुभाव संत – वसंत स. जोशी
(४) महानुभाव संशोधन, खंड १, – वि. भि. कोलते.
(५) महानुभाव साहित्य संशोधन, खंड १ – यू. म. पठाण.
(६) लीळाचरित्र : एक अभ्यास – व. दि. कुलकर्णी.
(७) चक्रपाणि – रा. चि. ढेरे.

(८) श्रीगोविंद प्रभु चरित्र – स्वरूप व कर्तृत्व (लेख)–पां. ना. कुलकर्णी नवभारत.

(९) महानुभाव पंथ – बाळकृष्णशास्त्री महानुभाव.

(१०) महात्मा ऊर्फ मानभाव पंथ व चक्रधर – ल. शि. चौधरी.

(११) महानुभाव : एक आव्हान – पुरुषोत्तम नागपुरे.

## प्रकरण सहावे : महानुभावीय काव्य (पृष्ठे ५०)

**प्रकरणाची रूपरेषा**

### (१) प्रास्ताविक : विषयांची व्याप्ती आणि मर्यादा

महानुभाव कवींच्या सर्व पद्यरचनांचा अभ्यास अभिप्रेत आहे, यामुळे यथे त्यांच्या ललित आणि ललितेतर सर्व काव्यकृतींचा विचार केला जाईल. मात्र पदे, आरत्या इत्यादी स्फुट रचना येथे वगळल्या जातील. महानुभाव काव्यकृतींचा व त्यांच्या कवींचा कालक्रमानुसार निर्देश करून हे 'प्रास्ताविक' विवेचन संपेल. (या कालखंडातील महानुभावांच्या एकूण अकरा काव्यकृती उपलब्ध आहेत.)

### (२) काव्यांचे विषय

महानुभावाच्या पंचकृष्णांपैकी श्रीदत्तात्रेय प्रभु, श्रीगोविंद प्रभु आणि श्रीचक्रधर या प्रत्येकावर एकेक काव्यकृती निर्माण झाली आहे. राहिलेल्या आठ काव्यकृतींपैकी श्रीकृष्ण चरित्रातील काही प्रसंगांचे चित्रण करणाऱ्या पाच काव्यकृती आहेत, आणि श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान विषद करणाऱ्या तीन कृती आहेत. श्रीकृष्ण चरित्र आणि तत्त्वज्ञान मुख्यतः श्रीमद्भागवत ग्रंथाला धरून आहे. गीतेवरील काही श्लोकांवरील टीका करणारा ग्रंथ हा एकमेव अपवाद. यादवकालीन काव्यग्रंथ हे मुख्यतः श्रीकृष्णपरच आहेत.

### (३) निर्मितीमागील प्रेरणा : निर्मितीचे प्रयोजन

श्रीकृष्ण आणि श्रीकृष्णावतार श्रीचक्रधरस्वामी यांच्यावरील उत्कट भक्तिभावनेतून या काव्यकृतींची निर्मिती झाली आहे. आपल्या परमेश्वराच्या सगुण मूर्तिरूपाचे व त्याच्या लीलांचे वर्णन करणे ही या काव्यरचनेमागील भावना आहे. परमेश्वर गुणगान आणि स्तवन यांतून 'भवबंध मुक्ती' साधावी हा काव्यहेतू असल्याचे येथें निर्दिष्ट केल्याचे आढळते. पंथीय तत्त्वज्ञानाचा विचार व प्रचार करणे हाही एक प्रमुख हेतू या काव्यकृतींतून दृग्गोचर होतो. यासाठी काही काव्यग्रंथही स्वतंत्रपणे लिहिण्यात आलेले आहेत.

### (४) महानुभावकवी : वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व व भूमिका

महदंबा वगळता हे सर्व कवी संस्कृतचे पंडित होते. संस्कृत विदग्ध महाकाव्ये, भागवतादी पुराणग्रंथ, आणि गीताभाष्यादी तत्त्वज्ञान ग्रंथांचा त्यांचा अभ्यास होता.

मराठी वाङ्मयातील 'पहिले पंडित कविमंडळ' असे यांना संबोधावे लागेल. यांची काव्य-विषयक भूमिका मूलतः संस्कृत साहित्यशास्त्रीय असली तरी त्यांची काव्यनिर्मिती संस्कृतातील विदग्ध काव्यासारखी शुद्ध रूपातली झालेली नाही. भक्ती आणि तत्त्वज्ञान यांच्या प्रचाराचा हेतू धरून ही काव्यरचना झाल्याने येथे प्रयोजनसंकर झालेला आहे. मराठी साहित्यदृष्टीत प्रारंभापासूनच असा प्रयोजनसकर झालेला आहे. यामुळे या कवींची रचना विदग्ध महाकाव्य व आख्यान काव्य यांच्या सुंदर–असुंदर–मिश्रणाने सिद्ध झालेली दिसून येते.

## (५) काव्यकृतींचे वाङमयीन रूपात्मक वर्गीकरण

या काळातील काव्यकृती सामान्यतः चार वाङ्मयीन रूपात समाविष्ट होऊ शकतील.

(१) विदग्ध कथाकाव्य – नरेंद्राचे रुक्मिणी स्वयवर
– भास्कराचे 'शिशुपालवध'

(२) आख्यानकाव्य – दामोदराचे 'वच्छहरण'

(३) दीर्घ कथा-गीत-काव्य – महदंबेचे 'धवळे,' मातृकी रुक्मिणी स्वयंवर
(Long Narative Song)

(४) भाषकाव्य (= 'टीका'ग्रंथ) – भास्कराची 'उद्धवगीता'
– हयग्रीवांचा 'गजराज'
– पं. विश्वनाथांचा 'ज्ञानप्रबोध'

यांपैकी 'वच्छहरणा'स 'प्रकरण' म्हणता येईल (जसे मोरोपंतांची स्फुट प्रकरणे). 'भाष्यकाव्या' मध्येही 'शुद्ध भाष्य ग्रंथ' किंवा 'टीका ग्रंथ' म्हणून आणखी स्वतंत्र वेगळा विचार करता येईल. 'मूर्तिप्रकाश'; 'सह्याद्रिवर्णन' 'ऋद्धिपर वर्णन' ह्यांमध्ये मुख्यतः व्यक्तिदर्शन व स्थळमाहात्म्यवर्णन येते. ते कधी निवेदनाच्या तर कधी विदग्ध चित्रणाच्या पातळीवर गेल्याचे दिसते... त्या त्या वाङ्मयकृतीच्या संदर्भात याचा विशेष विचार पुढील प्रकरणात करण्यात येईल.

## (६) काव्यकृतींचा वाङ्मयीन परामर्श

यातील प्रत्येक काव्यकृतीचा पुढील अंगांनी परामर्श घेतला जाईल.

(१) काव्यकृतीचा विषय आणि आशयाचे स्वरूप.
(२) अभिव्यक्तीचे रूप.
(३) वाङ्मयीन गुण–दोषांची चिकित्सा.
(४) अन्य तत्सदृश काव्यकृतींशी (पूर्वकालीन, समकालीन) तुलना.
(५) त्यातील काव्यसौंदर्याचा विचार.
(६) महानुभाव तत्त्वदर्शनाशी संबंध.
(७) मूळ भूमिकेशी इमान... (?) इत्यादी...

## (७) उपसंहार

यादवकालीन महानुभाव काव्यकृतीचे मराठी वाङ्मयातील स्थान निश्चित करण्याच्या दृष्टीने ' उपसंहार ' लिहिण्यात येईल.

(१) महानुभाव कवींची मूळ वाङ्मयीन बैठक व अभिरुची संस्कृत साहित्य-शास्त्रीय असली तरी त्यांची धर्ममूल्ये व पंथीय दृष्टिकोण त्यात मिसळल्याने महानुभाव काव्य संस्कृत काव्याहून वेगळया दिशेने व वाटेनें गेल्याने दिसून येते. मराठीतील ' विदग्ध कथाकाव्य ' व ' आख्यान काव्य ' यांचा येथे प्रारंभ झाला. विदग्ध कथाकाव्याची निर्मिती मराठीमध्ये सातत्याने झाली नाही, पण उत्तरकालीन जी विदग्ध कथाकाव्यनिर्मिती (एक-नाथकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन) झाली. तीमध्ये नरेंद्राचे ' रुक्मिणी स्वयंवर ' ही निर्मिती ठरते. यादवकालातच विदग्ध कथाकाव्याच्या आदर्शाची निर्मिती झाली. (पुढे गुप्तलिपित ते झाकले गेल्याने प्रत्यक्ष आदर्श म्हणून ते उत्तरकालीनापुढे येऊ शकले नाही.)

(२) यादवकालीन काव्यातील शब्दकळा, अलंकार सृष्टी आणि भाषाशैली ही तत्कालीन गद्य-शैलीहून वेगळी आहेत, पण तत्कालीन इतर काव्यग्रंथांशी ती सदृश आहेत. यादवकालीन या शैलीचे विशेष व तिची कारणमीमांसा या ग्रंथाधारे सिद्ध करता येते, ती दिशा दर्शविणे.

(३) महदंबेचे ' धवळे ' संबंधी स्वतंत्र विचार... स्त्री गीते व लोकगीतांची चाल या दृष्टीने... यादवकालीन जीवनाशी जवळीक साधणारे, अधिक स्वाभाविक, काव्यगीत हे वेगळेपण.

(४) ' साती ग्रंथ ' या काव्य ग्रंथ – समूहाचा स्वतंत्र विचार... एका शतकातील ह्या कलाकृतीतून काव्यनिर्मितीसंबंधी काही विशेष ध्यानी येतात का ते पाहणे... आलेख काढता येतो का ते पाहणे...

(५) या ग्रंथांवरील अर्वाचीन टीकेचा परामर्श घेऊन ' मराठी पंडिती युगाचे आद्य प्रवर्तक ' या दृष्टीने या कवींचे स्थान निश्चित करणे... व पुढील कवीशी अनुबंध दर्शविणे.

## संदर्भ साधने


(१) वछाहरण – दामोदर पंडित
(२) मूर्तिप्रकाश – केशवराज
(३) धवळे – महदंबा
(४) मातृकी रुक्मिणी – महदंबा
(५) गद्यराज (स्तोत्र) – हयग्रीव व्यास
(६) रुक्मिणी स्वयंवर – नरेंद्र
(७) शिशुपालवध – भास्करभट्ट

(८) उद्धवगीता — भास्करभट्ट
(९) ज्ञानप्रबोध — पंडित विश्वनाथ बाळापूरकर
(१०) सह्याद्रिवर्णन — रवळोब्यास
(११) ऋधिपूरवर्णन — नारोबास

## प्रकरण सातवे : ज्ञानदेव : चरित्र, वाङमय व कार्य

**स्थूल रूपरेषा**

(१) प्रास्ताविक – चरित्राला परिचित आलेख.

(२) चरित्रविषयक वादांचा उल्लेख व स्थूल परिचय – विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई, विठ्ठलपंतांचा संन्यास, नंतरचा प्रपंच, विठ्ठलपंतांचे गुरू, शास्त्रबाह्य संसाराबद्दलच्या प्रायश्चित्ताचा प्रश्न, त्या उभयतांचा देहत्याग – ज्ञानदेव आदींचे जन्मस्थळ, जन्मशक – ज्ञानदेव एक की दोन ?

(३) ज्ञानदेवांच्या नावावर सांगितले जाणारे ग्रंथ, संशयित ग्रंथांचा निर्देश, त्यांचे तीन ग्रंथ व अभंगगाथा.

(४) ज्ञानदेवी, तिची जुन्यात जुनी प्रत, ज्ञानदेवी लिहिण्यातील हेतू व भूमिका, ज्ञानदेवीचे स्वरूप, ती गीताटीका की स्वतंत्र ग्रंथ, ज्ञानदेवांची टीकापद्धती, ज्ञानदेवीतील तत्त्वज्ञान, 'भाष्यकारांचे वाट पूसतु' यातील भाष्यकार कोण याबद्दलचा वाद, ज्ञानदेवीचे वाङ्मयीन गुणविशेष.

(५) अनुभवामृत, त्याचे स्वरूप, तत्त्वज्ञान वाङ्मयीन गुणविशेष.

(६) चांगदेवपासष्टी, स्वरूप, तत्त्वज्ञान, वाङ्मयीन गुणविशेष.

(७) अभंगगाथा व हरिपाठाचे अभंग – अभंगाची विश्वसनीयता – त्यातल्या त्यात मान्य असलेल्या अभंगातील प्रमुख विषय – हरिपाठाचे अभंग – विराण्या व गौळणी – कूट व योगपर अभंग – आत्मसाक्षात्कारपर अभंग – अभंगांतील तत्त्वज्ञान – वाङ्मयीन गुणविशेष.

ज्ञानदेवांचे तीन ग्रंथ व त्यांचा परस्परसंबंध – तीन ग्रंथांचा अभंगांशी असलेला संबंध – ज्ञानदेवांचे एकूण तत्त्वज्ञान व त्याचे विशेष – शांकर अद्वैत व काश्मिरी शैवाद्वैत यांचा संबंध – नाथ संप्रदाय व वारकरी संप्रदाय यांच्याशी असलेले नाते – ज्ञानदेवांचे वाङ्मयीन कार्य व विशेष – ज्ञानदेवांचे सांस्कृतिक कार्य – ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व – संत व कवी या दोन भूमिका – तेरावे शतक व ज्ञानदेव – महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील ज्ञानदेवांचे अनन्यसाधारण स्थान.

(संदर्भसाधने स्वतंत्रपणे दिलेली नाहीत.)

## प्रकरण आठवे : नामदेव : चरित्र वाङ्मय व कार्य (पृष्ठे ४०)

चरित्र :

(१) प्राचीन संतकवींच्या चरित्राभ्यासातील अडचणी

(२) नामदेवचरित्राची उपलब्ध साधनसामग्री

(३) नामदेवांचे पूर्वज आणि घराणे

(४) जन्मग्रामाचा वाद (मतमतांतरांचे समालोचन)

(५) जन्मकालाचा वाद (मतमतांतरांचे समालोचन)

(६) नामदेवांच्या चारित्र्यावरील आक्षेप (पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष)

(७) नामदेवांचे एकानेकत्व (नामा शिंपी, विष्णुदास नामा, नामा पाठक, पंजाबातील नामदेव, ज्ञानदेवसमकालीन नामदेव, इ )

(८) नामदेवचरित्रातील चमत्कार–कथांची नोंद

(९) नामदेवांचे गृहजीवन

(१०) नामदेवांचे तीर्थाटन

(११) नामदेवांच्या समाधिस्थलाचा वाद (समालोचन / निष्कर्ष)

(१२) समाधिशक १२७२ / इ. स. १३५०

वाङ्मय

(१) अभंगांची मौखिक परंपरा

(२) नामदेवांचे उपलब्ध अभंग (सर्व भाषांतील)

(३) प्रकाशित नामदेव वाङ्मय

(४) संहितानिश्चिती (मतमतांतरे व निष्कर्ष) [नाममुद्रा, प्रक्षिप्त अभंग, अभंगांचे अर्वाचीनीकरण, अपपाठ, पाठभेद, वारकरी पंथाची पाठांतर परंपरा]

(५) नामदेवांची प्रतिमा, बहुश्रुतता आणि अभ्यास

(६) अभंगगाथेतील सर्व अभंग–विषयांचा परिचय

(७) नामदेवांचे अभंगात्मक आत्मचरित्र (आत्मचरित्र हा एक वेगळा वाङ्मय-प्रकार, संतांची आत्मचरित्रविषयक भूमिका, बालभक्ती, प्रपंचजीवन, कच्चे मडके, गुरुभेट, डोळियांचे डोळे उघडणे, आत्मसाक्षात्कार, शतकोटी अभंगांची प्रतिज्ञा, आत्मकथनातील पारदर्शक प्रामाणिकपणा, त्यातून जाणवणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व; आत्मचरित्रात्मक अभंगांचे अवतरणासह समालोचन / सौंदर्यग्रहण) आद्य आत्मचरित्रकार.

(८) नामदेवकृत संतचरित्रे – (चरित्रात्मक वाङ्मयप्रकाराची वैशिष्टये, ज्ञानदेव-निवृत्तिनाथ–सोपानदेव–मुक्ताबाई-जनाबाई-गोरा कुंभार–सावता माळी, जगमित्र नागा, चोखामेळा इ. ची चरित्रे; अवतरणासह समालोचन, वाङ्मयीन सौंदर्यग्रहण, आद्य संतचरित्रकार.

(९) नामदेवांची आख्यानक कविता (कृष्णकथापर, रामकथापर काव्ये इ.) [ वाङ्मयप्रकार म्हणून या काव्याचे महत्त्व आणि त्यातील सौंदर्यदर्शन]

(१०) नामदेवांचे कूटात्मक अभंग ( Mystic poems ), कूटातील परमार्थ आणि आत्मसाक्षात्काराचा गूढानुभव, गूढगुंजनातील तरल भावसंवेदन. त्यातील वाङ्मयीन सौंदर्य.

(११) नामदेवांची भारुडे, लोककाव्ये, रूपके (वाङ्मयीन परामर्श)

(१२) नामदेवांचा हरिपाठ

(१३) अभंगांची छंदोरचना आणि भाषाशास्त्रीय विशेष

(१४) अभंगांतील भावगीतात्मकता आणि भावकवी म्हणून नामदेवांचे विशेषत्व

(१५) नामदेवांची हिंदी पदे, रचना (उपलब्ध पदांची संख्या, त्यांची संहिता-निश्चिती, ग्रंथसाहेबातील ६१ पदे), हिंदीतील निर्गुणसंप्रदायाचे आद्य प्रवर्तक, हिंदी पदांचे वाङ्मयीन विशेष, हिंदी आणि मराठी रचनांतील साम्य इ.

(१६) अभंगांतील वाङ्मयीन गुणांची व्याप्ती आणि मर्यादा

तत्त्वप्रणाली :

(१) नामदेवांचा वारकरी संप्रदाय आणि नाथ संप्रदाय (केवळ नामदेवांपुरता मर्यादित)

(२) नामदेवांची भक्तिप्रणाली (नामवेद)

(३) खेचरांचे शिष्यत्व आणि ज्ञानेश्वरांशी सांप्रदायिक अनुबंध

(४) नामदेवांचा विठ्ठल (सगुण–निर्गुणत्व, बालभक्ती आणि ज्ञानी भक्त)

(५) हिंदी संतमताचे प्रवर्तक म्हणून विशेषत्व

(६) शांकर मत, अळवार संत, नारद–शांडिल्यादीकांची भक्तिसूत्रे, नाथसंप्रदायाचे शांभव तत्त्वज्ञान, वेद–उपनिषदे–दर्शने, पुराणे–लोककथा इत्यादींचा त्यांच्या अभंगांवर प्रभाव.

(७) विचारधर्म आणि आचारधर्म

(८) नामदेवांच्या तत्त्वप्रणालीचा भावमय अभंगोद्गार

कार्यकर्तृत्व :

(१) वारकरी सांप्रदायिक कीर्तनपरंपरेचे आद्य प्रवर्तक

(२) उत्तर भारतात दीर्घकाल भ्रमण आणि वास्तव्य करणारे पहिले मराठी संत

(३) नामदेवांची उत्तर भारतीय शिष्य परंपरा

(४) महाराष्ट्रातील आणि उत्तर भारतातील त्यांचे लोकप्रबोधनाचे कार्य

(५) नामदेवांचे अनेक बाबतीतील आद्यत्व

(६) 'पंढरीरायाचा प्रेमभांडारी'

(७) 'तेणें केलासे विस्तार'

[टीप – (१) प्रस्तुतची रूपरेषा स्थूल स्वरूपाची आहे. प्रत्यक्ष लेखनात काही फेरफार होणे संभवनीय.]

(२) संदर्भ – साधने दिलेली नाहीत.

## प्रकरण नववे : ज्ञानदेव – नामदेवांची प्रभावळ (पृ ५०)

१. केवळ 'समकालीन संत' नव्हे, तर 'प्रभावळ'.

'प्रभावळ' या संकल्पनेचे स्पष्टीकरण.

### २. 'ज्ञानदेवें रचिला पाया'

तत्कालीन स्थिती, संस्कृतचे प्राबल्य, मराठीतून तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न व पुरस्कार, नाथ व वारकरी संप्रदायांच्या तत्त्वज्ञानाचा संगम. 'वाग्विलासें विस्तारू। गीतार्थे विश्व भरू', ज्ञान हाच देव. ज्ञानेश्वरांनी सांगितलेला नीतिविचार, 'मार्गाधारे वर्तावे'. भक्तीच्या क्षेत्रात सर्व वर्णांना, स्त्रियांना प्रवेश

### ३. नामदेवांनी केलेला विस्तार

ज्ञानेश्वरांबद्दल आदर, नामदेवांबद्दल जिव्हाळा. विलक्षण उत्कट व्यक्तिमत्त्व. नाम हाच देव. भागवत संप्रदायाचे तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरांपेक्षाही अधिक सोप्या शब्दांत अभंगवाणीच्या द्वारे सांगितले. त्यांची अभंगवाणी ही मराठीतील पहिली भावकविता. भक्ति हीच जीवननिष्ठा मानून सामान्यांच्याही अंतःकरणाला स्पर्श करील आणि त्याच्या मनात विश्वास निर्माण करील इतक्या सुबोधपणे व उत्कटपणे तिचे निवेदन. अभंगवाणीतून आपल्या मनाचे आर्त प्रकट करण्याची संतसाहित्याची सुरुवात नामदेवापासून.

नामदेव हे कीर्तनपरंपरेचे आद्य प्रवर्तक. श्रीविठ्ठलमाहात्म्य, श्रीक्षेत्रपंढरी, नामसंकीर्तन यांविषयीचे त्यांचे बोल अनेकांना मार्गदर्शक व अनुकरणीय. 'विष्णुदासां'चा आदर्श

### ४. सांप्रदायिक तत्त्वज्ञान आणि त्याचा समाजमनावर झालेला परिणाम

नाना देवदेवतांचे बंड. 'हरिहरा नाही भेद । करू नका वाद.' क्षुद्र देवतांचे पूजन. कर्मकांड. रूक्ष तार्किक पांडित्यावर आघात. ज्ञान–आत्मज्ञान 'ज्ञानापसि प्रेम उत्तम.' देव दगडात नाही. तो सज्जनांच्या ठायी आहे. वर्णविषमतेचा निषेध. जातिभेदातीत मानवतेची शिकवण. 'जे जे देखिजे भूत । ते ते जाणिजे भगवंत'. ज्ञानेश्वरप्रणीत चिद्विलासवाद आणि अजातवाद. हे पार्थिव विश्व असत्य नसून चित्तत्वाचेच ते रूप आहे, त्याचाच तो विलास आहे अशा नव्या जाणिवेची निर्मिती. या विचाराचा समाजमनावर परिणाम. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा हा पहिला स्त्रोत. कर्तव्य हीच ईश्वराची पूजा. 'जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले । तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥'. स्वधर्म, सामाजिक नीती, लोकसंग्रह, आदर्श पुरुषांची लक्षणे. मोक्षप्राप्तीसाठी संसार सोडण्याची आवश्यकता नाही. 'सुखे येतो घरा नारायण.' नामभक्ती हाच मार्ग. 'नाममंत्र सुलभ सोपारे'. यांतून सर्व समाजाला, तळागाळातल्या सामान्य स्त्री–पुरुषांनाही आत्मविकासाचा मार्ग खुला झाला. या वैष्णवांच्या मेळाव्यात पुरुष, स्त्रिया, ब्राह्मण, ब्राह्मणेतर, ज्ञानी, योगी, केवळ भक्तीने धन्य झालेले, साधेभोळे असे सर्व.

५. प्रभावळीतील संतांची व अन्य कवींची (उदा. सच्चिदानंद बाबा, कान्हो पाठक) चरित्रे, त्यांची वाङ्मयीन कामगिरी व सांप्रदायिक कार्यकर्तृत्व या अनुक्रमाने विवेचन. या संतांच्या जीवनातील – चरित्रातील चमत्कार कथांचा फक्त उल्लेख. ज्ञानेश्वरांची भावंडे, नामदेवांचे कुटुंबीय व संत जनाबाई, गोरा कुंभार, चोखोबा व त्यांचे कुटुंबीय, नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी, विसोबा खेचर, जगमित्र नागा, जोगा परमानंद, परिसा भागवत इ. संतांचे स्थूलरूपाने चरित्र आणि त्यांचे वाङ्मयात यांचा सविस्तर विचार. काव्यातून प्रकट होणारे या संतांचे व्यक्तिमत्व. त्यातील काव्यसौंदर्य. त्यांच्या व्यक्तिगत आणि आध्यात्मिक जीवनाचे त्यांच्या वाङ्मयात उमटलेले साद–पडसाद यांचा विचार. त्या वाङ्मयातून प्रकट झालेला पंथीय दृष्टिकोण. समाजस्थिती आणि 'संतांचे सामाजिक दुखणे'.

६. 'प्रभावळी'च्या वाङ्मयाचे गुणविशेष. त्यांच्या काव्यामागील प्रेरणा. त्यांच्या कवितेचे प्रयोजन. त्यात आढळणारा विविध रसांचा परिपोष. त्यांच्या अभिव्यक्तीने घेतलेली वेगवेगळी रूपे. ओवी, अभंग, गौळणी, विरहिणी, भावगीते, चरित्रे, आत्मचरित्रे, आख्याने, कूटात्मक अभंग, रूपके इ. चा विचार.

### ७. समारोप

ज्ञानेश्वर–नामदेवप्रणीत भागवत संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा परिपाक म्हणजेच ही प्रभावळ. अध्यात्माच्या क्षेत्रात स्थापन झालेली लोकशाही. संसार न सोडता आणि जातिभेद न पाळता आत्मोन्नती करता येते याची जाणीव. समाजातील सर्वसामान्यांना, स्त्री–शूद्रांना आत्मविकासाचा मार्ग खुला. या संप्रदायाने एक नवी जीवननिष्ठा, मानसिक सामर्थ्य

समाजाच्या ठिकाणी निर्माण केले. त्याच्या बळावर पुढील आक्रमणांना महाराष्ट्र तोंड देऊ शकला. देशभाषेचा पुरस्कार. सामान्य जनांच्या कळवळ्यातून आणि भाषाभिमानाने प्रेरित होऊन वाङ्मयनिर्मिती. मराठीच्या प्रारंभकाळच्या अशा या वाङ्मयात कवीचा आत्मविष्कार. त्याची विविध रूपे. श्रोतृवंदन. व्यापक मानवतावाद यांतून श्रेष्ठ जीवनमूल्ये आणि संस्कारसंपन्नतेचे दर्शन. उत्कट भावनानुभूती आणि जीवनानुभूतीतून वाङ्मय-निर्मितीची मुहूर्तमेढ.

या अभ्यासासाठी 'सकलसंतगाथा' खंड १ व २ (संपादक का. अ. जोशी) ही संहिता आधारभूत मानली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


| | | |
|---|---|---|
| आजगांवकर ज. र. | : | प्राचीन मराठी संतकवी |
| आजगांवकर ज. र. | : | संतशिरोमणी श्रीनामदेव व त्यांचे समकालीन संत |
| इनामदार हे. वि. | : | संत नामदेव |
| इनामदार हे. वि. (संपा.) | : | संत नामदेव : काव्यसंभार व संतपरिवार |
| कुलकर्णी श्री. मा. | : | ज्ञानेश्वरीतील शिकवण |
| केतकर श्री. व्यं. | : | प्राचीन महाराष्ट्र. खंड १ |
| ग्रामोपाध्ये गं. ब. | : | संतकाव्य-समालोचन |
| चांदोरकर गो. का. | : | महाराष्ट्रीय संत-कवि-काव्य सूचि |
| तुळपुळे शं. गो. | : | पांच संतकवी |
| देशमुख न. बा. (संपा.) | : | श्री ज्ञानेश्वरी दर्शन |
| पेंडसे शं. दा. | : | ज्ञानदेव व नामदेव |
| पेंडसे शं. दा. | : | ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान |
| फाटक न. र. | : | श्री ज्ञानेश्वर: वाङ्मय आणि कार्य |
| महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग | : | श्री ज्ञानेश्वर नवदर्शन |
| मोकाशी पं. रा. | : | महाराष्ट्रातील पाच संप्रदाय |
| सरदार गं. बा. | : | संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती |
| सुंठणकर बा. रं. | : | महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य |
| गोसावी र. रा. | : | पाच भक्तिसंप्रदाय |
| सरदार गं. बा. | : | 'चोखामेळा संतभला' हा 'कोलते गौरव ग्रंथा'तील लेख |
| गंगाखेड येथील संपादन | : | संत जनाबाई : चरित्र व काव्य |
| पांगारकर ल. रा. | : | ज्ञानेश्वरांची प्रभावळ<br>नामदेवांचा संतपरिवार |
| कदम सं. भा. | : | संत चोखामेळा यांचे चरित्र |

## प्रकरण दहावे : मुकुंदराज : चरित्र आणि वाङ्मय (पृष्ठे ३०)

**स्थूल रूपरेषा :**

(१) मुकुंदराजांची कालनिश्चिती.

(२) मुकुंदराजांचा जन्म, कार्य व समाधी यांची स्थलनिश्चिती.
अंबेजोगाई, अंभोरे, फलटण इत्यादी स्थानांचा साधकबाधक विचार.

(३) मुकुंदराजांचे जीवनचरित्र : उपलब्ध माहिती.
मुकुंदराजांच्या गुरुपरंपरेची चर्चा.
मुकुंदराजांची विविध नावे.

(४) 'विवेकसिंधू' : रचनाकाल, रचनास्थल व अन्य संदर्भ.

(५) 'विवेकसिंधू' चे पूर्वसूत्र.
'विवेकसिंधू' तील राजयोग.
'विवेकसिंधू' तील तत्त्वज्ञान.

(६) 'विवेकसिंधू' तील काव्य.

(७) कालसंदर्भात 'विवेकसिंधू' चे स्थान.

(८) 'विवेकसिंधू' चा उत्तर वाङ्मयावर प्रभाव. गुरुचरित्र, दासबोध, ग्रंथराज इ. उदाहरणे.

(९) मुकुंदराजांचे अन्य ग्रंथकर्तृत्व. मराठी व संस्कृत.

(१०) उपसंहार.

### अभ्यासाची साधने

**ग्रंथ :**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) विवेकसिंधू | – संपा. वि. कृ. आठल्ये | – | १९११ |
| | – संपा. कृ. पां. कुलकर्णी | – | १९५२ |
| | – संपा. गो. रा. गोगटे | – | १९५२ |
| | – संपा. रा. वि. बोबडे | – | १९६० |
| | – संपा. म. वि. गोखले | – | १९७८ |
| (२) परमामृत | – शिळाछाप पोथी | – | १८७६ |
| | – संपा. ना. के. खाजगीवाले | – | १९५० |
| | – संपा. ना. ह. भागवत | – | १९१६ |
| | – संपा. ग. बा. माटे | – | १९०९ |
| (३) चक्रपाणी | – डॉ. रा. चिं. ढेरे | – | १९७७ |

(४) प्राचीन वाङ्मयाचा इतिहास – पूर्वार्ध – अ. ना. देशपांडे – १९६६

(५) निवडक निबंध खंड १ – य. खु. देशपांडे

(६) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – ल. रा. नसिराबादकर – १९७२

(७) मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग । – ल. रा. पांगारकर – १९७२

(८) श्रीज्ञानदेव वाग्यज्ञदर्शन – १९७३.

(९) महाराष्ट्र सारस्वत (पुरवणीसह) - आ. ५ वी. – वि. ल. भावे, शं. गो. तुळपुळे

(१०) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप – ह. श्री. शेणोलीकर – १९६२

(११) मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास (प्राचीन खंड) – प्र. न. जोशी

(१२) श्रीज्ञानेश्वर विविध दर्शन, १९७५.

नियतकालिकांतील लेख

(१) नवभारत, ऑक्टोबर ५५, ऑक्टोबर ६०, मार्च ६२, सप्टेंबर ६९, मे ६०, ऑगस्ट ५५, नोव्हेंबर ५५

(२) म. सा. प., डिसेंबर ५८, जानेवारी ५४, जून ५३, मार्च ५४, ऑक्टोबर ५० मार्च ५९.

(३) सह्याद्री, मार्च ४५, ऑक्टोबर ४६, एप्रिल ४५, जुलै ३७

(४) चित्रमयजगत्, जून ५०

(५) प्रसाद, मार्च ७०, जानेवारी ७०

(६) युगवाणी, ऑगस्ट – सप्टेंबर

## प्रकरण अकरावे : संकीर्ण व स्फुट काव्य (पृष्ठे ४०)

रूपरेषा

प्रारंभिक रचना – १ ले ज्ञात मराठी पद्य – इतर

पद्य छंद संज्ञा – धवल व इतर गीतसंज्ञा – इतर गीतप्रकार – परंपरागत आदिकालीन कवी – (गोरखनाथ, गहिनीनाथ, मुकुंदराज) – महानुभावीय स्फुट काव्यरचना – (चौपदी, धुवा, अन्य गीते) – महानुभावी परंपरा – (विनायक बासांचा धुवा, केशिराजाचे गीत, नाइक बाइयेचे गीत) कृष्णभट काळे यांची पदरचना, 'स्मृतिस्थळ' समाप्तीचे गीत, एक जुने विरहगीत किंवा धावा, आणखी एक धावागीत – नासोबासांचे पद – कवि डिंभ याचे पद—

वारकरी संप्रदायाची गीतरचना (मुकुंदराज, ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई).

गेय पदबंधाचे स्वरूप – धवळे : एक लौकिक धाटणीचा गीतप्रकार – स्फुट ओवी : एक लौकिक पद्यप्रकार – (महदंबा, देमाइसा, साकाइसा, ओंकारबास 'भानखेंडी विजना' च्या ओव्या, गर्भकांड ओव्या) ज्ञानदेवादिकांच्या ओव्या.

दुसरा लौकिक पद्यप्रकार : रूपके : भारुडे ज्ञानदेव : (टिपरी, चवांळा कापडी) नामदेव (बागुका हुंबरी) चांगदेव (अंबुळी घोंगडी) विठा, चोखामेळा (वासुदेव जोसर) आनुष्ठानिक स्फुटरचना) स्तोत्रे, मूर्तिवर्णनस्तोत्र, गद्यराज स्तोत्र, निर्वेद स्तोत्र, मार्गमंजरी स्तोत्र, श्रीदत्तात्रेय स्तोत्र, मूर्तिवर्णनपर काव्य, 'पूजावसर' इत्यादी ग्रंथ' नामाचे दहा ठाय, 'प्रसाद सेवा' (गद्य प्रकरणे), आरत्या, काकडारत्या, पाळणे (पालखा) भूपाळ्या इत्यादी, इत्यादी.

(अभ्यासाची साधने स्वतंत्रपणे दिलेली नाहीत.)

## प्रकरण बारावे : संकीर्ण व स्फुट गद्य–महानुभाव व इतर (पृष्ठे ५०)

### संकीर्ण व स्फुट गद्य

**स्थूल रूपरेषा –**

**मराठी वाङ्मय निर्मितीतील गद्य लेखनाचे पूर्व रूप** (१) काव्य निर्मितीच्या संदर्भातील गद्यनिर्मितीच्या संदर्भातील अल्पप्रमाणाची कारणे. (२) विविध पंथसंप्रदायातील लेखकांनी केलेली गद्यनिर्मिती. (३) गद्यवाङ्मयाच्या परंपरेचे स्वरूप. (४) लोक भाषांशी असलेले दृढ नाते. (५) संस्कृत भाषा आणि वाङ्मय यांचा मराठी गद्यावरील परिणाम. (७) सांप्रदायिक लेखक वर्ग – गद्यनिर्मितीकडे कोणत्या भूमिकेतून बघतो त्याचे स्वरूप निर्मिती-प्रक्रिया आणि कारणमीमांसा.

(२) **गद्याचे स्वरूप : स्फुट – संकीर्ण – दीर्घ – शास्त्रीय.**

(१) गद्य निर्मितीतील सातत्य (२) विविध संदर्भी परंपरा. (३) संस्कृत (४) शास्त्रीय (५) विज्ञान (६) संगीत (७) वैद्यक (८) व्याकरण (९) न्यायशास्त्र (१०) साहित्यशास्त्र (११) वाङ्मयसमीक्षा (१२) शब्दकोश (१३) नर्तिके (१४) महाकाव्ये (१५) टीपग्रंथ (१६) स्थळग्रंथ (१७) लक्षणबंध (१८) इतिहास प्रकटन (१९) शास्त्रीय गद्याचे विविध प्रवाह (अ) विज्ञाननिष्ठ (ब) तर्कप्रधान (क) शास्त्रीय (२०) वाङ्मय चिकित्सा आणि कलाविचार.

(३) **ललित गद्याचे स्वरूप**

(१) शास्त्रीय गद्य निर्मितीशी असलेले नाते (२) ललित गद्य निर्मितीच्या विविध रूपकक्षा (३) विविध आकृतिबंधांचे स्वरूप आणि मर्यादा (४) लोकजीवनाशी असलेले नाते, त्यामुळे ललित गद्याला आलेले स्वरूप (५) सांप्रदायिकतेचा लेखनावरील परिणाम (६) वाङ्मयीन विशेष (७) **विविध परंपरांची मुहूर्तमेढ** : वाङ्मयप्रकार आणि आकृतिबंध (८) तत्त्वचर्चांचे स्वरूप : लालित्यावर झालेला परिणाम (९) ललित आणि ललितेतर गद्याच्या सीमारेषांवर असलेले स्फुट गद्य.

(४) **तात्त्विक चर्चा आणि गद्याची पंथनिष्ठा**

(१) भाष्यनिर्मिती : स्वरूप आणि चिकित्सा (२) निर्मितीप्रेरणा – अभिव्यक्तीची

प्रक्रिया (३) शास्त्रीय आणि ललित गद्यनिर्मितीतील तत्त्वचर्चांचा परस्परसंबंध (४) पंथनिष्ठांमुळे शास्त्रीय आणि ललित गद्याला आलेले रूप (५) रचनापद्धती–शैली विचार – लोककथात्मकता – भाषिक अभिमान – विज्ञाननिष्ठा – विचिकित्सा संपादन संकलन आणि संशोधनाचे पहिले आदर्श (६) आविष्कार भिन्न, पण निर्मितीची प्रेरणा आणि भूमिका अंतिमतः एकच.

**(५) संस्कृत वाङ्मयाचा मराठी गद्यानुवाद**

(१) अनुवाद वाङ्मयाचे स्वरूप (२) विविध निर्मिती (३) दीप ग्रंथ (४) भाष्य ग्रंथ (५) शब्दकोशांचे स्वरूप (६) संस्कृत परंपरेशी असलेले नाते.

**(६) निष्कर्ष :**

(अभ्यासाची साधने स्वतंत्रपणे दिलेली नाहीत).

## प्रकरण तेरावे : यादवकालीन मराठी साहित्यविचार (पृष्ठे ३०)

**(१) प्रास्ताविक**

मराठी काव्याच्या जन्माआधीचे ११ – १२ व्या शतकातले संस्कृत–प्राकृत काव्य आणि साहित्यशास्त्र यांची ओळख केवळ पार्श्वभूमी म्हणून. यातूनच तत्कालीन साहित्याभिरुचीचा अंदाज घेता येईल. संस्कृतज्ञ मराठी कवींनी यादवकालात जे साहित्य निर्माण केले, त्यासाठी त्यांना रूढ साहित्यशास्त्राहून काही वेगळी साहित्यदृष्टी स्वीकारावी व पुरस्कारावी लागली का ? ती का ? ही वेगळी साहित्यदृष्टी कोणती ? ह्याचा शोध घेणे हा या प्रकरणाचा मूळ उद्देश.

**(२) मराठी कवींची अनुभवसृष्टी व तदनुसार काव्यविचाराची आवश्यकता**

संस्कृत कवींच्याहून मराठी कवींची अनुभवसृष्टी अगदी भिन्न होती. अध्यात्मविवरण आणि आत्मसाक्षात्काराचे चित्रण हे मराठी कवींच्या काव्याचे प्रयोजन व स्वरूप होते. संस्कृत काव्याला व काव्यशास्त्राला हे नवे होते. यामुळे आपल्या काव्याच्या आकलनासाठी व रसास्वादासाठी आपली साहित्यदृष्टी रसिकांना देणे आवश्यक होते. ज्ञानेश्वरांनी हे कार्य केले. अर्थात ज्ञानेश्वर समग्र साहित्यशास्त्र मांडायला बसले नाहीत. पण आवश्यक तेवढा विचार त्यांनी प्रसंगपरत्वे निश्चितपणे आवर्जून केला आहे. ती त्यांची गरज होती.

महानुभाव पंडित कवींना मात्र अशी बाजू नव्हती. पौराणिक कथाप्रसंग–चित्रण आणि परमेश्वरचरित्र– कथन हेच त्यांचे काव्य हेतू होते. त्यामुळे सस्कृत साहित्यशास्त्राहून मूलतः काही वेगळे सांगण्याची त्यांना आवश्यकता नव्हती. काव्यप्रयोजन व फलश्रुती यापुरते त्यांचे वेगळेपण जाणवते.

**(३) महानुभाव कवींची काव्यदृष्टी**

महानुभावांच्या काव्यकृतींतून विखुरलेले साहित्यविचार एकत्रित करून त्यातून त्यांचा

साहित्यविचार स्पष्टपणे मांडणे–उपमा, श्लेष, प्रतिमा यासंबंधीचे विवेचन. त्या एकंदर विचाराचे पारंपारिक स्वरूप विशद करणे.

(४) ज्ञानेश्वरांचा काव्यविचार

ज्ञानेश्वरांची साहित्यशास्त्रीय मूळ बैठक संस्कृत साहित्यशास्त्राची, पण आपल्या काव्यनिर्मितीच्या व काव्यास्वादाच्या संदर्भात मूळ संकल्पनांना त्यांनी दिलेली नवी परिमाणे व अर्थ यांचा विचार महत्त्वाचा. काव्यप्रयोजन, शब्दशक्ती, काव्यकारण, काव्य-लक्षण, शांतरसाचे श्रेष्ठत्व, रसिक व रसास्वाद–प्रक्रिया, काव्यानंद इत्यादींसंबंधी ज्ञानेश्वरांचे विचार स्वतंत्रपणे पाहणे आवश्यक. ज्ञानेश्वरांचा काव्यासंबंधीचा सामग्र्याने दृष्टिकोण मांडून त्याची मुकुंदराजांच्या भूमिकेशी तुलना.

(५) उपसंहार

ज्ञानेश्वरांचा साहित्यविचार हा प्राचीन मराठी संतसाहित्याच्या आकलन-आस्वादाला आवश्यक असा विचार आहे.

वाचे बरवें कवित्व । कवित्वी रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्त्व –। स्पर्शु जैसा ॥

–हे मराठी संतकाव्याचे मूल लक्षण आहे. ते कोणत्याही श्रेष्ठ साहित्याचं मूल लक्षण ठरू शकते. ज्ञानेश्वरांनी काव्यातील शब्दशक्तीचा केलेला विचार हाही मूल स्वरूपाचा व फार महत्त्वाचा आहे. केवळ मराठी साहित्याचा नव्हे तर मराठी साहित्यविचाराचाही पाया यादवकालातच घातला गेला.

(अभ्यासाची साधने दिलेली नाहीत.)

## प्रकरण चौदावे : उपसंहार (पृष्ठे ३०)

प्रारंभ ते इ स. १३५० या कालखंडातील वाङ्मयाचे एकूण स्वरूप–वाङ्मय विकासाचा आलेख – समाजाच्या स्थितिगतीशी या वाङ्मयाचा अनुबंध–वाङ्मय विचार, भाषिक विशेष, वाङ्मयीन प्रेरणांच्या स्वरूपाचा शोध, वाङ्मय-प्रकारांच्या स्वरूपाचे व विकासाचे विवेचन.

पुढील काळावर प्रभाव व पुढील काळाशी अनुबंध इत्यादी.

(अभ्यासाची साधने दिलेली नाहीत.)

## विविध सूची : सूचींची रूपरेषा (पृष्ठे ३०)

१. उल्लेख सूची

या सूचीत, ग्रंथात येणाऱ्या व्यक्ती, संस्था, विषय, महत्त्वाचे ग्रंथ यांच्या उल्लेखांची नोंद करण्यात येईल.

उदाहरणार्थ,

अज्ञानसिद्ध नागेश – (पृष्ठ क्रमांक)
चक्रधर – ,,
चोंभा – ,,
महानुभाव – आचार – तत्त्वज्ञान पृ. क्र.
मुकुंदराज – विवेकसिंधु (पृ. क्र.)
विवेकसिंधु – ,,
ज्ञानेश्वर – ,,
ज्ञानेश्वरी – ,, इत्यादी

**२. संदर्भ साहित्य सूची**

ग्रंथ या प्रकरणातून निर्दिष्ट झालेली आणि अन्य उपयुक्त अभ्यासाची साधने.

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहास-लेखनाची ही रूपरेषा शक्य तेवढी शास्त्रपूत आणि सर्वंकष करण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यासकांना आणि ज्ञानी वाङ्मयेतिहास-कारांना या रूपरेषेचा उपयोग होईल— व्हावा, अशी अपेक्षा आहे.

□ □ □

REFBK-0026196

# ॥ श्री ज्ञानेश्वर ॥
## आणि संतमंडळ

डॉ. हे. वि. इनामदार

विठो माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ॥
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ॥
पुढे चाले ज्ञानेश्वर मागे । मुक्ताई सुंदर ॥
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ॥
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ॥
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ॥



